# १

# शीतयुद्ध

**घटक रचना :**

१.० उद्दिष्टये

१.१ प्रस्तावना

१.२ शीतयुध्दाचा अर्थ व्याख्या

१.३ शीतयुध्दाचे प्रकटीकरण

१.३.१ दोन महासत्तांचा उदय

१.३.२ लोकशाही विरुध्द साम्यवाद-वैचारिक संघर्ष

१.३.३ पूर्व युरोपात रशियाचे वर्चस्व

१.३.४ तुर्कस्थानाचा पेचप्रसंग

१.३.५ रशियाची इराणमधील माघार

१.३.६ टुमन सिध्दांत

१.३.७ शीतयुध्दाकालीन संरक्षक करार

१.३.८ बर्लिनची तटबंदी

१.३.९ यु.टु. प्रकरण

१.३.१० कोरियन प्रश्न

१.३.११ क्युबा प्रश्न

१.३.१२ हंगेरियातील उठाव

१.३.१३ १९७०-८० या कालखंडातील शीतयुध्द

१.३.१४ शीतयुध्दाचा शेवट इ.स. १९८० नंतरचे शीतयुध्द

१.४ सारांश

१.५ प्रश्न

१.६ संदर्भ

munotes.in

## १.० उद्दिष्ट्ये

प्रस्तुत प्रकरणामध्ये आपण शीतयुध्दाबद्दल अभ्यास करणार आहेत. प्रथम आपण.

- शीतयुध्दाचा अर्थ व व्याख्या समजावून घेणार आहेत.
- शीतयुध्दाबद्दल रीतसर माहीती, यामध्ये अमेरिका व रशिया हे देश महासत्ता म्हणून कसे संबोधले जाऊ लागले तसेच साम्यवादाचा प्रचार व पूर्व युरोपमध्ये रशियाचे वर्चस्व कसे झाले.
- तसेच तुर्कस्थानचा प्रेचप्रसंग, इराण मधील रशियाची माघार कशी झाली, त्यानंतर ट्रूमन यांचा सिध्दांत व संरक्षक करार कसा अमलात आणला.
- बर्लिनची तटबंदी, यु-टू प्रकरण, कोरियन प्रश्न, क्युबा प्रश्न हंगेरी उठाव, १९७० ते १९८० पर्यंत शीतयुध्दा कालखंड व १९८० नंतरचे शीतयुध्द याबद्दल अभ्यास करणार आहोत.

प्रस्तुत प्रकरणामध्ये शीतयुद्ध या शब्द प्रयोगाचा उगम कसा झाला. त्याचा अर्थ काय ? ते कधी सुरु झाले ? या प्रश्नांचा मागोवा घेणार आहोत. खरे तर दुसर्या महायुद्धानंतर अमेरिका व रशिया या दोन महासत्तांचा उदय  झाला व त्यांनी परस्पर विरोधी धोरण स्वीकारून विविध देशांना हाताशी घेऊन आपला गट प्रभावी करण्यास सुरुवात केली, त्यातून कोणतेही युद्ध नसतांना शांततेच्या काळातही या दोन गटात कमालीचीअस्वस्थता व संघर्ष वाढला. लोकशाही विरुद्ध साम्यवादी गट असे स्वरूप या शीतयुद्धाला प्राप्त झाले. अमेरिका व रशिया हे दोन देश आपल्या सुरक्षेसाठी ताकद वाढवू लागले. त्यातून अण्वस्त्रस्पर्धा सुरु झाली. या शीतयुद्धामध्ये अनेक देशांचे प्रचंड नुकसान झाले. काही देशांचे विभाजन झाले अशा अनेक समस्या निर्माण होऊन जग तिसऱ्या महायुद्धाच्या छायेत जगू लागले. या सर्व गोष्टींचा अभ्यास करणे हे महत्वाचे उद्दिष्ट या प्रकरणाचे आहे.

## १.१ प्रस्तावना

दुसऱ्या महायुद्धाची परिणति म्हणजे आंतरराष्ट्रीय संबंधात निर्माण झालेले शीतयुद्ध. दुसरे महायुद्ध चालू असतानाच रशिया आणि पाश्चिमात्य राष्ट्रे यांच्यात वैचारिक मतभेद दिसून येण्यास सुरूवात झालेली होती.

जपानच्या हिरोशिमा आणि नागासाकी या दोन औद्योगिक महत्त्वाच्या शहरांवर इ.स. १९४५ मध्ये अमेरिकेने दोन बाँब टाकले. त्यामुळे जपानच काय, पण जगातील सर्व राष्ट्रे भीतीने हादरली. अखेर १५ ऑक्टोबर १९४५ रोजी जपान शरण आले आणि दुसऱ्या महायुद्धाचा शेवट झाला.

आता रणांगणांवरील तप्त युद्ध संपले होते आणि सत्ताचे वैचारिक युद्ध सुरू झाले. “शीत युद्ध” दुसऱ्या महायुद्ध नंतर सुरू झाले असले तरी त्याची पाळेमुळे आपल्याला १९१७ च्या रशियन क्रांतीत सापडतात. त्या क्रांतीने पाश्चिमात्य लोकशाही राष्ट्रांना त्यांच्या जीवनमूल्यांना व त्यांच्या व्यापाराच्या तत्त्वांना किंवा त्यांच्या संस्कृतीलाच जबरदस्त आव्हान दिले.

समाजवाद हा भांडवलशाही अर्थव्यवस्थेला फार मोठा धोका व आव्हान आहे असे अमेरिका व पश्चिम युरोपीय राष्ट्रांना वाटले. रशिया साम्यवाद सर्व जगामध्ये पसरविण्यास आतुर होता, तर अमेरिका व युरोपातील इतर देश रशियाबाबत साम्यवादी राज्याच्या स्थापनेपासून साशंक होते. द्वितीय महायुद्ध सुरू झाल्यावर अमेरिका व रशिया वगळता इतर देश महायुद्धामुळे बेचिराख झाले होते. या परिस्थितीचा फायदा घेऊन रशियाने जगात साम्यवाद पसरवण्याचे प्रयत्न सुरू केले. जगातील इंग्लंड व फ्रान्सचे वर्चस्व संपुष्टात येऊन अमेरिका व रशिया या दोन महास त्तांमध्ये जगात प्रभुत्व स्थापन करण्यावरून संघर्ष सुरू झाला.

महायुद्धानंतर शस्त्रांचा संघर्ष संपला पण कटू शब्द आरोप-प्रत्यारोप, एकाचा दुसऱ्याविरुद्ध प्रचार, कुटिल नीतीचे डावपेच वगैरेंना प्रारंभ झाला. दारुगोळ्यांचा संघर्ष संपला पण वर्तमानपत्राच्या व प्रसार माध्यमांच्याद्वारे राष्ट्रनितीचे युद्ध सुरू झाले होते. आंतरराष्ट्रीय राष्ट्रनितीमध्ये या युद्धाला "शीतयुद्ध" म्हटले जाते.

## १.२ शीतयुद्धाचा अर्थ व व्याख्या

"शीत युद्ध" हा शब्दप्रयोग प्रथमत: अमेरिकन मुत्सद्दी बर्नाड बरुच (Bernard Baruch) यांनी जागतिक तणावपूर्ण परिस्थितीच्या संदर्भात वापरला. १९४७ च्या वसंत ऋतूत सोव्हिएट रशिया आणि इतर पाश्चिमात्य "मुक्त जग" यांचे संबंध कसे आहेत, ह्या प्रश्नाला उत्तर देताना प्रा. वॉल्टर लिप्पमन याने स्पष्ट केले की, त्या दोन राष्ट्रात शीत युद्ध चालू आहे असे मी समजतो.

**१.२.१** एस.एन.धर यांच्या मते दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका व रशिया एकमेकांच्या विरुद्ध उभे राहिले आणि तिसर्या महायुद्धाला सज्ज होण्याची भाषा सुरू झाली. यालाच शीतयुद्ध म्हणता येईल.

**१.२.२** प्रा. यंग. हूम. किम यांनी शीतयुद्धाचे स्पष्टीकरण करताना म्हटले आहे की, "शीतयुद्ध" या संज्ञेची नक्की व्याख्या करता येत नसली तरी मुक्त अर्थ व्यवस्थेचे जग व साम्यवादी जग पर्यायाने अमेरिका व सोव्हिएट रशिया यांच्यातील ताण-तणाव व संघर्ष म्हणजे "शीतयुद्ध" होय.

**१.२.३ एनसायक्लोपीडिया ब्रिटानिका मध्ये शीतयुद्धाची व्याख्या पुढीलप्रमाणे आहे.**

(Encyclopeadia Britania - Vol. VI)

The term loosely used to describe the Powers Struggle with its Political, Diplomatic and Ideological conflicts and military threats, that arose after 1945 between the Communist and the Western Democratic Captalists Nation specially between Soviet Union and the United States.

१९४५ नंतर साम्यवादी राष्ट्रे आणि पाश्चिमात्य भांडवलशाही राष्ट्रे यांच्यात आणि विशेषत: सोव्हिएत युनियन आणि युनायटेड स्टेटस् यांच्यात राजकीय, वैचारिक आणि कूटनितीच्या पातळीवर जो संघर्ष निर्माण झाला त्याला शीतयुद्ध असे नाव पडले.

## १.३ शीतयुद्धाचे प्रकटीकरण (MANIFESTATION OF THE COLD WAR)

### १.३.१ दोन महासत्तांचा उदय (Emergence of Super-Powers) :

रोम - बर्लिन - टोकिओ अक्ष सत्तांचा (Axis Power) वॉशिंग्टन - लंडन - मॉस्को दोस्त राष्ट्रांनी दुसऱ्या महायुद्धात निर्णायक पराभव केल्यानंतर आंतरराष्ट्रीय संबंधाना व राजकारणाला वेगळे वळण मिळाले. दुसऱ्या महायुद्धात जर्मनी, इटली व जपान यांचा पराभव झाल्यानंतर जागतिक राजकारणातील इंग्लंड व फ्रान्सचे महत्त्व कमी झाले व अमेरिका व रशियाचे वर्चस्व वाढले.

युद्ध काळात दोस्त राष्ट्रांची मैत्री केवळ एक व्यवहार म्हणून झाली होती. या मैत्रीत प्रेम नव्हते. फक्त समान शत्रूचा पराभव करणे या व्यवहारीक उद्देशाने दोस्त राष्ट्रांची मैत्री झाली होती. महायुद्धानंतर जगाच्या राजकारणातील इंग्लंड व फ्रान्सची जागा आता अमेरिका व रशिया यांनी घेतली व पुढे ते दोन राष्ट्र जगातील राजकारणात आपले वर्चस्व निर्माण करण्यासाठी स्पर्धा करू लागले.

### १.३.२ लोकशाही विरुद्ध साम्यवाद-वैचारिक संघर्ष:-

अमेरिका व रशिया या दोन राष्ट्रांतील सैद्धांतिक आणि वैचारिक मतभेद शीतयुद्धाच्या निर्मितीचे महत्त्वाचे कारण आहे असे म्हटले जाते. जीवनमूल्ये, नैतिक मूल्ये आणि राजकीय विचारप्रणाली याबाबतीत दोन्ही देशात सतत मतभेत आहेत हे दिसून येते. पहिल्या महायुद्धानंतर मार्क्सवादी, साम्यवादी राष्ट्रांचा गट हा कामगार वर्गाच्या हिताचे रक्षण करणारा व साम्यवादाविरोधी आणि लोकशाहीवादी राष्ट्रांचा गट असे दोन गट पडले. पहिल्या गटाचे नेतृत्व रशियाने तर दुसऱ्याचे नेतृत्व अमेरिकेने करण्यास सुरूवात केली. तेव्हापासून जगाच्या राजकीय घडामोडींचे विश्लेषण या दोन परस्परविरोधी तत्वप्रणालींच्या संदर्भातून केले जाते.

सैद्धांतिकदृष्ट्या विरोधी असलेल्या साम्यवादाचा प्रवाह थांबविण्याचा प्रयत्न अमेरिका व युरोपातील ब्रिटन, फ्रान्स ही राष्ट्रे करीत होते. याचवेळी रशिया जगात साम्यवाद पसरविण्याचा प्रयत्न करीत होता. यातून शीतयुद्धाची निर्मिती झाली.

### १.३.३ पूर्व युरोपात रशियाचे वर्चस्व :

पूर्व युरोपातील राष्ट्रांना आपल्या नियंत्रणाखाली आणण्यासाठी रशियाने पावले उचलली. रशियाने पूर्व युरोपात साम्यवाद पसरवण्यासाठी पद्धतशीर प्रयत्न सुरू केले. नाझी सैन्यांच्या अत्याचारांपासून पूर्व युरोपातील राष्ट्रांना लाल सेनेने मुक्त केले. त्याठिकाणच्या स्थानिक भूमीगत साम्यवादी व राष्ट्रवादी नेत्यांच्या पुढाकाराने पोलंड, हंगेरी, रूमानिया व झेकोस्लोव्हाकिया या राष्ट्रांत साम्यवादी सरकारे स्थापन केली. काही ठिकाणी रशियाने संयुक्त आघाडीचे सरकार स्थापन करून देखावा केला. परंतु खरी सत्ता कट्टर साम्यवाद्याच्याच हाती राहिली.



munotes.in

रशियाने इ.स. १९४३ ते १९४८ या काळात झेकोस्लोव्हाकिया, पोलंड, रुमानिया, हंगेरी, बल्गेरिया, युगोस्लाव्हिाया आणि फिनलंड या देशांशी मैत्री सहकार्य व परस्पर सहकार्याचे करार घडवून आणले त्याचप्रमाणे रशियाने इस्टोनिया, लिथुआनिया, लटाव्हिया ही तीन बाल्कन राष्ट्रे सुद्धा कक्षेत आणली.

### १.३.४ तुर्कस्थानचा पेचप्रसंग :

तुर्कस्थान आपल्या नियंत्रणाखाली आणण्याचा रशियाने अनेक शतके प्रयत्न केला होता. त्याचे मुख्य कारण म्हणजे त्या राष्ट्रांच्या सीमांतर्गत असलेल्या काळा समुद्र व मेडिटरेनियन समुद्राला जोडणार्या डार्डनेल्स व बॉस्फोरस या दोन समुद्रधुन्यांना विशेष महत्त्व आहे. पहिल्या महायुद्धानंतर रशियाने भूमध्य समुद्र आपल्या वर्चस्वाखाली असावा याचा आटोकाट प्रयत्न केला.

रशियाने इ.स. १९३६ मध्ये तुर्कस्थानाशी करार करून या समुद्रधुनीवर वर्चस्व मिळवले होते; परंतु या कराराचा भंग तुर्कस्थानाने वारंवार केलेला होता. करार भंग केल्याचा आरोप इ.स. १९४६ मध्ये रशियाने तुर्कस्थानकडे केला त्यावेळेस तुर्कस्थानने अमेरिकेची मदत घेतली. अमेरिकेच्या हस्तक्षेपामुळे तुर्कस्थान रशियाच्या नियंत्रणाखालून सहीसलामत बाहेर पडला.

### १.३.५ रशियाची इराणमधील माघार :

इराणची भौगोलिक स्थिती व तेथील खनिज तेलाचे साठे या दोन्ही दृष्टींनी इराणचे महत्त्व सर्वच राष्ट्रांना जाणवत होते. दुसऱ्या महायुद्धकाळात ऑगस्ट १९४१ मध्ये इंग्लंड व सोव्हिएत रशिया यांच्या फौजांनी इराणच्या दक्षिण भागातील अंग्लो-इराणियन ऑईल कंपनीचे तेल व भारताकडे जाणारा मार्ग यांचे संरक्षण करण्याकरिता इराण व्यापले.

मे १९४५ मध्ये नाझींचा पराभव होताच सर्व परकीय फौजांनी इराण सोडून माघारी जावे अशी मागणी इराणने केली. एप्रिल १९४६च्या प्रारंभी सोव्हिएत संघ व इराण यांत करार घडून आला. त्यानुसार एक सोव्हिएत -इराण ऑईल कंपनी स्थापन व्हावी त्यात २५ वर्षेपर्यंत ५१ टक्के शेअर्स सोव्हिएत संघाचे असावेत; पण सोव्हिएत फौजा माघारी जाताच इराण सरकारने सोव्हिएत संघाशी झालेला करार उधळून लावला. त्याला अमेरिकेचा पाठिंबा होता.

### १.३.६ ट्रूमन सिद्धांत (Truman Doctrine) :

पूर्व जर्मनी व पूर्व युरोपातील देश रशिया आपल्या प्रभावाखाली आणत असल्याने अमेरिकेने याकडे गंभीररित्या पहाण्याचा निर्णय घेतला. साम्यवाद्याच्या धोक्यापासून पूर्व युरोप व मध्यपूर्व वाचवण्यासाठी अमेरिकेने खंबीरपणे पावले टाकण्यास सुरूवात केली.

ग्रीस, तुर्कस्थान व इराण या देशांतील परिस्थिती हाताबाहेर जात आहे हे लक्षात येताच हॅरी ट्रूमन यांनी या समस्येचा विचार करण्यासाठी १२ मार्च १९४७ ला सिनेटची बैठक बोलावली. यामध्ये साम्यवादाला आळा घालण्यासाठी तसेच मध्यपूर्वेत शांतता व

सुव्यवस्था टिकविण्यासाठी येथील राष्ट्रांचे स्वातंत्र्य आबादीत राहणे अत्यंत आवश्यक आहे.

ट्रूमन सिद्धांत म्हणजे जगात कोठेही प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष आक्रमण होऊन जगातील शांतता धोक्यात आली आहे. तर अमेरिकेची सुरक्षितता धोक्यात आली आहे असे मानले जाऊन अमेरिका त्या प्रकारणात हस्तक्षेप करील. ह्या सिद्धांतामुळे ग्रीस, तुर्कस्थान व इराण यांना साम्यवादापासून दूर ठेवण्याचे काम अमेरिकेने केले.

### १.३.७ शीतयुद्धकालीन संरक्षक करार (Security pacts and Treaties) :

#### A) रिओ करार (The Rio Pact 1947) :

रशिया व अमेरिकेच्या शीत युद्धात अमेरिकेने युरोपात साम्यवादाचे आक्रमण रोखले परंतु अमेरिकेला अशी भीती वाटत होती की अमेरिका खंडात साम्यवादाचा विस्तार होणार नाही याची खात्री काय?

यासाठी अमेरिका खंडातील एक बैठक १९४७ मध्ये रिओ-डी-जानेरो मध्ये बोलावली व अमेरिकांतर्गत परस्पर सहकार्याचा करार (Inter American Treaty of Raciprocul Assistance) घडवून आणला. या करारापासून नाटो संघटनेची कल्पना हळूहळू जन्म घेऊ लागली.

#### B) डंकर्कचा तह (Treaty of Duncark) - 1947 :

जर्मनीच्या संभाव्य संकटाला तोंड देण्यासाठी अमेरिकेच्या संयुक्त संस्थानाप्रमाणे युरोपचा देखील संयुक्त संघ तयार करावा. अशी इंग्लंड व फ्रान्सची इच्छा होती. आर्थिक साह्याची योजना अमेरिकेने मार्शल योजनेद्वारे केली होती. तशीच लष्करी कार्यासाठीसुद्धा अशी योजना असावी अशी इंग्लंड व फ्रान्सची कल्पना होती. त्यामधूनच या तहाचा उदय झाला. हा तह ५० वर्ष मुदतीचा होता.

#### C) ब्रुसेल्सचा तह (Treaty of Brussels) - 1948 :

युरोपातील झेकोस्लोव्हाकियातील उठाव, रशिया, फिनलँड समझोता या घटनांमुळे रशिया कोणत्याही क्षणी पश्चिम युरोपवर आक्रमण करणार अशी इंग्लंड - फ्रान्सला धास्ती वाटू लागली. यावर सुरक्षिततेचा उपाय म्हणून १७ मार्च १९४८ रोजी फ्रान्स, इंग्लंड, बेल्जियम, नेदरलँडस व लकझेंबर्ग यांच्यात ब्रुसेल्सचा तह घडून आला.

#### D) उत्तर अटलांटिक करार संघटना (NATO) - 1949 :

दुसऱ्या महायुद्धानंतर जर्मनीचे अमेरिका व रशियामध्ये वाटप झाल्यामुळे जो काही पूर्व पश्चिम तणाव वाढू लागला होता. त्यामधूनच रशियाचे साम्रज्य थोपवण्यासाठी भक्कम उपाय योजना करण्याचा निर्णय घेतला. या निर्धारातूनच पश्चिम करारातील सर्व राष्ट्रे सामील झाली.

नाटो करारावर ४ एप्रिल १९४९ रोजी अमेरिका, फ्रान्स, इंग्लंड, इटली, बेल्जियम, डेन्मार्क, लकझेंबर्ग, नेदरलँड, नॉर्वे, पोर्तुगाल, कॅनडा व आयर्लंड या १२ राष्ट्रांनी स्वाक्षर्या

केल्या. १९५२ मध्ये ग्रीस, तुर्कस्थान व १९५५ मध्ये पश्चिम जर्मनी नाटो करारात सामील झाले.

**E) अंझुस करार - 1947 (Australia - New Zeland United States Organization) :** चीनमधील साम्यवाद्यांचा विजय व जपानचा संभाव्य लष्करवाद या संकटांना तोंड देण्यासाठी अँझ्युस (ANZUS) ही करार संघटना जन्माला आली. ऑस्ट्रेलिया - न्यूझिलंड-अमेरिका या राष्ट्रांनी अस्ट्रेलिया खंडाच्या सुरक्षिततेसाठी प्रादेशिक पातळीवर केलेला हा संरक्षक करार १२ जुलै १९५१ रोजी घडून आला.

**F) सीटो करार (South East Asia Treaty Organisation) :**

शीतयुद्ध अमेरिका व युरोपखंडापुरते मर्यादित न राहता ते आशिया व मध्य पूर्व या भागातही पसरले पश्चिम आशिया व मध्यपूर्व ही तेलक्षेत्रे असल्याने त्यांच्यावर मालकी हक्क व वर्चस्व ठेवण्यासाठी रशिया व अमेरिकेमध्ये चढाओढ निर्माण झाली.

तसेच आशिया खंडामध्ये साम्यवादी विचारसरणी पसरू नये म्हणून आशिया खंडातील संरक्षणासाठी फिलीपाईन्सची राजधानी मॅनिला (मनिला) या ठिकाणी बैठक बोलण्यात आली. या परिषदेस अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, ऑस्ट्रेलिया, पाकिस्थान, फिलिपाईन्स व थायलंड ही राष्ट्रे उपस्थित राहीली आणि ८ सप्टेंबर १९५४ रोजी “आग्नेय आशिया करार संघटना” स्थापना झाली.

**G) बगदाद करार संघटना (The Baghdad Pact - 1955)**

अरब संघात तीव्र मतभेद झाल्यानंतर मध्यपूवेत एक प्रबळ संघटना निर्माण करण्यास वेग आला. त्यामधून इराक व तुर्कस्थान यांच्यात बगदाद करार २४ फेब्रुवारी १९५५ रोजी घडून आला. ज्या राष्ट्रांचे मध्यपूर्वेशी हितसंबंध गुंतले आहेत. अशी राष्ट्रे उदा. इंग्लंड, पाकिस्थान व इराण या करारात सामील झाले. यामुळे या कराराची व्याप्ती वाढल्याने त्यास मध्यवर्ती करार संघटना (Central Treaty Organization - CENTO) सेंटो असे नाव देण्यात आले.

H) **वॉर्सा करार** (Warsaw Pact)- 1955

अमेरिकेच्या प्रेरणेने पूर्व युरोपात घडत असलेला घटनांचा विचार करण्यासाठी सोव्हिएत रशियाने डिसेंबर १९५५ मध्ये हंगेरी, झेकोस्लोव्हाकिया, अल्बानिया, बल्गेरिया, पूर्व जर्मनी, पोलंड, रुमानिया, सोव्हिएत रशिया अशा आठ राष्ट्रांची एक परिषद पोलंडची राजधानी वॉसी येथे भरली.

या बैठकीमध्ये मैत्री, सहकार्य व परस्पर मदतीचा करार (Treaty of Friendship Co-operation and Mutual Assistance) करण्यात येऊन सभासद राष्ट्रांचे संयुक्त सेनादल उभारण्याचे ठरले म्हणून या करारास वॉर्सा करार असे संबोधण्यात आले.

### १.३.८ बर्लिनची तटबंदी

दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरी जर्मन प्रश्न सोडविण्याचा प्रयत्नांची परिणती ज्याप्रमाणे जर्मनीच्या विभाजनात झाली. त्या परिस्थितीमुळे राजधानी बर्लिन शहराचेही विभाजन झाले. बर्लिन शहर हे सोव्हिएत रशिया व्याप्त जर्मन प्रदेशात होते व पाश्चिमात्यांनी व्यापलेल्या पश्चिम जर्मनीच्या पूर्व सीमेपासून सुमारे ११० मैल आत होते दोस्त नियामक मंडळाच्या १९४५ मध्ये झालेल्या बैठकीच्या निणयानुसार तीत वायुमार्ग मोकळे ठेवण्यात आले होते.

जून १९४८ मध्ये पश्चिमी देशांनी जर्मनीमध्ये एक चलन सुरू केले व कारभारात सुव्यवस्था आणली. चलन संबंधीच्या त्या पाश्चिमात्य राष्ट्रे जर्मनीचे विभाजन पक्के करीत आहेत असा रशियाचा आरोप होता. रशियाने पूर्व बर्लिनमध्ये चलनात सुधारणा केली; परंतु पश्चिम जर्मनीतील त्या कार्यवाहीला प्रत्युत्तर म्हणून रशियाने बर्लिनची कोंडी केली. २४ जून १९४८ रोजी पश्चिम बर्लिन व पश्चिम जर्मनी यातील रस्ते रेल्वे व जलमार्ग हे दळणवळणाचे मार्ग रशियाने बंद केले.

या परिस्थितीला अमेरिका व मित्र राष्ट्रांनी हिंमतीने तोंड दिले. पश्चिम जर्मनीच्या लोकांना लागणारा सर्व माल प्रचंड मोठ्या प्रमाणावर वायुमार्गे विमानांनी पुरविण्यास त्यांनी सुरुवात केली.

सुमारे एक वर्ष ही परिस्थिती चालू होती. शेवटी बर्लिनची कोंडी करून बर्लिनमधून पाश्चिमात्यांना काढून लावण्याचे उद्दिष्ट सफल होत नाही हे रशियाला कळून चुकले. अखेर संयुक्त राष्ट्रसंघाच्या साह्याने १९४९ मध्ये बर्लिनची कोंडी उठवली.

### १.३.९ यू-टू प्रकरण

जर्मनीचे एकीकरण, शस्त्रकपात, सोव्हिएत रशियाला वेढा घालून असलेले पश्चिमी राष्ट्रांचे लष्करी तळ असे महत्त्वाचे प्रश्न पॅरिस शिखर परिषदेपुढे येणार होते. परंतु पॅरिस शिखर परिषद सुरू होण्याच्या १५ दिवस अगोदर १ मे १९६० रोजी रशियाच्या वायूसीमेचा भंग करून रशियन सीमेपासून सुमारे १००० मैल आत आलेले अमेरिकेचे "यू-२" विमान रशियाच्या विमानभेदी तोफांनी खाली पाडले व विश्वासघातकी अमेरिकेसमवेत जर्मनीचा प्रश्न सोडवण्याबाबत चर्चा करणे निरर्थक असल्याचे जाहीर केले.

अमेरिकेने ते विमान अमेरिकेचे नसल्याचा निर्वाळा देत असतानाच त्या विमानाचा वैमानिक फ्रान्सिस पॉवर्स याने रशियन लष्करी तळाची पाहणी करण्याची कामगिरी अमेरिकन सरकारने त्याच्यावर सोपविली होती अशी कबूली दिली. एवढेच नव्हे तर त्याने घेतलेली रशियन लष्करी तळांची छायाचित्रे कॅमेरासह त्याच्याजवळ सापडली. त्या बेकायदेशीर कृत्याचे अमेरिकेच्या परराष्ट्र खात्याने जोरदार समर्थन केले. उलट अमेरिकन शासन त्या बेकायदेशीर प्रकाराचे समर्थन करीत असलेले पाहून क्रुश्चेव्ह चांगलाच संतप्त झाला त्याने दिलेले रशिया भेटीचे निमंत्रण त्याने जाहीरपणे मागे घेतले.



munotes.in

### १.३.१० कोरियन तंटा / वाद (Korean Crisis - 1950-53)

दुसऱ्या महायुद्धानंतर संयुक्त राष्ट्रसंघावर कोरियाचा प्रश्न सोडविण्याचे महत्त्वाचे कार्य येऊन पडले. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात जपानचा पराभव करण्याकरिता रशिया आणि अमेरिका यांनी जसे ठरविले होते की, ३८ अक्षांशावर कोरियाचे दोन भाग पाडून उत्तरेकडील भाग रशियाने आणि ३८ अक्षांच्या दक्षिणेकडील भागात अमेरिकेने सैन्य न्यावे असे ठरले होते. मात्र पॉटसडॅम परिषदेत ठरल्याप्रमाणे युद्ध संपुष्टात येताच दोघांनीही आपले सैन्य माघारी बोलावून कोरियाला पूर्ण स्वातंत्र्य द्यावे असेही ठरविण्यात आले होते; परंतु युद्ध समाप्त झाल्यानंतर रशियाने हे वचन पाळण्याचे नाकारले.

१९४७ मध्ये अमेरिकेने संयुक्त राष्ट्रसंघात हा प्रश्न उपस्थित केला; परंतु तीन वर्षेपर्यंत रशियाने युनोला किंवा युनोने नेमलेल्या कोणत्याही कमिशनला दाद दिली नाही. उलट तेथील लोकांना शस्त्रास्त्रे पुरवून आणि युद्धाचे शिक्षण देऊन आंतरराष्ट्रीय परिस्थितीत तंग वातावरण निर्माण करण्यास मदतच केली. १९५० मध्ये तर उत्तर कोरियाने ३८ अंक्षाश रेषेचा भंग करून दक्षिण कोरियात आक्रमण केले. त्याच्याही मुळाशी रशियाच आहे हे सर्वांनाच कळून चुकले अशा स्थितीत संयुक्त राष्ट्रसंघाच्या सदस्य राष्ट्रांनी सैन्याचे दल उभारून हे आक्रमण थोपविले.

संयुक्त राष्ट्रसंघाचे सेक्रेटरी जनरल ट्रिग्वेली त्यांनी युनोच्या सदस्य राष्ट्रांना जे आवाहन केले त्याला प्रतिसाद मिळाला आणि ३१ राष्ट्रांनी आपल्या सैन्याची मदत देऊ केली. क्युबाने साखर देऊ केली, तर स्वीडनने औषधे पाठविली. अमेरिकेने ह्या सर्व प्रकरणात सिंहाचा वाटा उचलून युद्ध कैद्यांनी अदलाबदल यशस्वी पद्धतीने घडवून आणली.

### १.३.११ क्यूबा प्रश्न (तेढ) - (The Cuban Crisis)

दुसऱ्या महायुद्धानंतर जगात अतिशय गंभार पेचप्रसंग निर्माण झाले; परंतु क्युबाचा पेचप्रसंग सर्वात गंभीर समजला जातो. फिडेल कॅस्ट्रोने क्युबामध्ये १ मे १९५९ मध्ये बॅटिस्टा या लष्करी हुकुमशहा विरूद्ध क्रांती करून सत्ता हातात घेतली. क्रांतिकारी समाजव्यवस्था प्रस्थापित केली आणि अमेरिकेच्या नाकावर कम्युनिस्ट क्युबा उभा केला. १९५९ मध्ये मे महिन्यात आर्थिक स्वावलंबनासाठी कॅस्ट्रोने कृषीसुधारणांचा कार्यक्रम हाती घेतला. भूमिहीनांना जमिनी देण्यात आल्या. साखर उद्योगाचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. सुरुवातीच्या काळात त्याचे अमेरिकेशी चांगले संबंध होते.

कॅस्ट्रोने स्थानिक मालकीच्या मोठ्या उद्योगांचे राष्ट्रीयीकरण तसेच अमेरिकेच्या मालकीच्या उद्योगांचेही राष्ट्रीयीकरण केले. त्यामुळे अमेरिकेचे आर्थिक हितसंबंध धोक्यात आले. कॅस्ट्रोने रशियाशी उघडपणे मैत्रीचे व सहकार्याचे धोरण स्विकारल्यामुळे अमेरिका संतप्त झाली. सोव्हिएत रशियाच्या क्रूश्चेव्हने क्युबाचा उपयोग करून घेण्याचे ठरविले. अमेरिकन वर्चस्वाला जबरदस्त शह देण्यासाठी सोव्हिएट रशियाने क्युबात क्षेपणास्त्र तळ उभारण्याची योजना आखली. क्युबा अमेरिकेला अतिशय जवळ असल्याने तेथे क्षेपणास्त्रांची स्थानके निर्माण व्हावीत ही घटना अमेरिकेच्या दृष्टीने अतिशय गंभीर होती.

रशियाने जाणूनबुजून अशी स्थानके निर्माण करून अमेरिकेच्या संरक्षण व्यवस्थेला मोठा धोका निर्माण केला. हे उघडच होते म्हणून अमेरिकेचे प्रेसिडेंट केनेडी यांनी २२ ऑक्टोबर

१९६२ रोजी क्युबाची नाविक नाकेबंदी करावी असा हुकूम दिला. क्युबाच्या भूप्रदेशात अधिक लष्करी मदत जाऊन पोहचू नये हाच त्यामागील हेतू होता रशियाने ह्या नाकेबंदीला न जुमानता क्युबात शस्त्रास्त्रे पाठविण्याचे ठरविले. ह्या पेचप्रसंगाची परिणती युद्धात होणार हे उघड उघड दिसत होते.

अशा परिस्थितीत युनोचे सेक्रेटरी जनरल ऊ-थांट यांनी ह्या प्रश्नात मध्यस्थी केली आणि ह्या प्रश्नावर तडजोड घडवून आणली. क्युबातील क्षेपणास्त्रे युनोच्या देखरेखीखाली काढून घेण्यात आली. अशा रितीने जगातील एक मोठा पेचप्रसंग सुटला.

### १.३.१२ हंगेरियातील उठाव (The Hungarian Revolt)

पूर्व युरोपातील राष्ट्रांमध्ये साम्यवादाच्या विरोधात वातावरण निर्माण होऊ लागले होते. त्यामधूनच ऑक्टोबर १९५६ मध्ये हंगेरीमध्ये विद्यार्थ्यांनी सोव्हिएत फौजा हंगेरीतून घालवून देण्याची मागणी केली व प्रचंड आंदोलन छेडले. हंगेरीचे सैनिक देखील त्यात सामील झाले. स्टॅलिनचा पुतळा क्रांतिकारकांनी तोडला. त्यानंतर सरकारशी प्रामाणिक असलेल्या सैन्याने गर्दीवर गोळ्या चालवून भयंकर रक्तपात केला. क्रांतिकारक "नागी" यास पुन्हा पंतप्रधान बनवावे अशी मागणी करीत होते.

रशियाच्या सैनिकांनी हा उठाव दडपण्याचा प्रयत्न केला; परंतु त्यांना त्यात यश आले नाही. त्यांना हंगेरीमधून आपले सैन्य मागे घ्यावे लागले. अमेरिकेने हंगेरीयातील उठाव युनोत उचलून धरला. फेब्रुवारी १९८९ मध्ये हंगेरीत बहुपक्षीय गणराज्याची स्थापना करण्यात आली.

### १.३.१३ १९७०-८० या कालखंडातील शीतयुद्ध

अमेरिका व सोव्हिएट रशिया या दोन राष्ट्रांतील तणाव १९७० च्या नंतरच्या दशकात हळूहळू कमी होऊ लागला. सोव्हिएट रशियाचे इतर देशांशी संबंध सुधारू लागले. १२ ऑगस्ट १९७० रोजी "मॉस्को बॉन" (The Moscow Bonn Agreement) करार करण्यात आला. त्यावर सोव्हिएट रशियाने अध्यक्ष कोसिजीन व पश्चिम जर्मनीचे चान्सलर यांनी स्वाक्षर्या केल्या.

इ.स. १९७५ मध्ये व्हिएटनाम संघर्ष संपुष्टात आला. या संघर्षामध्ये अमेरिकेला पूर्णपणे अपयश आले. इ.स. १९७२ मध्ये अमेरिकेचे अध्यक्ष निकसन यांनी चीनला भेट दिली. तर मे १९७२ ला अध्यक्ष निकसन यांनी मॉस्कोला भेट देऊन Anti Ballistic Missile System करार घडवून आणला. तसेच २६ मार्च १९७९ रोजी मध्यपूर्वमध्ये शांतता निर्माण करण्याच्या उद्देशाने इजिप्त व ईस्त्राईल या दोन देशांमध्ये “कॅम्प डेव्हीड” करार घडवून आणला.

### १.३.१४ शीतयुद्धाचा शेवट (इ.स. १९८० नंतरचे शीतयुद्ध)

१९८०च्या दशकात त्या महासंहारक अस्त्रांची निरर्थकता सर्वच बड्या राष्ट्रांना जाणवली. युद्ध भडकले तर त्यात दोन्ही पक्षांचा विनाश नक्की होणार याची जाणीव असल्याने महायुद्ध अजून टळले नाही. १९८० नंतर शीतयुद्धाचे हिम वितळण्यास प्रारंभ झाला.

८ डिसेंबर १९८७ मध्ये अमेरिका व सोव्हिएट रशिया या दोन देशांमध्ये The Intermediate Range Forces Treaty हा करार घडवून आला. सोव्हिएट रशियाचे अध्यक्ष गोर्बाचेव्ह यांनी मे १९८९ मध्ये चीनला भेट देऊन सीमेवरील सैन्य कपात करण्याचा निर्णय घेतला. तसेच १९८९ च्या अखेरीस सोव्हिएट रशियाचे अध्यक्ष मिखाईल गोर्बाचेव्ह व अमेरिकेचे अध्यक्ष जॉर्ज बुश यांनी संयुक्त निवेदनाद्वारे शीतयुद्ध संपले असे जाहीर केले.

## १.४ सारांश

१९४५ मध्ये जागतिक दुसऱ्या महायुद्धाचा शेवट झाला; त्यानंतर काही काळ जगात शांतता प्रस्थापित राहिली; परंतु महायुद्धानंतर लोकशाही आणि साम्यवाद अशा दोन गटात जगाचे विभाजन करण्याची प्रक्रिया वेग धरू लागली. त्यामध्ये अमेरिका आणि रशिया या दोन्हीही महासत्तांनी जगातील छोट्या-मोठ्या देशांना आपल्या पंखाखाली ओढण्यासाठी चढाओढ लावली त्यातून शीतयुद्धाची सुरूवात झाली; परंतु दोन्ही देशांनी युद्ध न करता परस्परांना शहकाटशह देण्याचा प्रयत्न केला. शेवटी १९९०-९१ मध्ये संयुक्त रशियाचे विभाजन होऊन जगावरील युद्धाचे सावट कमी झाले.

## १.५ प्रश्न

१. शीतयुद्ध म्हणजे काय? ते सांगून दुसऱ्या महायुद्धानंतरच्या घडामोडीचा आढावा घ्या.

२. कोरीयन प्रश्नांच्या अनुशंगाने शीतयुद्धाचा आढावा घ्या.

३. शीतयुद्धाचे प्रकटीकरणावर चर्चा करा.

४. शीतयुद्ध म्हणजे काय ते सांगून त्याची कारणे सांगा.

५. शीतयुद्धकाळात झालेल्या संरक्षक करारांची माहिती लिहा.

६. शीतयुद्धाचा कोणकोणत्या देशांना फटका बसला ते सांगून त्याचे परिणाम काय झाले ?

## १.६ संदर्भ


१. प्रा.राजदरेकर / प्रा. गर्गे - आधुनिक जगाचा इतिहास - विद्या प्रकाशन, नागपूर

२. ना. सी. दिक्षीत- पश्चिमात्य जग - पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर

३. गायकवाड, कदम, थोरात - आधुनिक जगाचा इतिहास - भाग १ - श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर.

४. प्रा. हरिदास जाधव व प्रा. कल्याण चव्हाण - आधुनिक जगाचा इतिहास - अक्षरलेण प्रकाशन, सोलापूर.

५. डॉ. सुमन वैद्य - आधुनिक जग - श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर .

६. डॉ. सौ . शरावती शिरगावकर - आधुनिक युरोप - श्रीविद्या प्रकाशन, पुणे.


munotes.in

७. श. गो. कोलारकर - युरोपचा इतिहास - आनंद प्रकाशन, नागपूर

८. प्रा. जितेंद्र भामरे- आशियाचा इतिहास - शेठ प्रकाशन, मुंबई .

९. डॉ. रमेश गुप्ते व शे. रा. कुलकर्णी - आग्रेय आशियाचा इतिहास - परिमल प्रकाशन, औरंगाबाद

१०. डॉ. अनिलकठारे - आधुनिक चीन - कल्पना प्रकाशन, नांदेड .

११. डॉ. मु. बा. देवपुजारी - रशियाचा इतिहास - श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर

१२. डॉ. मु. बा. देवपुजारी - आधुनिक आशियाचा इतिहास - श्री मंगेश प्रकाशन , नागपूर

१३. डॉ. नि. वक्कानी - आधुनिक भारताचा इतिहास - श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर

१४. डॉ. जालिंदर भोसले - आधुनिक आशियाचा इतिहास - मुरलीधर प्रकाशन, पुणे

१५. डॉ. सुमन वैद्य व डॉ. शांता कोठेकर - भारताचा इतिहास - श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर

१६. Adolf Hitler - Mein Kampf - KRJ Book International, Delhi

१७. D. R. Sardesai and B. K. Gokhale - World History - Kitab Mahal Publication, Alahabad.

१८. M. D. David - Rise and Growth of Modern China.

१९. तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी - मराठी विश्वकोश - भाग २ व ९

२०. डॉ. शांता कोठेकर, अमेरिकेच्या संघराज्याचा इतिहास - श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर

२१. डॉ. सुमन वैद्य - रशियाचा इतिहास - श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.

२२. विस्टन चर्चील - दुसरे महायुद्ध - महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, १९७८.

२३. डॉ. हुकुमचंद जैन, डॉ.कृष्णचंद्र माथुर - आधुनिक जगाचा इतिहास - के. सागर प्रकाशन पुणे.

❖❖❖❖

munotes.in

# २

# पश्चिम युरोपचा अर्थविकास, रशिया व पूर्व युरोप संबंध

**घटक रचना :**

२.० उद्दिष्टये

२.१ प्रस्तावना

२.२ युरोपची पुनर्रचना

२.२.१ दुसऱ्या महायुध्दानंतर युरोप

२.२.२ मार्शल योजना

२.२.३ युरोपीयन आर्थिक सहकार्य संघटना

२.२.४ युरोपची समिती

२.२.५ बेनेलक्स करार

२.२.६ १९४८ चा ब्रसेल्सचा करार

२.२.७ युरोपियन कोल अँड स्टील कम्युनिटी

२.२.८ युरोपची सामायिक बाजारपेठ

२.२.९ सामाजिक बाजारपेठेची उद्दिष्टये

२.२.१० ब्रिटन व सामाजिक बाजारपेठ

२.३ पूर्व युरोपधील साम्यवादी सत्ता

२.३.१ पूर्व युरोपातील साम्यवादी सत्ता प्रस्थापित होण्याची कारणे

२.३.२ साम्यवादी शासनाची स्थापना

२.४ पूर्व युरोपबाबत रशियाचे धोरण

२.४.१ कॉमीनफॉर्य स्थापना

२.४.२ मालोतोव योजना

२.४.३ कॉमिकॉनची स्थापना

२.४.४ वॉर्सा करार

munotes.in

२.४.५ स्टॅलीननंतर रशियाचे धोरण

२.५ सारांश

२.६ प्रश्न

२.७ संदर्भ

## २.० उद्दिष्ट्ये

प्रस्तुत प्रकरणामध्ये आपण युरोपची पुर्नरचना कशी व का झाली याबद्दल अभ्यासकरणार आहोत या मध्ये

- दुसऱ्या महायुध्दानंतर युरोपची पुर्नरचना कशी झाली, या साठी मार्शल योजना, आर्थिक सहकार्य संघटना, महासमिती बेंनेलक्स करार इत्यादी कशा उपयुक्त ठरल्या.
- तसेच पूर्व युरोपमध्ये साम्यवादी सत्ता कशी स्थापन झाली.
- पूर्व युरोपबाबत रशियाचे धोरण कसे होते या बद्दल अभ्यासकरणार आहेत.

## २.१ प्रस्तावना

दुसऱ्या महायुद्धापासून जगातील कोणतेही राष्ट्र अलिप्त राहिले नव्हते. युरोपमधील इंग्लंड व फ्रान्स बलाढ्य सत्ता महायुद्धामुळे संपुष्टात आल्या होत्या. पूर्व युरोप व आशिया खंडातील राष्ट्रे स्वातंत्र्याच्या वाट्यावर होते. दुसऱ्या महायुद्धात सर्वात जास्त हानी युरोप खंडाची झाली. कारण दुसऱ्या महायुद्धाचा केंद्रबिंदू हा युरोप खंड होता. त्याचा परिणाम युरोप खंडातील प्रत्येक राष्ट्राला झाला. अशा परिस्थितीत साम्यवादाचा प्रसार झपाट्याने होवू शकतो. हे ध्यानात घेऊन अमेरिकेने युरोपला मदत करण्याचे ठरविले.

## २.२ युरोपची पुनर्रचना

दुसऱ्या महायुद्धानंतर जगाच्या राजकारणात अमेरिका व रशिया या दोन प्रभावी सत्ता जगाच्या पटलावर पुढे आल्या. युरोप खंडातील लहान राष्ट्रांची आर्थिक व्यवस्था पूर्णपणे कोसळली होती. आर्थिकदृष्ट्या कमकुवत झालेल्या युरोपीय राष्ट्रात साम्यवाद पसरू नये म्हणून अमेरिकेने युरोप खंडाच्या पुर्नजीवनाचा कार्यक्रम हाती घेतला. या जाणिवेतूनच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष हॅरी ट्रुमन यांनी युरोपातील देशांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी विविध आर्थिक अनुदान जाहीर केली.

### २.२.१ दुसऱ्या महायुद्धानंतरचा युरोप :

दुसरे महायुद्ध समाप्तीनंतर युरोप खंडाच्या पश्चिमेकडील भाग अमेरिका, इंग्लंड व फ्रान्स यांच्या छत्रछायेखाली आला. तर पूर्वेकडील युरोप रशियाने आपल्या वर्चस्वाखाली आणला. दुसऱ्या महायुद्धानंतर युरोप खंडाची आर्थिक स्थिती पूर्णपणे ढासळलेली होती. त्याचप्रमाणे युरोप खंडातील अनेक सैनिकांचा व नागरिकांचा या युद्धाने संहार केला होता. युरोप खंडातील मोठे-मोठे उद्योगधंदे नष्ट झाले होते. युद्धाच्या काळात शस्त्र निर्मितीवरती जास्त

भर दिल्याने दैनंदिन वस्तूचा तुटवडा भासू लागला. त्याचप्रमाणे मोठ्या प्रमाणात बेकारीसुद्धा वाढू लागली. युरोप खंडातील देशांसमोर उद्योगधंदे पूर्ववत करणे त्यासाठी लागणारे नवे भांडवल उभे करणे असे अनेक प्रश्न निर्माण झाले.

महायुद्धाच्या दरम्यान शेती व्यवसाय पूर्णपणे नष्ट झाला होता. त्यामुळे युरोप खंडात अन्नधान्याचा तुटवडा जाणवू लागला होता. त्याचबरोबर इंधन, कच्चा माल, कापड इ. सारख्या वस्तूचा मोठा तुटवडा युरोप खंडात जाणवत होता. शिवाय युरोपीय देशांना आर्थिक व लष्करी मदत देऊन परावलंबी न करता त्या मदतीच्या आधारे त्यांनी आपली अर्थव्यवस्था बळकट करून विकासाची झेप घेण्यास सिद्ध झाले पाहिजे अशी अमेरिकेची अपेक्षा होती.

### २.२.२ मार्शल योजना (Marshall Plan)

साम्यवादाच्या विरोधात अनेक राष्ट्रांना आर्थिक मदत देणारी योजना जॉर्ज मार्शल नावाच्या अमेरिकेच्या परराष्ट्र सचिवाने तिचा स्विकार केला. म्हणून त्या योजनेला "मार्शल योजना" म्हणतात.

अमेरिकेचे परराष्ट्र सचिव मार्शल यांनी हॉवर्ड विद्यापीठात ५ जून १९४७ रोजी युरोपीयन पुर्नजीवन कार्यक्रम या विषयावर भाषण करताना ही योजना जाहीर केली. या भाषणात त्यांनी असे जाहीर केले "आमचे धोरण कोणत्याही देशाविरुद्ध अथवा तत्त्वाविरूद्ध नसून भूक, दारिद्र्य, नैराश्य व अराजक याविरूद्ध आहे. लोकशाही व स्वायत्ता संस्था ज्या राजकीय आणि सामाजिक परिस्थितीत जगू शकतील अशा प्रकारच्या अर्थव्यवस्थेचे पुर्नजीवन करणे हे आमच्या धोरणाचे उद्दिष्ट आहे."

मार्शल योजनेची कार्यवाही करण्यासाठी २७ जून १९४७ रोजी पॅरीस येथे बैठक घेण्यात आली. या बैठकीत पश्चिम युरोप व अमेरिकेच्या गटातील १६ राष्ट्रे परिषदेस उपस्थित होते. मार्शल योजनेच्या प्रत्यक्ष कृतीसाठी युरोपीयन आर्थिक सहकार्य समिती स्थापन करून आर्थिक परिस्थितीची माहिती गोळा करण्यात आली. अमेरिकेने त्यासाठी १७ कोटी डॉलरची मदत जाहीर केली.

### २.२.३ युरोपियन आर्थिक सहकार्य संघटना (Organisation of European Economic co-operation)

१९४८ च्या प्रारंभाला मार्शल योजनेचा अंतर्भाव करून अमेरिकन काँग्रेसने आर्थिक सहकार्य कायदा (Economic co-operative Administration) मंजूर केला. त्याकरिता आरंभीची मंजूर केलेली रक्कम ५.३ बिलीयन डॉलर्स होती. युरोपीय पुर्नजीवन योजनेत, मार्शल योजनेत सहभागी झालेल्या सर्व युरोपीय राष्ट्रांनी अमेरिकेशी तत्संबंधी करार केले. आर्थिक सहकार्य विकसीत करणे व तो कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यात अमेरिकेशी सहकार्य करणे याकरिता युरोपीय आर्थिक सहकार्य संघटना (OEEC) प्रस्थापित करण्यात आली.

OEEC या संघटनेद्वारे सर्वेक्षण करून घेऊन युरोपीयन देशांच्या आर्थिक गरजांची माहिती घेतली व अमेरिकेने १७०० कोटी डॉलर्सची आर्थिक मदत दिली. मदत देताना ७६ टक्के

पूर्ण अनुदान, १५ टक्के सशर्त मदत आणि ९ टक्के दीर्घ मुदतीच्या कर्जरूपात देण्याचे धोरण होते. या मदतीमुळे संबंधित देश युद्धपूर्व परिस्थितीला येऊन पोहचले तर काही देशांची उत्पादन क्षमता युद्धपूर्व काळापेक्षा जास्त वाढली.

### २.२.४ युरोपची महासमिती (The Council of Europe)

दुसऱ्या महायुद्धानंतर युरोपात राजकीय एकात्मता वाढीस लागली त्यामधूनच युरोपची महासमिती ही संकल्पना पुढे आली. १९४९ मध्ये इंग्लंड, बेल्जियम, नेदरलॅंड, लक्झेंबर्ग, डेन्मार्क, फ्रान्स, आर्यलंड, इटली, नार्वे, स्वीडन इ. देशांनी या समितीची स्थापना केली. १९११ मध्ये स्पेन व पोर्तुगाल या देशांव्यतिरिक्त युरोपमधील १६ देश या समितीचे सभासद होते.

### २.२.५ बेनेलक्स करार (Benelux)

१९४४ मध्ये नाझी जर्मनीने बेल्जीयम, नेदरलँड व लक्झेंबर्ग या देशावर कब्जा मिळवला. तेव्हा या देशांच्या प्रतिनिधींची एक बैठक लंडन येथे भविष्यात परस्पर सहकार्याचा एक आराखडा तयार करण्यासाठी भरविण्यात आली. दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर बेल्जीयमचे पंतप्रधान पॉल हेन्से स्पाक यांनी पुढाकार घेऊन बेनेलक्स कस्टम युनियन स्थापन करून परस्पर समंतीने कोणतीही जकात न आकारता व्यापार विषयक धोरण पुढे अंमलात आणण्याचे ठरविले.

### २.२.६ ब्रसेल्स करार (The Treaty of Brussels - 1948)

द्वितीय महायुद्धानंतर रशियाच्या वाढत्या साम्यवादी आक्रमणास पायाबंद म्हणून इंग्लंड व फ्रान्स यांनी परस्पर लष्करी, आर्थिक, सामाजिक सहकार्याचा एक करार संमत केला. इंग्लंड, फ्रान्स, बेल्जीयम, नेदरलँडस् व लकझेंबर्ग यांच्यात १७ मार्च १९४८ रोजी ब्रुसेल्स करार घडून आला. तसेच या तहान्वये सामुदायिक सुरक्षिततेचे तत्व प्रत्यक्षात अस्तित्वात आले.

### २.२.७ युरोपीयन कोल अँड स्टील कम्युनिटी (The European Coal and Steel Community (ECSC))

फ्रान्स परराष्ट्र मंत्री रॉबर्ट शूमन याने १ मे १९५० रोजी फ्रान्स व पश्चिम जर्मनीची व त्या योजनेत जी युरोपीय राष्ट्रे सहभागी होण्यास इच्छुक असतील त्यांची कोळसा व पोलाद यांची साधनसामुग्री एकत्रित करावी व त्याचे उत्पादन व बाजारपेठ सामाजिक असावी असा प्रस्ताव मांडला. कोळसा व लोखंड यांचे तसे एकत्रीकरण झाले तर पोलाद उत्पन्नात लक्षणीय वाढ होऊ शकेला अशी कल्पना होती.

पश्चिम जर्मनी, बेल्जीयम, लकझेंबर्ग, इटली व नेदरलॅंड या राष्ट्रांनी फ्रान्सची ती कल्पना उचलून धरली त्यानंतर १८ एप्रिल १९५१ रोजी ६ राष्ट्रांनी सामाईक बाजारपेठ, समान उद्दिष्टे व समान घटक संस्था या आधारावर युरोपीयन कोल अँड स्टील कम्युनिटी या करारावर स्वाक्षर्या केल्या.

पश्चिम युरोपीय राष्ट्रांत विशेषत: फ्रान्स व जर्मनी या राष्ट्रांत अधिक निकटचे सहकार्य प्रस्थापित होईल व तसे झाले तर भविष्यात युरोपीय एकीकरणाचा मार्ग मोकळा होईल. अशी अपेक्षा होती. कोळसा व पोलाद या करिता एक सामायिक बाजारपेठ निर्माण करण्याकरीता त्या व्यापारातील अडथळे किंवा बंधने व भेदभावाची कार्यवाही नाहीशी करावी. याला सदस्य राष्ट्रांनी मान्यता दिली.

## २.२.८ युरोपची सामायिक बाजारपेठ

युरोपीयन कोल व स्टील कम्युनिटीची स्थापना झाल्यानंतर तीनच वर्षांनी कम्युनिटीची कोळसा व पोलाद यासंबंधीची व्यवस्था सामान्यत: सर्वच वस्तूंचा व्यापार व उद्योगांनाही लागू करण्यात यावी अशी सूचना फ्रान्स, पश्चिम जर्मनी व इटली या राष्ट्रांनी केली. त्या राष्ट्रांच्या परराष्ट्र मंत्र्यांची बैठक जून १९५५ मध्ये मेसीना या शहरी भरली. त्यांच्या या बैठकीत युरोपच्या सामायिक बाजारपेठेच्या निर्मिती करिता मार्च १९५७ मध्ये रोमचा करार करण्यात येऊन तरतूद करण्यात आली.

युरोपीयन कोल व स्टील कम्युनिटीच्या यशाने ती सहा राष्ट्रे युरोपच्या सामाजिक बाजारपेठच्या योजनेकडे आकर्षित झाली. या योजनेने त्या सहा राष्ट्रांच्या व्यापारीक्षेत्रातील सर्व अडथळे दूर होतील. व त्या राष्ट्रात बाहेरून आयात होणार्या मालावरील जकात कर समान असेल. युरोपच्या कोणत्याही राष्ट्राला या योजनेत सामील होण्याची मोकळीक आहे.

## २.२.९ सामायिक बाजारपेठची उद्दिष्टे

सामायिक बाजारपेठच्या नियमांनुसार सदस्य राष्ट्रांनी बाजारपेठच्या संपूर्ण क्षेत्राकरिता विशिष्ट मालाचे उत्पादन करण्यावर लक्ष केंद्रित करावयाचे असते. त्यामुळे कोणत्याही प्रकारची स्पर्धा उरणार नाही व सदस्य राष्ट्रांना राष्ट्राला लागणार्या सर्व प्रकारच्या मालाचे उत्पादन करण्याची गरज उरणार नाही. त्यामुळे वस्तुंचा दर्जा उंचावेल व वस्तूच्या किंमतीही कमी होतील. ज्या राष्ट्रात विविध प्रकारच्या मालाकरीता भरपूर साधन सामुग्री उपलब्ध आहे. तोच माल ते राष्ट्र तयार करेल. त्यामुळे त्या राष्ट्राकडे त्या वस्तूंचा एकाधिकार आल्यासारखे होईल. या व्यवस्थेमुळे उद्योगपतींना त्या वस्तूंचा दर्जा सुधारण्याकरिता तांत्रिक विकास करणे आणि नव-नवीन विद्युत-उपकरणे यांचा उत्पादन प्रक्रियेत सर्व प्रकारे वापर करणे शक्य होईल.

## २.२.१० ब्रिटन व सामाजिक बाजारपेठ

दुसऱ्या महायुद्धापर्यंत ब्रिटन एक जागतिक सत्ता होती. युद्ध समाप्तीनंतर ब्रिटनचे साम्रज्य हळूहळू संपुष्टात आले. युरोपचे एकीकरण करण्याच्या पश्चिम युरोपीयन राष्ट्रांनी चालविलेल्या प्रयत्नांत ब्रिटन सामील न झाल्याने त्या युरोपीयन राष्ट्रांचा ब्रिटनशी संबंधात कडवटपणा आला होता.

युरोपचे एकीकरण करण्याच्या पश्चिम युरोपीय राष्ट्रांनी चालविलेल्या प्रयत्नांत ब्रिटन सामील झाले नाही. तसेच जून १९५५ मध्ये मेसिना येथे भरलेल्या परिषदेला ब्रिटन उपस्थित नव्हते; परंतु १९५७ मध्ये सामाजिक बाजारपेठेला मूर्त स्वरूप आल्यानंतर ब्रिटनने सामाजिक बाजारपेठेत प्रवेश मिळावा याकरीता बोलणी सुरू केली. सामाजिक

बाजारपेठेकडे डोळेझाक करणे ब्रिटनला शक्य नव्हते. कारण ब्रिटनची साधारण १२ ते १४ टक्के निर्यात त्या क्षेत्राशी होती. ब्रिटन त्या बाजारपेठेच्या क्षेत्राबाहेर राहिले तर त्या निर्यातीवर विपरीत परिणाम होणार हे स्पष्टच होते. ब्रिटनने सामाजिक बाजारपेठेत प्रवेश मिळविण्याकरता सुरू केलेल्या वाटाघाटी फ्रान्सच्या विरोधामुळे १९५८ मध्ये फिसकटल्या होत्या.

मे १९६७ मध्ये ब्रिटनने सामाजिक बाजारपेठेच्या सदस्यत्वाकरिता पुन्हा प्रयत्न केला व फ्रान्सचा अध्यक्ष द-गॉलने २० डिसेंबर रोजी ब्रिटनचा तो अर्ज पुन्हा फेटाळून लावला व ब्रिटनला सामाजिक बाजारपेठेत प्रवेश मिळू दिला नाही. अखेर १९६८ मध्ये द-गॉल फ्रान्सच्या राजकारणातून निवृत्त झाल्यानंतर १९७० मध्ये ब्रिटनने सामाजिक बाजारपेठेत प्रवेशाकरिता पुन्हा बोलणी सुरू केली. काही काळ वाटाघाटी झाल्यानंतर जानेवारी १९७३ मध्ये ब्रिटन, डेन्मार्क व आयर्लंड ही राष्ट्रे औपचारिकरित्या युरोपच्या सामाजिक बाजारपेठेची सदस्य बनली.

## २.३ पूर्व युरोपातील साम्यवादी सत्ता

पूर्व युरोपचा प्रदेश १९ व्या शतकापासून युरोपीय क्षेत्रातील एक ज्वलंत समस्या बनला होता. ह्या प्रदेशाची भौगोलिक स्थिती युरोपीय राजकारणातील परस्परविरोधी अंतर्प्रवाह आणि त्यांचे गुंतलेले हितसंबंध यामुळे ह्या प्रदेशात सतत राजकीय तणाव कायम राहिला. द्वितीय महायुद्धाच्या अग्निदिव्यातून ज्या दोन महासत्ता जागतिक राजकारणात पुढे आल्या त्यापैकी सोव्हिएट रशियाच्या प्रभावाखाली पूर्व युरोपात समाजवादी राष्ट्रांचा गट संघटित झाला.

डी.एफ.पोलेमिंग या लेखकाने आपल्या “कोल्ड वॉर ॲन्ड इटस् ओरिजिन” या ग्रंथात, द्वितीय महायुद्धाच्या अखेरी पूर्व युरोपात समाजवादी राष्ट्रगटाचा उदय ही अनिवार्य घटना होती. तत्कालीन लष्करी व राजकीय परिस्थिती लक्षात घेता ती ऐतिहासिक अपरिहार्यता होती. रशियाच्या साम्रज्यवादाचा तो परिणाम नव्हता असे नि:संदिग्ध विधान केले.

### २.३.१ पूर्व युरोपातील साम्यवादी सत्ता प्रस्थापित होण्याची कारणे

दुसऱ्या महायुद्धानंतर पूर्व युरोपात समाजवादी शासने प्रस्थापित होण्यास प्रामुख्याने दोन गोष्टी कारणीभूत ठरल्या. पहिले कारण म्हणजे १९४४ सालच्या अखेरीपासून १९४५ सालच्या मे महिन्यापर्यंत पूर्व युरोपातील युद्धस्थिती आणि दुसरे कारण म्हणजे स्वसुरक्षिततेविषयी सोव्हिएट रशियाला वाटणारी चिंता होय.

रशियाच्या भूभागावरून जर्मन सैन्याची हकालपट्टी केल्यानंतर रशियन लाल सेना जर्मनी माघारी जाणार्या नाझी फौजांचा पाठलाग करू लागली. जर्मनी विरूद्ध लढा दिलेल्या स्थानिक गटांशी रशियाने हात मिळवणी केली. त्यांचा विश्वास संपादन केला आणि नाझी सत्तेचे उच्चाटन केल्यानंतर तेथील शासनाची सूत्रे तात्पुरती तेथील राष्ट्रवादी व समाजवादी नेत्यांच्या हाती सोपवली परंतु ज्याठिकाणी राष्ट्रवादी गट गनीमी पद्धतीने नाझी विरूद्ध लढले होते त्यांच्या सहकार्याने रशियाने नाझी प्रभावाचे उच्चाटन केले अशाप्रकारे मे १९४५ मध्ये जर्मनीचा पाडाव होण्यापूर्वीच पूर्व युरोपात रशियाचा प्रभाव प्रस्थापित झाला.

### २.३.२ साम्यवादी शासनाची स्थापना

महायुद्धाच्या दरम्यान पूर्व युरोपातील राष्ट्रे दोन गटात विभागली गेली होती. एक गट नाझी आक्रमणाला उघडपणे तोंड देणार्या झेकोस्लोवाकिया, युगोस्लाव्हिया, पोलंड व अल्बानिया या राष्ट्रांचा होता. दुसरा गट तो नाझींशी हात मिळवणी केलेल्या रूमानिया, हंगेरी, बल्गेरिया या राष्ट्रांचा होता.

युद्धाचा शेवट झाल्यानंतर अल्पावधीतच पूर्व युरोपात खुल्या वातावरणात सार्वत्रिक निवडणूका घेऊन तेथे लोक निर्वाचित प्रतिनिधीद्वारा लोकशाही शासनव्यवस्था प्रस्थापित करण्यात यावी, असा याल्टा परिषदेत निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार १९४५ सालच्या नोव्हेंबरपासून पूर्व युरोपात निवडणुका घेण्यात आल्या. त्यामध्ये राष्ट्रवादी व समाजवादी गटाचे नेते निवडणूकीत विजयी झाले; तर बहुतेक राष्ट्रांमध्ये संमिश्र सरकार स्थापन झाली.

अशाप्रकारे १९४७ सालच्या अखेरपर्यंत बल्गेरिया, हंगेरी, अल्बानिया, पोलंड, रूमानिया, युगोस्लाविया आणि १९४८ साली झेकोस्लोव्हाकिया व त्यापुढील वर्षी पूर्व जर्मनीत पूर्णत: समाजवादी सरकारे स्थापन झाली.

## २.४ पूर्व युरोपबाबत रशियाचे धोरण

पूर्व युरोपातील राष्ट्रांत समाजवादी शासने सत्तेवर आल्यामुळे सोव्हिएट रशियाशी वैचारिक एकात्मतेची भावना तेथे निर्माण होणे स्वाभाविकच होते. त्यानुसार राजकीय एकात्मतेचे धागे अधिक दृढ झाले.

### २.४.१ कोमिन्फार्मची स्थापना (The Communist Information Bureasu) Caminform)

पूर्व युरोपात समाजवादी सत्ता अस्तित्वात आल्यानंतर या सर्व राष्ट्रामध्ये ऐक्याची भावना बळकट करण्यासाठी तसेच वैचारिक देवाण-घेवाण करण्यासाठी रशियाने सप्टेंबर १९४७ मध्ये कोमिन्फार्म स्थापना केली.

पूर्व युरोपातील साम्यवादी पक्षांना रशियाच्या साम्यवादी पक्षांशी बांधून ठेवण्याचा व त्यांच्या धोरणात समन्वय साधण्याचा हा प्रयत्न होता. युगोस्लाव्हियासह पूर्व युरोपीय राष्ट्रातील साम्यवादी पक्ष त्या मंडळाचे सभासद होते. या राष्ट्रांत युद्धामुळे निर्माण झालेले अराजक नाहीसे करून राजकीय स्थिरस्थावर करण्यास रशियाने मदत दिली.

रशियातील शासकीय अधिकारी, पक्षाचे पदाधिकारी, शिक्षक व अर्थतज्ञ, वैज्ञानिक, तंत्रज्ञ अशी विभिन्न क्षेत्रातील अधिकारी रशियन मंडळी पूर्व युरोपात सल्लागार व मदतनीस म्हणून पाठविण्यात आले. अशाप्रकारे राजकीय एकात्मतेच्या नावाखाली पूर्व युरोपीय राष्ट्रे रशियाच्या वर्चस्वाखाली आली.

### २.४.२ मोलोतोव योजना (The Molotov Plan)

अमेरिकेच्या मार्शल योजनेला शह देण्यासाठी रशियाने १९४७ मध्ये मोलोतोव योजना अस्तित्वात आणली. पूर्व युरोपात औद्योगिक व कृषी उत्पादनाच्या वाढीला गती द्यावी. त्याचबरोबर त्यासाठी आवश्यक ते भांडवल व तंत्रज्ञान उपलब्ध करून द्यावे हा योजनेचा मुख्य उद्देश होता.

तसेच तेथील राहणीमानाची पातळी उंचावली आणि रशिया व पूर्व युरोप यांच्यातील आर्थिक संबंध परस्पर निगडीत व परस्परपूरक बनवावेत ही योजनेची मुख्य उद्दिष्टे होती.

### २.४.३ कॉमिकॉनची स्थापना (Council For Mutual Eco. Assistance)

रशिया व पूर्व युरोपात आर्थिक सहकार्य निर्माण व्हावे या उद्देशाने इ.स. १९४९ मध्ये कामिकॉनची स्थापना करण्यात आली. अमेरिकेने युरोपच्या आर्थिक पुर्नवसनासाठी आर्थिक मदतीची योजना सुरू केली होती. त्याकडे पूर्व युरोपीय राष्ट्रे आकर्षित होऊ नयेत. अशी रशियाची इच्छा होती. कारण अमेरिकेच्या आर्थिक मदतीचा परिणाम त्याच्या राजकीय व्यवस्थेवर होईल. अशी रशियाला भीती वाटत होती. ही सर्व राष्ट्रे रशियाच्याच प्रभावाखाली असावी म्हणून कॉमिकॉनची निर्मिती करण्यात आली.

पूर्व युरोपातील उत्पादनाचे स्वरूप, उत्पादन क्षमता आणि गरजा ध्यानात घेऊन आर्थिक व औद्योगिक सहकार्याच्या योजना आखण्याचे कार्य त्या मंडळाने करावयाचे होते. यामुळे पूर्व युरोपीय राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थेचे धागे रशियाच्या अर्थव्यस्थेत गुंतविण्यात आले होते.

### २.४.४ वॉर्सा करार (Warsaw Pact)

अमेरिकेच्या प्रेरणेने पश्चिम युरोपात घडत असलेल्या घटकांचा विचार करण्यासाठी रशियाने डिसेंबर १९५५ मध्ये हंगेरी, झेकोस्लोव्हाकिया, अल्बानिया, बल्गेरिया, पूर्व जर्मनी, पोलंड, रूमानिया आणि सोव्हिएट रशिया या आठ राष्ट्रांची बैठक पोलंडची राजधानी वॉर्सा येथे भरली.

या बैठकीत दीर्घ चर्चा होऊन आठ राष्ट्रांमध्ये मैत्री, सहकार्य व परस्पर मदतीचा करार (Treaty of Friendship Co-operation and Mutual Assistance) करण्यात येऊन सभासद राष्ट्रांचे संयुक्त सेनादल उभारण्याचे ठरले. या करारात वॉर्सा करार (Warsaw Pact) संबोधण्यात येते.

### २.४.५ स्टॅलीननंतर रशियाचे धोरण

स्टॅलीनच्या मृत्यूनंतर पूर्व युरोपातील समाजवादी राष्ट्रे रशियाच्या विरोधात बंड करून उभे राहतील अशी रशियन तज्ञांना धास्ती वाटत होती असे घडू नये म्हणून त्या राष्ट्रांसंबंधी अंगिकारलेल्या कडक ताठर धोरणात परिवर्तन करण्याची गरज आहे. याची जाणीव नंतरच्या कालखंडात आलेल्या क्रूश्चेव्ह झाली.

पूर्व युरोप बाबतची उद्दिष्टे तीच राहिली. परंतु साध्य करण्याचे मार्ग बदलण्यात आले. द्विपक्षीय कराराद्वारे पूर्व युरोपीय राष्ट्रावर रशियाचे धोरण लादण्याऐवजी अगोदर त्या

राष्ट्राचे विचार विनिमय करून निर्णय होण्याचे तसेच रशिया व पूर्व युरोपीय राष्ट्रे यांच्यातील संबंध राजकीय दडपणावर, नव्हे तर परस्पर सद्भावना, सहकार्य व सलोखा यांवर आधारण्यात आले.

रशियाने पूर्व युरोपीय राष्ट्रांचा विरोध असणारी केमिन्फार्म संघटना बरखास्त केली. पोलंड व रुमानिया यांचा विरोध ध्यानात घेऊन पूर्व युरोपीय साम्यवादी पक्षाची सल्लागार स्थापन करण्याची मागणी बाजूला ठेवली. त्याप्रमाणे साम्यवादी पक्षाच्या आंतरराष्ट्रीय परिषदा मॉस्कोप्रमाणे पूर्व युरोपातील इतर शहरी घेण्यात येऊ लागल्या.

स्टॅलीननंतर रशियाने आपली मते आपली भूमिका उपस्थित प्रतिनिधीच्या पुढे मांडली. इतरांवर ती लादली नाही. आर्थिक क्षेत्रात पूर्व युरोपीय राष्ट्रांशी अधिक जवळीक स्थापन करण्याचे काम स्टॅलीननंतर करण्यात येऊ लागले.

### (A) युगोस्लाव्हिाया

पूर्व युरोपातील साम्यवादी गटाच्या एकात्मतेला इ.स. १९४८ साली रशिया व युगोस्लाव्हिया यांच्यात पहिला तडा गेला. युगोस्लाव्हियाचा शासक मार्शल टिटो हा सोव्हिएट रशियाला अनुकूल असलेला व साम्यवादी विचारप्रणालीचा परंतु स्वतंत्र वृत्तीचा नेता व शासक होता. राष्ट्राच्या गरजा आहे आणि देशाच्या उन्नतीच्यादृष्टीने कोणती धोरणे अंगीकारणे गरजेचे आहे. याविषयी त्याची ठाम मते होती म्हणून अंतर्गत धोरणासंबंधी स्टॅलीनकडून आलेल्या सूचना जशाच्या तशा मान्य करण्याची त्याची तयारी नव्हती. मार्च ते मे १९४८ या तीन महिन्यात दोन नेत्यांमधील तीव्र मतभेद दिसून येऊ लागले. त्यामधून मतभेदाची दरी रुंदावत गेली. जून १९४८ मध्ये कॉमिन्फार्म मधून युगोस्लाव्हियाची हकालपट्टी करण्यात आली.

सोव्हिएट रशियाने युगोस्लाव्हियाची आर्थिक कोंडी केली. तरीही मार्शल टिटोचे शासन टिकाव धरू शकले. समाजवादी गटाकडून बहिष्कृत झाले असले तरी समाजवादी कास न सोडलेला मात्र अमेरिकेची आर्थिक मदत घेऊन देशाचा आर्थिक विकास स्वतंत्र्यवृत्तीने घडवून आणणारा मार्शल टिटो हा जागतिक राजकारणातील एक विरोधभासी चमत्कार मानला जातो.

### (B) पोलंडचा पेचप्रसंग

दुसऱ्या महायुद्धानंतर याल्टा परिषदेत पोलंडमध्ये कोणते सरकार असावे याविषयी इंग्लंड, अमेरिका आणि रशिया यांच्यातील मतभेद उघडकीस आले. इंग्लंडच्या मागणीनुसार इंग्लंडमधील निर्वासित पोलिश शासकाला पोलंडच्या हंगामी सरकारात सामावून घेण्यास रशियाने संमती दिली. इ.स. १९४७ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर गोमुल्का पक्षाच्या सरचिटणीस पदी नियुक्ती झाले. गोमुल्का साम्यवादी विचारप्रणालीचा असला तरी तो रशियाचे अनुकरण करणारा नव्हता त्याची भूमिका मार्शल टिटोप्रमाणेच होती. स्टॅलीनच्या निधनानंतर पोलंडमध्ये साम्यवादी पक्षात उदारीकरणाचे वारे वाहू लागले. लोकांचे राहणीमान सुधारण्याच्या प्रयत्नावर भर देण्याची गरज प्रतिपादन करण्यात आली. शेतीतील सुधारणेसाठी कृषीक्षेत्रात भांडवल गुंतवले जावे तसेच घर बांधणी व सामाजिक

कल्याणाच्या योजनांकडे शासनाने अधिक लक्ष पुरवावे असा मुद्द्यावर पक्षात चर्चा होऊ लागली.

१९५३ साली झालेल्या कामगारांच्या मोठ्या संपामुळे कामगारातील असंतोष दूर करणे हे आगत्याचे झाले. इ.स. १९५७ साली बुद्धीजीवी कलावंत, साहित्यिक यांच्या संघटना या निर्बंधावर टिका करू लागल्या पोलंडमधील पोझनान या शहरी जूनच्या अखेरीस मोटार कारखान्यांतील कामगारांनी संघटितरित्या निदर्शने केली. प्रक्षुब्ध कामगारावर पोलीस दलाने हल्ला करताच निदर्शनाचे रूपांतर चकमकीत झाले. अखेर देशात वाढणारा असंतोष कमी करण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या. शेवटी रशियाच्या निमंत्रणावरून गोमुल्काने नोव्हेंबर १९५६ मध्ये मॉस्कोला भेट दिली. मॉस्को भेटीत गोमुल्काने रशियन नेत्यांशी वाटाघाटी केल्या. त्यांना डिसेंबरमध्ये कराराचे रूप देण्यात आले.

### (C) हंगेरी

दुसऱ्या महायुद्धात हंगेरी हे जर्मनीचे मित्र राष्ट्र होते. रशियन सैन्याने इ.स. १९४४ मध्ये हंगेरीतील नाझी सत्तेचा शेवट केला. १९४७च्या ऑगस्ट महिन्यात हंगेरीमध्ये निवडणुका घेण्यात आल्या. इतर पक्ष मागे पडून सत्ता समाजवादी विचारप्रणालीच्या पक्षाच्या हाती आली. स्टॅलिन निष्ठ राकोसी ह्याच्या हाती साम्यवादी पक्षाचे सरचिटणीस आणि पंतप्रधान अशी दोन्ही पदे केंद्रित झाली; परंतु हंगेरीची आर्थिक स्थिती न सुधारल्यामुळे जनतेत लवकरच असंतोष पसरू लागला. देशातील स्फोटक परिस्थिती लक्षात घेऊन साम्यवादी पक्षाने २३ ऑक्टोबर रोजी नागीच्या हाती शासनाची सुत्रे सोपवली. त्याने काही सुधारणा केल्या. त्यामुळे नागीची लोकप्रियता वाढू लागली. त्याचबरोबर साम्यवादी पक्षाचा सरचिटणीस कादर याच्याशी त्याचे मतभेद वाढू लागले. इजिप्तवरील इंग्लंड व फ्रान्सचे आक्रमण नागीने वॉर्सा करारातून बाहेर पडण्याचा घेतलेला निर्णय आणि हंगेरीची तटस्थता टिकविण्यासाठी युनोकडे घेतलेली धाव यामुळे रशिया अतिशय अस्वस्थ होणे स्वाभाविक होते. रशियाने ४ नोव्हेंबरला पहाटे बुडापेस्टमध्ये आपल्या फौजा घुसविल्या. हंगेरीतील इतर काही महत्त्वाच्या शहरावरील रशियन सैन्याने हल्ला केला. नागीला सत्तेवरून दूर करून कादर यास पंतप्रधान बनविण्यात आले.

जानेवारी १९५७ मध्ये हंगेरीतील गोंधळाच्या परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी युनोच्या महासभेने एक समिती स्थापन केली. परंतु त्या समितीला हंगेरीत प्रवेश दिला गेला नाही. हंगेरीत स्थिरस्थावर होताच रशियन फौजाने बुडापेस्ट सोडले. २७ मार्च १९५७ रेजी कादर व रशियान सरकार यांच्यात परस्परांचा मदतीचा करार झाला.

## २.५ सारांश

दुसऱ्या महायुद्धानंतर, जगाचे वाटप करण्यासाठी लोकशाही अमेरिका व साम्यवादी रशिया हे दोन देश पुढे आले. युद्धोत्तर, पश्चिम जर्मनीवर अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स या गटाने तर रशियाने पूर्व जर्मनीवर कब्जा मिळविला. रशिया जगामध्ये साम्यवाद निर्माण करण्यासाठी धडपड करत होता. तर रशियाच्या साम्यवादी हुकूमशाहीला पायाबंद घालून लोकशाही निर्माण करण्याचा अमेरिकेचा प्रयत्न होता.

अमेरिकेने मार्शल योजना, ट्रुमल सिद्धांत, आयसेन हॉवर सिद्धांत या आधारे युरोपिय राष्ट्रांना लष्करी मदत देऊन, आपल्या वर्जस्वाखाली आणले. युरोपमध्ये आर्थिक पुनर्रचना करण्यासाठी युरोपियन आर्थिक संघटना, युरोपची महासमिती, बेनेलकस करार, ब्रुसेल्स करार, युरोपियन कोल अँड स्टील कम्युनिटी, युरोपची सामाजिक बाजारपेठ अस्तित्वात आली तर रशियाने पूर्व युरोपमधील सत्ता प्रस्थापित करण्यासाठी कोमिन्फार्म, मालोतोव योजना, कॉमिकाँलची स्थापना, वाँसी करार या संघटना निर्माण केल्या. १९व्या शतकाच्या अखेरपासून व २० व्या शतकाच्या मध्यापर्यंत साम्यवादाचा प्रभाव होता; परंतु स्टॉलेनच्या मृत्यूनंतर पूर्व युरोपातील साम्यवादाची पीछेहाट झाली.

इ.स.१९३९ ते १९४५ या काळात झालेल्या दुसऱ्या महायुद्धाचे संपूर्ण जगाची त्यातही प्रामुख्याने युरोपची रचना पूर्णतः बदलून गेली. अमेरिका व रशिया यांच्यातील शीतयुद्धामुळे संपूर्ण जग दोन गटात विभागले गेले. पूर्व युरोप रशियाच्या व पश्चिम युरोप अमेरिकेच्या छत्रछायेखाली गेला. दुसऱ्या महायुद्धात युरोपचे फार मोठे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक नुकसान झाले होते. दारिद्र्य, बेकारी, अन्नाचा तुटवडा यांनी जनता त्रस्त झाली होती. त्यामुळे पूर्वीप्रमाणे युरोपला उर्जितावस्था निर्माण करून देणे गरजेचे होते. युरोपची पुनर्रचना करण्यासाठी बडे बडे देश एकत्र आले. त्यातून विविध योजना, संघटन निर्माण करून जी उपापयोजना केली गेली. त्यामुळे फार कमी काळात युरोप आपल्या पायावर उभा राहिला हे दिसून येते.

## २.६ प्रश्न

१) १९४५-१९६२ या काळातील पश्चिम युरोपातील आर्थिक पुनर्रचनांचा आढावा घ्या.

२) रशियाच्या नेतृत्वाखालील पूर्व युरोपच्या पुनर्रचनेचा आढावा घ्या.

३) मार्शल योजनाद्वारे पश्चिम युरोपातील अमेरिकेच्या सहभागाचा आढावा घ्या.

४) युरोपच्या पुनर्रचनेसाठी कोणकोणत्या उपापयोजना व करार करण्यात आले.

५) पूर्व युरोपातील साम्यवादी सत्तेची माहिती सांगा.

६) पूर्व युरोपात रशियाने कोणते धोरण अवलंबिले ?

## २.७ संदर्भ


१. प्रा.राजदरेकर / प्रा. गर्गे - आधुनिक जगाचा इतिहास - विद्या प्रकाशन, नागपूर

२. ना. सी. दिक्षीत- पश्चिमात्य जग - पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर

३. गायकवाड, कदम, थोरात - आधुनिक जगाचा इतिहास - भाग १ - श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर.

४. प्रा. हरिदास जाधव व प्रा. कल्याण चव्हाण - आधुनिक जगाचा इतिहास - अक्षरलेण प्रकाशन, सोलापूर.


munotes.in

५. डॉ. सुमन वैद्य - आधुनिक जग - श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर .

६. डॉ. सौ . शरावती शिरगावकर - आधुनिक युरोप - श्रीविद्या प्रकाशन, पुणे.

७. श. गो. कोलारकर - युरोपचा इतिहास - आनंद प्रकाशन, नागपूर

८. प्रा. जितेंद्र भामरे- आशियाचा इतिहास - शेठ प्रकाशन, मुंबई .

९. डॉ. रमेश गुप्ते व शे. रा. कुलकर्णी - आग्नेय आशियाचा इतिहास - परिमल प्रकाशन, औरंगाबाद

१०. डॉ. अनिलकठारे - आधुनिक चीन - कल्पना प्रकाशन, नांदेड .

११. डॉ. मु. बा. देवपुजारी - रशियाचा इतिहास - श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर

१२. डॉ. मु. बा. देवपुजारी - आधुनिक आशियाचा इतिहास - श्री मंगेश प्रकाशन , नागपूर

१३. डॉ. नि. वक्कानी - आधुनिक भारताचा इतिहास - श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर

१४. डॉ. जालिंदर भोसले - आधुनिक आशियाचा इतिहास - मुरलीधर प्रकाशन, पुणे

१५. डॉ. सुमन वैद्य व डॉ. शांता कोठेकर - भारताचा इतिहास - श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर

१६. Adolf Hitler - Mein Kampf - KRJ Book International, Delhi

१७. D. R. Sardesai and B. K. Gokhale - World History - Kitab Mahal Publication, Alahabad.

१८. M. D. David - Rise and Growth of Modern China.

१९. तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी - मराठी विश्वकोश - भाग २ व ९

२०. डॉ. शांता कोठेकर, अमेरिकेच्या संघराज्याचा इतिहास - श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर

२१. डॉ. सुमन वैद्य - रशियाचा इतिहास - श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.

२२. विस्टन चर्चील - दुसरे महायुद्ध - महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, १९७८.

२३. डॉ. हुकुमचंद जैन, डॉ.कृष्णचंद्र माथुर - आधुनिक जगाचा इतिहास - के. सागर प्रकाशन पुणे.

❖❖❖❖

munotes.in

# ३

# रशियाचे विघटन

**घटक रचना :**

३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रस्तावना

३.२ रशियाचे अंतर्गत धोरणातील अपयश

३.३ क्रुश्चेव्ह ते गोर्बाचेव्ह

३.४ ग्लासनोस्त खुलेपणा

३.५ पेरेस्त्रॉइका (Perestroika) पुनर्रचना

३.६ बाल्टिक राज्यातील बंड

३.७ सोव्हिएट संघराज्याची अखेर

३.८ मिखाईल गोर्बाचेव्हचे मूल्यमापन

३.९ बोरिस येलत्सिनचा उदय

३.१० बोरिस येलत्सिन यांची कामगिरी

३.११ सारांश

३.१२ प्रश्न

३.१३ संदर्भ

## ३.० उद्दिष्ट्ये

या प्रकरणात इ.स.१९१७ मध्ये लेनीनच्या नेतृत्वाखाली झालेली क्रांती व रशियाने स्वीकारलेल्या साम्यवादाच्या जोरावर रशियात निर्माण झालेली हुकुमशाही आणि या जोरावर रशियाने सर्व क्षेत्रात केलेली अतुलनीय प्रगती आणि रशियाचा दुसऱ्या महायुद्धानंतर महासत्ता झालेला उदय या सर्व गोष्टींचा अभ्यास करने हे महत्वाचे उद्दिष्ट तर आहेच पण त्याचबरोबर कृश्चेव ते गोर्बाचेव्ह यांच्या सरकारच्या काळात रशियातील साम्यवादी हुकुमशाहीला बसलेले झटके, अंतर्गत परिस्थितीवर झालेला परिणाम, रशियाच्या विस्तारवादाविरुद्ध त्यांच्याच ताब्यात असलेल्या विविध राष्ट्रांनी केलेले उठाव व मिळवलेले स्वातंत्र्य आणि त्यातून झालेले रशियाचे विघटन ही उद्दिष्टये या प्रकरणातून साध्य करण्याचा प्रयत्न केला आहे.

munotes.in

## ३.१ प्रस्तावना

अमेरिकन स्वातंत्र्ययुद्ध, फ्रेंच राज्यक्रांती, १९१७ ची रशियातील बोल्शेविक क्रांती, भारताचे स्वातंत्र्य, व्हिएतनामचा स्वातंत्र्यलढा, चीनची लाल क्रांती या सार्याच क्रांत्या म्हणजे मानवी इतिहासातील उज्ज्वल अध्याय होय. कार्ल मार्क्सने प्रतिपादन केलेल्या साम्यवादी विचारसरणीचा प्रसार हळूहळू एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस होऊ लागला होता. अठराव्या शतकात औद्योगिक क्रांती झाली. एकोणिसाव्या शतकात या क्रांतीने युरोपात चांगलेच मूळ धरले व पश्चिम युरोपीय राष्ट्रात अनेक उद्योगधंदे कारखान्यात काम करण्यासाठी कामगारांचा शहराकडे ओढा सुरू झाला व खेडी ओस पडू लागली. कारखान्यात कामगार एकत्र येण्याने त्यांच्या संघटनेची भावना जीव धरू लागली. मार्क्सचा साम्यवाद रूजवण्यासाठी अनुकुल भूमी रशियात मिळाली.

लेनिन, स्टॅलिन, ट्रॉटस्की इ. साम्यवादी नेत्यांनी रशियात ऑक्टोबर, १९१७ मध्ये बोल्शेविक राज्यक्रांती घडवून आणली. साम्यवादी तत्त्वज्ञानाच्या प्रभावामुळे ही राज्यक्रांती घडून आल्यामुळे रशियात साम्यवादाचा प्रयोग सुरू झाला. लेनिनच्या हाती सत्ता आल्यानंतर मार्क्सच्या साम्यवादात प्रतिपादन केल्याप्रमाणे वर्गकलाहात जमीनदार, सरंजामदार, झारशाहीतील सत्ताधारी वर्ग हे प्रस्थापित भांडवलशाहीचे प्रतिनिधी असल्याने त्यांचा समूळ नाश करण्याची जबाबदारी लेनिनवर आली. पण दुर्दैवाने लेनिनचा १९२४ साली मृत्यू झाल्याने साम्यवादी रशियाची सूत्रे स्टॅलिनच्या हाती आली. कामगारांच्या हुकुमशाहीच्या नावाखाली रशियात स्टॅलिनची हुकुमशाही सुरू झाली; परंतु स्टॅलिनच्या मृत्यूनंतर त्याने रशियाभोवती उभारलेला पोलादी पडदा (Iron curtain) भंग पावला. क्रुश्चेव्हने रशियाच्या आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठेला धक्का पोहोचणार नाही अशा बेताने स्टॅलिनच्या राजवटीतील हुकुमशाहीचे क्रौर्य सौम्य करण्यास सुरूवात केली.

क्रुश्चेव्ह ते गोबाचेव्ह हा रशियाचा सुमारे ३०-३२ वर्षाचा प्रवास विशेष महत्त्वाचा मानला जातो. स्टॅलिनने साम्यवादी तत्वज्ञानावर उभा केलेला रशियाचा डोलारा किती पोकळ आहे हे या काळात निदशर्नात आले आणि १९९०-९१ साली सोव्हिएट संघराज्याचे विघटन होऊन रशियाच्या तथाकथित विकासाचा महासत्ता म्हणून असलेल्या प्रतिष्ठेचा साम्यवादाच्या आदर्श राजवटीचा डोलारा कोसळून जमीनदोस्त झाला.

## ३.२ रशियाचे अंतर्गत धोरणातील अपयश

रशियातील साम्यवादी राजवट अंतर्गतदृष्ट्या अनेक अपयशांनी घेरली होती. सामुदायिक व सहकारी शेतीमुळे उत्पादन वाढ अपेक्षेइतकी झाली नाही असा शेतीचा प्रयोग पूर्णपणे फसला असूनही राज्यकर्तांनी तो अट्टहासाने चालू ठेवल्यामुळे अन्नधान्याचे उत्पादन इतके घटले की देशात अन्नधान्याची प्रचंड टंचाई निर्माण झाली.

तसेच उद्योगधंदे, कारखाने, शस्त्रास्त्र निर्मितीसाठी वापरण्यात आल्याने दैनंदिन जीवनावश्यक वस्तूंच्या उत्पादनास खीळ बसली. त्यामुळे त्यांचीही टंचाई निर्माण झाल्याने सामान्य जनता हैराण झाली होती. जीवनावश्यक वस्तूंचे भाव उत्पादन खर्चावर आधारित न ठेवता नागरिकांना त्या स्वस्त दरात देण्याचे धोरण अवलंबल्याने येणार्या तुटीचा भरणा

शासनालाच करावा लागत असे त्यामुळे दरवर्षी अर्थव्यवस्थेत बरीच मोठी तूट येऊ लागली होती; परंतु जीवनावश्यक वस्तूंचा प्रचंड तुटवडा भासू लागल्यानंतर शासनाला हे सोंग आणखी फार काळ टिकवणे अशक्य झाले आणि अन्नधान्याची आयात करणे भाग पडले व त्यांच्या किंमतीही पूर्वी इतक्या स्वस्त ठेवता येणे शक्य झाले नाही. रशियन रुबल या चलनाचे परकीय मूल्यही घसरले होते.

## ३.३ क्रुश्चेव्ह ते गोर्बाचेव्ह

स्टॅलिनच्या मृत्यूनंतर सत्तेवर आलेले क्रुश्चेव्ह, बुल्गानिन कोसिजिन, ब्रेझनेव्ह इत्यादी नेत्यांनी साम्यवादी हुकुमशाहीची चौकट हळूहळू खिळखिळी करायला सुरूवात केली होती. क्रुश्चेव्हने स्टॅलिनच्या पापांचा पाढा वाचायला प्रारंभ करताच इतरांनीही त्यांचीच 'री' ओढून साम्यवादी नेत्यांवर हल्ला करू लागले. मार्क्स, लेनिन, स्टॅलिन यांची स्मारके, पुतळे यांची मोडतोड होऊ लागली. लेनिन, स्टॅलिनची शवे दफन करण्यात आली. प्रसार माध्यमावरील नियंत्रणे सैल झाल्याने देशात स्वातंत्र्याचे वारे वाहू लागले. परकीय नागरिकांचे येणे-जाणे रशियात सुरू झाल्यानंतर रशियान नागरिकांना आपल्या दैन्यावस्थेची कल्पना येऊ लागली. तरीही प्रशासनातील नोकरशाहीची यंत्रणा जबरदस्त पकड देऊन होती. कारण या नोकरशाहीचे मुख्य पाठीराखे ब्रेझनेव्हसारखे सत्ताधारीच होते.

ब्रेझनेव्ह हा वयाच्या शाहात्तराव्या वर्षी १९८२ साली मरण पावला. त्यानंतर युरो आन्द्रोपोव हा पक्षाचा महा सचिव झालेला. त्याच्याबद्दल तक्रार नव्हती पण तोही बिचारा वयोवृद्ध एकोणसत्तर वर्षाचा होता. आन्द्रोपोव वर्षभर टिकला. त्याचे निधन झाल्यावर कोन्स्तान्निन चेर्नेन्को राज्यावर आला. ते चौर्हात्तर वर्षाचे होते. प्रकृतीच्या कारणासाठी दिवसेन्दिवस ते टि.व्ही. वरून गायब व्हायचा पोलिटब्यूरो, मध्यवर्ती समिती सारी अशीच पिकल्या पानांनी भरलेली. सार्या रशियालाच जणू वृद्धत्व आले होते. देश स्थिर, स्थितिस्थापक, चैतन्यहीन, काही घडतच नव्हते.

प्रदीर्घ आजारानंतर ११ मार्च १९८५ रोजी चेन्रेन्कोचे निधन झाले आणि मिखाईल गोर्बाचेव्हचे वडील एका ट्रॅक्टर विभागाचे प्रमुख होते. गोर्बाचेव्ह कुटुंब तसे गरीबच होते आणि मिखाइलचे बालपण मातीच्या घरात शेणाने सारवलेल्या जमिनीवर रांगण्यात आणि गायी-गुरे मेंढ्या यांच्या सान्निध्यात गेले.

मिखाईल गोर्बाचेव्हने अत्यंत कठीण परिस्थितीत शालेय शिक्षण पुरे केले स्थव्हेरोपोल येथील कृषी महाविद्यालयातून पदवी घेतल्यानंतर मिखाईलने मास्को विद्यापीठातून कायद्याचे शिक्षणही पूर्ण करून त्यात डॉक्टरेटही संपादन केली. विद्यापीठात शिक्षण घेत असतानाच गोर्बाचेव्हचे रईसा या युवतीशी प्रेम जमले आणि त्याचे रूपांतर गोर्बाचेव्ह रईसा यांच्यात विवाहात झाले.

## ३.४ ग्लासनोस्त खुलेपणा

ग्लासनोस्तची (खुलेपणा) पहिली झलक १९८५ पासूनच सुरू झाली. याचे प्रतिबिंब अर्थातच वृत्तपत्रामध्ये साहित्यात व कलांमध्ये दिसू लागला. अप्रिय आर्थिक बाबी पूर्वी कधीच वृत्तापत्रांमध्ये छापल्या जात तसे पण त्या छापण्यास परवानगी मिळाली. घसरणारे

आयुर्मान व वाढणारे बालमृत्युचे प्रमाण यांविषयीची धक्कादायक आकडेवारी प्रसिद्ध होऊ लागली. शेतीच्या दूरव्यवस्थेचे चित्र वृत्तपत्रांमध्ये स्पष्ट होऊ लागली. टीकायुक्त भाषणे, अपघाताच्या बातम्या एवढेच काय कम्युनिस्ट पक्षाच्या गतेतिहासावर खुली टीका टिप्पणी सारे छापले जाऊ लागले.

वृत्तपत्रे, मासिके, साप्ताहिके, पुस्तके यांचा महापूर सुरू झाला. सत्तर वर्षे कोंडून ठेवलेल्या भावना वेगवेगळ्या रूपांनी उफाळून आल्या. कविता, कथा, विनोदी साहित्य, उपरोध, आत्मचरित्र, नाटके, सिनेमे, आत्मपरिक्षण व आत्मनिर्भत्सनेचा एकच महापूर सोव्हिएत युनियनमध्ये आला. वृत्तपत्रांची विक्री वेगाने वाढू लागली. सोव्हिएत युनियनमध्ये वाचनाचे प्रमाण खूपच मोठे होते. पूर्वो वृत्तपत्रांमध्ये पक्ष पुढार्यांची रटाळ भाषणे, कोरडी आकडेवारी, सरकारी घोषणा इ. गोष्टींनी रकानेच्या रकाने भरून येत असत. ग्लोसनोस्तमुळे वृत्तपत्रांचे स्वरूपच बदलून गेले. मार्क्सवाद वा साम्यवादी राजवट यांच्यावर उघड टीका करण्यास कोणाला भीती वाटेनाशी झाली. गोर्बाचेव्ह यांनी रशियात स्वातंत्र्याचे नवे युग आणले.

## ३.५ पेरेस्त्रॉइका (PERESTROIKA) पुनर्रचना

पेरेस्त्रॉइका याचा अर्थ पुनर्रचना होय. सोव्हिएट समाज व त्याची आर्थिक व्यवस्था यांच्यात आमूलाग्र बदल करून त्यात नवचैतन्य आणण्याच्या आपल्या योजनेस गोर्बाचेव्ह यांनी हे नाव दिले.

गोर्बाचेव्हनी बाजार अर्थव्यवस्थेवर अवलंबून असणारा आर्थिग पुर्नरचना कार्यक्रम लोकांना दिला. त्यात स्वत:चा कारभार, जमीन, संपत्तीवर, वैयक्तीक हक्क आणि परदेशाशी व्यापार, यावर त्यांनी भर दिला. त्यामुळे स्वत:च्या मालकीचे उद्योग सुरू झाले.

## ३.६ बाल्टिक राज्यातील बंड

गोर्बाचेव्ह यांनी सुरू केलेल्या नव्या वार्यामुळे सोव्हिएट युनियनमधील काही प्रजासत्ताक वांशिक प्रश्नांवरून बंडे उद्भवली आणि त्यातून स्वातंत्र्याची मागणी होऊ लागली. बाल्टिक राज्ये म्हणून ओळखल्या जाणार्या लिथुआनिया, इस्टोनिया व लटाव्हिया या राज्यांतही बंड उद्भवले येथे वांशिक प्रश्न फारसा गंभीर नव्हता. त्यांची मुख्य मागणी स्वातंत्र्याची होती. तिचा जोर वाढून सरकार कारभार बंद करण्याचा व लिथुआनियातील रेडिओ व टेलिव्हिजन केंद्रे ताब्यात घेण्याचा प्रयत्न झाला. तिथल्या लष्कराने रणगाड्याचा उपयोग करून ही केंद्रे मुक्त केली. पण यात १३ नागरिक ठार झाले. त्यामुळे बाल्टिक जनता संतप्त झाली. गोर्बाचेव्ह यांनी अध्यक्ष म्हणून आपले अधिकार वाढवून घेतले असले तरी ते वापरण्याची राजकीय शक्ती त्यांच्यापाशी नाही. शिवाय घटक राज्यांना स्वायत्तता देऊन सैलसर संघराज्य करावे की नाही याचाच निर्णय गोर्बाचेव्ह यांना करता येत नव्हता.

## ३.७ सोव्हिएट संघराज्याची अखेर

गोर्बाचेव्ह यांनी पुनर्रचना व खुलेपणा यांचे धोरण जाहीर केल्यापासून सोव्हिएट, संघराज्यात नवविचाराचे वाहू लागले. तसेच ते साम्यवादी राजवटी असलेल्या पूर्व युरोपीय देशातही गेले. परिणामी पूर्व साम्यवादी राजवटी १९८८-८९ मध्ये धडाधड कोसळल्या.

सोव्हिएट युनियनमधील प्रजासत्ताकांच्यावरही या घटनांचा प्रभाव पडत होता. कामगारांचे संप, मोर्चे, निदर्शने होऊ लागली. महागाई, टंचाई, चलनवाढ, काळाबाजार यांनी रशियात कहर केला. सर्व क्षेत्रातील उत्पादन थंडावले व रशिया अराजकाच्या उंबरठ्यावर येऊन ठेपला होता.

बाल्टिक राज्यातील लिथुआनियाने ११ मार्च १९९० रोजी सार्वभौमत्व जाहीर केले होते; परंतु त्यावेळी आर्थिक नाकेबंदीच्या मार्गाने त्यास रोखून धरले. पुढे गोर्बाचेव्हाच्या आर्थिक पुनर्रचना व खुलेपणाचा फायदा घेऊन लिथुआनिया इथ्थेनिया व लटाव्हिया या बाल्टिक राज्यानी स्वातंत्र्यासाठी बंड उभारले. याहीवेळी रिशयन लष्कराने बळाचा वापर करून ने बंड मोडून काढले. बाल्टिक राज्ये १९९० मध्येच स्वतंत्र्य झाली. त्यानंतर रशिया, युक्रेन व बायलोरशिया यांनी स्वातंत्र्य जाहीर केले.

अखेरीस ३० डिसेंबर १९२२ रोजी लेनिने स्थापन केलेले सोव्हिएट युनियन ३१ डिसेंबर १९९१ रोजी विलय पावले आणि कायदेशीरपणे सोव्हिएट युनियनमधील १५ प्रजासत्ताके स्वतंत्र्य व सार्वभौम झाली.

## ३.८ मिखाईल गोर्बाचेव्हचे मूल्यमापन

मिखाईल गोर्बाचेव्ह सोव्हिएट युनियनचे अध्यक्ष म्हणून सात वर्षाच्या क्रांतिकारक राजवटीनंतर २५ डिसेंबर १९९१ रोजी निवृत्त झाले. सोव्हिएट युनियन एकसंघ ठेवण्यात गोर्बाचेव्ह यांना अपयश आले हे खरे असले तरी काही अपयश अनिवार्य असतात. आणि ती उज्ज्वलही असतात. गोर्बाचेव्ह यांनी आपल्या सहा-सात वर्षाच्या कारकिर्दीत स्वदेशाचेच नव्हे तर, सार्या जगाचे स्वरूप बदलून टाकले. त्यांच्या पुनर्रचना व खुलेपणाच्या धोरणामुळे सामान्य लोकांना न्याय मिळाला. सामान्य लोकांचे जीवन जखडून टाकणारी व्यवस्था मोडीत काढण्यात आली. लाखो एकर जमीर खाजगी मशागतीसाठी देण्यात आल्यामुळे शेतीसुधारणा करण्याच्या मार्गातील अडथळा दूर झाला. सरकारी करणाने जी उत्पादनशक्ती क्षीण झाली होती ती मोकळी झाली.

गोर्बाचेव्ह हे या शतकातील एक महान क्रांतिकारक आहेत असे एका राजकीय पत्रकाराने त्यांच्या कामगीरीचे मूल्यमापन करताना म्हटले आहे. जगाच्या इतिहासात काही विलक्षण व भव्य घटना अशा असतात की त्यांचे ऐतिहासिक महत्त्व त्याच वेळी ताबडतोब समजून चुकते. आधुनिक इतिहासात फ्रेंच राज्यक्रांती, १९१७ ची ऑक्टोबर क्रांती आणि १९८९-९० ची गोर्बाचेव्ह यांची तिसरी क्रांती या अशा ऐतिहासिक घटना म्हणाव्या लागतील.

या सर्व १९८५ ते १९८९ च्या जागतिक शांततेच्या घटनांमध्ये पुढाकार गोबाचेव्ह यांचा होता. जागतिक राजकारणाचा अजेंडा ते ठरवीत होते. ते शांतिदूत होते. पुढे त्यांना १९८९ साली शांततेचा नोबल पुरस्कारही मिळाला.

## ३.९ बोरिस येलात्सिनचा उदय

बोरिस येलत्सिन देखील शेतकर्याचाच मुलगा होता. गोर्बाचेव्ह यांचा समवयस्क येलात्सिनला खरे म्हणजे गोर्बाचेव्ह यांनीच राष्ट्रीयस्तरावर आणले होते. बोरीस येलत्सीन

यांची मॉस्को ह्या सोव्हिएत संघाच्या राजधानीत फार मोठ्या प्रमाणात लोकप्रियता होती. त्यांनी कम्युनिस्ट पक्षाच्या मॉस्को शाखेतून भ्रष्टाचाराचे उच्चाटन केलेले होते. त्यामुळे त्यांची मॉस्कोमधील लोकांमध्ये अमाप लोकप्रियता होती.

१९९१ च्या नाताळच्या दिवशी मिखाईल गोर्बाचेव्ह यांनी सोव्हिएट संघाच्या राष्ट्रपती पदाचा राजीनामा दिला. १९१७ मध्ये अस्तित्वात आणलेला सोव्हिएट संघ इतिहास जमा झाला. बोरीस येलत्सीन अध्यक्ष झाल्यानंतर त्यांनी आपल्या उदारीकरणाची निता राबविण्यास सुरूवात केली.

## ३.१० बोरिस येलत्सिन यांची कामगिरी

### १) आर्थिक सुधारणा कार्यक्रम निश्चित:-

बोरिस येलात्सिन हे भांडवलशाही लोकशाहीचे मसीहा बनले. त्यांनी राज्याची उभारणी केली. समाजवादाऐवजी मुक्त बाजाराची भांडवलशाही व्यवस्था उभी केली. त्यासाठी आर्थिक सुधारणा कार्यक्रम निश्चित केला.

### २) युनोत स्थान:-

आण्विक अस्त्रे, जुने-करार-मदार यांच्या जबाबदार्यांचा प्रश्न उद्भवला त्यावेळी येलात्सिन यांनी ही जबाबदारी स्विकारली. त्यामुळे संयुक्त राज्याच्या सुरक्षा समितीत रशियास स्थान मिळाले व येलसित्सनच्या राज्यास युनोत स्थान प्राप्त झाले.

### ३) स्वतंत्र्य राज्यांना जन्म:-

नवरशिया हा स्वतंत्र्य राज्याचे राजकुल बनला. संघराज्य विघटिक होऊ नये म्हणून गोर्बाचेव्ह छोट्या राज्यांशी करार करीत होते. १९ ऑगस्ट १९९१ ला उठाव झाला. स्वतंत्र्य राज्यांनी स्थानिक समाजवादास उजाळा दिला. ही राज्ये एकत्र येण्यास तयार नव्हती. आर्थिक व राजकीय वास्तवाचे भान लक्षात घेऊन येलात्सेन यांनी स्वतंत्र्य राज्याचे राजकुल जन्माला आणले.

### ४) नेतृत्त्व:-

रशियात गोर्बाचेव्ह यांच्या धोरणावरून दोन गट पडले. मध्यममार्गी गोर्बाचेव्ह त्यामुळे मागे पडले. या काळात गोर्बाचेव्हचे नेतृत्व सोव्हिएत कम्युनिस्ट राजवट व समाजवादी प्रजासत्ताक संपुष्टात येऊन येलत्सिनाचे नेतृत्त्व यशस्वी ठरले. रशियातील भांडवल शाही लोकशाहीचे येलात्सिन प्रणेते बनले.

### १) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय धोरण:-

बोरिस येलत्सिनच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय धोरणास रिशयन जनतेने उचलून धरले.

**येलत्सिनच्या कामगिरीचे मूल्यमापन:-**

सोव्हिएत समाजवादी संघराज्याचा चेहरा निर्माण करणार्या गोर्बाचेव्हचे नेतृत्व येलत्सिनने झुगारले. ७५ वर्षे अव्याहत सत्ता गाजविणार्या साम्यवाद्यांना हादरे बसले. आर्थिक दुरावस्थेची चिकित्सा करून त्याला पर्याय देण्यचा प्रयत्न गोर्बाचेव्हने केला. पण तो अपुरा पडला.

रशियात वांशिक, सांस्कृतिक संघर्ष व ताणतणाव निर्माण झाले ते साम्यवादी सत्तेस सोडविता आले नाहीत. हे येलत्सिनने ओळखले होते. लोकशाहीचा संकोच होत होता. जनतेच्या पाठिंब्यावर येलात्सिन सत्ता व कार्यक्रम राबवू लागले. पहिल्या आर्थिक सुधारणा आवेगात लोकांनी त्यांना साथ दिली. आश्वासित भांडवलशाही सुबत्ता हवी असेल तर अध्यक्षाकडे अधिक सत्ता हवी हे येलात्सिनचे सूत्र होते.

आर्थिक क्षेत्रातील यशापयश हा ऊन-सावल्यांचा खेळ आहे. नवे भांडवलशाहीचे सुबत्ताधिष्ठित जीवन देण्यात येलत्सिन अंशत: यशस्वी ठरले.

## ३.११ सारांश

१९९० च्या दरम्यान गोर्बाचेव्ह यांच्या पुढे अनेक आव्हाने उभी राहिली होती. रशियामध्ये बोरिस येलत्सि हे धार्मिक स्वातंत्र्याचा वारंवार उच्चार करत होते. आर्थिक जग निर्माण करण्याचे आव्हान गोर्बाचेव्ह यांच्या समोर होते. पूर्व युरोपातील कम्युनिस्ट राजवटी धडाधड कोसळत होत्या. तर सोव्हिएट युनियन मधील १५ प्रजासत्ताकांनी स्वतंत्र होण्याची तयारी केली होती. गोर्बाचेव्ह यांना हे आव्हान समर्थपणे पेलता येणे अशक्य झाले. बोरिस येलत्सित हे रशियाच्या नव्या राष्ट्रसंघाचे नेते बनले.

## ३.१२ प्रश्न

१. सोव्हिएत संघामधील साम्यवादाच्या पाडावाला कोणती कारणे जबाबदारी कोणती?

२. गोर्बाचेव्ह यांच्या ग्लॅसनोस्त व पेरेस्त्रॉईका ह्या धोरणामुळे सोव्हिएत संघात साम्यवादाचा पाडाव कसा झाला हे स्पष्ट करा?

३. बोरिस येलत्सितच्या कामगिरीचे वर्णन करा?

## ३.१३ संदर्भ

१. प्रा.राजदरेकर / प्रा. गर्गे - आधुनिक जगाचा इतिहास - विद्या प्रकाशन, नागपूर

२. ना. सी. दिक्षीत- पश्चिमात्य जग - पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर

३. गायकवाड, कदम, थोरात - आधुनिक जगाचा इतिहास - भाग १ - श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर.

munotes.in

४. प्रा. हरिदास जाधव व प्रा. कल्याण चव्हाण - आधुनिक जगाचा इतिहास - अक्षरलेण प्रकाशन, सोलापूर.

५. डॉ. सुमन वैद्य - आधुनिक जग - श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर .

६. डॉ. सौ . शरावती शिरगावकर - आधुनिक युरोप - श्रीविद्या प्रकाशन, पुणे.

७. श. गो. कोलारकर - युरोपचा इतिहास - आनंद प्रकाशन, नागपूर

८. प्रा. जितेंद्र भामरे- आशियाचा इतिहास - शेठ प्रकाशन, मुंबई .

९. डॉ. रमेश गुप्ते व शे. रा. कुलकर्णी - आग्रेय आशियाचा इतिहास - परिमल प्रकाशन, औरंगाबाद

१०. डॉ. अनिलकठारे - आधुनिक चीन - कल्पना प्रकाशन, नांदेड .

११. डॉ. मु. बा. देवपुजारी - रशियाचा इतिहास - श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर

१२. डॉ. मु. बा. देवपुजारी - आधुनिक आशियाचा इतिहास - श्री मंगेश प्रकाशन , नागपूर

१३. डॉ. नि. वक्कानी - आधुनिक भारताचा इतिहास - श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर

१४. डॉ. जालिंदर भोसले - आधुनिक आशियाचा इतिहास - मुरलीधर प्रकाशन, पुणे

१५. डॉ. सुमन वैद्य व डॉ. शांता कोठेकर - भारताचा इतिहास - श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर

१६. Adolf Hitler - Mein Kampf - KRJ Book International, Delhi

१७. D. R. Sardesai and B. K. Gokhale - World History - Kitab Mahal Publication, Alahabad.

१८. M. D. David - Rise and Growth of Modern China.

१९. तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी - मराठी विश्वकोश - भाग २ व ९

२०. डॉ. शांता कोठेकर, अमेरिकेच्या संघराज्याचा इतिहास - श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर

२१. डॉ. सुमन वैद्य - रशियाचा इतिहास - श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.

२२. विस्टन चर्चील - दुसरे महायुद्ध - महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, १९७८.

२३. डॉ. हुकुमचंद जैन, डॉ.कृष्णचंद्र माथुर - आधुनिक जगाचा इतिहास - के. सागर प्रकाशन पुणे.

❖❖❖❖

# ४

# जर्मनी, युगोस्लाव्हिया व झेकोस्लावीयाचे पुनरुज्जीवन

**घटक रचना :**

४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रस्तावना

४.२ पोलंड

४.३ लोकशाहीची सुरूवात

४.४ हंगेरी

४.५ झेकोस्लोव्हाकिया

४.६ रूमानिया

४.७ बल्गेरिया

४.७.१ अल्बानिया

४.८ युगोस्लाव्हिया

४.९ जर्मनी

४.९.१ दुसऱ्या महायुद्धानंतर जर्मनीची फाळणी

४.९.२ पूर्व जर्मनीमधील साम्यवादी सरकार

४.९.३ बर्लिन भिंत

४.९.४ जर्मनीचे एकीकरण

४.९.५ पश्चिम युरोपमध्ये युरोपीयन संघाचा उदय

४.१० सारांश

४.११ प्रश्न

४.१२ संदर्भ

munotes.in

## ४.० उद्दिष्ट्ये

- साम्यवादाच्या पाडावाची पार्श्वभूमी समजून घेणे.
- दुसऱ्या महायुद्धानंतरच्या जर्मनीच्या फाळणीचा आढावा घेणे.
- जर्मन एकिकरणाच्या घडामोडीचा अभ्यास करणे.

## ४.१ प्रस्तावना

गोर्बाचेव्ह सोव्हिएत युनियनचे विड्रो विल्सन बनले पूर्व युरोपात पोलंड, पूर्व जर्मनी झेकोस्लोव्हाकिया, हंगेरी, रूमानिया, बल्गेरिया यांना सोव्हिएत बरोबर समानतेने लेखून त्यांच्याशी संबंध ठेवले जातील असे त्यांनी स्पष्ट केले. या राष्ट्रांवरील साम्यवादी वर्चस्व समाप्त झाले.

पूर्व युरोपमधील हंगेरी, झेकोस्लोव्हाकिया या राष्ट्रात लोकशाहीचे समर्थन करणारी शक्ती पूर्वीपासूनच लोकशाहीची वाट पहात होती. वरील राष्ट्रातील जनता ४० वर्षे सोव्हिएत संघाच्या ताब्यात राहिली. त्यांची संस्कृती व इतिहास रशियाबरोबर निगडीत नव्हता. या देशातील लोक पश्चिम युरोपीय देशांशी विशेषतः जर्मनी, ऑस्ट्रेलिया यांच्याशी मिळते जुळते होत होते. रशियाच्या नियंत्रणाखाली राहणार्या युगोस्लाव्हिया व अल्बानिया हे दोन समाजवादी देश होते. यापैकी युगोस्लाव्हिया सुरूवातीपासूनच रशियाच्या नियंत्रणापासून मुक्त झाला.मार्शल टिटो व स्टॅलिनचे पटले नाही. त्यामुळे टिटो हे अलिप्त राष्ट्र चळवळीला जाऊन मिळाले अल्बानियासुद्धा मुक्त झाला.

## ४.२ पोलंड

मध्य युरोपात असलेल्या देशांपैकी पोलंडमध्ये बदलाचे चिन्ह दिसून आले. जुलै १९८८ मध्ये गोर्बाचेव्ह पोलंडला राजकीय भेटीस गेले. तेव्हा भाषणात त्यांनी मानवाधिकार व पेरेस्त्रोइका सुधारणा केल्या जातील असे स्पष्ट केले. १९८०च्या प्रारंभास पोलंडमध्ये सॉलीडॅरीटी नावाची मजूर संघटना उदयास आली. तिने साम्यवादी सरकारला त्रास दिला होता. ही संघटना साम्यवादाच्या विरूद्ध होती.

सन १९८० मध्ये सॉलीडॅरीटी आणि पोलांड साम्यवादी सरकार यांच्यात संघर्ष चालूच होता. मजूर संघटना हरताळ पुकारित असे. त्यावरूनही संघर्ष सुरू होत असे सॉलिडेरिटी पक्षाचा नेता लेक वालेसा होता. त्याने जे धाडस व दूरदृष्टी दाखविली. त्याबद्दल १९८३ मध्ये त्याला नोबेल शांती पुरस्कार मिळाला. पोलंडच्या साम्यवादी पक्षाने लेक वालेसाला तुरुंगात टाकले आणि त्याच्यावर अनेक निर्बंध लादले. लेक वालेसाला काही काळासाठी तुरूंगातून सोडले पण त्याने गोर्बाचेव्हच्या लोकतांत्रिक कार्यक्रमापासून स्फूर्ती घेऊन पुन्हा सॉलीडॅरीटी आंदोलन हाती घेतले. गोर्बाचेव्हनी पोलंड भेटीच्या वेळी सॉलीडॅरीटी कार्यक्रमाचे समर्थन केले नाही. तथापि नंतर त्यांच्या कार्यक्रम आपल्या जवळचा आहे असे जाहीर केले.

पोलंडच्या साम्यवादी नेत्यांना कळून चुकले की, दीर्घकाळ सॉलीडॅरीटी व लेक वालेसा यांचा छळवाद आपण करू शकत नाही म्हणून त्यांनी लेक वालेसाशी बोलणी सुरू केली. त्यांच्यातीलही बोलणी पोलंडच्या अर्थव्यवस्थेपर्यंत मर्यादित राहिली. जानेवारी १९८९ मध्ये पोलंडच्या साम्यवादी सरकारने घोषणा केली की जर सॉलीडॅरीरोने वचन दिले की, आम्ही साम्यवादाच्या विशिष्ट कार्यक्रमानुसार काम करू तर मग त्यांच्यावरील निर्बंध काढून टाकले जातील.

## ४.३ लोकशाहीची सुरूवात

एप्रिल १९८९ मध्ये साम्यवादी दल आणि सॉलीडॅरीटी यांच्यात विस्तृत चर्चा झाली. त्यानुसार पोलंडच्या घटनेत बदल करण्यात आला पोलंडच्या लोकप्रितनिधीगृहात ६५% जागा साम्यवादी पक्षाच्या राहतील आणि ३५% जागा विरोधी पक्षाला राहतील असे स्पष्ट केले ३५% जागा लोकशाहीला दिल्या तरी सिनेटला लोकप्रितनिधी सभागृहात अथवा संसदेत मंजूर झालेल्या विधेयकास नामंजूर करण्याचा अधिकार दिला. जून १९८९ च्या निवडणूकीत सॉलीडॅरीटीने संसदेसाठी २६१ उमेदवार उभे केले. पैकी २५३ उमेदवार विजय झाले १०० सदस्यांच्या सिनेटमध्ये साम्यवादी सरकारला असे वाटले की सर्व जागा साम्यवादी दल जिंकेल. पण ९३ जागा साम्यवादी दलाने सॉलीडॅरीटीचे साहाय्य होऊन जिंकल्या सॉलीडॅरीटीने सिनेट व संसदेत वर्चस्व निर्माण केले. हे पाहून कम्युनिस्ट पक्षाचा नेता जनरल जारूझेलक्सीने राष्ट्रपदीपदासाठीची आपली उमेदवारी परत घेतली. पण पक्षाने हे नामंजूर करून त्यांना उमेदवारी दिली. त्यांना १९ जुलै रोजी संसदेने राष्ट्रपतीपदी निवडले या पक्षाचा वरिष्ठ नेता जेस्लाव्ह किस्जाक यांना पंतप्रधान करावे असे पक्षाचे म्हणणे होते. पण संसदेत त्यांना बहुमत न मिळाल्याने ते पंतप्रधान बनू शकले नाहीत. सॉलीडॅरीटीच्या मदतीने बाहजोह व्येतस्कीला पंतप्रधान बनविले पोलंडमध्ये ही नवीन युगाची सुरूवात होती. यानंतर पोलंड हळूहळू लोकशाहीकडे वाटचाल करू लागला. लेक वालेसाने पश्चिम देशाबरोबर आपले संबंध वाढविले. जुलै, १९८९ मध्ये अमेरिकन राष्ट्रपती जॉर्ज बुशची पोलंडला भेट म्हणजे पोलंड सोव्हिएत संघापासून मुक्त झाल्याचा संकेत होता. हळूहळू तिथे कम्युनिस्ट पक्षाचे महत्व कमी होत गेले आणि २२ डिसेंबर १९९० रोजी लेक वालेसा पहिला निर्वाचित राष्ट्रपती बनला.

## ४.४ हंगेरी

हंगेरीत रशियाविरूद्ध सामना होण्यासाठी हंगेरीचा स्वाभिमान जागृत करण्यासाठी हंगेरीचा लोकप्रिय नेता इमरे नागी याने साम्यवादी दलाला समांतर देशप्रेमी लोकमंचची स्थापना केली. १९५५ला क्रुश्चेव्हने हंगेरीवर रशियाचे वर्चस्व स्थापन केले. तेव्हा इमरे नागी याला हंगेरीच्या पंतप्रधानपदावरून काढून टाकले.

२३ एप्रिल १९५६ रोजी विद्यार्थ्यांनी सेव्हिएत फौजा हंगेरीतून घालवून देण्याची मागणी केली व प्रचंड आंदोलन छेडले हंगेरीचे सैनिकदेखील त्यात सामील झाले. स्टॅलिनचा पुतळा क्रांतिकारकांनी तोडला. त्यांनंतर सरकारशी प्रमाणिक असलेल्या सैन्याने गर्दीवर गोळ्या चालवून भयंकर रक्तपात केला. क्रांतिकारक नागी यास पुन्हा पंतप्रधान बनवावे अशी मागणी

करीत होते. सोव्हिएत संघाने यावेळी तिरकी राजकारणाची चाल खेळली. लोकांच्या आग्रहाप्रमाणे नागीला पंतप्रधान पदावर बसविले. आणि नागी रेडिओवरून हंगेरी वार्सा कराराचे सदस्यत्व तोडत असल्याची घोषणा करतात न करतात तोच रशियन फौजा राजधानी बुडापेस्टमध्ये घुसल्या. रशियन फौजांनी हंगेरीचे स्वातंत्र्य आंदोलन मोडून काढले. इमरे नागीला रशियाने अटक केली. १९५८मध्ये नागीला फासावर चढविले.

नागीने लोकांत स्वातंत्र्याचे जे बीज पेरले होते ते हळूहळू उगवून मोठे होत गेले. गोर्बाचेव्हच्या पेरेस्त्रोइका धोरणाच्या घोषणेने हंगेरीचे प्रेम उफाळून वर आले. मे १९८८ मध्ये हंगेरीचा सोव्हिएत समर्थक नेता जेनोस कादरच्या जागी करोली ग्रेज याला सरकारचा प्रमुख बनविले. हंगेरी रशियाची लोखंडी साखळी तोडत आहे हे त्याचे द्योतक होते.

डिसेंबर १९८८ मध्ये हंगेरी सरकारने लोकांना त्यांचे स्वातंत्र्य परत करण्यास सुरूवात केली. वृत्तपत्रांचे स्वातंत्र्य परत केले राजकीय पक्षांवरील बंदी उठविली. फेब्रुवारी १९८९ मध्ये हंगेरीत बहुपक्षीय गणराज्याची स्थापना करण्यात आली. पुढील काही महिन्यात गणराज्याची मागणी करण्यासाठी जनआंदोलन सुरू झाले जूनमध्ये इमरे नागी याचे प्रेत कबरस्थानामधून काढून राष्ट्रीय पद्धतीने समारंभपूर्वक दफन करण्यात आले. नोव्हेंबरमध्ये सार्वत्रीक निवडणुका होऊन लोकशाही सरकारची स्थापना झाली. ४० वर्षात हंगेरीत ही पहिलीr आणि निःपक्ष निवडणूक झाली.

## ४.५ झेकोस्लोव्हाकिया

रशियापासून मुक्त होण्यासाठी झेकने संघर्ष पुकारला. १९६८ मध्ये झेकने आपल्या स्वातंत्र्याची लढाई रशियाविरूद्ध झेकोस्लोवाक साम्यवादी पक्षाचा महासचिव एलेबुजांडरच्या नेतृत्वाखाली घोषित केली. ड्यूबचेक झेकोस्लोकियासाठी रशियापासून स्वतंत्र मार्ग शोधत होता.

रशिया झेकला गमावण्यास तयार नव्हता. जेव्हा रशियाला हे माहित झाले की झेक सोव्हिएत संघातून बाहेर पडण्यास उत्सुक आहे तेव्हा २० ऑगस्टच्या रात्री वार्सा कराराच्या सशस्त्र फौजा झेकमध्ये पाठविल्या. साडेसात लाख परदेशी फौजा झेकमध्ये होत्या. पैकी सोव्हिएत फौजा जास्त होत्या. दुसऱ्या दिवशी डयूबचेकला अटक करण्यात आली. त्यामुळे झेक जनाता खवळली. पण शत्रूच्या फार मोठ्या फौजेपुढे काही करता आले नाही. झेकचे स्वातंत्र्य अशा रितीने मोडून काढण्यात आले. एप्रिल १९८७ मध्ये गोर्बाचेव्ह झेकची राजधानी प्रगच्या भेटीस आले. तेव्हा त्यांनी लोकशाही व आर्थिक पुनर्रचनेची घोषणा केली. झेकच्या अंतर्गत राजकारणात रशिया लक्ष देणार नाही. असे स्पष्ट केले. त्यामुळे झेक जनता स्वातंत्र्यासाठी उत्सुक बनली.

गोर्बाचेव्हच्या भूमिकेमुळे झेकचे राष्ट्रपती हुसाकने पक्षाचे महासचिवपद सोडले रशियाने ड्यूबचेकला काढून हुसाकला त्या पदावर रशियाने १७ एप्रिल १९६९ मध्ये बसविले होते. १९८८ च्या मध्याला स्वातंत्र्यासाठी सार्वजनिक निदर्शने झाली. १९८८ मध्ये ड्यूबचेकच्या नावाची घोषणा देण्यास सुरूवात झाली. या विद्रोहाचे नेतृत्व झेकचा साहित्यकार हॉवेल (Havel) करीत होता. हॉवेल व ड्यूबचेक या दोघांनी झेकच्या स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व केले. ५९ दिवस ही चळवळ चालली. त्यामुळे देशात सत्ता बदलली.

हॉवेल झेकचे राष्ट्रपती बनले अलेक्झांडर ड्यूबचेक झेकच्या राष्ट्रीय संसदेचे अध्यक्ष निवडले गेले १९६८ ला चालू झालेल्या संघर्षाला १९९० मध्ये यश प्रप्त झाले.

## ४.६ रूमानिया

ख्रुश्चेव्ह सत्तेवर आल्यानंतर सोव्हिएत संघात स्टॅलिनवादाला धक्का पोहोचला. ख्रुश्चचेव्हनंतर समाजवादावरील हुकूमशाहीचा भार हलका झाला. पण रूमानिया सोव्हिएत संघराज्याचे असे एक राष्ट्र होते की, जिथे स्टॅलिनवादी हुकूमशाहीने आपले पाय भक्कम रोवले होते. इकडे रशियात गोर्बाचेव्हच्या माध्यामातून बदल होत असताना सुद्धा रूमानियात स्टॅलिनवाद टिकून होता.

रूमानियात चॉसेस्क्यू याला कोणत्याही परिस्थित समाजवादावरील स्वेच्छाधारी कार्यक्रमाला धक्का लागू नये असे वाटत होते रूमानियन प्रजेला कोणत्याही प्रकारचे स्वातंत्र्य व अधिकार देण्यास तयार नव्हता. चॉसेस्क्यू रूमानियाला स्वतःची व स्वतःच्या कुंटूबाची जहागिरी समजले होते रूमानियात तमाम नागरिकांचे स्वातंत्र्य संपले होते चॉसेस्क्यू प्रत्येक विरोधी स्वर दडपून टाकीत होते त्यामुळे डिसेंबरच्या शेवटी लोकांचा असंतोष मोठ्या प्रमाणावर बाहेर पडला. इराणच्या दौर्यावरून आल्यानंतर महालाच्या बाहेर एक रॅलीचा प्रयोग आयोजित केला. ज्यामध्ये हजारो लोक सामील झाले होते. चॉसेस्क्यू बोलण्यासाठी उभे राहिले, तेव्हा गर्दीतील लोकांमधून त्यांच्याविरूद्ध घोषणा सुरू झाल्या. त्यामुळे चॉसेस्क्यूने आपल्याजवळ बसलेल्या संरक्षणमंत्र्याला लोकांच्य गर्दीवर गोळ्या झाडण्याचा हुकूम द्या, असे सांगितले. संरक्षणमंत्र्याने त्याचा आदेश मानण्यास नकार दिला. सैन्याने चॉसेस्क्यूविरूद्ध आंदोलन सुरू करताच चॉसेस्क्यू आपल्या पत्नीला घेऊन हेलिकॉप्टरमधून पळून गेला. हेलिकॉप्टरमधून तो बोटेनी सैनिक छावणीकडे गेला. तिथे हेलिकॉप्टर जमिनीवर उतरताच तेथील शेतकर्यांनी त्या दोघांना वेढले व सैन्याला सूचना पाठविली सैन्याने त्य दोघांना कैद करून ४८ तास आपल्या ताब्यात ठेवले त्यांच्यावर खटला चालविल न्यायाधिशांनी त्यांना मृत्यूची शिक्षा जाहीर केली. २५ डिसेंबर १९८९ रोजी ४.०० वाजता सैनिकांनी चॉसेस्क्यूसह पत्नी एलेनाला गोळ्या घालून ठार मारले. अशा रितीने रूमानियाची जनता साम्यवादाच्या जोखडातून मुक्त झाली. चॉसेस्क्यूच्या नंतर रूमानिया २० मे १९९० रोजी सार्वजनिक निवडणुका होऊन त्यात नॅशनल साल्वेशन फ्रटला प्रचंड बहुमत प्रप्त होऊन फ्रंटचा नेता इयानशलियेस्क्यू रूमानियाचे राष्ट्रपती बनले.

## ४.७ बल्गेरिया

पूर्व युरोपातील सोव्हिएत संघाचा बल्गेरिया अत्यंत प्रमाणिक देश होता. स्टॅलिन काळात बल्गेरियाचे नेतृत्व स्टॅलिनवादी नेत्याच्या हातात होते. देशाची सर्व सत्ता साम्यवादी नेता तोदोर जिवकोव (Todor Zhivkov) यांच्या हाती होती. ख्रुश्चेव्ह व ब्रेझनेव्ह काळात तोदोर जिवकोव आपले रंग बदलत त्यांच्याशी प्रमाणिकपणाच्या शपथा घेत होता. सोव्हिएत संघाची सत्ता गोर्बाचेव्हच्या हाती येताच जिवकोवने त्यांच्या धोरणाची प्रशंसा केली. तोदोर जिवकोव याला जन आंदोलनाशी सामना करावा लागला नाही. १० नोव्हेंबर १९८९ रोजी त्याला राष्ट्रपती पदावरून काढून टाकले. बल्गेरियातील साम्यवादी दलाचे स्वरूप बदलून बहुदलीय लोकशाही स्वीकारण्याचे ठरविले देशात नव्याने निवडणुका घेतल्या. त्यात

विरोधी नेता झेलीयु झेलेन बल्गेरियाचे नवे राष्ट्रपती बनले. १९९० च्या शेवटी बल्गेरियान एक बहुपक्षीय मंत्रिमंडळ बनविण्यात आले.

अल्बानिया पूर्व यूरोपातील हा एकाकी असणारा आणि रशिया-चीन संघर्षात चीनला मदत करणारा देश होता. दुसऱ्या महायुद्धानंतर अल्बानियाची सत्ता साम्यवादी नेता होकझाच्या (Hoxha) हाती आली. तो १९८५ सत्तेवर होता अल्बानिया पूर्व युरोपला साम्यवादीची दिशा देईल. असे त्याला वाटत होते. १९८८-८९ मध्ये पूर्वीय युरोपीय साम्यवादी देशात जेव्हा सोव्हिएत वर्चस्व आणि साम्यवादाच्या विरूद्ध वादळ उठले तेव्हा अल्बानिया शांत होता.

अल्बानियात राष्ट्रपती रमीज यांच्या शिवाय साम्यवादात कोणीही नेता नव्हता. पण प्रत्यक्षात पोलिसांचे राज्य होते. १९९० मध्ये अल्बानिया जनतेने सरकारविरूद्ध सार्वजनिक निदर्शने केली. पोलिसांनी ही निदर्शने मोडून काढण्याचा निश्चय केला. तेव्हा अल्बानियात लोक राजधानी तिराजा पश्चिम दूतावासामध्ये शरण आले.

राष्ट्रपती रमिजने जनआक्रोश शांत करण्यासाठी अनेक पावले उचलली. अल्बानियाने युरोपिय सुरक्षा आणि सहकार संमेलनाचे सदस्यत्व स्वीकारले. तसेच देशात सार्वत्रिक निवडणुका घेण्याचे आश्वासन दिले. डिसेंबर १९९० मध्ये साम्यवादी दलाशिवाय अन्य पक्षाच्या स्थापनेस परवानगी दिली. अल्बानियन लोक एवढ्यावर समाधानी नव्हते. फेब्रुवारी १९९१ मध्ये तिराना या राजधानीच्या ठिकाणी सार्वजनिक निदर्शने झाली. या स्थितीचा कायदा उठवून रमिजने देशात आणीबाणी लागू केली. ह्या पाश्र्वभूमीवर अल्बेनियातील साम्यवादी खुल्या सार्वत्रिक निवडणूका घेण्याचे ठरविले ह्या निवडणूकानंतर १९९२ साली सॅली बेरीस्ला ह्या बिगर साम्यवादी राष्ट्राध्यक्षाची निवड झाली.

## ४.८ युगोस्लाव्हिया

युगोस्लाव्हियामध्ये अनेक लोक एकत्र राहत होते. मॉंटेनिग्रे ३% हंगेरियन २% सर्ब ३६% क्रोट २०% मुस्लीम ९% स्लोव्हेनीज ८% मैसेडोनियज ६% व अन्य ८% अशी वर्गवारी होती. मार्शल टिटो नेते होते आपल्या मृत्यूपर्यंत त्यांनी या देशाला नेतृत्व दिले अगदी सुरूवातीला टिटो व स्टॅलिन यांच्यात एक कामचलावू समीकरण बनले होते. १९४८ मध्ये ते तुटले आणि युगोस्लाव्हिया समाजवादी देशापासून वेगळा झाला. गोबीचेव्हनी ग्लासनोस्त आणि पेरेस्त्रोइकाद्वारा सोव्हिएत संघात लोकतांत्रिक क्रांती निर्माण केली होती. ती टिटोंनी जवळ जवळ ४० वर्षापूर्वी युगोस्लाव्हियात पूर्ण केली होती. राजनैतिक आर्थिक क्षेत्रात विकेंद्रीकरण, लोकतांत्रिकीकरण तसेच बाजार अर्थव्यवस्थेचे धोरण उपयोगात आणले तथापि युगोस्लाव्हिया आपली अर्थव्यवस्था स्थिर व भक्कम बनवू शकला नाही. त्यांनी उपराष्ट्रपती व समाजवादी विचारवंत मिलोवान जिलास यांना १२ वर्षांपर्यंत तुरुंगात डांबले. ते समाजवादाला मानवी मूल्य देऊ इच्छित होते नंतर लोकशाही मार्गावर युगोस्लाव्हियाला नेण्याचा त्यांचा प्रयत्न होता. त्यामुळे तुरुंगात त्यांना डांबले.

टिटोच्या मृत्यूनंतर कामगारात असंतोष निर्माण झाला. टिटोने युगोस्लाव्हियाला जी घटना दिली त्यात सहा गणराज्ये व दोन प्रंताला स्वतंत्र्य स्थान दिले या गणराज्यापैकी सर्बिया सर्वात मोठे होते. तेथे एकतृतीयांश युगोस्लाव्हियन लोक राहत होते सर्बियाचा राष्ट्रवाद जुना आहे.

फेब्रुवारी १९९० मध्ये अशी वेळ आली की, युगोस्लाव्हिया खंडित होतो की काय असे वाटले, स्लोव्हेनिया क्रोशीया, बोस्निया, हर्जेगोविना या पश्चिम गणराज्यात जातीय राष्ट्रवादामुळे असंतोष खदखदला. युगोस्लाव्हिया आर्थिक व राजनैतिक संकटात सापडला. पूर्वीय युरोपातील इतर देशाप्रमाणे युगोस्लाव्हियात साम्यवादाच्या विरोधात संकटे निर्माण झाली. ५२ वर्षानंतर डिसेंबर १९९० मध्ये युगोस्लाव्हियाने बहुपक्षीय आधारावर निवडणुका घेतल्या. निवडणुकीनंतर युगोस्लाव्हियातील साम्यवादी हुकूमशाही संपुष्टात आली.

## ४.९ जर्मनी

### ४.९.१ दुसऱ्या महायुद्धानंतर जर्मनीची फाळणी :

दुसऱ्या महायुद्धात हिटलरचा पराभव झाला. जर्मनी पुन्हा प्रबळ होऊ नये किंवा जर्मनीमध्ये पुन्हा हिटलर निर्माण होऊ नये यासाठी जर्मनीची फाळणी करण्याचे ठरले दोस्त राष्ट्रांनी जर्मनीचे पूर्व जर्मनी व पश्चिम जर्मनी असे विभाजन केले रशियाच्या वर्चस्वाखाली पूर्व जर्मनी तर इंग्लंड, फ्रान्स व अमेरिका यांच्या वर्चस्वाखाली पश्चिम जर्मनीचा भाग ठेवण्यात आला. बर्लिन हे राजधानीचे शहर असल्याने त्याचे राजकीय महत्व लक्षात घेऊन बर्लिनची फाळणी करण्यात आली. पूर्व जर्मनीची बर्लिन ही राजधानी तर बॉन ही पश्चिम जर्मनीची राजधानी करण्यात आली.

### ४.९.२ पूर्व जर्मनीमधील साम्यवादी सरकार

पूर्व जर्मनीमध्ये ७ ऑक्टो. १९४९ रोजी जर्मन लोकशाही प्रजासत्ताकाची स्थापना झाली. याठिकाणी साम्यवादी सरकार सत्तेवर आले. १९५३ मध्ये स्टॅलिनच्या मृत्यूनंतर जनतेने या राजवटीविरूद्ध उठाव केला. परंतु लष्कराच्या बळावर हा उठाव दडपण्यात आला. दुसऱ्या महायुद्धानंतर पश्चिम जर्मनीचा खुप विकास झाला. पुढे स्टॅलिनने बर्लिनची कोंडी निर्माण केली. मात्र इंग्लंड व अमेरिकेने ती मोडून काढली.

### ४.९.३ बर्लिन भिंत :

बर्लिन शहाराची फाळणी करणारी ही भिंत १९६१ साली होनेकर जो त्यावेळी पोलीट ब्युरोचा सभासद होता आणि दहा वर्षांनी १९७१ साली पूर्व जर्मनीच प्रमुख बनला. याच्या देखरेखी खाली उभारण्यात आली होती. ठिकठिकाणी लष्करी ठाणी बसविली. दोन्ही भागातील दळणवळण बंद केले भिंत ओलांडणार्या माणसांना गोळ्या घातल्या जात होत्या. साम्यवादी सरकारने पूर्व जर्मनीवर एकछत्री अंमल निर्माण केले होते.

### ४.९.४ जर्मनीचे एकीकरण :

१५ ते २० वर्षांनंतर पूर्व जर्मनी व पश्चिम जर्मनीत एकीकरणाच्या प्रक्रियेला सुरूवात झाली. जर्मनीची फाळणी करणार्या बार्लिन भिंतीला उद्ध्वस्त करून नव्या इतिहासाचा पूर्व जर्मनीच्या सरकारने १९६१ साली उभारलेली ही ऐतिहासिक भिंत व नोव्हें १९८९ रोजी पाडण्यास सुरूवात केली. जर्मनीच्या एकीकरणाच्या दृष्टीने हे पहिले पाऊल होते भिंती

लगतची लष्करी ठाणी उठवण्यात आली. जनतेला कोठेही, केव्हाही जाता येऊ लागले. अनेक वर्षांची ताटातुट समाप्त झाली.

जर्मनीचे विभाजन लवकरात लवकर नष्ट करण्यासाठी १९८९ मध्ये सार्वत्रिक निवडणुका झाल्या त्यामध्ये कम्युनिस्ट पक्षास १६% मते मिळाली जर्मनी एकीकरणाच्या बाजूने बहुसंख्य लोक असल्याचा निष्कर्ष काढण्यात आला. तसेच २ जुलै १९९० रोजी अडचणींवर मात करण्यासाठी दोन्ही जर्मनीत एक चलन स्वीकारले आर्थिक दृष्ट्या एकच चलन स्वीकारल्यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या. ह्या सर्व समस्या सोडविण्यासाठी राजकीय एकीकरण होणे गरजेचे आहे असे लोकांना वाटू लागले. त्यामधून जर्मनीचे एकीकरण घडून आले.

### ४.९.५ पश्चिम युरोपमध्ये युरोपियन संघाचा उदय

**युरोपियन संघ** (The European Union-EU) किंवा युरोपियन महासंघ हा युरोप खंडातील २७ देशांचा संघ आहे. या संघाचे उद्दीष्ट युरोपीय देशांमध्ये राजकीय व शासकीय संयुक्तता आणणे, समान अर्थव्यवस्था व समान व्यापार-नियम लागू करणे, समान चलन (युरो-€) अस्तित्वात आणणे हे आहे. युरोप खंडातील सर्वात मोठे राजकीय व आर्थिक अस्तित्व युरोपियन संघाला लाभले आहे. युरोपियन संघात खालील देश आहेत.

**सदस्य राष्ट्रे:** ऑस्ट्रिया, बेल्जियम, बल्गेरिया, क्रोएशिया, सायप्रस, चेक प्रजासत्ताक, डेन्मार्क, एस्टोनिया, फिनलंड, फ्रांस, जर्मनी, ग्रीस, हंगेरी, आयर्लंड, इटली, लॅटेव्हिया, लिथुनिया,लक्झेम्बर्ग, माल्टा, नेदरलंड, पोलंड, पोर्तुगाल, रोमानिया, स्लोव्हाकिया, स्लोव्हेनिया, स्पेन, स्वीडन. युनायटेड किंग्डममध्ये २३ जून २०१६ रोजी घेण्यात आलेल्या मतदानामध्ये ब्रिटिश नागरिकांनी युरोपियन संघ सोडण्याच्या बाजूने कौल दिला. त्यामुळे २०१९ साली युनायटेड किंग्डम अधिकृतपणे युरोपियन संघातून बाहेर पडला. याला **'ब्रेक्झीट'** म्हणतात.

दुसऱ्या महायुद्धानंतर आर्थिक सहकार्य तसेच व्यापार वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने युरोपीय देश एकत्र येऊ लागले, १९५७ मध्ये बेल्जीयम, जर्मनी, फ्रान्स, इटली, लक्झेमबर्ग आणि नेदरलंड या सहा देशांनी युरोपियन इकॉनॉमिक कम्युनिटी या संस्थेची स्थापना केली. युरोपियन संघ हा अतिप्रगत असा आर्थिक संघ आहे. युरोपियन कोल ॲंड स्टील कम्युनिटी आणि युरोपियन आर्थिक युनियन यांच्यापासुन युरोपियन संघाचा जन्म झाला. १९९३ मध्ये मॅस्ट्रिच कराराने युरोपियन युनियन हे नाव देण्यात आले. लिस्बन कराराने अलीकडे २००९मध्ये युरोपियन युनियनमध्ये सुधारित घटना लागू झाली आहे. १ जुलै २०१३ पासून क्रोशिया हा नवीन देश सदस्य होत असल्यामुळे युरोपियन युनियनमध्ये आता २७ (युनायटेड किंग्डम आता बाहेर पडला आहे) देश आहेत. या संघाने युरोपमधील विविध सदस्य देशांत एकत्रित बाजारप्रणाली विकसित केली आहे. युरोपमध्ये वस्तू, सेवा व भांडवल यांचा मुक्त संचार होणे, हे उद्दिष्ट आहे. समुदायातील सर्व देशांनी वस्तूंची देवाणघेवाण करताना सर्व वस्तूवरील जकात रद्द केली आहे. सभासद देशांकरिता 'युरो' हे चलन निश्चित केले.

## ४.१० सारांश

पूर्व युरोपीय देशांचा साम्यवादाचा त्याग आणि त्यांच्यावरील सोव्हिएत संघाच्या वर्चस्वाचा शेवट यामुळे वार्सा करार अनावश्यक ठरला आहे. हंगेरीची राजधानी बुडापेस्ट येथे २५ फेब्रुवारी १९९१ रोजी वार्सा कराराचे एक ऐतिहासिक संमेलन सुरू झाले. १ एप्रिल १९९१ पासून ३६ वर्षाचा जुना करार समाप्त करण्यात आला. वार्सा कराराचे स्वरूप कमीत कमी एक वर्षभर राहावे. अशारितीने स्टॅलिनद्वारा निर्माण झालेला साम्यवादाचा हा एक किल्ला जमीनदोस्त झाला आणि युरोपीय एकतेचा मार्ग मोकळा झाला.

दुसऱ्या महायुद्धानंतर जे शीतयुद्ध अमेरिका व रशिया या दोन महासत्तांमध्ये सुरु झाले. ते संपल्याशिवाय जगावर तिसऱ्या महायुद्धाची निर्माण झालेली टांगती तालावर नष्ट होणे शक्य नव्हते. परंतु अचानक इतिहासाचे नवीन वळण घेतले. रशियात मिरवाईल गोर्बाचेव्ह या शांततावादी नेत्याचे सरकार बनले व त्यांनी रशियाच्या नियंत्रणाखाली देशांना समानतेची वागणूक द्यायला सुरुवात केली. त्यातून मात्र रशियाच्या ताब्यात असलेल्या अनेक छोट्या छोट्या देशांनी बंडखोरी स्वातंत्र्य मिळवले. याचा मोठा फटका रशियाला व साम्यवादाला बसला रशियाचे विघटन झाल्यामुळे ही महासत्ता कमजोर होऊन अमेरिका हीच महासत्ता म्हणून कायम राहिली. या घटनेच जे दूरगामी परिणाम घडून आले, त्याचा केंद्रबिंदू म्हणजेच हे प्रकरण होय.

## ४.११ प्रश्न

१. पूर्व युरोपियन देशांची मुक्तता आणि लोकशाही संघर्षाची प्रक्रिया कशी घडून आली ते स्पष्ट करा.

२. “जर्मनीचे एकीकरणात बिस्मार्कची भूमिका स्पष्ट करा.

३. युरोपियन युनियनवर टीप लिहा.

## ४.१२ संदर्भ


१. प्रा.राजदरेकर / प्रा. गर्गे - आधुनिक जगाचा इतिहास - विद्या प्रकाशन, नागपूर

२. ना. सी. दिक्षीत- पश्चिमात्य जग - पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर

३. गायकवाड, कदम, थोरात - आधुनिक जगाचा इतिहास - भाग १ - श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर.

४. प्रा. हरिदास जाधव व प्रा. कल्याण चव्हाण - आधुनिक जगाचा इतिहास - अक्षरलेण प्रकाशन, सोलापूर.

५. डॉ. सुमन वैद्य - आधुनिक जग - श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर .

६. डॉ. सौ . शरावती शिरगावकर - आधुनिक युरोप - श्रीविद्या प्रकाशन, पुणे.


munotes.in

७. श. गो. कोलारकर - युरोपचा इतिहास - आनंद प्रकाशन, नागपूर

८. प्रा. जितेंद्र भामरे- आशियाचा इतिहास - शेठ प्रकाशन, मुंबई .

९. डॉ. रमेश गुप्ते व शे. रा. कुलकर्णी - आग्रेय आशियाचा इतिहास - परिमल प्रकाशन, औरंगाबाद

१०. डॉ. अनिलकठारे - आधुनिक चीन - कल्पना प्रकाशन, नांदेड .

११. डॉ. मु. बा. देवपुजारी - रशियाचा इतिहास - श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर

१२. डॉ. मु. बा. देवपुजारी - आधुनिक आशियाचा इतिहास - श्री मंगेश प्रकाशन , नागपूर

१३. डॉ. नि. वक्कानी - आधुनिक भारताचा इतिहास - श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर

१४. डॉ. जालिंदर भोसले - आधुनिक आशियाचा इतिहास - मुरलीधर प्रकाशन, पुणे

१५. डॉ. सुमन वैद्य व डॉ. शांता कोठेकर - भारताचा इतिहास - श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर

१६. Adolf Hitler - Mein Kampf - KRJ Book International, Delhi

१७. D. R. Sardesai and B. K. Gokhale - World History - Kitab Mahal Publication, Alahabad.

१८. M. D. David - Rise and Growth of Modern China.

१९. तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी - मराठी विश्वकोश - भाग २ व ९

२०. डॉ. शांता कोठेकर, अमेरिकेच्या संघराज्याचा इतिहास - श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर

२१. डॉ. सुमन वैद्य - रशियाचा इतिहास - श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.

२२. विस्टन चर्चील - दुसरे महायुद्ध - महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, १९७८.

२३. डॉ. हुकुमचंद जैन, डॉ.कृष्णचंद्र माथुर - आधुनिक जगाचा इतिहास - के. सागर प्रकाशन पुणे.

❖❖❖❖

# ५

# जागतिक महासत्ता म्हणून अमेरिकेचा उदय

**घटक रचना :**

५.० उद्दिष्ट्ये

५.१ प्रस्तावना

५.२ शीतयुद्धाचा शेवट

५.३ जॉर्ज बुशच्या काळातील अमेरिका

५.४ इराक - कुवेत युद्ध (१९९१)

५.५ रशिया - चीनचे प्रित डावपेच

५.६ सोमालिया

५.७ बिल क्लिंटनच्या काळातील अमेरिका

५.८ ईस्त्राइल पॅलेस्टाईन शांतता करार (१९९३)

५.९ अमेरिका व लॅटीन अमेरिका

५.१० १९८९-२००० या काळातील अमेरिका-भारत संबंध

५.११ बिल क्लिंटन भेट व भारतविषयक धोरण

५.१२ सारांश

५.१३ प्रश्न

५.१४ संदर्भ

## ५.० उद्दिष्टये

- अमेरिका व रशिया यांच्यातील शीतयुद्धाचा शेवट कसा झाला याचा अभ्यास करणे.
- अमेरिका अध्यक्ष जॉर्ज बुश यांच्या काळातील अमेरिकेचे विस्तारवादी धोरण अभ्यासाने.
- रशिया व चीन यांच्यातील मैत्री संबंधावर चर्चा करणे.
- अमेरिकेचे इस्त्रायल, भारत यांच्याशी असलेल्या संबंधावर प्रकाश टाकणे.
- अमेरिकेचा जागतिक महासत्ता म्हणून उडायची करणे तपासणे.

munotes.in

## ५.१ प्रस्तावना

दुसऱ्या महायुद्धानंतर इंग्लंडचे बलाढ्य साम्रज्य लयाला गेल्यानंतर महासत्ता पद मिळवू पाहणार्या राष्ट्रांत एक स्पर्धा सुरू झाली. त्याच इंग्लंडही होतेच बरोबरीने फ्रान्स, चीन, अमेरिका व रशिया या स्पर्धेत उतरले परंतु युरोपीयन राष्ट्रांची महायुद्धातील पराभवामुळे इतकी दमछाक झाली होती की त्यांना स्वकीय राजवट सांभाळणे जड होऊ लागले. साहजिक महासत्ताच्या स्पर्धेतून युरोपीन राष्ट्रे मागे पडली. फक्त अमेरिका व सोव्हिएत रशिया या स्पर्धेत राहिले पण रशियालाही महासत्ता पद मिळविण्यासाठी अनेक संकटांना सामोरे जावे लागले तरीही स्टॅलिनने ज्या हिंमतीने नवा रशिया उभा केला होता त्यास दाद द्यावीच लागेल.

शेवटी अमेरिका व रशिया या महासत्ता उदयास आल्या. त्यांच्यात प्रखर शीतयुद्ध झाले. शीतयुद्धातून रशियाला माघार घ्यावी लागली. शीतयुद्धात सोव्हिएत संघराज्यही लयास गेले अखेरीस अमेरिकेच्या महासत्ताक पदास आव्हान देण्यास कोणतेच राष्ट्र चिरकाळ राहिले नाही व एखाद्या सम्रटाप्रमाणे अमेरिका महासत्ता स्थानावर आरूढ झाली.

## ५.२ शीतयुद्धाचा शेवट

जपानच्या शरणागतीने दुसरे महायुद्ध संपले पण एका नवीन युद्धाची सुरूवात झाली. ते म्हणजे शीतयुद्ध होय. दुसऱ्या महायुद्धानंतर युरोपचे जगातील महत्व कमी होऊन अमेरिका व सोव्हिएत संघ ह्या दोन बलाढ्य महासत्ता निर्माण झाल्या. परंतु या दोन महासत्तेमध्ये वैचारिक मतभेद होते त्यामधून शह-काटशहाचे आंतरराष्ट्रीय राजकारण म्हणजे शीतयुद्ध होय.

अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स व त्यांची लोकशाही भांडवलशाही मित्रे राष्ट्रे यांचा एक गट ह्या गटाचे नेतृत्व अमेरिका करत होता तर दुसरा गट सोव्हिएत संघ, पोलंड, हंगेरी, अल्बेनिया, रोमानिया, इ. साम्यवादी राष्ट्रांचा होता. ह्या गटांचे नेतृत्व सोव्हिएत संघाकडे होते स्टॅलिनच्या मृत्यूपर्यंत हे शीतयुद्ध तप्तयुद्धापेक्षाही काहीसे भयंकर भासत होते १९५३ नंतर रशिया - अमेरिका यांनी विविध संरक्षण संघटना उभ्या करून जगाच्या राजकारणात प्यादी हालविण्याच्या कामास त्यानंतर जोर आला. १९७० पर्यंत शीत युद्धाचे अग्निकुंड धगधगत होते.

दुसऱ्या महायुद्धात इंग्लंडचे बलाढ्य साम्रज्य अस्त पावले. नव्याने महासत्ता पद मिळवू इच्छिणार्या राष्ट्रांमध्ये स्पर्धा सुरू झाली. या स्पर्धेत इंग्लंड, फ्रान्स, रशिया, अमेरिका, चीन ही राष्ट्रे होती. दुसऱ्या महायुद्धात युरोपीय राष्ट्रांची एवढी हानी झाली की, त्यांना त्यांच्याच राष्ट्रातील राजवटी संभाळता येत नव्हत्या. त्यामुळे महासत्ताच्या स्पर्धेतून ही राष्ट्रे आपोआप बाजूला झाली. फक्त अमेरिका आणि रशिया ही दोन राष्ट्रे उरली होती. अमेरिका आणि रशिया यांच्यात महासत्ता पदावरून शीत युद्धाला सुरूवात झाली. शीत युद्धात अमेरिकेच्या महासत्ता पदाला आव्हान देऊ शकणारी कोणतीच सत्ता जगाच्या पाठीवर उरली नव्हती. अमेरिका महासत्ता म्हणून नावारूपाला आली.

महासत्ता पद टिकविण्यासाठी तसेच प्रतिस्पर्धी महासत्ता निर्माण होऊन नये म्हणून अमेरिकेने बरीच खटपट केली. आपण जगात एकमेव महासत्ता असल्याचे दाखवून देण्यासाठी अमेरिका आंतरराष्ट्रीय घडामोडीमध्ये प्रसंगामध्ये हस्तक्षेप व ढवळाढवळ करू लागले. वेगवेगळ्या पेच प्रसंगात मध्यस्थाची भूमिका बजावू लागले. अरब ईस्त्राइल संघर्ष सोडविण्यासाठी अमेरिकेने मध्यस्थी करून कॅम्प डेविड करार केला. त्यामुळे मध्य पूर्वत काही प्रमाणात शांतता प्रस्थापित होऊ शकली. साम्यवादी राजवटीचा पूर्व युरोपात अस्त झाल्यानंतर युगोस्लाव्हियामध्ये वांशिक दंगली झाल्या. दंगलीचे रूपांतर हिंसाचारात झाले. सर्व क्रोट आणि इस्लाम धर्मियांमध्ये यादवी पेटली होती, दिवसाढवËया कत्तली होत होत्या. युगोस्लव्हियाचे तुकडे पडणार यात शंका नव्हती. संयुक्त राष्ट्र संघाने अधिक हिंसाचार व रक्तपात रोखण्यासाठी तेथे शांती सेना पाठविली. संयुक्त राष्ट्र संघावर अमेरिकेचा प्रभाव होता. त्यामुळे अमेरिकेला अंतर्गत हस्तक्षेप करण्यास संधी मिळाली तरीही अमेरिकेला या धोरणात फारसे यश आले नाही.

अमेरिका निर्विवाद सत्ता असल्याचे जगाला दिसत होते. आपल्या पदाचा जगाला दरारा निर्माण व्हावा यासाठी अमेरिका खटाटोप करत होती. अमेरिकेने इतर राष्ट्रांच्या प्रश्नांमध्ये केलेल्या ढवळाडवळीला आपेक्षित यश येत नव्हते. उदा. बोस्निया-हर्झेगोवेनिया, सोमालिया, झैरे या देशातील कारवायांना अमेरिकेस यश येऊ शकले नाही. शीत युद्धाच्या काळातमध्ये अलिप्त राष्ट्र संघटनेचा दबदबा आता कमी झाला होता. तरीही लहान लहान राष्ट्रे अमेरिकेच्या वर्चस्वास  मानत नव्हती. अमेरिकेला या गोष्टीची खूप चीड येत होती. सोव्हिएट संघराज्याचे विभाजन झाले असले तरी रशियाकडे प्रचंड अण्वस्त्र साठा होता. म्हणूनच अमेरिकेने हर प्रकारे हर नीति वापरून आपले वर्चस्व स्थापन करण्याचा खटाटोप चालविला होता. जगात कुठल्याही राष्ट्राने लष्करी किंवा बिनलष्करी कारणासाठी उपग्रह आवकाशात सोडल्यास अणुभट्टी बनविर्याचा प्रयत्न केल्यास अमेरिका अस्वस्थ होत असे लगेचच अमेरिकेची यंत्रणा त्याठिकाणी गस्त घालीत असे. भारताने असे करू नये असा इशाराही अमेरिकेने दिला. अमेरिकेने भारताच्या अशा कार्यक्रमांवर कधी नाराजी, कधी स्पष्ट नापसंती, कधी स्पष्ट विरोध दर्शविला. भारताच्या या कृतीमुळे अमेरिकेची तळपायाची आग मस्तकाला गेली व भारताला पाकिस्तान सीमेवरून क्षेपणास्त्रे काढून घेण्याची अमेरिकेने धमकी वजा सूचना केली. ११ जून १९९७ रोजी पंतप्रधान श्री. इंद्रकुमार गुजराल यांनी एका समारंभात भारताचे धोरण स्पष्ट केले. हा समारंभ भारतीय हवाई दलात रशियाकडून मिळालेल्या सुखोई-३० या अत्याधुनिक विमानांना समाविष्ट करण्याबाबत होता. यावेळी पंतप्रधानानी असे स्पष्ट केले की क्षेपणास्त्रे तैनात केल्याचा अमेरिकेचा आरोप खोडसाळपणाचा आणि दिशाभूल करणारा आहे. भारताने सीमेवरच काय देशात कुठेही क्षेपणास्त्रे तैनात केली नाही. काश्मीर प्रश्री मध्यस्थी करण्याचा अमेरिका वारंवार प्रयत्न करते. दक्षिण आशियायी विभागात दीर्घकाळ रेंगाळलेला काश्मीर प्रश्न सुटल्यास अमेरिकेची प्रतिष्ठा वाढेल अशी अमेरिकेची भूमिका आहे. त्यासाठी भारतातील अमेरिकेचे राजदूत फँक विस्नर यांनी अमेरिकेच्या शिष्ट मंडळासह काश्मीर दौरा केला. या दौर्याबाबत भारताने गंभीर दखल घेऊन अमेरिकन शिष्टमंडळाचा हा दौरा भारतातील अंतर्गत कारभारात ढवळाढवळ असल्याचे म्हटले.

१९८० नंतर शीतयुद्धाचा अंताच्या दिशेने प्रवास सुरू झाला. १९८५ साली मिखाईल गोर्बाचेव हे रशियन साम्यवादी पक्षाचे सरचिटणीस व सोव्हिएत संघाचे अध्यक्ष बनले त्यांनी

त्यांच्या कारकिर्दीत ग्लॅसनॉस्त व पेरेस्त्रॉईका ह्या दोन धोरणांना पुरस्कार केला. ह्या धोरणांचा परिणाम सोव्हिएत संघ नष्ट होण्यात झाला. ही प्रक्रिया जवळ - जवळ १९९१ साली पूर्णत्वास गेली. आणि एका महासत्तेचा शेवट झाला दुसऱ्या महायुद्धानंतर सुरू झालेल्या शीतयुद्धाचा शेवट झाला. सोव्हिएत संघ. ह्या महासत्तेचा अस्त झाल्यानंतर जगामध्ये फक्त एकच महासत्ता उरली. ती म्हणजे अमेरिका होय.

## ५.३ जॉर्ज बुशच्या काळातील अमेरिका

राष्ट्राध्यक्ष रीगननंतर अमेरिकेच्याच नव्हे तर जगाच्या राजकरणामध्ये फार मोठा बदल घडून आला.

१९९१ साली जेव्हा सोव्हिएत संघाचे विघटन झाले तेव्हा जॉर्ज बुश सिनीयर हे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष होते अमेरिकेने व रशियाने शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर शांतीचे व एकमेकांना सहकार्य नवे युग सुरू करण्याचा निश्चय केला.

## ५.४ इराक - कुवेत युद्ध (१९९१)

इराक - कुवेतच्या युद्धाच्या वेळेस अमेरिका एकमेव महासत्ता राहिली हे दिसून आले या युद्धात रशिया तटस्थ राहिला. अमेरिकेच्या खाजगीकरणाचा परिणाम विकास करू इच्छिणार्या राष्ट्रांवरही पडलेला आढळतो. आतापर्यंत दोन महाशक्ती असल्यामुळे जगात शक्ती संतुलन होते पण आता जणूकाही अमेरिका एकमेव महाशक्तीचा एकाधिकार सुरू झाला आहे. इराकने - कुवेतवर ऑगस्ट १९९० मध्ये आक्रमण केले आणि पश्चिम आशियातील शांतता पुन्हा भंग पावली. संयुक्त राष्ट्रसंघाने इराकने सैन्य मागे घ्यावे असा ठराव पास केला. इराकने आपले सैन्य १५ जानेवारी १९९१ पर्यंत मागे घ्यावे अन्यथा इराकच्या सैन्याला जबरदस्तीने मागे करण्यात येईल. असे सुरक्षा मंडळाने कळविले. परंतु इराकने ऐकले नाही म्हणून सभासद राष्ट्रांच्या सैन्याने इराकवर कारवाई केली. सद्दाम हुसेनने अट घातली की इस्त्राइलने पॅलेस्टाईनमधून आपले सैन्य काढून घ्यावे. परंतु अमेरिका, ब्रिटन व सौदी अरेबिया यांनी ही अट अमान्य केली सद्दाम हुसेन सुरक्षा मंडळाच्या सांगण्याप्रमाणे ऐकत नाही हे पाहून अमेरिकेने इराकवर इतका प्रचंड हल्ला केला की सद्दाम हुसेनने कुवेतवरील सैन्य मागे घेतले व युद्ध बंद झाले सुरक्षा मंडळाला शांतता प्रस्थापित करण्यात यश मिळाले.

अमेरिकेच्या धोरणाच्या दृष्टीने विचार केला तर इराकच्या युद्धाचा महत्वाचा परिणाम म्हणजे अमेरिकेने जी कार्यवाही केली ती संयुक्त राष्ट्रसंघाला स्वीकारणे भाग पडले या घटनेला दुसरा अर्थ असा की अमेरिका या महाशक्तीचे एकमेवपणा सिद्ध झाले रशिया जे पूर्वी एक मोठे राष्ट्र होते ते आता मात्र तटस्थ राहिले जॉर्ज बुशच्या अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणाचा हेतू साध्य झाला बुशने दुसरा हेतूही सफल केला तो म्हणजे या युद्धाने अरब राष्ट्रात फुट पाडली अमेरिकेने कुवेत मध्ये आपला प्रभाव ठेवण्यासाठी आपले सैन्यिक तळ उभारले.

munotes.in

## ५.५ रशिया - चीनचे प्रित डावपेच

शीतयुद्धाची अखेर झाल्यावर आणि सोव्हिएत संघराज्याची शकले उडल्यावर अमेरिकेला अपेक्षित अशी जगाची घडी अद्याप लागते की नाही निरंवशी महासत्ताक प्रप्त झालेली नाही हे जाणून अमेरिकेने नाटो विस्ताराचा डाव रचला होता. नाटोत अधिक युरोपीय राष्ट्रांना सामील करून पूर्वीच्या सोव्हिएत साम्रज्यात पूर्व युरोपीय राष्ट्रांना आपल्या बाजूस घेतल्यास रशियाला कोंडीत काढता येईल असे अमेरिकेला वाटले अमेरिकेच्या डावपेचाला यश आले आणि रशियाशी नाटो सदस्य राष्ट्रांचा सहकार्याच्या मैत्रीचा करार अमेरिकन अध्यक्षांच्या प्रत्यक्ष उपस्थितीत संपन्न झाला. ज्यावेळी नाटोच्या विस्ताराची आणि रशियाच्या सहकार्याच्या कराराची वाटाघाटी चालू होत्या. त्याचवेळी रशियाने त्यामागील अंतर्गत हेतू ओळखला.

चीन हा कितीही झाले तरी रशियाचा पूर्वीचा दोस्त यांच्यात प्रेम व जिव्हाळा असणे नैसर्गिक होते. अमेरिकेचा रशियाला कोंडीत पकडण्याचा डाव ओळखून चीनचे नवे अध्यक्ष आणि रिशयन अध्यक्ष बोरीस- येलास्तिनने परस्परांशी मैत्रीपूर्ण संबंध केले जर नाटोच्या माध्यमातून लष्करी विस्तार करण्याचा अमेरिकेचा डाव रशिया आणि चीन या दोन्ही देशांच्या सीमेवर अमेरिका व त्यांचे सहकारी देश उभे राहील याची पूर्णतः जाण ठेवून रशिया व चीन यांनी २३ एप्रिल १९९७ मध्ये मॉस्को येथे ऐतिहासिक करार केला.

## ५.६ सोमालिया

अमेरिकेने सोमालिया ह्या सर्व पूर्व आफ्रिकेतील राष्ट्रात देखील शांतता प्रस्थापित प्रयत्न केले त्याकरीता अमेरिकेचे तत्कालिन राष्ट्राध्यक्ष जॉर्जबुश (सिनीयर) यानी जवळ जवळ २०,००० अमेरिकन सैन्य सोमालियात पाठविले. जॉर्जबुश (सिनीयर) नंतर बनलेल्या बिल क्लिंटन यांनी देखील त्यांच्या ह्या निर्णयाला पाठींबा दशर्विला. अमेरीकन जनतेत अमेरिकेच्या सोमालियातील यादवी युद्धातील सहभागाबाबत नाराजी पसरली. शेवटी १९९४ साली अमेरिकेने सोमालियातून आपले सैन्य परत बोलविले.

## ५.७ बिल क्लिंटनच्या काळातील अमेरिका

जॉर्ज बुशनंतर अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदावर आलेल्या क्लिंटननेही इराकचा बदला घेतला. क्लिंटनने इराकच्या बगदाद या शहरामधील इमारतीवर क्षेपणास्त्राचा मारा केला. क्लिंटनच्या या क्षेपणास्त्र मार्याचे समर्थन सुरक्षा मंडळाने केले नाही. कारण जॉर्ज बुश (सिनियर) यांच्या हत्येचा कट करण्यात आला होता हे सिद्ध झाले नव्हते.

## ५.८ ईस्त्राइल पॅलेस्टाईन शांतता करार (१९९३)

बिल क्लिंटनच्या कारकिर्दीत अमेरिकेत आणखी एक महत्वाची घटना घडली ती म्हणजे वॉशिंग्टन येथे इस्त्राइल व PLO (पॅलेस्टाईन मुक्ती संघटना) यांच्यात १३ सप्टेंबर १९९३ रोजी एक शांतता करार झाला. यावेळी इस्त्राइलचे पंतप्रधान यितझॅक रॅबीन व PLO चे अध्यक्ष यासर अराफत यांनी या करारावर स्वाक्षर्या केल्या.

अमेरिका सुरूवातीपासून इस्त्राइलचे मित्र होते. इस्त्राइलला नष्ट करण्याचे अरब राष्ट्रांनी बरेच प्रयत्न केले पण त्यांना यश मिळाले नाही. उलट यासर अराफत यांनी हा करार करून इस्त्राइलला मान्यता दिली. या कार्यामध्ये अमेरिकेचे भरघोस सहकार्य मिळाले.

याप्रकारे इस्त्रायलच्या भुमिकेशी सहमत होऊन क्लिंटनने अमेरिका ही एकमेव महासत्ता असल्याचा परिचय देत पश्चिम आशिया एका प्रदीर्घ संघर्षातून मुक्त केले व शांतता प्रस्थापित करूनच हातभार लावला हे बिल क्लिंटनच्या परराष्ट्र धोरणाचे यश मानावे लागेल.

## ५.९ अमेरिका व लॅटीन अमेरिका

अमेरिका जगाच्या राजकारणात कळत-नकळतपणे सहभागी होत होती. अमेरिकेचे दक्षिणकडील शेजारी म्हणजे लॅटीन वा दक्षिण अमेरिकेतील देश होत. ह्या देशाच्या अंतर्गत बाबींमध्ये अमेरिकेने फार पूर्वीपासून रस दाखवलेला होता.

बिल क्लिंटन यांनी १९९४ साली हैती या मध्य अमेरिकेतील राष्ट्राच्या अंतर्गत बाबीमध्ये रस घेतला. जॉन-बर्टरँड-अॅरीसटाइड ह्यांची लोकांनी निवडणूकीत हैतीचे राष्ट्राध्यक्ष म्हणून निवड केली होती. परंतु त्यांच्या विरूद्ध सैन्याने बंड करून हैतीची सत्ता काबीज केली होती. बिल क्लिंटन यांनी हैतीतील सैनिकी राजवट हटवण्यासाठी व पुन्हा लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी अमेरिकन सैन्य पाठवून हैती विरूद्ध सैनिकी कारवाई करण्याचे जवळ-जवळ निश्चीत केले होते. ह्यावेळी अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष जिमी कार्टर यांनी मध्यस्थी करून चर्चा घडवून आणली व जॉन बर्टरँड अॅरीसटाईड यांच्या हातात सत्ता पुन्हा एकदा हैतीची सूत्रे देण्यात आली.

अमेरिकेच्या दक्षिणेकडील मेक्सीकोमध्ये १९९५ साली अनेक आर्थिक संकटे निर्माण झाली होती. ह्यामुळे मेक्सीकोची अर्थव्यवस्था डबघाईला आली होती. अशा परिस्थितीत अमेरिकेने १९९५ साली बिल क्लिंटन यांच्या नेतृत्वाखाली मेक्सीकोला २० अब्ज डॉलर्सची आर्थिक मदत केली.

## ५.१० १९८९-२००० या काळातील अमेरिका-भारत संबंध

रीगनच्या कारकिर्दीत अमेरिकेने पाकिस्थानला आधुनिक शस्त्राचे भरपूर साह्य केले. त्यामुळे भारत चिंतातूर झाला होता. भारताची चिंता दूर करण्यासाठी रीगन १९८६ ते १९८७ मध्ये भारताशी संबंध सुधारणासाठी भर दिला होता. इ.स. १९९१ ते ९६ या कालखंडात भारताचे प्रधानमंत्री नरसिंहराव यांनी देखील अमेरिकेशी संबंध सुधारावे यासाठी प्रयत्न केले आहेत. नरसिंहरावने अमेरिकेतील मोठेमोठे उद्योग भारतात आणण्यास परवानगी दिली आहे. इतकेच नव्हे तर अमेरिकेने समर्पित केलेला डंकेल प्रस्ताव देखील भरताने स्वीकारला आहे.

## ५.११ बिल क्लिंटन भेट व भारतविषयक धोरण

विल्यम जेफर्सन तथा बिल क्लिंटन हे २० मार्च ते २४ मार्च २००० या काळात भारताच्या भेटीसाठी आले होते या भेटीकडे भारताचेच नव्हे तर जगाचेही लक्ष लागले होते. २२ वर्षापूर्वी अमेरिकेच तत्कालीन अध्यक्ष जिमी कार्टरनी जाने १९७८ मध्ये भारताला भेट दिली होती. भारताला भेट देणारे बिल क्लिंटन हे चौथे (४) अध्यक्ष होते.

भारताचे परराष्ट्रमंत्री जसवंत सिंह व अमेरिकेचे उपराष्ट्रमंत्री स्ट्रोब-टाल्बोट यांच्यात जून १९९८ ते जानेवारी २००० या काळात दहा वेळा झालेल्या वाटाघाटीची परिणती म्हणजे बिल क्लिंटन यांची भारत भेट समजली जाते.

भारत भेटीसाठी निघालेल्या बिल क्लिंटन यांनी एक निवेदन प्रिसद्ध केले होते त्यामध्ये ते म्हणतात, "जगातील लोकसंख्येच्या २०% लोकसंख्या असलेला द. आशियातील लोकशाही परंपरा मुक्त होत चाललेली अर्थव्यवस्था, वैज्ञानिक प्रगती याद्वारे येत्या अर्धशतकात हा भूभाग विकसीत होणार असून दरिद्र्य, परस्पर संघर्ष, अण्वस्त्र प्रसारबंदी, दहशतवाद, अंमली पदार्थांचा व्यापार या भेडसावणार्या प्रश्नाचा विचार करण्याची गरज आहे असे क्लिंटनने स्पष्ट केले होते.

जगात शांती, समृद्धी अधिक बळकट करण्यासाठी २१व्या शतकात अमेरिकेने दक्षिण आशियाशी सहकार्य करण्याची इच्छा आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष बिल क्लिंटन यांचे २१ मार्च २००० रोजी भारतामध्ये आगमन झाले अण्वस्त्र प्रसार बंदी व भारताची सुरक्षा व्यवस्था यावर भारत व अमेरिका यांच्यात मतभेद असला तरी अण्वस्त्र प्रसारबंदीसाठी दोन्ही देशांना परास्पर सहकार्य केले पाहिजे म्हणजे भारताच्या सुरक्षतेच्या संदर्भात निर्णय घेण्याचा अधिकार फक्त भारतालाच आहे. अशी भूमिका दोन्ही नेत्यांनी मान्य केली.

या चर्चेत

(१) संरक्षण, राजकीय क्षेत्रात सहकार्य,

(२) अन्य क्षेत्रांसाठी कार्यगट स्थापन करणे

(३) द्विपक्षीय शिखर परिषदा नियमितपणे आयोजित करणे

(४) अणुस्फोट विरोधात अमेरिकेने निर्बंध शिथिल करणे हे ठळक मुद्दे होते.

२०व्या शतकाने ब्रिटनच्या साम्रज्याचा सुर्य मावळला आणि उत्तरार्धात सोव्हिएत संघ लयास गेले तसेच अमेरिका एक महासत्ता म्हणून उदयास आली अमेरिकेच्या महासत्तापदास जे पारडे अमेरिकेच्या बाजूने जे झुकलेले आहे याची कोणीच खात्री देऊ शकत नाही.

munotes.in

## ५.१२ सारांश

२० व्या शतकाच्या पूर्वार्धात ब्रिटिश साम्राज्याचा सुर्य मावळला होता. याच शतकाच्या उत्तरार्धात सोव्हिएत युनियनचे विघटन घडून आले त्यामुळे अमेरिका हा एकमेव जागतिक सत्ता उरली होती. याच शतकाच्या अंतिम टप्प्यात चीन, भारत महासत्ता म्हणून उदयास येऊ पाहात आहेत.

## ५.१३ प्रश्न

१. अमेरिका ह्या जगातील महासत्तेच्या भूमिकेचे मूल्यमापन करा?

२. अमेरिका राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश यांनी अमेरिकेला महासत्ता बनविण्यासाठी कोणते धोरण स्वीकारले ?

३. राष्ट्राध्यक्ष बिल क्विंटन यांच्या काळात अमेरिकेचे धोरण काय होते ?

४. अमेरिकेला व भारत यांच्यातील १९८९-२००० या काळातील संबंधावर प्रकाश टाका.

## ५.१४ संदर्भ


१. प्रा.राजदरेकर / प्रा. गर्गे - आधुनिक जगाचा इतिहास - विद्या प्रकाशन, नागपूर

२. ना. सी. दिक्षीत- पश्चिमात्य जग - पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर

३. गायकवाड, कदम, थोरात - आधुनिक जगाचा इतिहास - भाग १ - श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर.

४. प्रा. हरिदास जाधव व प्रा. कल्याण चव्हाण - आधुनिक जगाचा इतिहास - अक्षरलेण प्रकाशन, सोलापूर.

५. डॉ. सुमन वैद्य - आधुनिक जग - श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर .

६. डॉ. सौ . शरावती शिरगावकर - आधुनिक युरोप - श्रीविद्या प्रकाशन, पुणे.

७. श. गो. कोलारकर - युरोपचा इतिहास - आनंद प्रकाशन, नागपूर

८. प्रा. जितेंद्र भामरे- आशियाचा इतिहास - शेठ प्रकाशन, मुंबई .

९. डॉ. रमेश गुप्ते व शे. रा. कुलकर्णी - आग्नेय आशियाचा इतिहास - परिमल प्रकाशन, औरंगाबाद

१०. डॉ. अनिलकठारे - आधुनिक चीन - कल्पना प्रकाशन, नांदेड .

११. डॉ. मु. बा. देवपुजारी - रशियाचा इतिहास - श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर

१२. डॉ. मु. बा. देवपुजारी - आधुनिक आशियाचा इतिहास - श्री मंगेश प्रकाशन , नागपूर

१३. डॉ. नि. वक्कानी - आधुनिक भारताचा इतिहास - श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर

१४. डॉ. जालिंदर भोसले - आधुनिक आशियाचा इतिहास - मुरलीधर प्रकाशन, पुणे

१५. डॉ. सुमन वैद्य व डॉ. शांता कोठेकर - भारताचा इतिहास - श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर

१६. Adolf Hitler - Mein Kampf - KRJ Book International, Delhi

१७. D. R. Sardesai and B. K. Gokhale - World History - Kitab Mahal Publication, Alahabad.

१८. M. D. David - Rise and Growth of Modern China.

१९. तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी - मराठी विश्वकोश - भाग २ व ९

२०. डॉ. शांता कोठेकर, अमेरिकेच्या संघराज्याचा इतिहास - श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर

२१. डॉ. सुमन वैद्य - रशियाचा इतिहास - श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.

२२. विस्टन चर्चील - दुसरे महायुद्ध - महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, १९७८.

२३. डॉ. हुकुमचंद जैन, डॉ.कृष्णचंद्र माथुर - आधुनिक जगाचा इतिहास - के. सागर प्रकाशन पुणे.

❖❖❖❖

munotes.in

# ६

# दक्षिण आफ्रिकेतील वर्णभेदाविरुद्ध प्रचार व चळवळ

**घटक रचना :**

६.० उद्दिष्ट्ये

६.१ प्रस्तावना

६.२ आफ्रिकन ऐक्य संघटनेची पार्श्वभूमी

६.३ आफ्रिकन ऐक्य संघटनेची स्थापना

६.४ आफ्रिकन ऐक्य संघटनेचे ध्येय

६.५ आफ्रिकन ऐक्य संघटनेचे उद्दिष्टे

६.६ आफ्रिकन ऐक्य संघटनेचे कार्य

६.६.१ निर्वसाहतीकरण

६.६.२ अखंड प्रादेशिक एकात्मता व सार्वभौमत्वाचा पुरस्कार

६.६.३ वंशवादाविरोधी संघर्ष

६.६.४ आफ्रिकन संस्कृतीला प्रोत्साहन

६.६.५ आर्थिक व सामाजिक विकास व दळणवळण सुविधा

६.६.६ आरोग्य शिक्षण व विज्ञानाला प्रोत्साहन

६.६.७ आफ्रिकन निर्वासित (Refugee) लोकांचे पुनर्वसन

६.६.८ आफ्रिकन ऐक्य संघटनेची अधिकृत भाषा

६.७ दक्षिण आफ्रिका - वर्णभेदाचा शेवट

६.७.१ वांशिक भेदभावाचा अर्थ (Apartheid)

६.७.२ दक्षिण आफ्रिकेतील काĖया निग्रोवरील बंधने

६.७.३ दक्षिण आफ्रिकेतील वांशिक भेदभावाचे धोरण

६.७.४ वांशिक भेदभाव धोरणाची वैशिष्ट्ये

६.७.५ वांशिक भेदभाव धोरण विरूद्ध चळवळ

६.७.६ पंतप्रधान बोथाचे सरकार

६.७.७ बोथांचे भेदभाव धोरणातील बदल

६.७.८ अध्यक्ष क्लार्क - भेदभाव समाप्ती

६.७.९ वांशिक भेदभावाची समाप्ती व डॉ. नेल्सन मंडेला अध्यक्ष

६.८ सारांश

६.९ प्रश्न

६.१० संदर्भ

## ६.० उद्दिष्ट्ये

या प्रकरणात दक्षिण आफ्रिकेतील वर्णभेद चळवळीचा मागोवा घ्यावयाचा असून आफ्रिकेत ऐक्यासाठी कोणीकोणी कोणकोणते प्रयत्न केले, येथे अखंड एकात्मता व सर्वभौमता याला कसे महत्व प्राप्त झाले आणि आधुनिक जागृतीमुळे वंशवादाविरुद्ध संघर्ष कसा निर्माण झाला. याचा अभ्यास करावयाचा आहे. येथील वर्णभेदाचा शेवट होण्यास कोणकोणते घटक कारणीभूत ठरले यांचा अभ्यास करने हे या प्रकरणाची उद्दिष्टये आहेत.

## ६.१ प्रस्तावना

आफ्रिका खंड एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत या खंडाचा उल्लेख अज्ञात खंड (dark continent) या शब्दात केला जात असे, पण आज मात्र तेथील चित्र पूर्ण बदलले आहे. आधुनिक विचारधारा व एका पाठोपाठ एक स्वतंत्र झालेली राष्ट्रे व त्यांच्या आकांक्षा यामुळे त्या खंडाचा अंध:कार नाहीसा झालेला असून तो आज एक उगवता खंड मानला जातो.

दुसऱ्या महायुद्धाने आफ्रिकन राष्ट्रवादावर परिणाम होऊन आफ्रिकन स्वातंत्र्यासाठी पार्श्वभूमी तयार झाली होती. दुसऱ्या महायुद्धाला युद्धासाठी आफ्रिकन राष्ट्रांनी आवश्यक नैसर्गिक सामुग्री पुरवली होती. दुसऱ्या महायुद्धात युरोपीय सत्तांचा पराभव झाल्यामुळे त्यांच्या विरोधात जोरदार प्रयत्न झाले. आफ्रिकेच्या निरनिराËया राष्ट्रात झालेल्या स्वातंत्र्य संग्रामांमुळे संपूर्ण आफ्रिकेच्या ऐक्याची संकल्पना साहजिकच पुढे आली. कारण त्या आफ्रिकन राष्ट्रांच्या लढ्याचे मूळ उद्दिष्ट सारखेच होते.

## ६.२ आफ्रिकन ऐक्य संघटनेची पार्श्वभूमी

आफ्रिकेच्या निरनिराळ्या राष्ट्रात झालेल्या स्वातंत्र्य संग्रामांमुळे संपूर्ण आफ्रिकेच्या ऐक्याची संकल्पना पुढे आली. पाश्चात्य संस्कृती, संकल्पना आणि तत्वज्ञानाशी आफ्रिकेतील जनतेचा संपर्क आला. त्यामुळे आफ्रिकन जनतेत राष्ट्रवादी भावना बळावली. पाश्चात्य विद्या संपादन करण्यासाठी गेलेले तरुण विद्या विभूषित बनले. त्यांनी पाश्चात्य, स्वतंत्र, विचार आणि स्वातंत्र्याची संकल्पना आफ्रिकेत आणली. पहिल्या महायुद्धानंतर

munotes.in

तेथील राष्ट्रवादी चळवळींना व्यापक स्वरूप प्राप्त झाले. इंग्लंड, फ्रान्स या वसाहतवाद्यांनी आफ्रिकेतील अनेक लोकांना सैन्यात भरती केले होते. युद्धामध्ये आफ्रिकन तरुणांचा इतरांशी संपर्क आला. त्यांच्यात आचार विचारांची देवाणघेवाण झाली. त्यामुळे त्यांच्या दृष्टीकोनात प्रगल्भता आली. आपले राष्ट्र लोकशाही टिकवण्यासाठी इंग्लंड, फ्रान्ससारखी राष्ट्रे एवढी मोठी युद्धे खेळू शकतात, तर आपण आपले स्वातंत्र्य मिळवण्यासाठी का लढा नाही देऊ शकत? असा प्रश्न युद्धावरून परतलेल्या सैन्यास पडला व ते युद्धात झालेली नुकसान भरपाई मागू लागले. संपूर्ण आफ्रिकेचे ऐक्य साधण्याच्या कल्पनेचे श्रेय मार्क्स ऑरेलियस ग्रव्ही व विलियम ई-दुबोईस (१८६८-१९६३) या दोन ख्यातनाम आफ्रिकनांना द्यावे लागले. संपूर्ण आफ्रिकेची पहिली परिषद १९०० मध्ये लंडन येथे घेण्यात आली. इ.स. १९०९ मध्ये साम्रज्यवादाचा त्याबाबत कोणतीही तडजोड मान्य नसलेला कट्टर शत्रू व संपूर्ण आफ्रिकेच्या ऐक्याच्या संकल्पनेचा जनक डॉ. विलियम दुबोईस याने निग्रोंच्या मनात मातृभूमीविषयीचा अभिमान आफ्रिकन जनतेचे खास व्यक्तीमत्त्व, त्यांचे भवितव्य व आफ्रिका आफ्रिकनांकरिताच असावे. उन्नतीकरिता नॅशनल ॲडव्हान्समेंट ऑफ द कलर्ड पीपल या संघटनेची स्थापना केली. डॉ. दुबाईसने आफ्रिकन जनतेला जागृतीकरिता दमदार आवाहान करून त्याने युनिव्हर्सल निग्रो इंम्प्रूव्हमेंट अँड आफ्रिकन कम्युनिटीज लीग ही संस्था स्थापन केली आणि तो स्वत: युनायटेड स्टेटस् ऑफ आफ्रिकेचा अध्यक्ष असल्याची घोषणा त्याने केली.

पहिल्या महायुद्धानंतर अखिल आफ्रिकन परिषदा १९२३ मध्ये लिस्बन येथे व १९२७ मध्ये न्यूयॉर्क येथे घेण्यात आल्या. अखेरची परिषद १९४३ मध्ये मँचेस्टर येथे भरली.

## ६.३ आफ्रिकन ऐक्य संघटनेची स्थापना

दुसऱ्या महायुद्धानंतर आशिया व आफ्रिका खंडातील चळवळीला वेग आला. १९५५ मध्ये बांडुंग येथे भरलेल्या परिषदेत प्रथमच आशियातील स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांच्या प्रतिनिधींच्या बरोबर स्वतंत्र्य झालेल्या आफ्रिकन राष्ट्रांचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्या परिषदेत स्वतंत्र आफ्रिकेने स्वतंत्र आशियाशी हस्तांदोलन करून अभिवादन केले. १९५८ मध्ये स्वतंत्र आफ्रिकन राष्ट्रांची एक परिषद स्वतंत्र आफ्रिकन भूमीवर अक्रा येथे आयोजित केली. या परिषदेला इथिओपिया, घाना, लायबोरिया, निबिया, सुदान, ट्युनिशिया, मोरोक्को व युनायटेड अरब रिपब्लिक असे एकूण आठ राष्ट्रांचे प्रतिनिधी उपस्थित होते. अक्रा येथील परिषदेनंतर मनरोविया, लागोस व कासाब्लांका येथे परिषदा घेण्यात आल्या.

आफ्रिकन ऐक्य संघटनेची स्थापना २५ मे १९६३ मध्ये झाली. या परिषदेमध्ये जवळपास ३२ राष्ट्रांनी आफ्रिकन ऐक्य संघटनेला (Organisation of African unity) या सनदेला मंजूरी दिली. त्या संघटनेची उद्दिष्ट साध्य करण्याकरिता आफ्रिकन राष्ट्रप्रमुखांची एक असेंब्ली व त्या राष्ट्रांच्या परराष्ट्र मंत्र्याची एक समिती अश्या दोन घटक संस्थांची निर्मिती करण्यात आली.

आफ्रिकन ऐक्य संघटनेच्या (Organisation of African unity) महासचिवाचे कार्यालय अदिस-अबाबात असावे असे निश्चित करण्यात आले. त्याचबरोबर मध्यस्थी, लवाद व तडजोड

## ६.४ आफ्रिकन ऐक्य संघटनेचे ध्येय

१) राजकीय व परराष्ट्र संबंधाविषयक सहकार्य व वाहतूक सहकार्य करणे.

२) आर्थिक उन्नती करणे त्यामध्ये दळणवळण

३) शैक्षणिक व सांस्कृतिक सहकार्य करणे.

४) आरोग्य, तसेच आरोग्यरक्षणार्थ खबरदारी अन्नधान्याचे सहकार्य करणे.

५) तांत्रिक व वैज्ञानिक सहकार्य करणे.

६) शांतता व सुरक्षिततासाठी सहकार्य करणे.

## ६.५ आफ्रिकन ऐक्य संघटनेचे उद्दिष्टे

१) आफ्रिकन ऐक्याचा पुरस्कार करणे ते ऐक्य साध्य होईल याकरिता आवश्यक ते सर्व प्रयत्न करणे.

२) आफ्रिकन राष्ट्रांच्या सार्वभौत्वाचे व प्रादेशिक अबाधित्वाचे रक्षण करणे.

३) आफ्रिकन राष्ट्रातील सर्व मतभेदांचे निराकरण शांततेच्या मार्गांनी करणे.

४) वसाहतवादाचे आफ्रिकन भूमीवरून समूळ उच्चाटन करणे.

५) आंतरराष्ट्रीय सहकार्याकरिता प्रयत्न करणे.

## ६.६ आफ्रिकन ऐक्य संघटनेचे कार्य

द्वितीय महायुध्दानंतर आफिकेतील बरेच देश अक्रा स्वतंत्र झाले. सर्व आफ्रिकेतील देशांची एक संघटना स्थापन करण्याचे ठरवले १९५८ मध्ये अक्रा १९६० मध्ये टयुनिस व १९६१ मध्ये कैरो येथे भरलेल्या परिषदेमध्ये आफ्रिकन ऐक्यावर बरीच चर्चा झाली परंतु आफ्रिकेतील सर्व देशांची सर्वकष राजकीय एकता असावी यावर मतैक्य होऊ शकले नाही.

१९५८ मधे नुकत्याच स्वतंत्र झालेल्या घाना देशात अक्रा येथे पहिली परिषद बोलवण्यात आही. त्यामध्ये इथिओपिया, इजिप्त, घाना, लायबेरिया लिबीया मारोक्को सुदान व ट्युनिरीया या देशांशी भाग घेतला. या परिषदेमध्ये साम्रज्य विरोधी सुर व्यक्त झाला होता. आफ्रिकेतीग सर्व देशांनी समान राजकीय आर्थिक कार्यक्रम राबवावा अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

स्वतंत्र आफ्रिका राष्ट्रांची दुसरी परिषद जुन १९६० मध्ये इथिओपियाची राजधानी आदीस अबाबा येथे भरविण्यात आली. या परिषदेत आफ्रिकेतील १५ देशांनी सहभाग घेतला होता. अक्रा येथील परिषदे प्रमाणे परिषदेतील सर्व देशांनी साम्रज्यवादी शक्तींचा धिक्कार केला व आफ्रिकेतील पारतंत्र्यातील देशांना लवकर स्वातंत्र्य देण्याची मागणी केली या परिषदेत इथिओपिया, सोमालिया, घाना यामधील सीमारषेवर चाललेल्या वादाचे तसेच कांगोमधील

नागरी युध्दाचे सावट पसरले होते. घाना व नायजेरिया मधील वादामुळे आफ्रिकन देशांची एकता धोक्यात आली होती. घानाचे लोकप्रिय नेते न्कूमाह यांच्या मते तेवढ्या लवकर आफ्रिकन एकता प्रत्यक्षात आणायला हवी होती पण नायजेरियाने यास तीव्र हरकत घेतली त्यामुळे आफ्रिकन देशांतील एकतेचे स्वप्न प्रत्यक्षात येऊ शकले नाही.

**आफ्रीकन ऐक्य संघटना**

आफ्रिकेतील अनेक नवनिर्वाचीत देशांना स्वातंत्र्य मिळाल्याने आफ्रिकेतील इतर देशांवर अनुकुल परिणाम झाला होता. युरोपातील घडामोडीचा द्वितीय महायुध्दात आफ्रिकेतील तरुणांना परिचय झाल्यामुळे त्यांची स्वातंत्र्याची ओढ अधिकच तीव्र झाली तसेच द्वितीय महायुध्दामुळे युरोपमधील साम्रजवादी शक्तीची ताकत कमी झाली होती १९५५ मध्ये इंडोनेशियात बांडुंन येथे अलिप्त राष्ट्रांच्या परिषदेत आफ्रिकेतील अनेक नेत्यांनी बरोबरीने भाग घेतला होता. त्यामुळे आशियातील अनेक नेत्यांशी त्यांचा संपर्क आला. तसेच बांडुग परिषदेत अलिप्त राष्ट्रांनी अमेरिका व रशिया या महाशक्तींचा भांडणात न पडता गरीब देशातील अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गोष्टींवर भर दिला होता. आफ्रिकेतील देशांना हे अनुकुल होते. तसेच अक्रा कासाब्लांका व आदिसअबाबा येथे भरलेल्या परिषदेमधेही आफ्रिकन ऐक्याची मागणी साततत्याने पुढे आली होती. तसेच आफ्रिकेत अनेक देशांनी आपापसात करार करुन आपापले हितसंबंध जोपसणारे गटही स्थापन केहे होते. पूर्वी फ्रान्सच्या ताब्यात असणार्या देशानी १९६० मध्ये आयतरी कोस्ट या देशात परिषद भरवली या परिषदेत सहभागी देशांनी आपापसात आर्थिक सहकार्य करण्याचे ठरविले या गटाला ब्रझविले गट म्हणून ओळखले जाऊ लागले.

मोरोक्कोची राजधानी कासाब्लांका येथे १९६१ मध्ये आफ्रिकन राष्ट्रांना दुसरा गट अस्तित्वात आला यामध्ये मोरोक्को, इजिप्त, लिबिया, घाना, गियाना व माली या देशांचा सामावेश होता घानाचे सामजवादी नेते न्युभाहु यांचा या गटावर मोठा प्रभाव होता. आफ्रिकन ऐक्याचे न्यूभाहु खंदे पुरस्कर्ते होते.

१९६१ मधे लायबेरीयातील मनेरोव्हीया येथे २० आफ्रिकन देशांची एक बैठक झाली यामध्ये ब्रझविले गटातील देश तसेच पूर्वी ब्रिटीशांच्या ताब्यात असणारे देश सामील झाहे होते. या दोन्ही गटाच्या एकत्रीकरणातुन मनरोव्हीया गट अस्तित्वात आला या परिषदेत नायजेरियाचे प्रभुत्व जास्त होते.

आफ्रिकेतील सर्व देशांचे ऐक्य व्हावे यासाठी या संघटना कार्यरत असल्या तरी कांगो मधील नागरी युध्दाने आफ्रिकन खंडात एकतेची गरज सर्वांना जाणवत होती. नायजेरीयात १९६२ मधे लागोस येथे भरलेल्या परिषदेमध्ये आफ्रिकन ऐक्य परिषदेचा मसुदा तयार करण्यात आला. पुढील वर्षात १९६२ मध्ये आदिसअबाबा येथे आफ्रिकन ऐक्य संघटना (OAU) स्थापना झाली ह्यामध्ये सुरवातीला ३२ देश सभासद होते द्वीतीय महायुध्दानंतर रशियन साम्यवादी धोरणाविरोधात अमेरिकेने स्थापन केलेल्या नाटो व सेंटो सारख्या लष्करी संघटनेसारखे (OAU) चे स्वरुप नव्हते सामुदायिक संरक्षण करार हे तत्वही आफ्रिकन संघटनेने आंगिकारले नव्हते. आफ्रिकन बांधवाना मदत करावी हे तत्व आफ्रिकन ऐक्य संघचनेच्या स्थापनेमागील मुळ कारण होते.

### ६.६.१ निर्वसाहतीकरण

आफ्रिकन ऐक्य संघटनेने वसाहतवादास विरोध करून आफ्रिकन राष्ट्रात ऐक्य व सहकार्य स्थापन करण्यासाठी ही संघटना स्थापन केली होती. दुसऱ्या महायुद्धानंतर आफ्रिकेत आफ्रिकी स्वातंत्र्याच्या चळवळीने जोर धरला. या चळवळीस आफ्रिकन ऐक्य संघटनेने स्वातंत्र्य चळवळीस आर्थिक व नैतिक पाठिंबा दिला.

लायबेरिया, इथिओपिया, घाना (१९५७), गिनी (१९५८), कांगो (१९६०) ते १९६५ या काळात ३८ राष्ट्रे परकीयांच्या वर्चस्वाखालून मुक्त झाली. तर १९७४ पर्यंत आफ्रिकन भूमीवरील परकीय राजवटी जवळजवळ संपुष्टात आल्या होत्या.

### ६.६.२ अखंड प्रादेशिक एकात्मता व सार्वभौमत्वाचा पुरस्कार

आफ्रिका खंडातील कांगो हे वसाहतवादास बळी पडले होते. कांगोमधून मोठ्या प्रमाणात युरेनियम व जस्त याचा कच्चा माल पाश्चात्य देश मोठ्या प्रमाणात कमी किंमतीमध्ये घेत असत. त्याला पायाबंद घालण्याचे काम OAU ने केले.

इ.स. १९६४ मध्ये इजिप्त व इस्त्राइल मध्ये युद्ध झाले त्यायुद्धामध्ये इस्त्राइलने इजिप्तचा काही भाग व्यापला होता. तो मुक्त करण्यासाठी OAU ने प्रयत्न केले.

नायजेरियामध्ये यादवी युद्ध सुरू झाले होते ते यादवी युद्ध संपुष्टात आणण्यासाठी OAU ने पूर्णपणे सहकार्य केले.

### ६.६.३ वंशवादाविरोधी संघर्ष

दक्षिण आफ्रिका, र्होडेशिया व नामबिया या राष्ट्रात मोठ्या प्रमाणात वंशवाद सुरू होता. OAU ने वंशवाद संपुष्टात येण्यासाठी प्रयत्न केले. इ.स. १९६८ च्या तेहरान परिषदेमध्ये वंशवाद म्हणजे मानवतावादा विरूद्ध गुन्हा असे सांगण्यात आले तरीसुद्धा दक्षिण आफ्रिकेतील वंशवाद कमी होत नव्हता. अखेर दक्षिण आफ्रिकेला जागतिक खेळ (Olympic) खेळातून तसेच जागतिक टेनिस खेळातून खेळण्यास मनाई करण्यात आली.

### ६.६.४ आफ्रिकन संस्कृतीला प्रोत्साहन

आफ्रिकन ऐक्य संघटनेने (OAU) आफ्रिकन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी ऑगस्ट १९६९ मध्ये अल्जेरिया या ठिकाणी आफ्रिकन संस्कृती उत्सव साजरा केला होता. त्यामध्ये कलात्मक व संस्कृतीचे प्रदर्शन दाखविणार्या अनेक कलाकृती मांडल्या होत्या.

मोघाडिस्को, तसेच डान्स, संगीत यांची कार्यशाळा OAU ने आयोजित केली होती. याचा उद्देश आफ्रिकन कला गुणांना वाव मिळावा, त्यांच्यामध्ये प्रगती व्हावी हा होता.

### ६.६.५ आर्थिक व सामाजिक विकास व दळणवळण सुविधा

आफ्रिकन ऐक्य संघटनेने आफ्रिकन राष्ट्रात उपलब्ध असणार्या नैसगिक साधनसंपत्तीचे जतन करणे. आंतरराष्ट्रीय कायद्यांद्वारे प्रांतिक पाण्याचा वाद नष्ट केला. त्याचप्रमाणे सामाजिक क्षेत्रात तरुणांचा एक संघ निर्माण करण्यात आला व आफ्रिकन व्यापारी संघ

स्थापन करण्यात आला. दळणवळण सुविधा वाढविण्याचे प्रयत्न करण्यात आले. रस्ता रुंदीकरण, टेलीफोन सुविधा वाढविण्यात आल्या.

### ६.६.६ आरोग्य शिक्षण व विज्ञानाला प्रोत्साहन

आफ्रिकन ऐक्य संघटनेने आरोग्यविषयक शिबीर आयोजित केले. पशुपक्षी यांच्या होणार्या संख्येतील घट यावर काही उपाययोजना सुचविण्यात आल्या. OAU ने आफ्रिकन राष्ट्रांत अनेक शाळा व कॉलेजांना प्रोत्साहन देऊन आर्थिक मदत केली. युरोपियनांच्या धर्तीवर विद्यापीठाची रचना करण्यात आली.

### ६.६.७ आफ्रिकन निर्वासित (Refugee) लोकांचे पुनर्वसन

आफ्रिकन ऐक्य संघटनेने निर्वासितांचे पुनर्वसन केले. त्यांच्या शिक्षणाचे व नोकरीसाठी Placement Bureau स्थापन करण्यात आले. अनेक आफ्रिकन निर्वासितांना शैक्षणिक सुविधा देऊन त्यांचा विकास केला. त्यांना आफ्रिकन राष्ट्रात दर्जा व अधिकार प्राप्त होतील यासाठी OAU ने प्रयत्न केले.

### ६.६.८ आफ्रिकन ऐक्य संघटनेची अधिकृत भाषा

OAU ची कामकाजाची अधिकृत भाषा म्हणून अरेबिक, इंग्रजी, फ्रेंच आणि पोर्तुगीज यांना मान्यता देण्यात आली आहे.

## ६.७ दक्षिण आफ्रिका : वर्णभेदाचा शेवट

वांशिक भेदभाव नीतीचा जन्म दक्षिण आफ्रिकेत झाला. १६५२ मध्ये डच ईस्ट इंडिया कंपनीचे काही लोक प्रथम "केप ऑफ गुड होप" (Cape Of Good Hope) येथे आले या डचांना आफ्रिकन किंवा बोअर असे म्हटले जात होते. या बोअर डचांनी स्थानिक मागासलेल्या आदिवासी असलेल्या आफ्रिकनांच्या जमिनी हिसकावून घेतल्या आणि त्यांना शेतीवर गुलामाप्रमाणे वागवून शेतमजूर म्हणून काम करण्यास भाग पाडले.

१७९५ मध्ये ब्रिटिशांनी केप ऑफ गुड होप ही वसाहत डचांकडून जिंकून घेतली आणि त्यानंतर झालेल्या तहान्वये ही वसाहत ब्रिटीशांकडे राहिल असे मान्य करण्यात आले. त्यामुळे आफ्रिकेच्या अन्य भागात असलेले ब्रिटीश मोठ्या प्रमाणात केप वसाहतीत कायम वास्तव्यासाठी आले. ब्रिटीशांनी गुलामगिरी नष्ट करण्याचा निर्णय घेतल्याने डचांना शेतीवर काम करण्यासाठी शेतमजूर, मिळेनासे झाले म्हणून त्यांनी उत्तरेकडील ट्रान्सवाल व ऑरेंज-फ्री-स्टेट या भागात १८३५ ते १८४० या काळात मोठ्या प्रमाणावर स्थलांतर केले.

ब्रिटीश व डच यांच्यात दक्षिण आफ्रिकेच्या अन्य भागात स्थलांतर करण्याच्या प्रश्नावरून बोअर युद्ध (१८९९ ते १९०२) घडले. इ.स. १९१० मध्ये प्रदेशांचे दक्षिण आफ्रिकेचे संघराज्य (Union of South Africa) निर्माण केले. या नवनिर्मित संघराज्यात ७० टक्के निग्रो, १८ टक्के गोरे व ९ टक्के मिश्रवंशीय काळे-गोरे (Coloured) आणि ३ टक्के आशियाई होते.



munotes.in

### ६.७.१ वांशिक भेदभावाचा अर्थ (Apartheid)

दुसऱ्या महायुद्धानंतर आफ्रिकेतील काËया निग्रोंना वेगळेपणाची वागणूक देण्याबाबत युरोपीयन वसाहतवाद्यांनी धोरणात्मक बदल केले. त्यास Apartheid वंशभेद असे म्हणतात किंवा कृष्णवर्णीयांना हीन वंशाचे लेखून त्यांना गौरवर्णियांपासून दूर ठेवण्याची नीती म्हणजे वंशभेद निती Apartheid होय.

Apartheid हा आफ्रिकन शब्द Apartness "वेगळेपण" या अर्थाने १९४० च्या दशकात "आफ्रिकन नॅशनल पक्ष" (Africanar National Party) या राजकीय पक्षाने निग्रो वंशीयांचे इतर वंशांपासून वेगळेपण दर्शविण्यासाठी प्रचलित केला.

### ६.७.२ दक्षिण आफ्रिकेतील काळ्या निग्रोवरील बंधने

१) गोर्यांच्या हाती दक्षिण आफ्रिकेतील राजकीय व आर्थिक नाड्या होत्या. निग्रोंना मतदान अधिकार नव्हता.

२) काळ्या निग्रोंना शेतीवर व कारखान्यांत शारिरीक श्रमाची कामे करण्याचे बंधन होते.

३) गोरे राहत असलेल्या वस्तीस्थानापासून दूर ठराविक आखून दिलेल्या राखीव भागातच राहण्याचे बंधन त्यांच्यावर होते.

४) राखीव प्रदेशाच्या बाहेर काळ्याना जमीन खरेदी करण्यास मनाई होती.

५) निग्रोंवर नियंत्रण ठेवण्यासाठी पासपद्धती (Pass Laws) लागू करण्यात आली.

६) इ.स. १९११ साली एक कायदा करून काËया निग्रोना संप करण्यास बंदी घालण्यात आली.

### ६.७.३ दक्षिण आफ्रिकेतील वांशिक भेदभावाचे धोरण

डॉ. मालन (Malan) १९४८ साली दक्षिण आफ्रिकेचे पंतप्रधान झाले व त्यांनी वांशिक भेदभावाचे धोरण अधिकृतपणे जाहीर केले. या धोरणामुळे काळ्या आफ्रिकनांवरील बंधने व नियंत्रण अत्यंत कडक करण्यात आली.

डॉ. मालन (१९४८ ते ५४) यांच्यानंतर द. आफ्रिकेच्या सत्तेवर आलेल्या स्ट्रिंज्डम (१९५४-५८), व्हरवर्ड (१९५८ ते ६६) आणि व्होर्स्टर (१९६६ ते १९७८) या सर्व पंतप्रधांनांनी वांशिक भेदभावाचे धोरण जास्तीत जास्त कडकपणे राबविले.

### ६.७.४ वांशिक भेदभाव धोरणाची वैशिष्ट्ये

#### १) सर्व स्तरावर वेगळेपण

काळे आणि गोरे यांच्यात शक्य तितक्या सर्व स्तरांवर व सर्व क्षेत्रांत वेगळेपणा कायम ठेवणे हे या धोरणाचे उद्दिष्ट होते. ग्रामीण भागात काळ्याची निवास व्यवस्था राखीव जागांमध्ये तर शहरात गोर्यांच्या वस्तीस्थानापासून सुरक्षित अंतरावर काळ्यासाठी घरकुले ठेवली होती.

बससेवा, आगगाड्या, हॉटेले, स्वच्छतागृहे, उद्याने, बागा, हॉस्पिटले, बैठकीची बाके, समुद्र किनार्यावरील बीच, क्रीडांगणे आणि चर्च इत्यादी सर्व गोष्टी काळ्यासाठी वेगळ्या ठेवण्यात आल्या होत्या.

### २) ओळखपत्रांची तरतूद

प्रत्येक काळ्या आफ्रिकनास त्यांचे वांशिक वेगळेपण लक्षात आणून देण्यासाठी ओळखपत्र देण्यात आले होते. काळ्याचे राखीव निवासस्थान, कामाचा कारखाना, प्रवास इत्यादीसंबंधी कडक कायदे करण्यात आले होते व त्यांना पास देण्यात आले होते.

### ३) विवाहावर बंदी

निग्रो आणि गोरे यांच्यात विवाह करण्यास बंदी घालण्यात आली होती. वांशिक पावित्र्य व शुद्धी राखण्यासाठी अशी बंदी घातली होती.

### ४) बांटू स्वयंशासन कायदा (१९५९)

आफ्रिकेतील मूळ आदिवासी आफ्रिकन (बांटू) होते. त्यांची सात प्रादेशिक विभागात राखीव व्यवस्था करण्यात आली. हे बांटू आफ्रिकन हळूहळू सुधारतील आणि स्वयंशासन देण्यासाठी तसा कायदा करून बांटूस्थान (Bantustan) निर्माण करून स्वतंत्र घोषीत करण्यात आले.

### ५) राजकीय हक्कांपासून वंचित

दक्षिण आफ्रिकेतील काळ्याना मतदान, निवडणूक आदी कोणतेही राजकीय हक्क देण्यात आले नाहीत.

### ६.७.५ वांशिक भेदभाव धोरण विरूद्ध चळवळ

### १) अल्बर्ट लुथुलीची मोहीम

आफ्रिकन नॅशनल कॉंग्रेस () चा नेता अल्बर्ट लुथुली याने सरकारच्या दडपशाहीच्या धोरणाच्या निषेधार्थ एक मोहीम सुरू करून काळ्या कामगारांनी काही दिवस काम थांबवले. इ.स. १९५२ मध्ये गोर्या लोकांची दुकाने आणि त्यांच्या जागांमध्ये घुसघोरी करण्याची मोहीम लुथुलीने शिस्तबद्धपणे राबवली. त्याच्या Let my people go या त्यांच्या आत्मचरित्राने त्याची जगाला ओळख झाली.

### २) धार्मिक संस्था व नेते यांचा वांशिक भेदभावास विरोध

काळ्या व गोर्या चर्च मिशनर्यांनी दक्षिण आफ्रिकेच्या वांशिक भेदभावाच्या धोरणास विरोध केला. त्यामध्ये ट्रेव्हर हडलस्टन या प्रसिद्ध धर्म प्रमुखासह अनेकांचा समावेश होता.

### ३) आफ्रिकन नॅशनल काँग्रेसची बस वाहतुकीवर बहिष्कार

सरकारने बस भाड्यात वाढ केल्यामुळे आपल्या राहत्या घरापासून दहा मैल दूर अंतरावर असलेल्या जोहान्सबर्ग या शहरात कामावर जाण्यासाठी बसऐवजी चालत जाऊन बस वाहतुकीवर संपूण बहिष्कार घातला. ही मोहीम तीन महिने चालू होती.

### ४) इ.स. १९६० चे प्रचंड निदर्शन व नेल्सन मंडेलांना अटक

दक्षिण आफ्रिकन सरकारच्या जुलमी कायद्यांना विरोध करण्यासाठी राजधानी जोहान्सबर्ग, नजीक असलेल्या शार्प व्हिल या छोट्या नगरात आफ्रिकन नॅशनल काँग्रेसने १९६० साली प्रचंड निदर्शन ९ मार्चला आयोजित केला. पोलिसांनी निदर्शकांवर केलेल्या गोळीबारात ६७ आफ्रिकन ठार व अनेक जखमी झाले; परंतु पोलिसांनी केलेल्या हिंसक अत्याचारी उपायांमुळे लोक भयंकर चिडले आणि हिंसेला हिंसेनेच उत्तर देण्याचे ठरवले. आंदोलकांनीही बाँबस्टोट गोळीबार इ. हिंसक कृत्ये आरंभली.

नेल्सन मंडेला यांच्यासह काँग्रेसच्या अनेक नेत्यांना पकडून त्यांच्यावर खटले भरले. नेल्सन मंडेला यांना ही जन्मठेपेची शिक्षा देण्यात आली.

### ५) वांशिक भेदभावाचा शेवट

दक्षिण आफ्रिकन सरकारने १९४८ साली लागू केलेले वांशिक भेदभावाचे धोरण १९८० पर्यंत काळ्या आफ्रिकन लोकांना कोणत्याही प्रकारची सवलत वा सूट न देता चलू ठेवले होते. या धोरणाविरूद्ध सुरू झालेली निषेध चळवळ कमी अधिक तीव्रतेने चालू होती.

या चळवळीला दक्षिण आफ्रिके बाहेर राष्ट्रकुल (Common Wealth) आफ्रिकन ऐक्य संघ (OAU) संयुक्त राष्ट्रसंघ (UNO) अन्य मानवतावादी संघटना आणि जागतिक लोकमत यांचा पाठिंबा मिळत होता.

### ६.७.६ पंतप्रधान बोथाचे सरकार

१९१९ साली दक्षिण आफ्रिकेत सार्वत्रिक निवडणूका होऊन पंतप्रधान पी. डब्ल्यू. बोथा (Botha) चे सरकार सत्तेवर आल्यानंतर बोथांना बदलत्या परिस्थितीची जाणीव झाली. त्यांनी काही प्रमाणात अनुकूल बदल करावा असा निर्णय घेतला.

### ६.७.७ बोथांचे भेदभाव धोरणातील बदल

१) पंतप्रधान बोथाने आपल्या समर्थकांना योग्य तो इशारा देऊन त्यांच्या टीकेची पर्वा न करता, बाह्य जगाची आगपाखड शांत करण्यासाठी सकारात्मक पावले उचली.

२) काळ्या कामगारांना कामगार संघटना स्थापन करण्यास व संपावर जाण्यास परवानगी दिली.

३) काळ्याना आपल्या नगरपालिकेच्या निवडणूकीत मतदानाने आपले प्रतिनिधी निवडण्यास मान्यता दिली.

४) नवी राज्यघटना प्रस्थापित केली. त्यानुसार संसदेत दोन सभागृहे नवी राज्यघटना १९४८ मध्ये अंमलात आली.

५) मिश्रवंशीय विवाह आणि लैंगिक संबंधाना सवलती देण्यात आली.

६) गोरेतरांना पास देण्याचा कायदा रद्द करण्यात आला.

### ६.७.८ अध्यक्ष क्लार्क - भेदभाव समाप्ती

१९८९ मध्ये निवडून आलेले दक्षिण आफ्रिकेचे नवे अध्यक्ष एफ. डब्ल्यू.डी. क्लार्क यांनी अगदी सावधतेची पावले टाकीत वांशिक भेदभाव समाप्त करण्याचे ठरविले.

दक्षिण आफ्रिकेच्या भेदभाव चळवळीत स्वत:ला झोकून देणारे डॉ. नेल्सन मंडेला गेली २७ वर्ष तुरुंगात होते. त्यांना १९९० मध्ये मुक्त केले आणि त्यांच्या आफ्रिकन नॅशनल काँग्रेस या पक्षास राजकीय मान्यता दिली.

**वांशिक भेदभाव करणारे कायदे रद्द करण्यात आले.**

१९१९ पासून द. आफ्रिकेच्या अधिपत्याखाली असलेल्या नामिबिया या प्रदेशास १९९० मध्ये स्वातंत्र्य देण्यात आले.

आफ्रिकन नॅशनल काँग्रेस व दक्षिण आफ्रिकेचे सरकार यांच्यात काळ्या लोकांना सर्व प्रकारचे राजकीय व अन्य हक्क देणारी नवी राज्यघटना तयार करण्यासंबंधी १९९१ मध्ये वाटाघाटी सुरू झाल्या.

### ६.७.९ वांशिक भेदभावाची समाप्ती व डॉ. नेल्सन मंडेला अध्यक्ष

दक्षिण आफ्रिकन सरकारचे अध्यक्ष क्लार्क आफ्रिकन नॅशनल काँग्रेसचे नेल्सन मंडेला व नॅशनल पक्ष यांच्यात नव्या राजवटीच्या स्थापनेसाठी बरेच दिवस चर्चा चालू होत्या. शेवटी १९९३ च्या प्रारंभी वाटाघाटी यशस्वी झाल्या आणि गोर्यांकडून काळ्याकडे सत्तांतर करण्याच्या करारास सर्वांनी मान्यता दिली. या करारानुसार दक्षिण आफ्रिकेत सार्वत्रिक निवडणूका घेण्यात आल्या.

डॉ. नेल्सन मंडेला यांच्या आफ्रिकन नॅशनल काँग्रेस या पक्षाला संसदेतील दोन-तृतीयांश जागा मिळाल्या तरीही सत्तांतर करारात ठरल्याप्रमाणे १९९३ मध्ये दक्षिण आफ्रिकेचे सर्वपक्षीय संयुक्त सरकार सत्तेवर आले.

दक्षिण आफ्रिकेच्या अध्यक्षपदी डॉ. नेल्सन मंडेला व उपाध्यक्षपदी क्लार्क यांची एकमताने निवड झाली.

### आपली प्रगती तपासा

१) आफ्रिकन ऐक्य संघटनेच्या स्थापनेची पार्श्वभूमी सांगा.

## ६.८ सारांश

द्वितीय महायुद्धानंतर आफ्रिका खंडातील बरेच देश स्वतंत्र्य झाले अशा स्वतंत्र्य देशांनी सर्व आफ्रिकेतील देशांची एक संघटना स्थापन केली. संघटनेला आफ्रिकन ऐक्य संघटना म्हणून ओळखले जाते. सर्व आफ्रिकेतील देशांनी एकमेकांशी आर्थिक सहकार्य करावे व साम्रज्य वादाच्या विरोधात लढणार्या आफ्रिकन बांधवांना मदत करावी ही तत्व आफ्रिकन ऐक्य संघटनेच्या स्थापने मागील मूळ सूत्र होते.

दक्षिण आफ्रिकेतील वर्णद्वेषी राजवट नष्ट करण्यात एफ.डब्ल्यू. ही क्लार्क यांनी पुढाकार घेतला. १९९३ मध्ये द. आफ्रिकेत पहिल्यांदा सार्वत्रिक निवडणूका घेण्यात आल्या. त्यामध्ये आफ्रिकन नॅशनल काँग्रेसला दोन तृतियांश बहुमत मिळाले आणि मे १९९४ मध्ये नेल्सन मंडेला यांची अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली.

## ६.९ प्रश्न

प्र. १ वंशवर्ण नितिचे मूल्यमापन करून दक्षिण आफ्रिकेत त्याचा अंत कसा झाला ते सांगा?

प्र. २ आफ्रिकन ऐक्य संघटना यावर टीप लिहा?

## ६.१० संदर्भ


१. प्रा.राजदरेकर / प्रा. गर्गे - आधुनिक जगाचा इतिहास - विद्या प्रकाशन, नागपूर

२. ना. सी. दिक्षीत- पश्चिमात्य जग - पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर

३. गायकवाड, कदम, थोरात - आधुनिक जगाचा इतिहास - भाग १ - श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर.

४. प्रा. हरिदास जाधव व प्रा. कल्याण चव्हाण - आधुनिक जगाचा इतिहास - अक्षरलेण प्रकाशन, सोलापूर.

५. डॉ. सुमन वैद्य - आधुनिक जग - श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर .

६. डॉ. सौ . शरावती शिरगावकर - आधुनिक युरोप - श्रीविद्या प्रकाशन, पुणे.

७. श. गो. कोलारकर - युरोपचा इतिहास - आनंद प्रकाशन, नागपूर

८. प्रा. जितेंद्र भामरे- आशियाचा इतिहास - शेठ प्रकाशन, मुंबई .

९. डॉ. रमेश गुप्ते व शे. रा. कुलकर्णी - आग्नेय आशियाचा इतिहास - परिमल प्रकाशन, औरंगाबाद

१०. डॉ. अनिलकठारे - आधुनिक चीन - कल्पना प्रकाशन, नांदेड .

११. डॉ. मु. बा. देवपुजारी - रशियाचा इतिहास - श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर


munotes.in

१२. डॉ. मु. बा. देवपुजारी - आधुनिक आशियाचा इतिहास - श्री मंगेश प्रकाशन , नागपूर

१३. डॉ. नि. वक्कानी - आधुनिक भारताचा इतिहास - श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर

१४. डॉ. जालिंदर भोसले - आधुनिक आशियाचा इतिहास - मुरलीधर प्रकाशन, पुणे

१५. डॉ. सुमन वैद्य व डॉ. शांता कोठेकर - भारताचा इतिहास - श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर

१६. Adolf Hitler - Mein Kampf - KRJ Book International, Delhi

१७. D. R. Sardesai and B. K. Gokhale - World History - Kitab Mahal Publication, Alahabad.

१८. M. D. David - Rise and Growth of Modern China.

१९. तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी - मराठी विश्वकोश - भाग २ व ९

२०. डॉ. शांता कोठेकर, अमेरिकेच्या संघराज्याचा इतिहास - श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर

२१. डॉ. सुमन वैद्य - रशियाचा इतिहास - श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.

२२. विस्टन चर्चील - दुसरे महायुद्ध - महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, १९७८.

२३. डॉ. हुकुमचंद जैन, डॉ.कृष्णचंद्र माथुर - आधुनिक जगाचा इतिहास - के. सागर प्रकाशन पुणे.

❖❖❖❖

munotes.in

# ७

# अमेरिकेतील नागरी हक्क चळवळ

**घटक रचना :**

७.० उद्दिष्ट्ये

७.१ प्रस्तावना

७.२ अमेरिकेतील नागरी हक्क चळवळ

७.२.१ इंग्लड लोकशाहीची जननी

७.२.२ फ्रेंच राज्यक्रांतीः

७.२.३ १९ व्या शतकातील मानवी हक्क चळवळ

७.२.४ पहिल्या महायुद्धानंतरची मानवी हक्क चळवळ

७.२.५ युनोचे आंतरराष्ट्रीय मानवी हक्क घोषणापत्र

७.२.६ आंतरराष्ट्रीय मानवी हक्क घोषणा

७.२.७ मानवी हक्क चळवळीचा विकास

७.२.८ वांशिक भेदभाव

७.२.९ देहदंडाची शिक्षा

७.२.१० गुलामगिरी

७.३ नागरी हक्क चळवळ Civil Right Movement

७.३.१ नागरी हक्क

७.३.२ अमेरिकेतील नागरी हक्क चळवळ

७.३.३ नागरी हक्क चळवळीची उद्दिष्ट्ये

७.३.४ नागरी हक्क समिती

७.३.५ ब्रऊन खटला व निकाल (१९५४)

७.३.६ नागरी हक्क कायदे व आंदोलन

७.४ सारांश

७.५ प्रश्न

७.६ संदर्भ

munotes.in

## ७.० उद्दिष्ट्ये

१. अमेरिकेतील नागरी हक्क चळवळीतील पार्श्र्वभूमी समजून घेणे.

२. अमेरिकेतील नागरी हक्क चळवळ समजून घेणे.

## ७.१ प्रस्तावना

मानवी हक्क व प्रितष्ठा यादृष्टीने सर्व समान आहे प्रत्येक मानवाच्या ठायी नैतिकदृष्ट्या हे हक्क अविभाज्यपणे आणि स्वाभाविक असतात. म्हणूनच शासक समूहाने या हक्कांना मान्यता दिली. मानव हा सामाजिक प्रणी असल्याने सर्व नागरिकांच्या समुहासाठी समान नियम असावेत असे कित्येक शतकापासून मानवास वाटत होते. त्यासाठी काही नियमांचे संचही करण्यात आलेले होते ते नैसर्गिक कायद्याच्या संकल्पनेने ओळखले जातात.

तरीसुद्धा अज्ञान, पूर्वग्रह असत्य तत्वज्ञानाच्या आधारे असमानता, परिहार्य मानली जात होती यामुळेच जातीव्यवस्था धार्मिक अंधश्रद्धा व्यक्तीचे राष्ट्रीय आणि वांशिक मुळ आधारे भेदभाव व गुलामगिरीचे समर्थन केले जात होते. एकीकडे नैसर्गिक कायद्याचा आग्रह व दुसरीकडे असमानतेची असमान हानी अशा संघर्षातून मानवी हक्क चळवळीची पार्श्र्वभूमी तयार होऊ लागली.

दुसऱ्या महायुद्धानंतर संपूर्ण जगत विविध घडामोडी घडून आल्या. त्यापैकी सर्वात मोठी चळवळ म्हणजे जागतिकीकरणाची चळवळ होय. या जागतिकीकरणाचे अर्थ अनेक तज्ञांनी मांडले असले तरी त्यातून आर्थिक विकास, शहरीकरण, व्यापारात वाढ, समाज संस्कृतीवरील परिणाम, श्रीमंत राष्ट्रांची वाढ, बहुराष्ट्रीय कंपन्यांची मक्तेदारी, शेतीवरील, उद्योगांवर नव्याने झालेले परिणाम याचबरोबर संपूर्ण जग एकमेकाजवळ आले हा सर्वात मोठा घडलेला परिणाम माचा ठरतो. या जागतिकीकरणाचे दुष्परीणामही दारिद्र्य, नैसर्गिक संपत्तीचा ऱ्हास, लोकसंख्यावाढ, पर्यावारावर झालेले वाईट परिणाम हे प्रकर्षाने जाणवतात. पण याच जागतिकीकरणामुळे जगातील आधुनिक घडामोडींची माहिती प्रत्येक देशात पोहचून सर्व मागास, विकसनशील देशात स्त्रीमुक्तीची चळवळ वेगाने वाढली. या सर्व गोष्टींचा अभ्यास करणारे हे प्रकरण महत्वाचे ठरते.

## ७.२ अमेरिकेतील नागरी हक्क चळवळ

### ७.२.१ इंग्लड लोकशाहीची जननीः

इंग्लंडला लोकशाहीची जननी म्हटले जाते कारण तेथे लोकांना हक्क मिळवून देण्याची प्रकियेची सुरूवात झाली. १३व्या शतकापासून लोकशाही म्हणजे लोकांचे राज्य प्रस्थापित होण्यास सुरूवात झाली.

इ.स. १२१५ मध्ये राजे जॉन यांच्याकडून लोकांनी मोठी सनद प्रप्त करून घेतली. त्याचाच परिणाम पुढे इ.स. १६२८ मध्ये हक्क विषयक निवेदकामध्ये आणि १६८९ मध्ये हक्क विषयक विधायकामध्ये रूपांतर करून घेण्यात आले.

### ७.२..२ फ्रेंच राज्यक्रांती :

इ.स. १७८९ मध्ये फ्रान्समध्ये राज्यक्रांती घडून आली. या राज्यक्रांतीने जगाला स्वातंत्र्य, समता, बंधूत्व या संकल्पना दिल्याही राज्यक्रांती स्वतंत्र मानवाच्या इच्छा शक्तीतूनच आकारास आली. सामान्य नागरिकांच्या हक्कांची घोषणा ही इ.स. १७८९ मध्ये घडून आलेल्या फ्रेंच राज्यक्रांतीची जगाला मोठी देणगी होय.

### ७.२.३ १९ व्या शतकातील मानवी हक्क चळवळ :

इ.स. १७९१ मध्ये अमेरिकेत मानवी हक्काची सनद जी प्रसिद्ध झाली. त्या सनदेमुळे देखील जगामध्ये मानवी हक्काविषयी जागृती निर्माण झाली. आणि जगातील अनेक देशांच्यामध्ये मानवी हक्कांविषयी जागृती होऊन जगातील अनेक देशामध्ये त्याचा स्वीकार करण्यात आला. १९व्या २०व्या शतकाच्या पूर्वार्धात मानवी हक्कांच्या संदर्भात महत्वाची वाटचाल म्हणजे इ.स. १८१५ मध्ये व्हिएन्ना परिषदेने गुलामप्रथेचा आंतरराष्ट्रीय पातळीवर धिक्कार केला यासाठी काही आंतरराष्ट्रीय करार करण्यात आले पुढे १८५६ मध्ये पॅरिस घोषणा १८७४ मध्ये जिनिव्हा परिषद इ.स. १८९९ ची हेग परिषद या मानवी हक्काच्या संदर्भात महत्वाच्या आहेत.

### ७.२.४ पहिल्या महायुद्धानंतरची मानवी हक्क चळवळ :

पहिल्या महायुद्धाने केवळ शासन संस्था ही मानवी हक्काचे रक्षण करू शकत नाही. तर त्यास आंतरराष्ट्रीय हमीची गरज आहे. हे स्पष्ट झाल्याने पहिल्या महायुद्धानंतर अस्तित्वात आलेल्या राष्ट्रसंघाने मानवी हक्काच्या विषयी प्रत्यक्षात भरीव कामगिरी केली नसली तरी मानवी हक्काचे रक्षण व्हावे याकरिता मर्यादित प्रमाणात का होईना प्रयत्न केले.

उदा. इ.स. १९१९ मध्ये आंतरराष्ट्रीय श्रमिक संघटना स्थापन करून आंतरराष्ट्रीय पातळीवर काही मानवी हक्कांच्या संदर्भात काही नियम तयार करण्याचे प्रयत्न केले.

सप्टेंबर १९२६ मध्ये जिनिव्हा या ठिकाणी भरलेल्या आंतरराष्ट्रीय संमेलनामध्ये गुलामगिरीचे संपूर्ण उच्चाटन करण्यासाठी सनद तयार करण्यात आली. इतकेच नव्हे तर निर्वासितांच्या प्रश्नांवरती सुद्धा या संमेलनामध्ये विचारविनिमय झाला.

अशा प्रकारे वेगवेगळ्या संघटनांनी मानवी हक्कांच्या संदर्भात आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रयत्न केले त्याचाच परिणाम म्हणून पुढे दुसऱ्या महायुद्धानंतर संयुक्त राष्ट्र संघटनेने मानवी हक्क चळवळीला योग्य दिशा दिली.

### ७.२.५ युनोचे आंतरराष्ट्रीय मानवी हक्क घोषणापत्र :

दुसऱ्या महायुद्धानंतर अस्तित्वात आलेल्या युनोने मानवी हक्काच्या संरक्षणाची नितांत गरज स्पष्ट केली आणि म्हणून यूनोने आपल्या घोषणापत्रामध्ये या मानवी हक्काचे ठोस धोरण जाहीर केले.

पुढील पिढ्यांची युद्धाच्या आपत्तीपासून संरक्षण करणे आणि मानवास योग्यता व सन्मान तसेच स्त्री पुरूष यांच्या करीता समान हक्क याबद्दलच्या महत्वाच्या गोष्टी जाहीर केल्या

यासाठी युनोच्या आर्थिक व राजकीय समितीतून मानवी हक्क आयोग या समितीची स्थापना करण्यात आली.

मानवी हक्क आयोग या समितीच्या घोषणापत्रानुसार मानवी हक्क व स्वातंत्र्यविषयक आंतरराष्ट्रीय विधेयक तयार केले हे विधायक १० डिसेंबर १९४८ ला यूनोच्या सर्वसाधारण सभेमध्ये ८४ राष्ट्रांच्या प्रितनिधीकडून संमत करून घेतले त्याचाच परिणाम म्हणून आंतरराष्ट्रीय मानवी हक्क घोषणापत्र हे जगातील सर्व देशांनी स्वीकारलेले आहे.

### ७.२.६ आंतरराष्ट्रीय मानवी हक्क घोषणा :

यामध्ये एकूण ३० कलमे आहेत. त्यातील पहिल्या व २१व्या कलमामध्ये नागरी आणि राजकीय हक्कांचा समावेश करण्यात आलेला आहे. नागरी आणि राजकीय हक्कामध्ये व्यक्तीचे जीवन, स्वातंत्र्य, सुरक्षा, गुलामगिरीतून, मुक्तता, कायद्यानुसार समान मालमत्ता मिळवणे, राजकीय प्रक्रियेतील सहभाग यांना महत्व देण्यात आले आहे. त्याचबरोबर इतर कलमांमध्ये समान वेतन, त्याचबरोबर संघटना स्थापन करणे, शिक्षण घेणे, यावरती अधिक भर देण्यात आलेला आहे.

### ७.२.७ मानवी हक्क चळवळीचा विकास :

मानवी हक्क घोषणा पत्रकास सुरूवातीला कमी प्रितसाद मिळाला तरी पुढील २५ वर्षाच्या काळात जवळजवळ जगातील १७१ देशांनी त्याचा स्वीकार केला. इ.स. १९५०च्या काळातील स्वयंनिर्णयासाठी झगडणार्या अनेक वहसाहतींना प्रेरणा दिली परिणामी स्वातंत्र्यप्रप्तीनंतर संबंधीत देशातील प्रत्येक राज्यघटनेत मानवी हक्कांना प्रेत्साहन दिले.

तेहरान येथील संमेलनामध्ये मान्यता देण्यात आली. तसेच इ.स. १९९३ मध्ये व्हिएन्ना या ठिकाणी भरलेल्या मानवी हक्क विषयक जागतिक संमेलनामध्ये जे घोषणापत्र प्रिसद्ध करण्यात आले त्यामध्ये सांस्कृतिकदृष्ट्या, आर्थिकदृष्ट्या, राजकीय दृष्ट्या भिन्नता असलेल्या देशांनी - ही मानवी हक्क व मूलभूत स्वातंत्र्य याचे संरक्षण संवर्धन कर्तव्य म्हणून केले पाहिजे असे अहवाल करण्यात आले.

### ७.२.८ वांशिक भेदभाव :

वांशिक भेदभाव म्हणजे रंग, वंश, घराणी या वांशिक मुळाच्या आधारे करण्यात आलेले वर्गीकरण त्याचा त्या समाजावर होणारा विपरीत परिणाम आज आपल्याला जगामध्ये पहावयास मिळतो. इ.स.१९७८ मध्ये यूनोने वंश आणि वांशिक पूर्वग्रहाबाबत जाहीरनामा काढून या भेदभावास शास्त्रीय आधार नसल्याचे म्हटले आहे. तरीदेखील आजही अनेक देशांमध्ये वांशिक समस्या भेडसावत आहे.

उदा. दुसऱ्या महायुद्धाच्या कालखंडात ज्यूंवर झालेले अत्याचार किंवा द. आफ्रिकेतील राष्ट्राध्यक्ष क्लार्क यांनी भेदभावाच्या धोरणारा अनुकूल असे धोरण राबवून बहुसंख्य निग्रेंच्या हाती सत्ता सोपविण्यासाठी खंबीर पावले उचलली.

### ७.२.९ देहदंडाची शिक्षा :

देहदंडाची शिक्षा योग्य की अयोग्य यावर मोठ्या प्रमाणात वैचारिक मतभेद झाले आणिबाणी किंवा युद्धाच्या काळात लष्करी व सरकारी आदेशानुसार देहदंडाच्या शिक्षा सुनावल्या जातात. खून करणार्या व्यक्तीस देहदंडाची शिक्षा योग्य मानली जाते.

तरीही मानवी हक्क आयोगाने याची गंभीर दखल घेतली आहे. इतकेच नव्हे तर प्रंतीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील देहदंडाच्या शिक्षा रद्द केल्या जातील या दृष्टीने प्रयत्न चालवले आहे.

### ७.२.१० गुलामगिरी :

मानवी हक्क आयोगाने एक अभ्यास गट स्थापन करून या समस्यांविषयी अभ्यास करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे गुलामगिरीच्या उच्चाटन संदर्भात जवळ जवळ १० देशांनी सह्या केल्या आहेत.

त्यामध्ये ऋण, बांधिलकी, लहान बालकांचे शोषण, विवाहाचे लाचार प्रकार अशी गुलामगिरीचे अंग अभ्यासगटाने केलेले आहे. वैयक्तीक कारणाकरीता घेतलेल्या कर्जातून परतफेड न करता आल्याने ऋण-बांधिलकी प्रथा पुढे आली. आणि ती प्रथा पुढील वारसा नाईलाजाने चालविलेला दिसतो.

बालकांचे शोषण देखील आंतरराष्ट्रीय समस्या आहे. या विषयी कायदा करण्यासाठी जवळजवळ १८० देशांनी सह्या केल्या आहेत. आणि म्हणूनच प्रत्येक देशांनी आपल्या देशात लहान बालकांचे शोषण होणार नाही. याची काळजी घेतली आहे.

वेश्याव्यवसायवर देखील १९५० मध्ये बंदी करार लागू करण्यात आला. यावरदेखील जगातील ७० देशांनी सह्या केलेल्या आहेत.

## ७.३ नागरी हक्क चळवळ (CIVIL RIGHT MOVEMENT)

१९व्या शतकाच्या उत्तरार्धापासून ते २०व्या शतकाच्या मध्यापर्यंत जगातील विविध ठिकाणी स्वतंत्र्यपणे आंदोलन उभी राहून अनेक लोकसत्ताक राज्ये उदयाला आली. अनेक नवीन देशांनी राज्यघटनेद्वारे आपल्या प्रजेला नागरी हक्क बहाल केले.

परंतु वंशवाद, वर्णद्वेष यासारख्या प्रवृत्तींनी नागरी हक्क उपभोगण्याच्या मार्गामध्ये आडथळे आणले हे अडथळे दूर करण्यासाठी विविध ठिकाणी नागरी हक्क चळवळीने जन्म घेतला. असे असले तरी दुसऱ्या महायुद्धानंतर काही प्रमुख देशात नागरी हक्क चळवळ झाली.

### ७.३.१ नागरी हक्क

नागरी हक्कांशिवाय प्रत्येक नागरिकास आपले जीवन योग्यप्रकारे जगता येत नाही. नागरी हक्क हे अशा स्वरूपाचे असतात की प्रत्येक नागरिक आपल्या दैनंदिन जीवनात त्यांचा अंमल करतो किंवा किमान त्यांचा अंमल करण्याचा प्रयत्न करतो. सुव्यवस्थित प्रशासन

असलेल्या राष्ट्राने नागरिकांच्या या हक्कांची हमी दिली पाहिजे. व प्रसंगी त्यांचे संरक्षण ही केले पाहिजे. त्यासाठी राज्यांचे त्याचे नियमन व नियंत्रण केले जावे अशी अपेक्षा असते.

### ७.३.२ अमेरिकेतील नागरी हक्क चळवळ

निग्रेंच्या समस्याने अमेरिकेच्या इतिहासामध्ये अनेकवेळा राष्ट्रीय वादळे निर्माण झाली. निग्रेंच्या प्रश्नावरून अमेरिकेत यादवी युद्धसुद्धा झाले त्याचा परिणाम म्हणून निग्रेंना गुलामगिरीतून मुक्त करण्यात आले कायद्याने निग्रेंना नागरी हक्क बहाल केलेले असताना देखील श्वेत वर्णियांनी त्यांचे ते हक्क नाकारून त्यांना राष्ट्रीय प्रवाहात सामील करून घेतले नाहीत. म्हणूनच अमेरिकेतील नागरी हक्क चळवळीचा प्ररंभ झाला.

### ७.३.३ नागरी हक्क चळवळीची उद्दिष्ट्ये :

१. माणूस म्हणून जगण्याचे स्वातंत्र्य मिळवणे.

२. काळा - गोर्या भेदभावास मुठमाती देणे.

३. आर्थिक स्थिती सुधारणे.

४. नागरिकत्वाचे राजकीय हक्क मिळवणे.

५. शैक्षणिक प्रगती साध्य करून श्वेतवर्णिय लोकांबरोबर उन्नती करणे.

६. सर्व प्रकारच्या स्वातंत्र्याचा उपभोग घेणे.

७. सामाजिक दर्जा उंचावणे.

७. राष्ट्रीय प्रवाहामध्ये सामील होणे.

### ७.३.४ नागरी हक्क समिती :

दुसऱ्या महायुद्धानंतर ट्रूमनने निग्रेंच्या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी एक नागरी हक्क समिती नेमली होती. तिने आपल्या अवहवालात म्हटले की "निग्रेंना अलग करण्याच्या भूमिकेचे समर्थन करता येत नाही."

### ७.३.५ ब्राऊन खटला व निकाल (१९५४)

कॅन्सास राज्यातील टोपेका येथील शिक्षण मंडळाविरूद्ध ब्रऊन खटला विशेष गाजला. सुप्रीम कोर्टाने १९५४ ला खटल्यात निकाल जाहीर केला. १८९६ चा निकाल रद्द केला. या निकालाने निग्रेंना गोर्यांच्या संस्थेत प्रवेश द्यावा असा सुप्रीम कोर्टाने निग्रेंना न्याय दिला. पण दक्षिण अमेरिकेतील गोर्यांना तो रूचला नाही. त्यांनी या निकालाचा निषेध केला.

### ७.३.६ नागरी हक्क कायदे व आंदोलन :

**१) १९५७ चा नागरी हक्क कायदा :**

आयसेन हॉवरच्या प्रयत्नाने १९५७ मध्ये नागरिक हक्क कायदा पास करण्यात आला. या कायद्यान्वये एक नागरी हक्क मंडळ स्थापन करण्यात आले त्यावर सहाय्यक कायदा सचिव नेमण्यात आला. कायदा सचिवाच्या कार्यालयात नागरी हक्क विभाग हा एक नवीन विभाग उघडण्यात आला.

'निग्रे मतदान करण्यास जातील त्यांना केंद्र सरकारने संरक्षण द्यावे.' असे कायद्याने ठरवण्यात आले. याप्रमाणे या कायद्याने नागरी हक्काचा विजय झाला. पण आयसेन हॉवरने या कायद्याची अंमल बजावणी करण्यास उत्साह दाखवला नाही.

**२. लिटल रॉक प्रकरण (१९५७) :**

लिटल रॉक या शहरातील शाळांना फेडरल कोर्टाने इ.स. १९५७ मध्ये निग्रेंना शाळेत प्रवेश देण्याचा आदेश दिला. पण तेथील गव्हर्नर हा निग्रे द्वेष्टा असल्याने त्याने 'नॅशनल गार्ड' पाठवून ९ निग्रेंना प्रवेश देण्यास नकार दिला. त्यामुळे अखेर आयसेन हॉवरने फेडरल फौज पाठवून त्यांना शाळेत पाठविले.

**३. डॉ. मार्टिन ल्युथर किंग व नागरी हक्क आंदोलन :**

निग्रेंना समानतेची वागणूक मिळावी यासाठी निग्रेंनी इ.स. १९०९ मध्ये निग्रेंचे संघटन करण्यासाठी "नॅशनल असोसिएशन फॉर द ॲडव्हासमेंट ऑफ कलर्ड पीपल (NAACP) ही संस्था स्थापन झाली होती. या संस्थेने शिक्षणाचा प्रसार केला. १ डिसेंबर १९५५ मध्ये रोझा पार्कस् प्रकरण घडले. त्याविरोधात माँटगोमेरी शहरातील सर्व निग्रेंनी बस कंपनीवर बहिष्कार टाकला. या बहिष्कार आंदोलनाचे नेतृत्व डॉ. मार्टिन ल्युथर किंग याने केले या आंदोलनात निग्रे विजयी झाले व मार्टिन ल्यूथर किंग हा निग्रेंचा पुढारी बनला."

**४. रोझा पार्क प्रकरण :**

१ डिसेंबर १९५५ रोजी एक महत्वाची घटना घडली. माँटगोमेरी शहरात रोझा पार्कस् या नावाची एक निग्रे स्त्री बसमधून प्रवास करीत होती. ती थकून गेली होती. म्हणून ती गोर्यांसाठी असलेल्या जागेवर बसली. तिने उभ्या असलेल्या गोर्याला आपली जागा दिली नाही. हा आरोप करून तिला अटक करण्यात आली. बस कंपनीने निग्रेंबाबत भेदभाव दाखविला म्हणून या घटनेवर एक आंदोलन उभारण्यात आले. माँटगोमेरी शहरातील सर्व निग्रेंनी बस कंपनीवर बहिष्कार पुकारला. या बहिष्कार आंदोलनाचे नेतृत्व डॉ. मार्टिन ल्यूथर किंग याने केले. हे बहिष्कार आंदोलन ३८२ दिवस चाचले अखेर निग्रे या आंदोलनात विजयी झाले.

**५) १९६० चा नागरी हक्क कायदा (Civil Rights Act - 1960) :**

"जे लोक निग्रेंना दमदाटी करतील व केंद्रीय शासनाने आदेश झिडकारून मतदानास प्रितबंध करतील त्यांना दंड करण्यात येईल. तसेच कारावासाची शिक्षा देखील करण्यात येईल."

अशा आशयाचा तो कायदा होता. पण या कायद्याचा प्रत्यक्षात फारसा परिणाम झाला नाही. निग्रेंना देखील हा कायदा समाधानकारक वाटला नाही.

**६) निग्रेंचे नागरी हक्क आंदोलन व केनेडी :**

केनेडी यांनी अध्यक्षीय निवडणुकीच्या वेळी निग्रेंच्या समस्यांबाबत सहानुभूती दाखविली होती. म्हणून निग्रेंनी केनेडीला मतदान केले होते. दूरदशर्नवरून संदेश देताना केनेडीने म्हटले होते की, "जो पर्यंत सर्व नागरिक मुक्त होणार नाहीत तोपर्यंत संपूर्ण राष्ट्र मुक्त होणार नाही.”

केनेडी सत्तेवर आला. त्यावेळी निग्रे मतदार म्हणून नाव नोंदविण्यासाठी प्रयत्न करीत होते. त्यांना नोकरीवरून काढून टाकले जात होते हे पाहून केनेडीने नागरी हक्क कायद्याने दिलेले अधिकार प्रत्यक्षात आणण्याचे ठरविले. त्याने निग्रेंना मोठ-मोठ्या जागांवर नेमले.

**७) चोविसावे संशोधन :**

अध्यक्ष केनेडी याच्या प्रयत्नामुळे काँग्रेसने घटनेचे चोविसावे संशोधन मान्य केले सर्व राज्यांनी त्याला मान्यता दिली व त्याची संमलबजावणी जानेवारी १९६४ पासून सुरू झाली. केंद्रीय निवडणुकीच्या वेळी ज्या निग्रेंनी पोलटॅक्स वा तत्सम अन्य कर भरले नसतील तर या कारणावरून त्यांचा मतदान करण्याचा हक्क हिरावून घेण्यात येऊ नये. अशा आशयाची तरतूद या संशोधनात होती.

**८) निग्रेंचा प्रचंड मोर्चा व मार्टिनचे स्वप्न :**

नागरी हक्क विधेयकाबाबत लोकमत जागृत करावे व वर्णद्वेषातून निर्माण होणार्या दंगलीचा निषेध करावा. यादृष्टीने निग्रेंचा प्रचंड मोर्चा वॉशिंग्टन येथे काढण्यात आला. निग्रेंच्या हातात फलक होते. त्यावर "स्वातंत्र्य आता पाहिजे." अशी मागणी लिहिलेली होती. त्याचे नेतृत्व मार्टिन ल्यूथर किंग हा करीत होता.

मोर्चा एका प्रचंड सभेत परिवर्तन झाला. ही सभा लिंकन स्मारकाजवळ घेण्यात आली. मार्टिन ल्यूथर किंगने भाषणात स्वप्न श्रोत्यांसमोर मांडले. "माझ्या मनात एक स्वप्न आहे एक दिवस असा येईल की जॉर्जिया राज्याच्या तांबड्या माळावर पूर्वीच्या गुलामांची मुले व गुलाम - मालकांची मुले परस्परांच्या बंधुत्वरूपी टेबलाजवळ बसू लागतील."

एक दिवस असा उगवेल की माझ्या चार बालकांची परीक्षा घेण्यात येईल. पण ती त्यांच्या शरीराच्या त्वचेच्या वर्णावरून नव्हे तर त्यांच्या चारित्र्यातील गुणावरून



munotes.in

## ९) दि व्होटिंग अॅक्ट

**जॉन्सनचा (The Voting Act) 1965**

जॉन्सनच्या काळात The Voting Act कायदा पास करण्यात आला. या कायद्याने मतदार संघात मतदार म्हणून निग्रेंचे रजिस्ट्रेशन करण्यात यावे जॉन्सनच्या कारकिर्दीत विविध प्रकारच्या नोकरीत निग्रेंना स्थान देण्यात आले The Voting Act च्या अंमल बजावणीने १९६५च्या शेवटपर्यंत निग्रेंचे मतदार म्हणून होणारे रजिस्ट्रेशन ४६ टक्के पावेतो पोचले.

## १०) वांशिक दंगली व मार्टिन ल्यूथर किंगचा खून :

इ.स.१९६५ पासून अमेरिकन शहरात वांशिक दंगली सुरू झाल्या. लॉस एंजेलिस, शिकागो, क्लिव्हलँड इ. शहरातील दंगलीमुळे समाज जीवन अस्वस्थ झाले न्यूयॉर्क व डेट्राईट या शकरात निग्रे व गोरे यांच्यात भीषण दंगली झाल्या. या दंगलीची चौकशी करण्यासाठी जॉन्सनने एक समिती नेमली.

जॉन्सनने उपाय योजना म्हणून निग्रेंच्या शिक्षण व आरोग्य विकासाकरिता पाण्यासारखा पैसा खर्च केला. पण दंगली शमवण्याच्या प्रयत्नात तो अपयशी ठरला. अनेक शहरात दंगली अधूनमधून चालूच राहिल्या. इ.स.१९६८ च्या एप्रिल महिन्यात मेन्फिस (टेनेसी) च्या शहरात डॉ. मार्टिन ल्युथर किंग या निग्रे पुढार्याचा खून करण्यात आला. त्याची प्रतिया अनेक शहरात उमटली. व निग्रेंनी वॉशिंग्टनमध्ये दंगली केल्या आणि दोन महिन्यानंतर रॉबर्ट केनेडी याचाही खून झाला.

## ११) काळे आंदोलन The Black Movement

डॉ. मार्टिन ल्यूथर किंगने काळी संस्कृती ही सुंदर आहे. (Black is Beautiful) ही कल्पना मांडली. गोर्यांशी एक संघ होण्याच्या मागे पडून काळी सत्ता ही मागणी होऊ लागली. आपले स्वतःचे राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक जीवन घडविण्यासाठी निग्रेंना स्वतःची काळी सत्ता हवी आहे. निग्रेंचे हे एक नवीनच आंदोलन सुरू झाले होते. यालाच काळे आंदोलन (The Back Movement) असे म्हणतात.

## १२) ब्लॅक पँथर पार्टी :

जहाल तरुणांनी "ब्लॅक पँथर पार्टी" हा जहाल पक्ष स्थापन केला. ब्लँक पँथर पार्टीचा प्रमुख एल्ड्रिन कलीव्हर हा होता. ब्लँक पँथरच्या सदस्यांनी कॅलिफोर्नियाच्या राजधानीत बंदूका घेऊन पद संचलन केले काही गोरे जहाल तरुण या पँथर पार्टीला मदत करीत होते. ह्यू न्यूटन हा ब्लॅक पँथर पार्टीचा पुढारी दोन वर्षानंतर कारागृहातून बाहेर पडला. त्यावेळी त्याच्या स्वागतासाठी निग्रेपेक्षा गोरे लोक जास्त प्रमाणात उपस्थित होते.

इ.स. १९६८ मध्ये पीस अँड फ्रीडम पार्टी या पक्षातर्फे काही जहाल निग्रे निवडणुकीत उभे राहिले परंतु त्यांना जास्त मते मिळविता आली नाहीत.

munotes.in

## ७.४ सारांश

दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक शांतता निर्माण करण्यात संयुक्त राष्ट्र संघटनेला यश आले. सर्वच क्षेत्रात यश आले असे नाही; परंतु युनोने जागतिक राजकारणात अत्यंत मोलाची कामगिरी बजावली आहे. यात शंका नाही. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आर्थिक व राजकीय समितीतून मानवी हक्क आयोगाची निर्मिती करण्यात आली. मानवी हक्क आयोगाने व्यक्तीचे जीवन, स्वातंत्र्य, सुरक्षा, गुलामगिरीतून मुक्तता इ. गोष्टींना महत्त्व देण्यात आले.

अमेरिकेच्या स्वातंत्र्य लढ्यात निग्रोंचा सहभाग महत्त्वाचा ठरतो. तेव्हापासून दोन शतकभर त्यांनी सत्ता आणि स्वातंत्र्यासाठी लढा दिला. त्यांचा हा लढा सामाजिक लढा होता. त्यांच्या या लढ्याच्या यशस्वितेची सांगता मार्टिन ल्यूथर किंगच्या रूपाने झाली. परंतु त्याच वंशवादातील हिंसाचाराने डॉ. मार्टिन ल्यूथरचा बळी घेतला.

## ७.६ प्रश्न

१. मानवी हक्क चळवळीचा आढावा घ्या?

२. अमेरिकेतील नागरी हक्क चळवळीच्या विकासाचा मागोवा घ्या?

## ७.५ संदर्भ


१. प्रा.राजदरेकर / प्रा. गर्गे - आधुनिक जगाचा इतिहास - विद्या प्रकाशन, नागपूर

२. ना. सी. दिक्षीत- पश्चिमात्य जग - पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर

३. गायकवाड, कदम, थोरात - आधुनिक जगाचा इतिहास - भाग १ - श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर.

४. प्रा. हरिदास जाधव व प्रा. कल्याण चव्हाण - आधुनिक जगाचा इतिहास - अक्षरलेण प्रकाशन, सोलापूर.

५. डॉ. सुमन वैद्य - आधुनिक जग - श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर .

६. डॉ. सौ . शरावती शिरगावकर - आधुनिक युरोप - श्रीविद्या प्रकाशन, पुणे.

७. श. गो. कोलारकर - युरोपचा इतिहास - आनंद प्रकाशन, नागपूर

८. प्रा. जितेंद्र भामरे- आशियाचा इतिहास - शेठ प्रकाशन, मुंबई .

९. डॉ. रमेश गुप्ते व शे. रा. कुलकर्णी - आग्रेय आशियाचा इतिहास - परिमल प्रकाशन, औरंगाबाद

१०.डॉ. अनिलकठारे - आधुनिक चीन - कल्पना प्रकाशन, नांदेड .

११.डॉ. मु. बा. देवपुजारी - रशियाचा इतिहास - श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर

१२.डॉ. मु. बा. देवपुजारी - आधुनिक आशियाचा इतिहास - श्री मंगेश प्रकाशन , नागपूर

१३.डॉ. नि. वक्कानी - आधुनिक भारताचा इतिहास - श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर

१४.डॉ. जालिंदर भोसले - आधुनिक आशियाचा इतिहास - मुरलीधर प्रकाशन, पुणे

१५.डॉ. सुमन वैद्य व डॉ. शांता कोठेकर - भारताचा इतिहास - श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर

१६.Adolf Hitler - Mein Kampf - KRJ Book International, Delhi

१७.D. R. Sardesai and B. K. Gokhale - World History - Kitab Mahal Publication, Alahabad.

१८.M. D. David - Rise and Growth of Modern China.

१९.तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी - मराठी विश्वकोश - भाग २ व ९

२०.डॉ. शांता कोठेकर, अमेरिकेच्या संघराज्याचा इतिहास - श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर

२१.डॉ. सुमन वैद्य - रशियाचा इतिहास - श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.

२२.विस्टन चर्चील - दुसरे महायुद्ध - महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, १९७८.

२३.डॉ. हुकुमचंद जैन, डॉ.कृष्णचंद्र माथुर - आधुनिक जगाचा इतिहास - के. सागर प्रकाशन पुणे.

❖❖❖❖

munotes.in

# ८

# अलिप्ततावादी चळवळ

**घटक रचना :**

**८.०** उद्दिष्ट्ये

८.१ प्रस्तावना

८.२ अलिप्तवादाचे अर्थ

८.२.१ अलिप्तवादाचे स्वरुप

८.३ अलिप्तवादाच्या विकासाची कारणे

८.३.१ प्रखर राष्ट्रवादाचा उदय

८.३.२ वसाहत वादाला कट्टर विरोध

८.३.३ विकासाची गरज

८.३.४ आशिया व आफ्रिका खंडातील प्रभाव

८.३.५ युनोमध्ये आलिप्तवादी राष्ट्रांचा सहभाल

८.३.६ बांडूग परिषद

८.४ आलिप्तवादी विकास

८.५ आलिप्तवादी राष्ट्रांच्या शिखर परिषदा

८.५.१ बेलग्रेड परिषद (१९६१)

८.५.२ कैरो (१९३४)

८.५.३ ल्युसाका परिषद (१९७०)

८.५.४ आल्जियर्स (१९७३)

८.५.५ कोलोंबो परिषद (१९७६)

८.५.६ हवाना परिषद (१९८९)

८.५.७ दिल्ली परिषद (१९८३)

८.५.८ हरारे (१९८६)

munotes.in

८.५.९ बेलग्रेड परिषद (१९८९)

८.५.१० जकार्ता (१९९२)

८.५.११ कार्टाजेना परिषद

८.५.१२ दर्बन परिषद (१९९८)

८.५.१३ १३ वी शिखर परिषद

८.६ आलिप्तवादी चळवळीचे कार्य

८.६.१ ठाम भुमिका

८.६.२ निःपक्षपातीपणा

८.६.३ मुक्तवातावरण निर्णय

८.६.४ आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रतिष्ठा

८.६.५ आर्थिक प्रगती

८.६.६ बड्या राष्ट्राच्या स्वार्थाला आळा

८.६.७ तिसरे महायुध्द टाळण्यास कारणीभूत

८.६.८ एक उपयोगी राजनैतिक क्षेत्र

८.६.९ साम्रज्यवादाला विरोध

८.६.१० शीत युध्दात शिथिलता

८.७ आलिप्तवादी चळवळीचे अपयश

८.७.१ कठोर स्थितीचा अभाव

८.७.२ महासत्तेची चळवळ

८.७.३ व्हितमनाम युध्दात अमेरीकन हस्तक्षेप

८.७.४ अमेरिकेसारख्या महाशक्तीचा उद्रेक

८.७.५ आलिप्तवादी राष्ट्रांची चळवळ अमेकीकेला अमान्य

८.७.६ पंचशील तत्वांचा विसर

८.७.७ आलिप्तवादी चळवळीच्या कामगिरीचे मूल्यमापन

८.८ बांडूंग परिषद

८.८.१ बांडूंग परिषदेची पार्श्वभूमी

८.८.२ बांडूंग परिषद

८.८.३ बांडूंग परिषदेतील सभासद राष्ट्रे

८.८.४ परिषदेचे निवेदन पत्र

८.८.५ मानवी हक्क व स्वयं निर्णयाचे तत्व

८.८.६ परिषदेनंतरच्या घडामोडी

८.९ आशिआई ऐक्याची कारणे

८.९.१ सुयोग्य विचार प्रणालीची निवड

८.९.२ आशिया ऐक्य भावनेचा विकास

८.१० सारांश

८.११ प्रश्न

८.१२ संदर्भ

## ८.० उद्दिष्ट्ये

- अलिप्ततावादी चळवळीचा अर्थ आणि स्वरूप समजून घेणे.
- अलिप्ततावादी चळवळीचे कार्य समजून घेणे.
- अलिप्ततावादी चळवळीचे यशापयश समजून घेणे.

## ८.१ प्रस्तावना

अलिप्तवाद अथवा असंलग्नता या धोरणाला सर्वप्रथम व्यवहारिक स्वरूप देण्याचे श्रेय भारताचे आहे भारताचे आहे. भारताने आपल्या परराष्ट्रीय धोरणात अलिप्ततावादास आपले आधार स्तंभ बनविले.

दुसऱ्या महायुद्धानंतर अलिप्तवादाचा उदय झाला. दुसऱ्या महायुद्धानंतर साम्यवादी आणि लोकशाहीवादी असे दोन महाशक्तीमान गट निर्माण झाले. त्या गटात जी राष्ट्रे सामील झाली नाही. आणि ज्यांनी आपले परराष्ट्रीय धोरण स्वतंत्र ठेवले. अशा गटाला अलिप्तवादी राष्ट्रे म्हणू लागले. अलिप्तवादी धोरण प्रथम भारत, इंडोनेशिया, श्रीलंका या राष्ट्रांनी आमलात आणले. आफ्रिका व आशियाया खंडातील, युगोस्लाव्हिया व इजिप्त या देशांनी सुद्धा अलिप्तवादी धोरणाचा पुरस्कार केला.

पंडीत नेहरू अलिप्तवादी धोरणाचे उद्गाते म्हणून संबोधले जातात. अलिप्तवादी धोरण बाळगणार्या राष्ट्रांची सध्या हळुहळु वाढत गेली. १९६१ मध्ये बेलग्रेड येथे असलेल्या पहिल्या शिखर संमेलनामध्ये २५ देश हजर होते. १९८३ ते ८७ या काळात त्यात आणखी काही राष्ट्रे सामील होऊन ही संख्या १०१ झाली.

## ८.२ अलिप्तवादाचा अर्थ

अलिप्तवाद या संज्ञेचा अर्थ प्रत्येक राजनीती तंज्ञानी वेगवेगळा लावला आहे. भारताने अलिप्तवादाचे धोरण जाहीर केल्यानंतर त्याचा अर्थ पाश्चिमात्य राजकारण, धुरंधराणी, तटस्थता, क्रियाशील, तटस्थता हस्तक्षेप विरहीत धोरण अथवा अलिप्त वाद असे संबोधण्यात प्ररंभ केला.

अलिप्तवादाचा अर्थ स्पष्ट करताना पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी अलिप्तवादाची संकल्पना स्पष्ट केली आहे. दोन प्रभावी गटांमध्ये सामील न होता. त्यांच्या संघर्षातून स्वतःच्या राष्ट्राला अलग ठेवणे आणि त्याचबरोबर जागतिक शांततेसाठी प्रयत्न करणे.

अलिप्तवादाचा शब्द प्रयोग प्रथमतः भारताचे परराष्ट्रीयमंत्री व्ही. के. कृष्णमेनन यांनी केले. अलिप्तवादी संकल्पनेचा अर्थ पाश्चिमात्य राजकरण्यांनी या धोरणाला तटस्थता किंवा हस्तक्षेप विरहीत धोरण अथवा अलिप्तवाद असे संबोधले.

### ८.२.१ अलिप्तवादाचे स्वरूप

अलिप्तता म्हणजे तटस्थता नव्हे तटस्थता यांचा अर्थ संहारक युद्धामुळे निर्माण होणार्या आर्थिक, नैतिक परिणामापासून देशाला सुरक्षित ठेवणे होय. तसेच युद्धपीपासू राष्ट्रापासून दूर राहणे. युद्धखोर राष्ट्राशी कसलाही संबंध न ठेवणे. यालाच पंडीत जवाहरलाल नेहरूंनी अलिप्तवाद असे म्हटले.

अलिप्तवाद पूर्णतः वेगळ्या स्वरूपात असतो. अलिप्ततेच्या धोरणात आंतरराष्ट्रीय संबंधात योग्य वाटणारी कृती स्वतंत्र असते व स्वतंत्र राष्ट्रांना जागतीक संस्था स्पर्धेच्या राजकारणापासून अलग राहून आपल्या विकासासाठी प्रयत्नशील असणे. ज्या संघर्षाशी आपला प्रत्यक्ष संबंध पोहचत नाही. अशा समस्या पासून दूर राहणे म्हणजेच अलिप्तवादी धोरण म्हणता येईल. भारताचे धोरण अलिप्तवादाचे असल्याचे नेहरूनी स्पष्ट केल्यानंतर त्याला जगातून विरोध करण्यात आला.

## ८.३ अलिप्तवादाच्या विकासाची कारणे पुढील प्रमाणे

### ८.८.१ प्रखर राष्ट्रवादाचा उदय

दुसऱ्या महायुद्धानंतर आशिया व आफ्रिका खंडात प्रखर राष्ट्रवादाचा उदय होऊन त्यांनी परकीय सत्तेशी संघर्ष करून स्वातंत्र्य मिळवले. स्वतंत्र राष्ट्रांमध्ये स्वातंत्र्याबद्दल जागरूकता होती. मोठी राष्ट्रे पुन्हा राजकारण खेळून आपल्या स्वातंत्र्याचा अपहार करतील अशी भीती त्यांना वाटत होती. म्हणून नवनिर्वाचीत स्वतंत्र राष्ट्रे कोणत्याही सत्ता गटामध्ये सहभागी न होता. आपले स्वातंत्र्य कायम ठेवण्यासाठी प्रयत्नशील होते.

### ८.८.२ वसाहत वादाला कट्टर विरोध

आशिया व आफ्रिका खंडात पाश्चात्य राष्ट्राच्या वसाहती होत्या दुसऱ्या महायुद्धानंतर आशिया व आफ्रिका खंडातील राष्ट्रामध्ये स्वातंत्र्याचे वारे वाहू लागले. त्यामुळे दुसऱ्या महायुद्धानंतर आशिया व आफ्रिका खंडातील राष्ट्रे स्वतंत्र झाली. या राष्ट्रांना अनेक शतकापर्यंत परकीय राष्ट्रांनी आर्थिक, सामाजिक पिळवणूक केली होती. त्या कारणाने दुसऱ्या महायुद्धानंतर आशिया व आफ्रिका खंडात प्रखर राष्ट्रवादाचा उदय झाला. आशिया खंडातील राष्ट्रवादयांनी वसाहतवादाचे कडू फळे चाकली होती. त्यामुळे ही राष्ट्रे स्वातंत्र्य रक्षण हे आपले कर्तव्य मानत होते.

### ८.८.३ विकासाची गरज

आशिया व आफ्रिका खंडातील राष्ट्रे पारतंत्र्यात असल्याने त्यांचा आर्थिक विकास होऊ शकला नाही. परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर स्वतंत्र झालेल्या राष्ट्राला आर्थिक विकासाला चालना मिळाली. या नवनिर्वाचीत राष्ट्रांनी आर्थिक विकास हे उद्दिष्ट ठेवले. हा विकास साध्य करण्यासाठी कोणत्याही गटात जाणे किंवा युद्धात स्वतःला गुंतवून ठेवणे या राष्ट्रांना परवडणारे नव्हते.

### ८.८.४ आशिया व आफ्रिका खंडातील नेत्यांचा प्रभाव

आशिया व आफ्रिका खंडातील बहुतांशी राष्ट्रे स्वतंत्र झाल्यानंतर नवीन राष्ट्राच्या उदय पावलेल्या नेत्यांच्या व्यक्तीमत्वाचा आंतरराष्ट्रीय राजकरणावर फार मोठा प्रभाव पडला. उदा. पंडीत जवाहरलाल नेहरू, कर्नल नासेर, मर्शल टिटो इ. होय. या नेत्यांनी आंतरराष्ट्रीय राजकारणात आपल्या प्रभावी व्यक्तीमत्वाने जागतिक राजकरणावर छाप पाडली.

### ८.८.५ यूनोमध्ये अलिप्तवादी राष्ट्रांचा सहभाग

आशिया, आफ्रिका खंडातील स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांना आपल्या अडचणी, आपले प्रश्न मोकळेपणाने व्यक्त करण्यासाठी युनोशिवाय दुसरे व्यासपीठ नव्हते. यूनोमुळे मोठ्या राष्ट्रांशी बरोबरीच्या नात्याने चर्चा करता येऊ लागला. यूनोच्या सभासद राष्ट्रांनी मानवतावादी कार्य करण्यास सुरूवात केली. त्यामध्ये अलिप्तवादी राष्ट्राचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता.

### ८.८.६ बांडूग परिषद

१८ एप्रिल १९५५ रोजी आशिया व आफ्रिका खंडातील स्वतंत्र झालेल्या राष्ट्राची परिषद बांडुंग येथे भरली. या परिषदेला आशियातील २३ व आफ्रिकेतील ६ देशांचे प्रितनिधी हजर होते. तेथे पंचशील तत्वे मांडण्यात आली. परंतु पंचशीलाचे रूपांतर दशशीला मध्ये झाले. कारण पंचशीलास पाकीस्तानने विरोध केला.

## ८.४ अलिप्तवादी विकास

अलिप्तवादी राष्ट्राचे पहिले संमेलन १९६१ मध्ये बेलग्रेड येथे भरले होते. या संमेलानापूर्वी ५ वर्षे म्हणजे १९५६ मध्ये पंडीत जवाहरलाल नेहरू कनेर्ल नासेर, माशर्ल टिटो यांनी अलिप्तवादी संघटेनेची पाया भरणी केली. तिसर्या शक्तीच्या ह्या विश्वाचे या तिघांनी चर्चेद्वारे स्वरूप निश्चीत केले. १९५६ मध्ये एका मसुद्यांवर सह्या झाल्या आणि त्यात या चळवळीचे सिद्धांत मानण्यात आले.

स्वतंत्र झालेली राष्ट्रे महासत्तांक राष्ट्राचा दबाव झेलून एखादा जवळचा मार्ग शोधण्याचा प्रयत्नात होते. इ.स. १९५६-६१ या काळातील अलिप्ततावादी चळवळीचे दोन टप्पे होते. तिसर्या शक्तीच्या गटातील राष्ट्रे स्वतःचा रस्ता निवडण्यास प्रथम पासूनच तयार होते. आशिया, आफ्रिका खंडातील सर्व देशांना एका मंचावर आणण्यासाठी भारत प्रथम पासून तयार होता.

७ सप्टेंबर १९४५ रोजी पंडित नेहरूंनी रेडीओ वरून स्पष्ट केले की गटबाजी पासून आपण अलिप्त राहिले पाहिजे. १३ डिसेंबर १९४५ रोजी नेहरू म्हणाले होते "आम्ही सर्व राष्ट्रांकडून मैत्रीची अपेक्षा करतो. अलिप्त यांचा अर्थ असा नव्हे की आंतरराष्ट्रीय प्रश्नांची उपेक्षा करणे" नवी दिल्ली येथे १९४७ मध्ये आशियाई राष्ट्रांचे संमेलन आयोजित करण्यात आले होते. त्यात अनेक देशांचे प्रितनिधी उपस्थित होते. या संमेलनामध्ये असे जाहीर करण्यात आले की आम्ही आशियाई देश पश्चिमी देशांना सांगू इच्छीत आहे की जे आमच्याशी सहकार्य करतील आम्ही त्याच्याशी मैत्री करू. आम्ही दुसऱ्याच्या हाताचे बाहुले बनणार नाही.

१९५५ मध्ये बांडुंग शहरात आयोजित केलेली परिषद हे एक अलिप्तवादी दृष्टीने टाकलेले पहिले पाऊल होय. महाशक्ती राष्ट्रे आपला निर्णय दुसऱ्यावर किंवा दुसऱ्या देशांवर लादू शकणार नव्हता. अलिप्ततावादात पुढील पाच तत्वे म्हणजे सिद्धांत सांगण्यात आले.

१) क्षेत्रीय अखंडात्वाचा मान ठेवावा.

२) एकमेकांनी एकमेकांवर हल्ला करू नये.

३) अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करू नये.

४) समानता

५) शांततामय सहजीवन

अलिप्ततावादी चळवळीच्या पंडीत नेहरू, कर्नल नासेर आणि मार्शल टिटो यांनी अलिप्ततावादी संघटनेचे सदस्य होण्यासाठी पाच अटी जाहीर केल्या होत्या.

१) स्वतंत्र निती

२) इतर सैनिकी संघटनेचे सदस्य न होणे

३) गट बदल न करणे

४) बड्या राष्ट्रांशी समझोता न करणे.

५) समान विचार कार्यक्रमावर विश्वास ठेवणे.

## ८.५ अलिप्ततावादी राष्ट्रांच्या शिखर परिषदा

### ८.५.१ बेलग्रेड परिषद (१९६१)

अलिप्तवादी चळवळीचे कट्टर पूरस्कर्ते पंडीत नेहरू, कर्नर नासेर व मार्शल टिटो यांच्या प्रयत्नामुळे पहिली शिखर परिषद बेलग्रेड येथे इ.स. १९६१ मध्ये भरली.

यूगोस्लाव्हियाची राजधानी बेलग्रेड येथे एकूण २५ अलिप्त राष्ट्रे उपस्थित झाली होती. त्यात प्रमुख्याने भारत, इजिप्त, युगोस्लाव्हिया, अफगाणीस्थान, ब्रह्मदेश, कंबोडिया, इराक, घाना, इंडोनेशिया, नेपाळ, सौदी अरेबिया इ. राष्ट्रांना या शिखर परिषदेत सहभाग घेतला होता.

### ८.५.२ कैरो (१९६४)

अलिप्त राष्ट्राच्या दुसऱ्या शिखर परिषदेचे नेतृत्व इजिप्तचे अध्यक्ष कर्नल नासेर यांनी स्वीकारले. या परिषदेस ४७ राष्ट्रे उपस्थित झाली. आफ्रिकेतील १८ व जॉर्डन, कुवेत, सिरीया, लाओस या चार मध्य आशियाई राष्ट्रे अशा जवळपास २२ राष्ट्रांना परिषदेचे पूर्ण सभासदत्व देण्यात आले.

### ८.५.३ ल्यूसाका : (Lusaka) परिषद (१९७०)

आफ्रिकेतील झांबीयाची राजधानी ल्युसाका येथे अलिप्त राष्ट्राची तिसरी शिखर परिषद १९७० झाली भरली. या परिषदेला ५४ सभासद राष्ट्रे उपस्थित होती. वंशावादाविरूद्ध आंदोलन प्रखर करणारा आणि वसाहत वादास पूर्णपणे नाहीसा करणारा जाहीरनामा परिषद करण्यात आला.

### ८.५.४ जॉर्ज टाऊन संम्मेलन - १९७२ अल्जियर्स (Algiers) १९७३

१९७३ साली अल्जियर्सच्या राजधानीमध्ये चौथी शिखर परिषद भरविण्यात आली. या परिषदेस ७६ राष्ट्रे उपस्थित होती. पाकिस्तानला ह्या परिषदेत प्रवेश नाकारण्यात आला होता. तसेच दक्षिण आफ्रिका व र्होडेशिया येथील वर्ण द्वेष आणि वसाहतवाद यामुळे होणार्या हानीची दखल परिषदेत घेण्यात आली.

### ८.५.५ कोलोंबो परिषद (१९७६)

अलिप्तवाद चळवळीची व्याप्ती दिवसें दिवस वाढत चाललेली होती. अमेरिकेच्या वर्चस्वाखालील दक्षिण अमेरीकेतील अनेक राष्ट्रे अलिप्तवादाचा पुरस्कार करीत होते. आफ्रिकेतील ४८ आशियातील २७ व लॅटीन अमेरीकेतील ७, यूरोपातील ३ अशी मिळून ८५ राष्ट्रे या सभेला उपस्थित होते. या परिषदेत सामाजिक आर्थिक सुरक्षततेची हामी

देणारी न्याय, समाज रचना निर्माण झाल्याशिवाय आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता स्थापन होणार नाही. असा इशारा या परिषदेने दिला.

### ८.५.६ हॅवाना (Havana) परिषद (१९७९)

क्युबाची राजधानीमध्ये सहावी शिखर परिषद सप्टेंबर १९८९ मध्ये भरली. या परिषदतेत ९३ सभासद राष्ट्रे उपस्थित होती. इराण, व्हिएतनाम, कंबोडिया अफगाणीस्तान या राष्ट्रांमध्ये अमेरीका व रशिया या राष्ट्रांनी हस्तक्षेप केल्यामुळे ह्या परिषदेस खूप महत्व आले होते. मोठ्या राष्ट्राच्या शस्त्र - अस्त्र स्पर्धेवर या परिषदेत जोरदार टिका करण्यात आली.

### ८.५.७ दिल्ली परिषद (१९८३)

सातव्या शिखर परिषदेत एकूण १०० राष्ट्रांचे प्रितनिधी उपस्थित होते. पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी ह्या परिषदेचे नेतृत्व केले होते. या परिषदेला ८० देशांचे राष्ट्रप्रमुख उपस्थित होते. अणू शक्तीचा जगाने वापर ढाळावा. असे आव्हान या परिषदेत करण्यात आले.

### ८.५.८ हारारे (Harare) (१९८६)

झिबांब्वे येथे १९८६ साली आठवी शिखर परिषद भरविण्यात आली. या परिषदेचे अध्यक्ष झिबांब्वे पंतप्रधान रॉबर्ट मुगाबे हे होते. या परिषदेस १०१ राष्ट्राचे प्रितनिधी उपस्थित होती. हरारे परिषदेने वंशभेदाविरूद्ध लढण्याचे जाहीर करण्यात आले.

### ८.५.९ बेलग्रेड परिषद (१९८९)

४ ते ७ सप्टेंबर १९८९ मध्ये यूगोस्लाव्हियाची राजधानी बेलग्रेड येथे अलिप्त राष्ट्राची नववी परिषद दुसऱ्यादा झाली. या परिषदेमध्ये सर्व राष्ट्राचा आर्थिक विकास करून गरीब राष्ट्रांना कर्ज देण्याचे आव्हान केले. या परिषदेस १०२ राष्ट्राचे प्रमुख प्रितनिधी उपस्थित होते.

### ८.५.१० जकार्ता (१९९२)

१९९२ मध्ये दहावी शिखर परिषद जकार्ता येथे भरली. या परिषदेला १०८ प्रितनिधी हजर होते. यूगोस्लाव्हियाच्या प्रश्नांबाबत सभासदामध्ये मतभेद होते. परिषदेतील सभासदाची संख्या वाढली होती. मात्र त्यांच्या मते अंतर्गत विरोध होता.

### ८.५.११ कार्टाजेना (Cortagena) परिषद (१९९५)

कोलंबिया परिषद (१९९५) लॅटीनन अमेरीकेतील कोलंबिया या छोट्या देशांत कार्टाजेना येथे ऑक्टोबर १९९५ मध्ये अलिप्त राष्ट्राची अकरावी शिखर परिषद भरली. या परिषदेस ११३ सभासद राष्ट्राचे प्रितनिधी उपस्थित होते. अणूनिर्मितीवर बंदी तसेच जगात शांतता निर्माण करण्यासाठी या परिषदेत ठराव मांडण्यात आले.

### ८.५.१२ दर्बन (Durban) परिषद (१९९८)

दक्षिण आफ्रिकेतील दर्बन येथे २९ ऑक्टोबर ते ३ सप्टेंबर १९९८ डॉ. नेल्सन मंडेला यांच्या अध्यक्षतेखाली बारावी शिखर परिषद भरली. या परिषदेमध्ये आंतरराष्ट्रीय दहशतवाद जागतिक निःशस्त्रीकरण आणि आर्थिक, जागतिकीकरणाचा विचार केला गेला.

### ८.५.१३ १३ वी शिखर परिषद (Kualakumpur) २००३

येथे आयोजित करण्यात आली होती तसेच १४वी शिखर परिषद क्यूबा येथे २००६ आणि पुढील शिखर परिषद २००६ इजिप्तमध्ये भरणार आहे.

## ८.६ अलिप्तवादी चळवळीचे कार्य

दुसऱ्या महायुद्धानंतर अलिप्तवादाचा उदय झाला. पंडीत जवाहरलाल नेहरू, कर्नल नासेर व यूगोस्लाव्हियाचे मार्शल टिटो यांनी अलिप्तवादी चळवळीला आकार दिला. अलिप्तवादी चळवळीमुळे ४ दशकात आंतरराष्ट्रीय राजनीतीची दिशा बदलली नसली तरी तिचे अस्तित्व टिकून राहून सदस्य राष्ट्रांची संख्यात सतत वाढ होत गेली हे मात्र स्वीकारावे लागेल.

शीत युद्धाच्या काळात अलिप्ततावादी चळवळीचे मोठे योगदान होते. अलिप्ततावादी चळवळीने शीत युद्धाच्या काळात जागतिक शांतता निर्माण करण्यासाठी भरीव प्रयत्न केले.

### ८.६.१ ठाम भूमिका :

आंतरराष्ट्रीय राजकारणात अनेक राष्ट्रांना स्वतःची  स्वतंत्र भूमिका घेणे अशक्य होते. कारण मोठ्या राष्ट्रांकडे पाहून नमावे लागत होते. तसेच विधायक भूमिका ठामपणे मांडता आल्या.

उदा. भारताला इंडोचिन प्रकरणात ठामभूमिका बजावता आली उत्तर कोरीयाने जे आक्रमण केले. त्यांचा भारताने धिक्कार केला.

### ८.६.२ निःपक्षपाती पणा :

आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रत्येक प्रश्नांचा विचार करताना अलिप्तवादी राष्ट्रांना निःपक्षपातीपणा राखता या गटाचा विचार न करता जगाचा विचार करण्याची सवय लागली. उदा. व्हिएतनाम संघर्ष, इस्त्राईल, पॅलेस्टाईन समस्या व कोरीयन संघर्ष या सारख्या समस्यामध्ये अलिप्ततावादी राष्ट्रांना निःपक्षपातीपणे आपली भूमिका मांडली.

### ८.६.३  मुक्त वातावरणात निर्णय :

अलिप्ततावादी राष्ट्रे कोणाच्याही प्रभावाखाली नसल्याने कोणत्याही प्रश्नांचा मूक्तपणे विचार करीत असे. साम्यवादी किंवा भांडवलदार राष्ट्रात सामील होऊन असे मुक्त स्वातंत्र्य त्यांना मिळू शकले नसते. उदा. झेकोस्लाव्हियातील रशियन हस्तक्षेप व्हिएतनामवरील अमानूष बॉम्ब फेक यांवर भारत आपले रचनात्मक विचार मोकळेपणाने मांडू शकला.

### ८.६.४ आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रितष्ठा :

अलिप्तवादी राष्ट्रांना आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रितष्ठा मिळाली. अलिप्तवादी चळवळीमध्ये आशिया व आफ्रिका व लॅटीन अमेरिकेतील अनेक राष्ट्रांनी सहभाग घेतल्यामुळे जगाच्या राजकारणात तिसरी शक्ती निर्माण झाली. या चळवळीमध्ये सहभागी झालेल्या राष्ट्रांना काटेकोरपणे नियम पाळावे लागत. कोणत्याही सामर्थ्यवान राष्ट्रांना आपल्या भूमीवर लष्करी तळ उभारू देता येत नसे, कारण असे वर्तन केल्यास अलिप्तवादी धोरणाच्या ते विरूद्ध होते त्यामुळे आंतर राष्ट्रीय राजकारणास अलिप्तवादी प्रितष्ठा प्रप्त झाली.

**कोणतीही राजकीय प्रणाली स्वीकारण्यास स्वतंत्र :**

स्थानिक गरजेनुसार राष्ट्राला कोणतेही राजकीय प्रणाली स्वीकारण्यास स्वातंत्र्य होते.

### ८.६.५ आर्थिक प्रगती :

पारतंत्र्याच्या काळात साम्रज्यवादी धोरणाने वहासतवादी देशांची अर्थव्यवस्था दुबळी बनली होती. स्वतंत्र झालेल्या वसाहतींनी आपले अलिप्त धोरण ठेवून स्वतःच्या आर्थिक ताकदीवर आपला उदार करण्याचे ठरवले अलिप्तवादी राष्ट्रांनी दोन महासत्तांच्या गटांमध्ये सहभागी न होता अलिप्त राहून आपला आर्थिक विकास साधला. अमेरिका व रशिया यांने सुद्धा निर्वाचीत स्वतंत्र राष्ट्रांना आर्थिक मदत केली. उदा. रशियाने भारताला भिलाईच्या पोलाद निर्मितीसाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत केली.

### ८.६.६ बंड्या राष्ट्राच्या स्वार्थाला आळा :

जगात अलिप्त राष्ट्रांचा गट निर्माण झाल्याने अमेरिका व रशिया यासारख्या बड्या राष्ट्राच्या स्वार्थाला थोडा आळा बसला. अलिप्तवादी राष्ट्राची चळवळ दिवसे-दिवस वाढत असल्यामुळे जगातील एका मोठ्या राष्ट्रांचा गट आपणांस विरोध करेल. अशी भीती अमेरीका व रशिया यांच्या मनात झाली.

उदा. इजिप्तने सुवेझ कालव्याचे राष्ट्रीयकरण केले त्यावेळेस इंग्लड आणि फ्रान्सने इजिप्तवर आक्रमण केले. त्यावेळेस या राष्ट्राच्या स्वार्थी धोरणास यूनोने आळा घातला.

### ८.६.७ तिसरे महायुद्ध टाळण्यास कारणीभूत :

जगात पहिले आणि दुसरे महायुद्ध घडून गेले होते. परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर शीत युद्धाला सुरूवात झाली. शीतयुद्धाच्या कालखंडात तिसर्या युद्धाची परिस्थिती अनेक प्रसंगाच्या वेळी निर्माण झाली होती परंतु अलिप्त वादी राष्ट्रांनी जगात सतत चिरकाल शांततेचा पुरस्कार केला आणि त्यांनी युद्धखोर राष्ट्रांच्या भूमीकेस सतत विरोध केला आणि अलिप्तवादी राष्ट्रांना त्यामध्ये यश येऊन तिसरे महायुद्ध टाळता आले.

### ८.६.८ एक उपयोगी राजनैतिक क्षेत्र :

दुसऱ्या महायुद्धानंतर जगामध्ये आंतरराष्ट्रीय शांतता व सामंजसाचे धोरण आमंलात आणण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना झाली. दुसऱ्या महायुद्धाची झळ जगातील प्रत्येक राष्ट्राला बसली होती. अशाप्रकारचे महायुद्ध होऊ नये म्हणून यासाठी जागतिक पातळीवर प्रयत्न केले जात होते. संयुक्त राष्ट्राने दुसऱ्या महायुद्धानंतर जगात शांतता



munotes.in

निर्माण करण्यासाठी बरेच प्रयत्न केले. काही प्रसंगी युनोला अलिप्तवादी राष्ट्राची चळवळ सहाय्यकारी ठरली. अलिप्तवादी राष्ट्रांनी तिसरी शक्ती निर्माण करून दोन महासत्तांना युद्धापासून परावृत्त केले आणि जगात शांतता निर्माण होण्यासाठी सतत प्रयत्नशील राहिले.

### ८.६.९ साम्रज्यवादाला विरोध :-

अलिप्तवादी चळवळ साम्रज्यवादाला विरोधी होती. तिने स्वातंत्र्य चळवळीला नेहमी पाठींबा दिला दुसऱ्या महायुद्धानंतर आशिया व आफ्रिका खंडातील पारतंत्र्यामध्ये असणार्या राष्ट्रामध्ये स्वातंत्र्याच्या चळवळी जोर धरू लागल्या होत्या. अशा वसाहतीतील स्वातंत्र्य चळवळीला अलिप्तवादी चळवळीने पाठींबा दिला. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या व्यासपीठावर साम्रज्यवादी विरूद्ध आवाज उठवून स्वतंत्र होऊ इच्छिणार्या राष्ट्रांना आपला पाठिंबा दशर्विला.

### ८.६.१० शीत युद्धात शिथिलता :

अलिप्तवादी चळवळीमुळे महाशक्ती राष्ट्रातील शीतयुद्धाची तिव्रता कमी झाली. तिसरी शक्ती या राष्ट्रांशी उभी केल्याने शीतयुद्ध संपृष्टांत येण्यास सुरवात झाली. जगाच्या राजकारणात युद्ध सदृश्य परिस्थिती निर्माण झालेल्या कालखंडामध्ये अलिप्ततावादी ही चळवळीने जागतिक शांततेसाठी भरीव प्रयत्न केले. त्यामुळे दुसऱ्या महायुद्धा नंतर यामध्ये अलिप्तवादी चळवळीचे मोठे योगदान आहे.

## ८.७ अलिप्ततावादी चळवळीचे अपयश

### ८.७.१ कठोर स्थितीचा अभाव :

अलिप्ततावादी सदस्य देशांवर कठोर शिस्त, अनुशासन लादले जात नव्हते. उदा. इराण, इराक, युद्ध इराकचे कुवेतवरील आक्रमण या युद्धात अलिप्ततावादी चळवळीला प्रभाव पडला नाही. अलिप्तवादी चळवळीतील सदस्य राष्ट्रांना युद्धापासून परावृत्त करण्यात अलिप्तवादी चळवळ यशस्वी ठरली.

### ८.७.२ महासत्तेची चळवळ :

अलिप्तवादी राष्ट्रांनी अमेरीका व रशिया या महासत्ताची मदत घेऊन आपला आर्थिक विकास साधला. त्यामुळे ते बड्या राष्ट्राच्या हातातील बाहुले बनले होते. दोन्ही महासत्तांनी या गोष्टीचा लाभ उठविला. अमेरिकेने लष्करी गटातील राष्ट्रांना तसेच अलिप्त गटांना मदत देण्याचा प्रयत्न केला.

### ८.७.३ व्हिएतनाम युद्धात अमेरीकन हस्तक्षेप :-

दुसऱ्या महायुद्धानंतर व्हिएतनाममध्ये १९५४ मध्ये स्वातंत्र्यांचे वारे वाहु लागले. त्यामधून फ्रेंच राज्यकर्त्यांनी व्हिएतनामला पारतंत्र्यातून मुक्त केले. व्हिएतनाममध्ये उत्तर व्हिएतनाम व दक्षिण व्हिएतनाम असे भिन्न राजकीय प्रणालीचे दोन राष्ट्रे निर्माण झाली, उत्तर

व्हिएतनाममध्ये हो-चि-मिन्ह यांच्या नेतृत्वाखाली साम्यवादी सरकार स्थापन झाले. तर दक्षिण व्हितनाम लोकशाही प्रणालीवर विश्वास ठेवणारे राष्ट्र निर्माण झाले.

उत्तर व्हिएतनाम व दक्षिण व्हिएतनाम मध्ये १९५७ मध्ये ते १९७५ या काळात संघर्ष झाला. या संघर्षात अमेरीकेने दक्षिण व्हिएतनामची बाजू घेऊन दक्षिण व्हिएतनाममध्ये आपले सैन्य पाठवले अलिप्तवादी राष्ट्रांना व्हिएतनाममध्ये संघर्षात अमेरीकेच्या हस्तक्षेपाविरूद्ध जागतिक राजकारणात यश मिळवता आले नाही.

### ८.७.४ अमेरिकेसारख्या महाशक्तीचा उद्रेक :

अलिप्त राष्ट्रे नेहमी आपआपसात लढत होती. व्हिएतनामी फौजा, लाओस कंबोडीयात अशांतता निर्माण करीत होत्या. पाकिस्तान काश्मीरसाठी हल्ले चढत असल्याने भारतीय उपखंडात अशांतता निर्माण झाली होती. इराण, इराक, युद्ध सूत्र होऊन इराणने इराकवर कब्जा मिळवला होता.

अशा परिस्थितीमध्ये अमेरिकेसारख्या महाशक्तीने आपले हीतसंबंध जपण्यासाठी आंतरराष्ट्रीय राजकारणात हस्तक्षेप करायला सुरुवात केली.

### ८.७.५ अलिप्तवादी राष्ट्रांची चळवळ अमेरिकेला अमान्य :-

अलिप्तवादी राष्ट्रे शांततेचा मंत्र जपत होती पण महाशक्ती राष्ट्रांकडून आर्थिक व लष्करी मदत घेऊन आपल्याच देशातील सरकार उलथून टाकीत होते.

उदा. अफगाणिस्थान, व्हिएतनाम व लॅटीन अमेरीका इ. देशांमध्ये अमेरिकेच्या साहाय्याने सरकार बदलण्यात आले. अशावेळी महाशक्ती राष्ट्रे या अलिप्तवादी राष्ट्राच्या चळवळीला ग्रह्य धरत नव्हती.

### ८.७.६ पंचशील तत्वाचा विसर

अलिप्तवादी चळवळीने जगाला पंचशील तत्वाचा एक मंत्र दिला होता. तो आंतरराष्ट्रीय समस्येमध्ये शांती पूर्ण महत्वाची भूमीका पार पाडू शकत होता. पण अलिप्त देशांनी तो उपयोगात आणला नाही. उदा. कोरीयांचा संघर्ष हंगेरी, झेकोस्लाव्हिया संघर्ष, अफगाणीस्तानाचे तसेच कुवेत वरील हल्ले दक्षिण आफ्रिकेतील वर्णद्वेष इ. अलिप्त चळवळीला विशेष भूमिका बजावता आली नाही.

### ८.७.७ अलिप्तवादी चळवळीच्या कामगिरीचे मूल्यमापनः

भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर जगाच्या राजकारणात अलिप्तवादी व पंचशील या धोरणाचा सतत पूरस्कार केला. पाश्चिमात्य जगाला त्याची ती भाषणे आदर्श व स्वप्नाळू वाटत होती. जगात कोणतेही राष्ट्र संघर्षापासून अलिप्त राहू शकत नाही. अशी त्याची भूमिका होती साम्यवादी राष्ट्रांना पंडीत नेहरूची ही भूमिका ढोंगीपणाची वाटत होती. अनेक विचारवंत तर अलिप्तावादाच्या धोरणाला धोरण मानावयास तयार नव्हते.

१९६२ मध्ये चीनने भारतावर हल्ला केल्यानंतर अलिप्तवादी तत्वज्ञानाच्या विरूद्ध वातावरण निर्माण झाले. तरीही अलिप्तवादी राष्ट्र चळवळीने जगाचा फायदा करून दिला

आहे. हे मान्य करावेच लागले. अन्न, वस्त्र, कपातीसंबंधी रशिया व अमेरिका यांच्यात जी रस्सीखेच निर्माण झाली आहे. त्याला आवर घालण्यासाठी जगात शांततेचे वातावरण निर्माण करण्यामध्ये अलिप्तवादी चळवळीचे मोठे योगदान आहे.

## ८.८ बांडुंग परिषद (एप्रिल १९५५)

बांडुंग परिषदेचे कार्ये लक्षात घेतल्या शिवाय आधुनिक आशिया व आफ्रिका खंडातील नव्या विचारांचे पूर्ण आकलन होऊ शकत नाही. ही परिषद आधुनिक काळातील एक विशेष महत्वाची घटना होती. आशिया व आफ्रिका खंडातील स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांनी स्वतंत्र राजकीय जीवनाची सुरूवात केली आहे. हे या परिषदेमध्ये स्पष्टपणे सांगण्यात आले त्याचप्रमाणे बांडुंग परिषद आशियाई आणि आफ्रिकी देशांच्या जागृतीचा एक अविष्कार होता. भूतकालातील घटनांवर व्यर्थ चर्चा करण्यात या परिषदेने आपला वेळ घालविला नाही.

या परिषदेमध्ये २९ देशांच्या प्रितनिधींनी भाग घेतला होता. त्यापैकी बहुतेक देशांना प्रिदर्घ लढ्यानंतर नुकतेच स्वातंत्र्य मिळाले होते. मध्य आफ्रिकी संघ राज्याने मात्र या परिषदेचे आमंत्रण स्वीकारले नव्हते.

### ८.८.१ बांडुंग परिषदेची पार्श्वभूमी :

इ.स. १९४५ - ५० या काळात आशियाई राष्ट्रवादाचा युरोपियन साम्रज्यवादावर विजय झाला होता. "वसाहतवादाला आणि साम्रज्यवादाला विरोध या शब्दांनीच आशियाई जनसामान्यांना उत्साह येत असे. पाश्च्यात्य देशांची जुलमी राजवट आणि त्यांनी केलेले आर्थिक शोषक यांचे प्रतीक म्हणून हे शब्द वापरले जात होते."

साम्रज्यवादी जुलमी राजवटी संपल्या आहेत यावर आशियाई देशांचा काही वेळ विµवासच बसत नव्हता. पूर्वीच्या वसाहतीमधील जनसामान्यांना राजकीय स्वातंत्र्य नव्हते आणि त्याचे भवितव्य परकीय राजवटीत गहाण पडले होते अशा अर्थाचे प्रितपादन डा@. सुकार्णो यांनी १९४७ केले होते.

### ८.८.२ बांडुंग परिषद

डिसेंबर १९५४ मध्ये इंडोनेशियातील बोगोर येथे भारत, पाकीस्तान, शिलोन, ब्रह्मदेश, व इंडोनेशिया यांच्या पंतप्रधानाची एक बैठक झाली. या बैठकीत बांडुंग परिषदेची उद्दिष्टे खालील प्रमाणे होती.

१. आफ्रो आशियाई देशांतील सद्भाव व सहकार्य वाढवून त्यांच्या समान हितसंबंधाच विकास करणे व मैत्रीचे आणि चांगल्या शेजाऱ्यांचे संबंध स्थापन करणे.

२. सभासद देशांचे सामाजिक आर्थिक व सांस्कृतिक संबंध आणि समस्या विषयी चर्चा करणे.

८. वसाहतवाद व वंशवाद यासारख्या खास आफ्रो आशियाई प्रश्नांचा विचार करणे.

४. आधुनिक जगातील आफ्रिका व आशिया खंडाच्या व त्यांच्या प्रजाजनांच्या स्थानाचा विचार करणे.

५. आधुनिक जगातील आफ्रिका व आशिया खंडाच्या व त्यांचा प्रजाजनांच्या स्थानाचा विचार करणे व जागतिक शांतता आणि सहकार्य वृद्धींगत करण्यासाठी ते कार्य करू शकतील याचा आढावा घेणे.

बोगोरच्या बैठकीत संकल्पीत परिषदेची रचना ही सर्व स्पष्ट करण्यात आली. रशिया सकट सर्व यूरोपीय देशांना त्यातून कटाक्षातून वगळण्यात आले. आणि त्या दृष्टीने ही परिषद आशियाई देशांना मिळालेल्या नव्या स्वातंत्र्याचा एक आविष्कार होता. अरब देशांच्या इच्छेला मान देऊन इस्त्राईल ही वगळण्यात आले संकल्पीत परिषद इंडोनेशियातील बांडुंग येथे एप्रिल १९५५ मध्ये भरावयाची होती.

### ८.८.३ बांडुंग परिषदेतील सभासद राष्ट्रे :

या परिषदेमध्ये २९ देशांच्या प्रितनिधींनी भाग घेतला होता. ते पुढीलप्रमाणे :-

अफगाणीस्थान, ब्रह्मदेश, कंबोडिया, शिलोन, साम्यवादी चीन, इजिप्त, इथिओपीया, धाना, भारत, इंडोनेशिया, इराण, इराक, जॉर्डन, जपान, लाओस, लेबनॉन, लिबीया, लायबेरिया, नेपाळ, पाकिस्तान, फिलीपाईन्स, सौदी, अरेबिया, सुदान, थायलंड, तुर्कस्थान, उत्तर व दक्षिण व्हिएतनाम येमेन.

### ८.८.४ परिषदेचे निवेदन पत्र :

परिषदेचे अखेरीस एक प्रिदर्घ निवेदन करण्यात आले त्यातील काही महत्वाचे मुद्दे असे होते.

आर्थिक सहकार्य वाढविण्यासाठी परस्परांना मदत करणे आवµयक आहे. त्यासाठी आपापसातील व्यापार वाढविला पाहिजे.

सभासद देशातील सांस्कृतिक देवाण-घेवाण वाढविण्यासाठी सांस्कृतिक शिष्टमंडळे पाठविण्यात यावीत.

### ८.८.५ मानवी हक्क व स्वंयः निर्णयांचे तत्व :

अलजेरिया, ट्युनिशिया, व मोरोक्को यांचे प्रश्न ताबडतोब सोडविण्याचे फ्रान्सला आव्हान करण्यात आले.

**निवेदनातील अन्य मुद्दे**

१) पॅलेस्टाईन मधील अरबांच्या हक्कांना पांठिंबा देण्यात आला.

२) इंडोनेशियाला दिलेली आश्वासने पूर्ण करण्योच आव्हान हॉलन्डला केले गेले.

३) एंडब्च्या प्रश्नांवर येमेनची बाजू उचलण्यात आली.

४) जागतिक शांतता व सहकार्य : कंबोडिया, शिलोन, लिबिया, ट्युनिशिया व सुदान यांसारख्या नव्याने स्वतंत्र झालेल्या देशांना संसदीय राष्ट्रसंघाचे सभासदत्व देण्यात आले.

५) राष्ट्र संघाच्या सुरक्षा समीतीची रचना भौगोलिक घटकांच्या आधाराने करण्यात यावी.

६) अणुविषय सर्व चाचण्यावर बंदी घालण्यात यावी. तसेच सैन्यात कपात केली जावी.

७) शेवटी सर्व मान्य मुलभूत तत्वांचा उल्लेख करण्यात यावा.

या परिषदेच्या मुळच्या ५ निमंत्रक देशांना अशा परिषदा भरविण्याचा अधिकार देण्यात आला.

### ८.८.६ परिषदेनंतरच्या घडामोडी :

या परिषदेनंतर आशियाई देशांमध्ये विधायक सहकार्याचे एक नवे युग सुरू होण्याची अपेक्षा होती. परिषदेने स्वीकारलेल्या कार्यक्रमात अशा सहकार्याला भरपुर वाव होता तथापि परिषदेमध्ये व्यक्त झालेले आदर्शवादी विचार लवकरच विसरून गेले. सभासदांमधील अनेक समस्या व विभाजन मुद्दे तसेच कायम राहिले होते. रशियाने बांडुंग परिषदेच्या कामकाजातून आपल्याला वगळण्याची शल्य रशियाला बोचत होतेच तसेच तेथील चर्चेमध्ये त्याच्यावर झालेल्या अप्रत्यक्ष टिकेमुळे तो विशेष अस्वस्थता झाली होती. साम्यवादी चीन आपल्यांशी साम्यवादी गटांच्या नेतृत्वाविषयी स्पर्धा करेल. अशी भीती रशियाला वाटत होती. त्यामुळे साम्यवादी चळवळीतील आपले अग्रेसर स्थान टिकविण्यासाठी प्रयत्न करणे. रशियाला अवघड नव्हते. कारण रशियाचा अर्धा प्रदेश आशिया खंडात आहे.

## ८.९ आशियाई ऐक्याची कारणे

वसाहत काळात साम्रज्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी समूद्र मार्गाचा उपयोग होत असे ह्या समूद्रमार्गावर आता राष्ट्रवादाचे नियंत्रण आले होते. नव्याने स्वतंत्र झालेल्या आशियाई देशांकडे आपले स्वतःचे आरमार नव्हते किंवा अशा आरमाराची त्यांना गरजही नव्हती बदललेल्या परिस्थितीत या समूद्र मार्गाचा त्यांना व्यापारी उपयोग करावयाचा होता. आणि म्हणून हे मार्ग मोकळे होण्यासाठी आंतरराष्ट्रीय कायद्याचा आधार घेण्याची त्यांची तयारी होती.

प्रदीर्घ लढल्यानंतर मिळालेल्या स्वातंत्र्याचा सर्वाधिक चांगला वापर करण्याचा आशिया देशांची इच्छा होती आर्थिक व सर्वांगीण प्रगती साधण्यासाठी स्वातंत्र्याची त्यांना गरज होती. तथापि औद्योगिक व शेतीच्या विकासासाठी आवश्यक ते भांडवल तांत्रिक ज्ञान व इतर अनुभव त्यांच्याकडे नव्हते त्यासाठी पूर्वीच्या साम्रज्यवादी देशांवर विसंबून राहण्याखेरीज त्यांना गत्यंतर नव्हते. आर्थिक विकासही प्रत्येक देशांची उदय व सर्वाधिक प्रथमिक गरज होती.

### ८.९.१ सुयोग्य विचार प्रणालीची निवड

आर्थिक व बौध्दिक नियंत्रण हे वसाहत वादाचे आधुनिक अविष्कार असल्याचा इशारा डॉ. सुकार्णो यांनी दिला होता. पश्चिम आशियात तेलाचा दर, आग्नेय आशियात चिनी लोकसंख्येचा प्रश्न, वाढत्या बौद्धीक नियंत्रणापैकी मार्क्सवादी विचार सरणीचे आकर्षण विशेष महत्वाचे होते. मार्क्स पुरस्कार केलेली जागतीक साम्यवादी क्रान्ती नुसतीच तत्वात नव्हती तर व्यवहारात ती अवतरण्याची शक्यता होती.

### ८.९.२ आशिया ऐक्य भावनेचा विकास :

१९४५-५० या काळात आशिया खंडात अनेक राजकीय महत्वाचे बदल होऊन अनेक वसाहती स्वतंत्र झाल्या. याचा काळात युरोपातील शीतयुद्धाने परराष्ट्राचे गंभीर रूप धारण केले होते. आणि युद्ध कालीन दोस्त राष्ट्रात गंभीर मतभेद उत्पन्न झाले होते. कोरीयन युद्धामुळे हे मतभेद काहीसे मागे पडले. इंडोचिनमधील संघर्षात फ्रान्सची माघार होत होती. अशा परिस्थितीमध्ये इंडोनेशिया पंतप्रधान डॉ. अलीसा स्वामी जोजा यांनी ऑगस्ट १९५३ मध्ये अशी सुचना केली होती की "आशियाई देशांनी एकमताने निर्णय घ्यावेत." कारण ऐक्य बदलाच्या साहाय्याने त्यांना साम्रज्यवादी पाश्च्यात्य देशांबरोबर दोन हात करता येते. एप्रिल १९५४ मध्ये कोलोंबो येथे भरलेल्या पाच आशियाई बैठकीत डॉ. अलीसा जोजा यांची सुचना स्वीकारण्यात आली. त्यामुळे परस्परांशी विचार विनीमय करणार्या प्रक्रीयेचे पाऊल पुढे पडले. दरम्यान साम्यवादी चीन आपल्या अलिप्ततेच्या कोषातून बाहेर पडून १९५४ च्या जिनिव्हा परिषदेत सामील झाला होता. भारत व चीन यांच्यातील सहकार्य वाढतच होते. जुन १९५४ मध्ये चिनी पंतप्रधान चाऊ-एन-लाय यांनी भारतास भेट दिली. त्यावेळेस नवी दिल्ली येथे उभय पंतप्रधानात एक करार होऊन पंचशील तत्वे अशी होती.

१. परस्परांच्या प्रदेशिक सलगतेविषयी आदर -

२. अनाक्रमण

८. परस्परांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप न करणे.

४. समानता

५. शांततामय सहजीवन

## ८.१० सारांश

आंतरराष्ट्रीय सहजीवन व शांतता टिकविण्यासाठी दुसऱ्या महायुद्धानंतर संयुक्त राष्ट्र संघटनेची निर्मिती झाली; परंतु रशिया आणि अमेरिका यांच्यात स्पर्धा वाढली. त्यामुळे तिसर्या महायुद्धाचा धोका निर्माण झाला होता. दुसऱ्या महायुद्धानंतर आशिया आणि आफ्रिका खंडातील अनेक लहान देश परकीयांच्या वर्चस्वाखालून मुक्त झाली होती. त्यांचे राजकीय दास्य संपले होते; परंतु आर्थिक आणि शास्त्रीय प्रगती करण्यासाठी विकसित संपन्न राष्ट्रांच्या मदतीवरच अवलंबून राहावे लागत होते. ही मदत देण्यामागे विकसित राष्ट्रांचा स्वार्थ होता. त्यातूनच जगातला दोन्ही लष्करी गटांपासून दूर राहून जगाच्या पाठीवर कुठेही संघर्ष चालू झाल्यास स्वत: अलिप्त न राहणे ही अलिप्तवादाची संकल्पना पुढे

आली. अलिप्तवाद चळवळीचे नेतृत्व पंडीत जवाहरलाल नेहरू, मार्शल टिटो आणि कर्नल नासेर यांनी केले. अलिप्तवादी चळवळ जागतिक राजकारणामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे.

## ८.११ प्रश्न

१. अलिप्ततावादाचा अर्थ, स्वरूप व वैशिष्ट्यांची चर्चा करा?

२. अलिप्ततावादी चळवळीच्या कार्याचा आढावा घ्या?

३. अलिप्ततावादाचा अर्थ सांगून स्वरूप व वैशिष्टये सांगा.

४. अलिप्ततावादी राष्ट्रांच्या शिखर परिषदांची माहिती लिहा.

५. अलिप्ततावादी चळवळीने कोणते प्रभावी कार्य केले?

६. अलिप्ततावादी चळवळीला अपयश का आले?

७. बांडुंग परिषदेची माहिती स्पष्ट करा.

## ८.१२ संदर्भ


१. प्रा.राजदरेकर / प्रा. गर्गे - आधुनिक जगाचा इतिहास - विद्या प्रकाशन, नागपूर

२. ना. सी. दिक्षीत- पश्चिमात्य जग - पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर

३. गायकवाड, कदम, थोरात - आधुनिक जगाचा इतिहास - भाग १ - श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर.

४. प्रा. हरिदास जाधव व प्रा. कल्याण चव्हाण - आधुनिक जगाचा इतिहास - अक्षरलेण प्रकाशन, सोलापूर.

५. डॉ. सुमन वैद्य - आधुनिक जग - श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर .

६. डॉ. सौ . शरावती शिरगावकर - आधुनिक युरोप - श्रीविद्या प्रकाशन, पुणे.

७. श. गो. कोलारकर - युरोपचा इतिहास - आनंद प्रकाशन, नागपूर

८. प्रा. जितेंद्र भामरे- आशियाचा इतिहास - शेठ प्रकाशन, मुंबई .

९. डॉ. रमेश गुप्ते व शे. रा. कुलकर्णी - आग्रेय आशियाचा इतिहास - परिमल प्रकाशन, औरंगाबाद

१०. डॉ. अनिलकठारे - आधुनिक चीन - कल्पना प्रकाशन, नांदेड .

११. डॉ. मु. बा. देवपुजारी - रशियाचा इतिहास - श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर

१२. डॉ. मु. बा. देवपुजारी - आधुनिक आशियाचा इतिहास - श्री मंगेश प्रकाशन , नागपूर


munotes.in

१३. डॉ. नि. वक्कानी - आधुनिक भारताचा इतिहास - श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर

१४. डॉ. जालिंदर भोसले - आधुनिक आशियाचा इतिहास - मुरलीधर प्रकाशन, पुणे

१५. डॉ. सुमन वैद्य व डॉ. शांता कोठेकर - भारताचा इतिहास - श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर

१६. Adolf Hitler - Mein Kampf - KRJ Book International, Delhi

१७. D. R. Sardesai and B. K. Gokhale - World History - Kitab Mahal Publication, Alahabad.

१८. M. D. David - Rise and Growth of Modern China.

१९. तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी - मराठी विश्वकोश - भाग २ व ९

२०. डॉ. शांता कोठेकर, अमेरिकेच्या संघराज्याचा इतिहास - श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर

२१. डॉ. सुमन वैद्य - रशियाचा इतिहास - श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.

२२. विस्टन चर्चील - दुसरे महायुद्ध - महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, १९७८.

२३. डॉ. हुकुमचंद जैन, डॉ.कृष्णचंद्र माथुर - आधुनिक जगाचा इतिहास - के. सागर प्रकाशन पुणे.

❖❖❖❖

munotes.in

# ९

# जागतिकीकरण

**घटक रचना :**

९.० उद्दिष्ट्ये

९.१ प्रस्तावना

९.२ जागतिकीकरणाचा अर्थ

९.२.१ चार्लस हिल

९.२.२ माल्कम एस

९.२.३ आंतरराष्ट्रीय नाणेनिधी

९.२.४ डॉ. दिपक नायर

९.३ जागतिकीकरणाच्या संकल्पनेतील महत्वाच्या बाबीः-

९.३.१ जागतिकीकरणाचे जगावरील परिणाम

९.३.२ जगातील आर्थिक विकासाला प्रेरणा

९.३.३ जागतिकीकरणाने जग जवळ आले

९.३.४ कंपन्यांचा विस्तार

९. ४ जागतिकीकरणाने स्पर्धाशक्ती वाढली

९.४.१ जागतिककीकरणाने आंतरराष्ट्रीय व्यापार वाढला.

९.४.२ उत्पादन क्षमतेचा योग्य वापर

९.४.३ जागतिकीकरणाने लोकांच्या प्रवृत्तीत बदल

९.४.४ इतर लाभ

९.५ जागतिकीकरणाचे दुष्परिणाम / तोटे

९.५.१ श्रीमंत राष्ट्रांकडे नेतृत्व

९.५.२ जागतिकीकरणाने कर्जबाजारीपणा वाढला

९.५.३ बहुराष्ट्रीय कंपन्यांची मक्तेदारी

munotes.in

९.५.४ नैसर्गिक संपत्तीचा ऱ्हास

९.५.५ जागतिकीकरणाने शेतीवर अनिष्ट परिणाम झाला.

९.५.६ वसाहतवादाचा नवीन अवतार

९.६ लोकसंख्यावाढ Population Explosion

९.६.१ व्याख्या

९.६.२ लोकसंख्येची घनता

९.६.३ लोकसंख्या वाढीची कारणे

९.६.४ लोकसंख्या वाढीचे परिणाम

९.७ जागतिक दारिद्र्य

९.७.१ दारिद्र्याची संकल्पना

९.७.२ दारिद्र्याची व्याख्या

९.७.३ दारिद्र्याची वैशिष्ट्ये

९.७.४ जागतिक आर्थिक तुलना

९.७.५ दारिद्र्याची कारणे

९.७.६ दारिद्र्य निर्मुलनासाठी उपाययोजना

९.८ विकास आणि पर्यावरण

९.८.१ औद्योगिकीकरणांनंतर पर्यावरणात झालेला बदल

९.८.२ जागतिक स्तरावर पर्यावरणाचे रक्षणाचे प्रयत्न

९.८.३ पर्यावरणाच्या र्हासास पुढील गोष्टी जबाबदार आहेत.

९.८.४ आर्थिक विकास व त्याचा पर्यावरणावर होणार्या परिणामांची दखल

९.८.५ पर्यावरणीय जागतिक समस्या

९.८.६ सार्क परिषद

९.८.७ बँकाँक परिषद

९.८.८ भारतातील पर्यावरण समस्या

९.८.९ पर्यावरणाच्या र्हासाचे परिणाम

munotes.in

९.८.१० जंगलतोड / निर्वृक्षीकरण (Deforstration)

९.८.११ जागतिक समस्या

९.८.१२ आंतरराष्ट्रीय प्रयत्न

९.८.१३ जंगल तोडीची परिणाम

९.९ स्त्री मुक्ती चळवळ

९.९.१ स्त्रीवाद

९.९.२ स्त्रीहक्कांचे स्वरूप व एतिहासिक पार्श्र्वभूमी

९.९.३ स्त्री हक्क चळवळ

९.९.४ जगातील स्त्री हक्क चळवळीः

९.१० सारांश

९.११ प्रश्न

९.१२ संदर्भ

## ९.० उद्दिष्ट्ये

- जागतिकीकरण हि संकल्पना समाज्जून घेणे.
- जागतिकीकरणाचे फायदे आणि तोटे समजून घेणे.
- जागतिक स्तरावरील स्त्री-मुक्ति चळवळीचा अभ्यास करणे.

## ९.१ प्रस्तावना

जगातील सर्व देशात साधारणतः १९८५ नंतर उदारीकरण व जागतिकीकरण या संकल्पना महत्वाच्या मांनल्या जातात. दुसऱ्या महायुद्धानंतर, युनो, गॅट नाणेनिधी, जागतिक बँक इ. जागतिक संघटना स्थापन करण्यात आल्या. या सर्वांचा उद्देश जगातील विविध देशांनी कोणत्याही अडथळ्याविना विविध प्रकारचे व्यवहार एकमेकांत करावे.

जागतिकीकरणाचा परिणाम जगातील सर्व देशांवर होत आहे. जागतिकीकरण हा २०व्या शतकाच्या अखेरचा व २१ व्या शतकाच्या प्रारंभीच्या परिचयाचा शब्द बनला आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर संपूर्ण जगत विविध घडामोडी घडून आल्या. त्यापैकी सर्वात मोठी चळवळ म्हणजे जागतिकीकरणाची चळवळ होय. या जागतिकीकरणाचे अर्थ अनेक तज्ञांनी मांडले असावे. तरी त्यातून आर्थिक विकास, शहरीकरण, व्यापारात वाढ, समाज, संस्कृतीवरील परिणाम, श्रीमंत राष्ट्रांची वाढ, बहुराष्ट्रीय कंपन्यांची मक्तेदारी, शेतीवरील, उद्योगांवर नव्याने झालेले परिणाम याचबरोबर संपूर्ण जग एकमेकांजवळ आले. हा सर्वात मोठा

घडलेला परिणाम महत्वाचा ठरतो. या जागतिकीकरणाचे दुष्परिणामही तेवढेच महत्त्वाचे ठरतात. कर्जबाजारीपणा, राष्ट्रीय दारिद्र्य, नैसर्गिक संपत्तीचा ऱ्हास, लोकसंख्यावाढ, पर्यावरणावर झालेले वाईट परिणाम हे प्रकर्षाने जाणवतात. पण याच जागतिकीकरणामुळे जगातील आधुनिक घडामोडींची माहिती प्रत्येक देशात पोहचून सर्व मागास विकसनशील देशात स्त्रीमुक्तीची चळवळ वेगाने वाढली. या सर्व गोष्टींचा अभ्यास करणारे हे प्रकरण महत्वाचे ठरते.

## ९.२ जागतिकीकरणाचा अर्थ

अनेकांना जागतिकीकरणाचा अर्थ वेगवेगळा वाटतो. "जागतिकीकरण म्हणजे देशाच्या राजकीय सीमेबाहेर आर्थिक व्यवहाराचा विस्तार करणे होय." यानुसार जागतिक अर्थव्यवस्थेच्या संदर्भात विविध देशांच्या अर्थव्यवस्थचे एकीकरण समाविष्ट आहे म्हणजेच जागतिकीकरण ही आर्थिक एकीकरणाची प्रक्रिया आहे.

### ९.२.१ चार्लस हिल :

जागतिकीकरण म्हणजे आर्थिक एकात्मता आणि परस्परांवलंबन या दिशेने जागतिक अर्थव्यवस्थेत झालेला बदल होय.

### ९.२.२ माल्कम एस :

(Malcom-S) जागतिक अर्थव्यवस्थेची निर्मिती होत असताना तिला मिळालेले जागतिक परिणाम म्हणजे अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण होय.

### ९.२.३ आंतरराष्ट्रीय नाणेनिधी :

Globalisation means the growing economic interdependance of countries worliwide through increasing volume & variety of cross border transactions in goods of services and of international capital flows & also through the more rapid & widespread difusion of technology

### ९.२.४ डॉ. दिपक नायर :

राष्ट्रराज्याच्या भौगोलिक सीमांपलीकडे जाऊन आर्थिक व्यवहारांचा झालेला विस्तार म्हणजे जागतिकीकरण होय.

## ९.३ जागतिकीकरणाच्या संकल्पनेतील महत्वाच्या बाबी

१. मुक्त बाजार अर्थव्यवस्थेचा स्वीकार.

२. अर्थव्यवस्थेवरील सरकारने लादलेली नियंत्रणे कमी करणे.

३. सरकारी उपक्रमांचे खाजगीकरण.

munotes.in

४. अर्थसाहाय्य बंद करून सरकारी खर्चात कपात विदेशी बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या गुंतवणुकीत खर्च क्षेत्रात मुक्त प्रवेश देणे त्यांच्यासाठी स्पर्धा करण्यासाठी देशांतर्गत उद्योगांना खास मदत व संरक्षण देणे.

५. आयत वरील बंधणे काढणे.

६. निर्यातीला उत्तेजन देणे.

७. चलणाची किंमत चलन बाजारातील चढउताराप्रमाणे ठरवणे.

८. देशाची अर्थव्यवस्था स्वयंपूर्ण न करता जागतिक अर्थव्यवस्थेशी अधिकाधिक जवळ येणे.

**९.३.१ जागतिकीकरणाचे जगावरील परिणाम :**

जगातील अनेक देशांनी या धोरणाचा विस्तृत प्रमाणावर स्वीकार केला आहे. अलिकडे या धोरणाचा भारतानेही स्वीकार केला आहे. तेव्हा या धोरणाचा भारतावर व जगावर परिणाम झाला आहे.

**९.३.२ जगातील आर्थिक विकासाला प्रेरणा :**

जागतिकीकरणाच्या धोरणाने मुक्त व्यापार आणि जगातील सर्व देशांच्या आर्थिककरणाच्या विकासाला प्रेरणा प्राप्त होईल. विशेषतः अविकसित देशानांही फायदा मिळेल. तेथील लोकांचे जीवनमान सुधारण्यास मदत होईल.

उदा. भारतासह अनेक देशांनी जागतिकरणाच्या नावाखाली बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या प्रभावाखाली. न येता तंत्र व विज्ञान, उत्पादन, आर्थिक व्यवस्था यामध्ये स्वातंत्र्याचा मार्ग स्वीकारून आर्थिक विकास साधणे योग्य ठरेल.

**९.३.३ जागतिकीकरणाने जग जवळ आले :**

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने जगातील सर्व देश एकमेकांच्या अधिक जवळ येत आहे दूरसंचार क्षेत्रातील क्रांतीकारी बदलाने हे स्पष्ट झाले आहे. नवे तंत्रज्ञान स्वीकारून उद्योगांचे आधुनिकीकरण सुलभ होईल सर्व क्षेत्रांची उत्पादकता व कार्यक्षमता वाढवणे.

**पिटर ड्रुकर :** यांच्या मते "भावी समाज हा ज्ञानार्थ समाज आहे जग अत्यंत जवळ येत आहे देशाच्या सीमा ढासळत आहे. बहुराष्ट्रीय उद्योग, व्यापार नियमनाचे जाळे सर्वत्र पसरले आहे हा प्रवाह थोपवणे कठीण आहे."

**९.३.४ कंपन्यांचा विस्तार :**

जागतिकीकरणाच्या धोरणाने जगात बहुसंख्य कंपन्यांचा वेगाने विस्तार होतो. त्याची गुंतवणूक वाढते सन १९९५ अखेर जगात ४० हजार बहुराष्ट्रीय कंपन्या होत्या आणि त्यांच्या संलग्न कंपन्या २-५ लाख होत्या त्यांची विदेशी गुंतवणूक २६ अब्ज डॉलर्स होती.

### ९.४ जागतिकीकरणाने स्पर्धाशक्ती वाढली :

जागतिकीकरणाच्या धोरणाने विकसनशील देश आपली स्पर्धा शक्ती सुधारण्यास समर्थ बनतात. परिणामी विकसनशील देशांना विविध प्रकारच्या दबावापासून जागतिकीकरणापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न होतो.

उदा. भारतात १९९१ पासून आंतरराष्ट्रीय व्यापारावरील नियंत्रणे व बंधने दूर करण्यासाठी प्रक्रिया सुरू होती. शेवटी भारताला वस्तु भांडवल व तंत्रज्ञानाच्या मुक्त प्रवाहाला मान्यता द्यावी लागली. अशाप्रकारे जागतिकीकरण हे देशांना स्वतःच्या वेगवान विकासाठी योग्य लाभदायक वातावरण निर्माण करते.

### ९.४.१ जागतिककीकरणाने आंतरराष्ट्रीय व्यापार वाढला :

जागतिकीकरणाच्या धोरणाने कोणत्याही देशाच्या आयात निर्यातीत वाढ होते. सन १९९८ ते १९९९ नंतरच्या जागतिक व्यापाराच्या अहवालानुसार सन १९९० मध्ये एक जागतिक व्यापाराच्या अहवालानुसार सन १९९० मध्ये एक जागतिक व्यापारातील भारताचा हिस्सा ०.५६% होता जो १९९६ मध्ये ०.७६% झाला.

याच कालावधीत चीन, द. कोरिया, व ब्रझील या देशांच्या हिस्स्यात अनुक्रमे १.९५% वरून २.७८%, २.०३% वरून २.३०% आणि ०.८३% वरून १.७६% वाढ झाली.

### ९.४.२ उत्पादन क्षमतेचा योग्य वापर :

जागतिकीकरणाने देशातील अर्थव्यवस्थेच्या उत्पादन क्षमतेच्या पुरेपुर वापर होण्याची शक्यता वाढते कारण या धोरणाने विविध देशातील उत्पादने बाजारपेठेने येतात. त्यांच्याशी स्पर्धा करण्यासाठी कार्यक्षमता वाढवावी लागते तरच त्या स्पर्धेत टिकाव धरता येतो.

### ९.४.३ जागतिकीकरणाने लोकांच्या प्रवृत्तीत बदल :

पाश्चीमात्य देशांच्या व विविध देशांच्या आयतीने विकसनशील देशातील अनेक लोकांच्या आयुष्यप्रमाणात बदल झाला आहे. अनेक नवीन वस्तु आल्याने जुन्या वस्तु कालबाह्य झाल्या चीन सारख्या साम्यवादी देशातील स्त्री पुरूष पाश्चीमात्य कपड्यांचे अनुकरण करू लागतात. विदेशी वस्तु वापराचे फॅड निर्माण होते.

### ९.४.४ इतर लाभ :

जागतिकीकरणाने देशाच्या विदेशी चलनाचा साठा वाढतो जगातील विविध देशातील आधुनिक तंत्रज्ञान सहज उपलब्ध होते. देशातील उत्पादनमानाच्या वितरणातील विषमता कमी होते उद्योगांच्या व्यवस्थापन कौशल्यात सुधारणा होते.

## ९.५ जागतिकीकरणाचे दुष्परिणाम / तोटे

विशेषतः प्रगत देशांच्या मानाने विकसनशील देशांना या धोरणाने अनेक तोटे सहन करावे लागतात. जागतिकीकरणाने अनेक दुष्परिणाम निर्माण झाले आहे.

### ९.५.१ श्रीमंत राष्ट्रांकडे नेतृत्व :

जगातील विकसित देशांनी आर्थिक व्यवस्थेचा पुर्नविचार सुरू केला. याचा मुख्य उद्देश म्हणजे जागतिकीकरण होय. ज्याद्वारे विकसित देशांना विशेषतः अमेरिका जागातिक अर्थव्यवस्थेवर पकड बसवता येईल. जागतिक व्यापार संघटनेच्या १९९५ च्या स्थापने नंतर जागतिकीकरणाने एक वेगळे स्वरूप धारण केले.

श्रीमंत देशांनी (G-7) गट स्थापन केला. जगातील १/७ लोकसंख्येचे प्रितनिधित्व करणारे हे २१ व्या शतकात सर्व जगाचे नेतृत्व करणार आहे. परंतु त्या धोरणाचा परिणाम जगातील ५/६ लोकसंख्येच्या जीवनमानावर होईल.

### ९.५.२ जागतिकीकरणाने कर्जबाजारीपणा वाढला :

सन १९८० नंतर अविकसित देश कर्जबाजारी झाल्याने कर्जाच्या सापĖयात सापडले त्यातून बाहेर येण्यासाठी त्यांनी नाणेनिधी व जागतिक बँक याकडे धाव घेतली. या संस्थेने मदत देताना कर्ज - बाजारी देशांनी अर्थव्यवस्थेच्या पुर्नरचनेच्या कार्यक्रम स्वीकारला पाहिजे अशी अट घालण्यात आली.

कर्जबाजारीपणाचा पहिला धक्का लॅटिन अमेरिकेतील मॅक्सीकोला १९८२ मध्ये बसला त्यानंतर ब्रझील, चिली, अर्जेटीना या देशांची स्थितीही अशीच होती. सन १९९१ मध्ये भारतावरही तीच परिस्थिती ओढावली. सारांश म्हणजे वेगवेगळ्या देशांना परिस्थितीचा फारसा विचार न करता जागतिकीकरणाने सर्व देशांना आर्थिक पुर्नरचनेच्या माध्यमातून जखडून टाकले.

### ९.५.३ बहुराष्ट्रीय कंपन्यांची मक्तेदारी :

प्रत्येक देशात माहिती तंत्रज्ञान, दूरसंचार सेवा, कायदा, वैद्यकिय सेवा, पर्यटन, जाहिराती, लेखा परिक्षा इ. विविध क्षेत्रात बहुराष्ट्रीय कंपन्यांना राष्ट्रीय कंपन्यासारखी वागणूक द्यावी लागेल. यापुढे मुक्त व्यापाराने हानिकारक व विषारी रसायने इ. पदार्थाच्या आयातीवर बंधने घालता येणार नाही.

जगातील ५० श्रेष्ठ कंपन्यांची संपत्ती २ हजार ३०० अब्ज कोटी डॉलर्स आहे. या कंपन्या ७०% जागतिक व्यापार करतात. प्रचंड जाहिरात बाजीतून आपल्या मालाचा ठसा ग्रहक, मनावर उमटवतात उदा. कोका कोला, पेप्सी इ.

### ९.५.४ नैसर्गिक संपत्तीचा र्‍हास :

जागतिकीकरणाने विविध देशातील संपत्तीचा र्‍हास मोठ्या प्रमाणात होतो. यामुळे विषुवृत्तीय संपत्तीचा ५५% भाग नष्ट झाला १ लाख ३८ हजार चौ. कि.मी क्षेत्रावरील वन संपत्ती

बरोबर ५ हजार जीवजाती दरवर्षी संपुष्टात येतात जैविक विविधतेचा र्हास होतो नैसर्गिक संपत्तीच्या र्हासाने मानव संस्कृतीला धोका निर्माण होणार आहे.

### ९.५.५ जागतिकीकरणाने शेतीवर अनिष्ट परिणाम झाला :

जागतिकीकरणाचा एक महत्वाचा अविष्कार म्हणजे बहुराष्ट्रीय कंपन्या, कृषी व्यवसाय स्थापन्याच्या प्रयत्नात आहे. म्हणजे एका बाजूने बी-बीयाने, खते, किटकनाशके यांच्या पुरवठ्यावर तर दुसऱ्या बाजूने जागतिक शेती उत्पादन बाजारावर पूर्ण नियंत्रण ठेवणे होय.

या कृषी जागतिकरणाच्या नवीन व्यवस्थेत भारतासारख्या लहान शेतकरी असणार्या देशात त्यांचे अस्तित्व नष्ट होईल. किफायतशीर उत्पादनाच्या दिशेने शेतीची वाटचाल सुरू झाल्यास अन्नधान्य उत्पादनातील स्वयंपूर्णता नष्ट होईल.

### ९.५.६ वसाहतवादाचा नवीन अवतार :

जागतिकीकरणाच्या प्रकियेने वसाहतवादाचा नवीन अवतार जन्माला आला आहे. असे टिकाकांराचे मत आहे. १८व्या व १९व्या शतकात इंग्रज, फ्रेंच, डच पोर्तुगीज कंपन्यांनी जे केले तेच २१व्या शतकात बहुराष्ट्रीय कंपन्या जागतिक संस्थाच्या संगनमताने जागतिकरणाच्या माध्यमाने करण्याचा प्रयत्न करीत आहे. आपले जीवनमान उंचवण्यासाठी विकसनशील देशातील नैसर्गिक संपत्ती व श्रमशक्तीवर प्रभूत्व निर्माण करून त्याचा आपल्यासाठी उपयोग करून घेत आहे.

## ९.६ लोकसंख्यावाढ (POPULATION EXPLOSION)

आधुनिक काळात लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. लोकसंख्यावाढ हा जगातील सर्व शास्त्रज्ञांना आवाहन देणारी आहे. कारण जगात एका मिनिटाला १७६ व्यक्तींनी भर पडते. वाढत्या लोकसंख्येबरोबर सामाजिक, आर्थिक, राजकीय, प्रश्नांची वाढ होताना दिसते. या सर्वाचा परिणाम देशांच्या राजकीय विकासावरून अनेक विकसीत देश अडचणीत येतात. विकसित देश आपला विकास कायम ठेवण्याचा प्रयत्न करतात. जगातील एकूण लोकसंख्येपैकी ६०% लोकसंख्या गरीब देशांत राहते. उदा. आशिया खंडातील भारत, पाक, बांग्लादेश व आफ्रिका खंडातील काही देश यांचा समावेश होतो.

विकसित देशांनाही लोकसंख्या वाढीची समस्या जाणवते. परंतु ती अविकसीत व विकसनशील देशांच्या समस्ये एवढी जाणवत नाही. १९५० मध्ये जगाची लोकसंख्या ५० कोटी होती. तर १९०० मध्ये ती संख्या १०६ अब्ज एवढी साली १६५० ते १९०० या काळात लोकसंख्या वाढीचा दर कमी होता. साधारणपणे १७वे शतक वैज्ञानिक क्रांतीचे पर्व मानले जाते नवनवीन औषधाचा शोध लागला. जुन्या रोगांवर औषधे उपलब्ध झाली. त्यामुळे मृत्यूदरात मात्र प्रचंड प्रमाणात घट झाली. त्यामुळे लोकसंख्येत वाढ घडून आली.

विकसनशील (आशिया खंड) व अविकसित (आफ्रिका खंड) देशांचा विचार करता येथे मोठ्या प्रमाणात लोकसंख्या वाढ नियंत्रणात आणु शकतील. तर त्यांचा विकास होऊ शकतो. भारताचा विचार करता भारत हा विकसनशील देश आहे. संपूर्ण जगात २५% जमिन व ७०% पाणी आहे. त्यातील १% जमीन ही भारताच्या वाट्याला आली आहे. व

या १% जमिनीवर जगातील लोकसंख्यापैकी ११% लोकसंख्या राहत आहे. १९८१ च्या जणगणनेनुसार भारताची लोकसंख्या ६० ते ६५ कोटी होती.

**९.६.१ व्याख्या :**

विशिष्ट काळात, विशिष्ट भौगोलिक क्षेत्रांमध्ये झालेला लोकसंख्येतील सकारात्मक बदल म्हणजे लोकसंख्या वाढ होय.

अल्पकालावधीत झालेल्या लोकसंख्येचा प्रचंड वाढीला लोकसंख्येचा विस्फोट म्हणतात. ती वाढ अशीच होत राहिली तर पृथ्वीवरील अन्न, पुरवठा, साधन-सपंत्ती वाढल्या. लोकसंख्येला अपूरी पडेल. जगातील अनेक देशांत लोकसंख्या वाढीची जाणीव झाल्याने लोकसंख्या नियंत्रणावर प्रयत्न केले जात आहे.

दर चौ. किमी क्षेत्रातील प्रत्यक्ष लोकसंख्या म्हणजे लोकसंख्येची घनता होय.

**९.६.२ लोकसंख्येची घनता :**

एखाद्या प्रदेशांतील प्रत्यक्ष लोकसंख्या त्या प्रदेशांचे क्षेत्रफळ लोकसंख्येची घनता जास्त तसेच जपान, कोरिया, पाक या देशांची घनता जास्त तसेच अमेरिका, जर्मनी, नेदरलँड, डेन्मार्क यांची घनता कमी आहे.

**९.६.३ लोकसंख्या वाढीची कारणे :**

जगातील साधारणतः लोकसंख्या वाढीची २ कारणे महत्वाची मानली जातात. ती पुढीलप्रमाणे -

**१) जननदरांचे वाढते प्रमाण / वाढता जन्मदर :**

दर हजार लोकसंख्येत एका वर्षात किती मुले जन्माला आली त्यास  जन्मदर म्हणतात. जन्मदराच्या वाढत्या प्रमाणात जर मृत्यूदर घटत असेल तर वाढणार नाही. सध्याच्या परिस्थितीत जन्मदरांचे प्रमाण वाढत आहेत. त्यास जबाबदार घटक पुढीलप्रमाणे:

**२) वैद्यकीय सुविधांत वाढ :**

१९व्या शतकाच्या पूर्वी जगात लोकसंख्येचे प्रमाण मर्यादित होते. पण त्यानंतर मात्र लोकसंख्या झपाट्याने वाढली जन्मदराचे प्रमाण वाढतच राहिले व मृत्यूदराचे प्रमाण घटत राहिले. जन्मदर वाढण्याचे महत्वाचे कारण म्हणजे वैद्यकीय सुविधात झालेली वाढ पूर्वीच्या काळी साथींच्या रोगांचे प्रमाण जास्त होते. यात अनेक मृत्यूमुखी पडत पण वैद्यकिय क्षेत्रात प्रगती झाल्याने साथीच्या रोगांवर प्रितबंधात्मक लसी शोधण्यात आल्यामुळे. रोगांनी मृत्यू मुखी पडणार्यांची संख्या कमी झाली. प्रितबंधात्मक लसी व औषधामध्ये देवी, प्लेग, कॉलरा व संसर्ग जन्य रोगाचे प्रमाण घटले त्यामुळे लोकसंख्यात वाढ घडून आली.

**३) शिक्षणाची कमतरता :**

अविकसीत व विकसनशील देशांत शिक्षणाचे प्रमाण कमी असते. शिक्षण नसल्याकारणाने लोक अजानतेने जास्त मुलांना जन्म देतात. परिणामी लोकसंख्या वाढ होते. तसेच धार्मिक

बंधनांनी ही लोकसंख्येत वाढ होते. उदा. इस्लाम धर्मात नसबंदी पाप समजली जाते. व हिंदू धर्मात मुले देवाघरची फुले या संकल्पनेने अनेक मुले जन्माला येऊ दिली जातात.

**४) अंधश्रद्धा :**

भारताच्या बाबतीत लोकसंख्या वाढीबाबत हे महत्वाचे कारण आहे. भारतात प्रचंड प्रमाणात अंधश्रद्धा माजलेली आहे. हिंदु धर्मात मुलगा हा वंशाचा दिवा मानला जातो. त्यामुळे मुलगा होण्यासाठी अनेक मुलांना जन्म दिला जातो. तसेच मृत्यूनंतर अग्नीदाह मुलांनी दिल्यास स्वर्गाची प्रप्ती होते. यासारख्या अंधसमजुतीमुळे भारताची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे.

**५) दारिद्र्य :**

लोकसंख्या व दारिद्र्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. लोकसंख्या जास्त वाढल्याने मुलांना दारिद्र्यात साधन मानले जाते. जेवढी मुले जास्त तेवढी संपत्ती अधिक अशी भारतात संकल्पना आहे. पण आशियाई देशांत ही समस्या तीव्र आहे आपल्याला जी मुले होतील ती कामाला लागल्याने त्यांच्याकडून आपल्याला संपत्ती प्रप्त होते. या आशेने देखील जास्त मुलांना जन्म दिला जातो. पण त्या मुलांच्या पालन पोषणासाठी लागणारा पैसा आपल्याकडे कमी आहे. याचा विचार व्यक्ती करीत नाही. व परिणामी दारिद्र्यात वाढ होते. हे दारिद्र्य कमी करण्यासाठी जास्त मुलांना जन्म दिला जातो.

**६) बालविवाह :**

भारतात बालविवाहाची प्रथा अस्तित्वात होती सध्या ती अतिशय अल्प प्रमाणात अस्तित्वात आहे. आशियाई व आफ्रिकन देशांतील हवामान उष्ण व दमट आहे. यामुळे तेथील स्त्रीयांची प्रजोत्पादन क्षमता लवकर सुरू होऊन उशीरा संपते म्हणजेच प्रजोत्पादन क्षमता १३ ते ४० या वयोमानापर्यंत असते. बालविवाह प्रथा असल्याने मुलांना जन्म दिला जातो. त्यामुळे लोकसंख्येत झपाट्याने वाढ झालेली दिसते. उलट युरोपियन देश हा हवामानाने थंड असल्याने तेथील स्त्रियांची प्रजोत्पादन क्षमता कमी असते.

**७) घटता मृत्यूदर :**

दर हजारी लोकसंख्येत एका वर्षात एक व्यक्ती मृत्यूमुखी पावली. याचे प्रमाण म्हणजे मृत्यूदर घटत्या मृत्यूदराची कारणे पुढीलप्रमाणे :

**८) वैद्यकीय सुविधांत वाढ :**

विज्ञान क्षेत्रांत मोठ्या प्रमाणात प्रगती झाल्याने अनेक प्रकारचे रोग बरे होत आहेत तसेच दुसऱ्या महायुद्धानंतर स्थापन झालेली युनोची ही UNO ही संघटना जागतिक लोकांच्या आरोग्यासाठी काम करते मलेरिया, क्षयरोग, पोलिओ, कृष्ठरोग यासारख्या संसर्गजन्य रोगांसाठी ही संस्था अनेक प्रकल्प राबवीत आहे. तसेच एड्सवर प्रतिबंध म्हणून व्यापक कार्यक्रम युनोने हाती घेतला आहे. वरील सर्व उपाययोजनांमुळे मृत्यू प्रमाणात घट झाली.

munotes.in

**९) आरोग्याबाबत काळजी:**

पूर्वीच्या काळी व्यक्ती ही आपल्या आरोग्याबाबत जागृत नव्हती परंतु संध्याच्या काळातील महत्व कळल्याने त्याबाबत व्यक्ती जागृत असतात. सार्वजनिक स्वच्छतेबाबत ही काळजी घेतली जाते. त्यामुळे संसर्गजन्य रोगांचे प्रमाण घटले व परिणामी मृत्यूदरात घट झाली.

**१०) राहणीमानाचा दर्जा सुधारणे :**

शरिरास आवश्यक असलेले सकस अन्न व कॅलरीज मिळाल्याने शरीराचा दर्जा वाढतो. व रोगप्रितकार शक्तीसुद्धा वाढते राहणीमानाचा दर्जा म्हणजे आवश्यक असणार्या कॅलरीज योग्य प्रमाणात मिळणे तसेच स्वच्छ परिसरात राहणे व आपला आहार व पर्यावरणीय स्वच्छतेबाबत जागृत असणे याचा समावेश होतो. या गोष्टीमुळे आजाराचे वेगवेगळ्या रोगांचे प्रमाण कमी होते व लोकसंख्येत वाढ झाली.

**वाहतुक दळणवळणात वाढ :**

वाहतुक व संदेशवहन या क्षेत्रांत झालेली प्रगती संपूर्ण जग जवळ आले आहे. संगणकामुळे जगातील कोणत्याही कोपर्यात असलेल्या व्यक्तींशी प्रत्यक्ष बोलता व बघता देखील येते. याच कारणामुळे मृत्यूदरात देखील घट झालेली दिसते. अविकसित देशांत सुधारित तंत्र नसल्याने आजारी असलेली व्यक्ती वाचेलच याची खात्री नसते. पण वाहतुक व दळणवळणाच्या प्रक्रियेने ह्या व्यक्तीला शहरामध्ये किंवा एखाद्या दुसऱ्या देशांत नेऊन वैद्यकीय सुविधा देऊन ती व्यक्ती वाचू शकते यामुळे लोकसंख्येत वाढ होत आहे.

**९.६.४ लोकसंख्या वाढीचे परिणाम :**

**१) बेकारी :**

बेकारी म्हणजे कोणत्याही प्रकारचा संपत्ती मिळवण्याचा मार्ग नसणे होय. लोकसंख्या वाढीची गती जास्त असल्याने वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत रोजगार निर्मिती होऊ शकत नाही. त्यामुळे बेकारीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. "ज्याला काम करायची आवड पण त्याला काम मिळत नाही. त्याला बेरोजगार किंवा बेकार म्हणतात." या बेकारीचे काही प्रकार आहे.

उदा. सुरक्षित बेकार, अशिक्षित बेकार, हंगामी बेकार, छुपी बेकार, तांत्रिक बेकारी इ.

**२) दारिद्र्यात वाढ :**

लोकसंख्या वाढ व दारिद्र्यात वाढ एकमेकांस निगडीत असलेल्या गोष्टी आहेत. लोकसंख्या जास्त असल्याने प्रत्येक व्यक्तीला आपल्या मुलभुत गरजा भागवता येत नाही तेवढी त्यांना साधने उपलब्ध होत नाही विकसनशील व अविकसीत लोकसंख्या वाढीचा महत्वाचा परिणाम मानला जातो.

### ३) शेती क्षेत्रांवर अतिरिक्त भर :

जमीनीचे लागवडीखालील क्षेत्र हे मर्यादित असते व ते वाढत नाही. पण लोकसंख्या मात्र दिवसेंदिवस अमर्याद वाढत आहे. त्यामुळे वाढणार्या लोकसंख्ये बरोबर शेतीक्षेत्रांवर त्याचा अतिरिक्त भर पडत आहे. त्यामुळे अन्न टंचाई भासु लागली. शेतीवर उत्पादित होणार्या साधनांवर प्रमाणापेक्षा जास्त लोकसंख्या अवलंबून राहते.

### ४) शिक्षणाचा प्रश्न :

देशांच्या वाढत्या लोकसंख्येत लहान मुलांची संख्या जास्त असते त्यामुळे देशांतील सध्याच्या शिक्षणाच्या सोयी अपुर्या पडत आहेत. अजूनही काही ठिकाणी शाळा नसल्यामुळे लहान मुलांच्या शिक्षणाबरोबरच प्रौढ शिक्षणाचाही मोठा प्रश्न आहे.

### ५) अपुऱ्या आरोग्यविषयक सेवाः

विकसनशील देशांत लोकांना आरोग्यविषयक सेवा उपलब्ध करून देणे हे शासनाचे महत्वाचे कार्य आहे. परंतु वाढत्या लोकसंख्येस शासन पुरेशा आरोग्यविषयक सेवा देऊ शकत नाही. कारण अनेक देशातील लोकसंख्या वाढीचा दर खूपच जास्त आहे.

### ६) नैसर्गिक साधनसंपत्तीवर ताण :

वाढत्या लोकसंख्येमुळे देशाच्या नैसर्गिक साधन संपत्तीवर पडणारा ताण पाण्याच्या वापरामुळे जलसंपत्तीवर पडणारा ताण लोकांना रोजगार मिळवून देण्यासाठी उद्योग धंद्याचा विकास व त्यामुळे खनिज संपत्ती वनस्पती इ. वर पडणारा ताण अशा अनेक समस्या लोकसंख्या वाढीमुळे निर्माण होतात.

## ९.७ जागतिक दारिद्र्य

'दारिद्र्य' हा जागतिक अर्थव्यवस्थेचा प्रदीर्घ काळापासून अस्तित्वात असलेला आणि उपाय करूनही लवकर बरा न होणारा असा दुर्धर रोग आहे. जेव्हा समाजातील एखादा जीवन घटक जीवन जगण्यासाठी आवश्यक असणार्या अन्न, वस्त्र, निवारा यासारख्या किमान प्रथमिक गरजा ही आपल्या उत्पन्नातून भागवू शकत नाही. तेव्हा तो दारिद्र्यात आहे असे म्हटले जाते, दारिद्र्याची व्याख्या करताना त्याचा संबंध किमान आवश्यक गरजा भागविण्याच्या जीवनमुल्यांशी जोडला जातो. दारिद्र्य ही एक अशी अवस्था आहे की, ज्या अवस्थेत, व्यक्तीला अथवा व्यक्तीसमुहाला जीवनाश्यक वस्तूंचा पुरवठा बराच काळ नियमितपणे मिळवणे अशक्य असते. वास्तविक आर्थिक विषमता आणि दारिद्र्य ही एकत्रच असतात.

### ९.७.१ दारिद्र्याची संकल्पना :

दारिद्र्य ही एक सामाजिक घटना आहे. या अवस्थेत समाजातील काही घटकांना किंवा गटांना किमान अन्न, वस्त्र, निवारा यासारख्या जीवनावश्यक वस्तु बराच काळ नियमितपणे मिळणे अशक्य असते. जर समाजातील मोठा गट सातत्याने केवळ निर्वाह पातळीवरील किंवा त्याहीपेक्षा खालच्या पातळीवरील जीवन जगत असेल तर समाज दारिद्र्यावस्थेत

आहे. असे म्हणता येईल किमान राहणीमान टिकवून ठेवण्यासाठी व्यक्तींची कुवत नसेल तर ती दारिद्र्यात आहे असे म्हटले जाते.

**९.७.२ दारिद्र्याची व्याख्या :**

समाजातील ज्या लोकांना सरासरी जीवनमानाच्या पातळीखाली जगावे लागते. त्याची गणना दारिद्र्यरेषेखाली केली जाते. यासाठी समाजातील विषमतेचे अस्तित्व लक्षात घेतले आहे.

**सारांश :** "अन्न, वस्त्र, निवारा, अशा जीवनावµयक मुलभुत गरजांची पुर्तता करण्याची क्षमता नसणे म्हणजे दारिद्र्य होय."

**९.७.३ दारिद्र्याची वैशिष्ट्ये :**

१. दारिद्र्याची कारणे आणि परिणाम दारीद्र्यातच असतात. प्र. नकर्सच्यामते, देश दारिद्र्य आहे. कारण तो दारिद्र्यात आहे आणि हे दारिद्र्याचे दृष्टचक्र फिरत असते.

२. प्र. विन्सेल यांनी जिनेव्हा - परिषदेत म्हटले आहे दारिद्र्य व आजारपण हे दृष्टीचक्रातील कर्मबृद्ध चालणारे प्रकार आहेत. लोक दरिद्री झाले. कारण ते आजारी होते. सतत आजाराने त्यांना दारीद्र्य येत राहिले.

३. दारिद्र्य आरंभापासून आतापर्यंत वर्तुळाकार क्रीया व प्रतिक्रिया करीत वाढत राहते.

४. दारिद्र्याचा प्रभाव व परिणाम संचयी स्वरूपाचा प्रवेग तत्वानुसार घडतो.

५. दारिद्र्य ही सतत चालणारी प्रक्रीया गुणात्मकरित्या करिता वाढते.

६. दारिद्र्याची सुरूवात नकारात्मक घटकातून होते.

७. दारिद्र्य हे प्रभावित करणार्या घटकांना खालच्यापातळीवर ढकलते.

८. दारिद्र्यात भांडवलनिर्मिती कमी होते.

९. कमी बचत व कमी गुंतवणूक क्षमता त्यामुळे भांडवलनिर्मिती कमी राहते.

१०. दारिद्र्यामुळे लोकांचे वास्तव उत्पन्न कमी पातळीचे असते.

११. अपूर्ण भांडवल - भांडवलाची कमतरता हे दारिद्र्याचे एक कारण ठरते.

१२. दारिद्र्यातील व्यक्तीची क्रयशक्ती कमी असते.

१३. बाजारपेठेच्या अपूर्ण विकासामुळे दारिद्र्यात वाढ होते.

१४. आर्थिक विषमता आणि दारिद्र्य ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू होत.

### ९.७.४ जागतिक आर्थिक तुलना :

अविकसीत देशात मोठ्या प्रमाणात विषमता आढळून येते पुढे काही महत्वाच्या देशांची तुलना केली आहे.

**निवडक देशांतील उत्पन्नाचे वाटप :**

(वितरणात शेकडा दर)

सर्वांत कमी २०%

ब्राझील - २.१ इंग्लड ४.१ चीन, ६-४, अमेरिका - ३६-७ पाकिस्तान ८.४, भारत ८.८, श्रीलंका ८.९

वरील पत्रकाचा अभ्यास केल्यानंतर काही महत्वाचे निष्कर्ष दिले आहेत.

१. ब्रझील व मेक्सिको या देशात उत्पन्नातील विषमता अधिक आहे.

२. इंग्लंड, स्वित्झर्लंड व चीनमध्ये उत्पन्नातील विषमता मर्यादित प्रमाणात आढळते.

३. पाकिस्तान, भारत व श्रीलंका या देशांत ती कमी प्रमाणात आढळते.

४. लॅटीन अमेरिका, आशिया व आफ्रिका खंडातील साधारणतः ३४% लोकसंख्या ही दारिद्र्य रेषेखाली येते.

५. आशिया खंडातील चीन वगळून भारत, पाकीस्तान, बांग्लादेश, श्रीलंका जेथे जगातील ५५% लोकसंख्या राहते. तेथील ७५% लोकसंख्या लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली राहत होती.

६. दरडोई उत्पन्न कमी असणे हा घटक दारिद्र्याच्या समस्येशी निगडीत आहे. त्याचप्रमाणे उत्पन्नातील वितरण हाही महत्वाचा घटक आहे. विशेषतः दारिद्र्य ही संकल्पना निरपेक्ष दारिद्र्यात येत.

७. साधारणतः दारिद्र्य असलेल्या लोकसंख्येचे आणि वास्तव्य ग्रमीण क्षेत्रात जमीनीच्या मालकी हक्काच्या विषमतेने हे दारिद्र्य उद्भवते, देशाच्या आर्थिक विकासाचा लाभ या दारिद्र्यरेषेखालील जनतेला पुरेसा मिळत नाही.

### ९.७.५ दारिद्र्याची कारणे :

**१) वेगाने वाढणारी लोकसंख्या :**

गेली ५० वर्षे जगातील लोकसंख्या वाढ दरवर्षी ३.२% राहिला आहे. याचा परिणाम उपभोग्य वस्तुंची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

munotes.in

**२) साधन सामुग्रीचा अपुरा वापर :**

लोकांत असणारी छुपी बेकारी व उघड बेकारी याबरोबर शेतीचा पूर्ण क्षमतेने वापर होत असल्याने ग्रमीण भागातील लोकांचे उत्पन्न कमी म्हणून राहणीमान कमी दर्जाचे आढळते.

**३) भाववाढ :**

जगातील सातत्याने वाढणार्या किंमतीमुळे गरीब लोकांच्या वास्तव उत्पन्नात क्रयशक्तीत मोठी घट होते. गरीबांना वाढत्या किंमत पातळीमुळे आपल्या उत्पन्नाच्या ७०% ते ८०% उत्पन्न अन्न धान्यावर खर्च करावे लागत असल्याने वस्तुंचा उपभोग घेता येत नाही.

**४) सामाजिक घटक :**

जगातील सामाजिक वातावरण वेगवान आर्थिक विकासात मोठा अडथळा निर्माण करते. त्यामुळे व्यावसायिक गतिशिलता कमी राहून दारिद्र्यात खितपत पडतात.

**५) शिक्षणाचा अभाव :**

जगात काही भांगांत शिक्षणाचा प्रसार काहीसा वाढला असला तरी अजूनही ग्रमीण भागात निरक्षरता मोठ्या प्रमाणात शिक्षण धोरणात व्यावसायिक शिक्षणाकडे दुर्लक्ष झाल्याने बेकारी व दारिद्र्य हे दोन राक्षस जागतिक अर्थव्यवस्थेत आढळतात.

**६) नैसर्गिक आपत्ती :**

अवर्षण, भूकंप, अतिवृष्टी इ. मुळे लोकांच्या उत्पादनात स्थैर्य राहत नाही. त्यामुळे सातत्याने दारिद्र्य आढळते.

**९.७.६ दारिद्र्य निर्मुलनासाठी उपाययोजना :**

**१) जमीनीचे पुर्नवाटप :**

जमीनदारीचे उच्चाटन कुळ कायदे, भूधारणेंवर, कमाल मर्यादा इ. कायद्यामुळे जमीनीवर राबवणार्या गरीबांना जमीनीची मालकी मिळून उत्पन्न वाढवण्यात प्रेरणा मिळते.

**२) जमीन लागवडीखाली :**

ओसाड व पडीक जमीन लागवडीखाली आणून तसेच अति ओलीत व्यवस्थेमुळे नापीक झालेल्या जमीनी लागवडी योग्य केल्याने ग्रमीण दारिद्र्य कमी व्हायला मदत होते.

**३) श्रमप्रधान तंत्राचा स्वीकार :**

शेती व्यवसायात श्रमप्रधान तंत्राचा अवलंब केल्यास छोटे शेतकरी, सीमांत शेतकरी व भूमीहीन शेतमंजूर यांना रोजगार उपलब्ध होऊन दारिद्र्य कमी होण्यास सहाय्य होते.



munotes.in

**४) लोकसंख्या नियंत्रण :**

लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवल्यास दारिद्र्य कमी होण्यास मदत होते. लोकसंख्येवर नियंत्रण ठेवल्यास रोजगार मोठ्या प्रमाणात उपलब्ध होते. लोकसंख्येवर नियंत्रण ठेवल्यावर बेरोजगारी कमी होते.

**५) शिक्षण प्रसार :**

आधुनिक शिक्षणावर भर दिला पाहिजे. शिक्षणावर भर दिल्यास देशांच्या प्रगती चालना मिळते. शिक्षणामुळे आर्थिक प्रगती मोठ्या प्रमाणात भर पडते.

## ९.८ विकास आणि पर्यावरण

जगात पर्यावरणाचा हळूहळू र्हास होत चालला आहे २१ व्या शतकाच्या सुरूवातीला संपूर्ण भेडसावणारा प्रश्न आहे. निसर्गाने निर्माण केले त्या लाखो वर्षापासूनच्या नैसर्गिक परिस्थितीला पर्यावरण असे म्हणतात.

पर्यावरणामध्ये हवा, पाणी, जमीन, पशूपक्षी सजीव प्रणी जंगले झाडे अशा अनेक गोष्टीचा समावेश आहे. निसर्ग या सर्व गोष्टीमध्ये एक प्रकारे समतोल राखीत असतो. हजारो वर्षाच्या कालखंडामध्ये काही गोष्टी विनाश पावल्या आहेत. अठराव्या शतकात औद्योगिक क्रांतीस इंग्लडमध्ये सुरूवात झाली. कारखानदारीची चक्रे फिरू लागली. व त्यामुळे आमूलाग्र बदल झाला. तसेच माणसाच्या गरजाही वाढल्या. गरजांची पूर्तता करण्यासाठी मानव नैसर्गिक साधन संपत्तीचा उपयोग करू लागला.

### ९.८.१ औद्योगिकीकरणांनंतर पर्यावरणात झालेला बदल :

जगातील प्रगत राष्ट्रात सातत्याने गेल्या दोनशे वर्षापेक्षा जास्त काळात सतत कच्च्या वस्तु नैसर्गिक साधन संपत्तीचा अमर्यादा वापर केल्याने आज व यानंतरच्या काळात साधनसंपत्तीची कमतरता जाणवू लागेल. खनिज संपत्ती उर्जा साधनांचे साठे झपाट्याने संपत चालले आहेत. त्याचा प्रत्यक्ष औद्योगिक उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता असून आर्थिक विकासास खिळ बसत आहे.

१८व्या शतकातील औद्योगिक क्रांतीने अनेक कारखाने सुरू केले. या कारखान्यमधून धूर, विषारी वायु दुर्गंधी, रासायनिक द्रव्ये वातावरणात सोडली जाऊ लागली. त्यामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडून सजीव सृष्टी आणि मानवी जीवनाला धोका निर्माण झाला. तेव्हा या समस्येचे निराकरण करण्याचे प्रयत्न केले जाऊ लागले. संयुक्त राष्ट्र संघटनेसारख्या आंतरराष्ट्रीय संघटना बरोबर जगातील प्रत्येक राष्ट्राला जाणीव निर्माण झाली आहे. सर्व राष्ट्रे पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर प्रयत्नशील आहे.

munotes.in

### ९.८.२ जागतिक स्तरावर पर्यावरणाचे रक्षणाचे प्रयत्न :

विकास व पर्यावरण यांचा मेळ कसा घालवायचा हा आज विविध क्षेत्रांतील तंज्ञापुढे एक महत्त्वाचा वादग्रस्त प्रश्न झालेला आहे. संयुक्त राष्ट्र संघाला UNO पर्यावरणाच्या संतुलनास गंभीर धोका निर्माण झाला आहे, याची जाणीव झाली.

१९५० नंतरच्या काळात विकसनशील देशांच्या संदर्भात आर्थिक विकासाचे स्वरूप त्यांचे मापदंड, विकासधोरण या गोष्टींना महत्व प्रप्त झाले १९६० नंतरच्या दशकात देशांतील बहुतेक लोकांच्या मूलभूत गरजेचे संरक्षण संवर्धन याचा विचार करून विकासाचे स्वरूप मापदंड ठरविले पाहिजेत यावर भर देण्यात आला.

१९७२ साली स्टॉक होम या ठिकाणी संयुक्त राष्ट्र संघाच्या सदस्य राष्ट्रांची एक शिखर परिषद भरली. या परिषदेत मानवी पर्यावरणाचा विचार केला गेला. संयुक्त राष्ट्रसंघाच्या पर्यावरण कार्यक्रमाची (Unites Nations Environment Programme) रूपरेषा निश्चीत केली गेली व या कार्यक्रमाच्या अमंलबजावणीला इ.स. १९८९  साली सुरूवात झाली.

### ९.८.३ पर्यावरणाच्या र्हासास पुढील गोष्टी जबाबदार आहेत :

१) वेगाने होणारी जंगलतोड

२) वाळवंटाची वाढ

३) तापमानात होणारी वाढ

४) वारंवार येणारे पूर व दुष्काळ

५) पृथ्वीभोवती असणार्या ओझोन वायुच्या आवरणास पडलेले छिद्र

६) वन्यप्रणी जीवनाचा र्हास अशा सर्व गोष्टीचा विचार स्टॉकहोम परिषदेमध्ये केला होता.

### ९.८.४ आर्थिक विकास व त्याचा पर्यावरणावर होणार्या परिणामांची दखल :

यांची दखल घेण्यात आली. नैसर्गिक स्थिती, प्रदूषणे, पर्यावरण व संबंधित विषयांचा आंतरराष्ट्रीय विषय पत्रिकेत समावेश केला आहे. १९९२ मधील रिओ - डी- जानेरो येथील शिखर परिषद.

या परिषदेलाच वसुंधरा परिषद असे ही म्हणतात. या परिषदेत जगातील १७२ राष्ट्रांचे प्रितनिधी हजर होते. ब्रझीलची राजधानी रिओ-डी-जाने-रो या ठिकाणी ही परिषद भरविण्यात आली होती. त्या पाठी मागे तीन उद्धेश होते.

ब्रझीलमध्ये बेजबाबदारपणे पर्यावरणास फार मोठा धोका निर्माण झाला होता.

दुर्मिळ प्रणी आणि वनस्पती यांचा नाश करून जंगल तोड झाली होती.

ब्राझीलमध्ये अमेझॉन नदीचे खोरे असल्यामुळे या प्रदेशातील पर्यावरण समस्यांचा त्या निमित्ताने विचार करण्यात आला. वसुंधरा बचाव अशी घोषणा या परिषदेत आली.

### ९.८.५ पर्यावरणीय जागतिक समस्याः

१) ओझोन वायुच्या थराचा नाश

२) जागतिक तापमानात वाढ

३) ब्रझील व आग्नेय आशियातील अरण्यांचा नाश

४) स्कॅडीनेव्हीयातील आम्ल पर्जन्य

५) आंतरराष्ट्रीय पाण्याचे प्रदुषण

६) धोकादायक कारखान्यांच्या स्थानांचे स्थलांतर

### ९.८.६ सार्क परिषद :

२४ मार्च १९९५ रोजी सार्क (Saarc) संघटनेतील भारत, पाकीस्तान, बांग्लादेश, श्रीलंका, व मालद्वीप या राष्ट्रांनी सागरी पर्यावरण सुरक्षित ठेवण्यासाठी एककृती कार्यक्रम जाहीर केला.

दक्षिण आशियातील सागरी किनार्यांचे पर्यावरण संरक्षण करण्याचे ठरविते.

### ९.८.७ बँकॉक परिषद :

वृक्षतोड थांबविण्यासाठी नोव्हेंबर १९९५ मध्ये बँकॉक येथे आशिया पॅसिफिक परिषद भरविण्यात आली. या परिषदेमध्ये वृक्षतोड नागरी समस्या जंगलातील वणवे व पर्यावरण संरक्षण अशा कार्यक्रमामध्ये सामान्य जनतेचा होणारा सहभाग अशा विषयांवर चर्चा केली गेली.

### ९.८.८ भारतातील पर्यावरण समस्याः

भारतातील पर्यावरणीय समस्यांचे उग्र स्वरूप हे मुखत्वेकरून वाढती लोकसंख्या व तंत्रज्ञानाची वाढ यात आढळून येते तंत्रज्ञानाच्या विकासामुळे कारखानदारीत वाढ होत आहे त्यामुळे नागरीकरणात झोपडपट्ट्या जल, हवा, ध्वनी व भूप्रदूषणात वाढ होत आहे.

भारतातील पर्यावरणीय समस्यांचे उग्र स्वरूप व त्यावरील समस्या, भारतातील प्रमुख पर्यावरणीय समस्याः हिमालयातील पर्वत उताराचा होणारा र्हास एकांकूरी बियाणांचा वापर गंगा-यमूना जलप्रणालीचे प्रदुषण खाडी जलसंवर्धन भारताच्या वायव्येकडील वाळवंटीकरण भारत सरकारने पर्यावरण रक्षणासाठी केलेले कार्यः वन्यजीवन संरक्षण कायदा -१९७२ पाण्याचे प्रदूषण नियंत्रण - १९७४ हवेचे प्रदुषण नियंत्रण - १९८१ पर्यावरणीय ऑडिटची सुरूवात - १९९२ राज्यपातळीवरील प्रदुषण नियंत्रण समित्याची घोषणा

### ९.८.९ पर्यावरणाच्या र्हासाचे परिणाम :

१. पर्यावरणाच्या र्हासामुळे पावसाची अनियमितता वाढली आहे. पाऊस लवकर पडणे, अवेळी पडणे व अवर्षण या आपत्ती वृक्षतोड व जंगल संपत्ती नष्ट झाल्यामुळे आल्या आहेत.

२. पर्यावरणाच्या र्हासामुळे पावसाची अनियमितता आणि पृथ्वीच्या तापमानात असाधारण वाढ होत असल्याचे आयर्स (अर्जेटीना) येथे १९८९ येथे झालेल्या परिषदेत पर्यावरण हानीमुळे पृथ्वीचे तापमान दरवर्षी ०.३ अंशानी वाढत आहे. असे मत व्यक्त केले.

३. प्रचंड प्रमाणात जमिनीची धूप होऊन धान्योंत्पादन  जंगले यांचा नाश होईल.

४. जल वायु प्रदुषणामुळे रोगराईत व मानवी मृत्यूत वाढ होईल.

५. वायु प्रदुषणांमुळे ताजमहाल, वेरूळ - अजिंठा लेणी एलिफंटा लेणी इ. सुंदर शिल्पांचा नाश होण्याची शक्यता असते.

### ९.८.१० जंगलतोड / निर्वृक्षीकरण (Deforstration) :

जगाच्या पृष्ठभागापैकी फक्त २०% भाग हा जमीन आहे. असे म्हटले जाते. त्यातील १३% समिशतोष्ण आणि ७% अतिउष्ण वने मानव जीवन निरंतर आणि सुरक्षित ठेवण्यास उपयुक्त ठरतात. कारण ही दोन भागातील पृथ्वीची फुफुसे आहेत. ज्यातून प्रचंड प्रमाणात कार्बन डाय ऑक्साइड शोषली जाते. आणि ते जर शोषल गेला नसता तर मानवास हरितग्रह परिणामास सामोरे जावे लागले असते.

म्हणून मानवी जीवनाच्या दृष्टीकोणातून वने प्रचंड गुंतागुंतीच्या आणि तेवढीच एक नाजूक परिसंस्था आहे. त्यामुळे ही वने वाढवणे मानवाचे कर्तव्य आहे.

जंगलतोड किंवा निर्वृक्षीकरण म्हणजे वने किंवा जंगले नष्ट करून ती जागा इतर गोष्टीसाठी वापरणे.

### ९.८.११ जागतिक समस्याः

पृथ्वीच्या पृष्ठभागावरील जमीनीच्या फक्त ७% भाग पावसाळी वने (Rain Forest) आहेत. तरीही त्यात जगातील विविध प्रकारचे दोन तृतीयांश प्रणी व वनस्पती सापडतात हा हे औषधासाठी फार महत्वाचा घटक आहे.

जगातील उष्ण कटिबंधातील ५०% वनांसाठीची जमीन ही इतर कामासाठी वापरली जाऊन दरवर्षी ११ दशलक्ष हेक्टर वने नष्ट केली जातात. या वनांच्या ठिकाणी शेती केली जाते. तसेच मोठे विस्तृत क्षेत्र गुराठोरांसाठी वापरले जाते आणि काही भागात प्रकल्प राबविले जातात.

जंगल तोड / निर्वृक्षी करणामुळे मानवी विकासासाठी उपयुक्त असणारे महत्वाचे वन - उत्पादन नाहीसे होते. तसेच विविध वनस्पती आणि प्रण्यांचे वंशज नष्ट होतात.

जंगलतोडीमुळे करोडो लोकांचे जीवन धोक्यात येते कारण त्यामुळे जमीनीची धूप होते. पुरांचे प्रमाण वाढते. तसेच अवर्षण स्थिती निर्माण होऊन सर्व समाज व संस्कृतीची उलथापालथ होते.

जंगलतोडीमुळे स्थानिक तसेच जागतिक वातावरणात फेरबदल घडू शकतात. यात काही वृक्षांची संख्या कमी होते.

जंगलतोड / निवृक्षीकरण थांबविण्यासाठी किंवा कमी कमी करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. यात प्रमुख्याने म्हणजे जंगले / वने सुरक्षित करावीत. त्याचे विशेष व्यवस्थापन करावे.

### ९.८.१२ आंतरराष्ट्रीय प्रयत्न :

जंगलतोड थांबविण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर मोठ्या प्रमाणात प्रयत्न करण्यात आले. सन १९८५ मध्ये अन्न आणि शेती संघटनेने (FAO) टॉपीकल फॉरेस्ट ॲक्शन प्लॅन तयार करून वने संरक्षित मदत देण्याचे नियोजन केले होते.

सन १९८७ मध्ये ४८ देशांनी एकत्रितपणे आंतरराष्ट्रीय ट्रॉपीकल टिंबर ऑर्गबाटाझेशन (ITTO) स्थापन केले ज्यातून टिंबरचे उत्पन्न वाढविण्याचे प्रेत्साहन दिले. सन १९९२ मध्ये अमेरिका सिनेटमध्ये बुश व्हाईट हाऊसचा प्रस्ताव होता. ज्यातून त्यांनी जंगलतोड बहिष्कृत करण्यासाठी १५० दशलक्ष डॉलर वने कार्यक्रमासाठी देऊ केले होते. परंतु यावर विविध मते मांडून हा करार झाला नाही.

### ९.८.१३ जंगल तोडीची परिणाम :

जंगलतोडीमुळे कार्बनवायु व इतर वायांचे प्रसारण वातावरणात वाढते. उष्ण कटिबंधीय वनात ४६० ते ५७५ अब्ज टन कार्बन साठवलेले आहे. ज्यावेळी झाडे तोडली जातात. तेव्हा या झाडांत साठवलेला कार्बन वातावरणात सोडला जातो.

१९८५-१९९० च्या दरम्यान झालेल्या जंगलतोडी आजतागायत १,२२० कोटी टन कार्बन  वायु वातावरणात सोडला गेलेला आहे. आज सुमारे १,६०० अब्ज टन कार्बन वायु दरवर्षी वातावरणात सोडला जात आहे कार्बन.

## ९.९  स्त्री मुक्ती चळवळ

सजीवांच्या विश्वात मानवास त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण अस्तित्वामुळे काही हक्क व अधिकार प्रप्त होतात. मानवातील स्त्री पुरूषांना त्यांची निसर्गदत्त प्रकृत्ती कर्तव्य समान हक्क संभवतात. परंतु स्त्री व पुरूष यांना समान हक्क मिळालेले दिसत नाही. पूरातन काळापासून पुरूषाने आपल्या शारीरिक सामर्थ्याच्या हक्कांद्वारे स्त्रीवर वर्चस्व गाजविले आहे.

शतकातूशतके पुरूषाचे असे स्त्रीवर निरंकुश वर्चस्व प्रस्थापित केल्यानंतर स्त्रीमध्ये न्यूनतेची एक समान मानसिकता निर्माण झाल्याचे दिसून येते. किंबहुना स्त्रीवर वर्चस्व गाजविण्याचा पुरूषाचा अधिकार आहे. अशी स्त्रीची गाढ समजूत झाल्याने आढळून आले

आणि पुरूषाने या समाजास खतपाणी घालुन स्त्रीला गुलाम करून टाकले. स्त्रीची ही स्थिती आधुनिक काळापर्यंत तशीच कायम होती.

**९.९.१ स्त्रीवाद :**

मुख्यतः स्त्रीयांच्या हक्कांशी स्त्रिवाद निगडीत आहे स्त्री आणि पुरुष यांच्यातील संबंधातून व पुरूषी वर्चस्वातून स्त्रीयांच्या हक्कांची समस्या निर्माण झाली. स्त्रीयांनी आपल्या हक्कांची समाजाकडे पर्यायाने पुरूषप्रधान समाजाकडे मागणी केली त्यामुळे समाजात स्त्रीयांचे स्थान काय असावे असा प्रश्न निर्माण झाला. या दृष्टीकोनातून स्त्रीवादांचे दोन अर्थ सांगितले जातात.

ऐतिहासिक दृष्टिकोनातून वर्णनिष्ठ स्त्रीपुरुष संबंधातून पुरुषातून स्त्रीवर प्रस्थापित करून तिला कायम दुय्यम भूमिका स्वीकारण्यास भाग पाडले आहे. या वर्चस्वाविरूद्ध स्त्रीने धार्मिक किंवा नैतिकदृष्ट्या पुरुषांशी समान वागणूक मिळण्याची मागणी केली.

दुसऱ्या आदशर्वादी संबंधाचा यामध्ये स्त्रीपुरूषाचे आदशर्वादी संबंध कथाकादंबर्यातून आणि काल्पनिक गोष्टीतून सांगितले जातात. यात स्त्री - पुरूष समान आहे असे सांगितले जाते.

म्हणून डेल्मर ह्या राजकीय विचारवंताने स्त्रीवादीचा संकल्पना स्पष्ट करताना प्रतीपादन केली की "स्त्री-पुरूष संबंधातील परस्पर विरोधातून स्त्रीवाद चळवळ निर्माण झाली. आपल्यावर होणार्या जुलूमाविरूद्ध स्त्रीवादी चळवळ निर्माण झाली. आपल्यावर होणार्या जुलुमाविरूद्ध तिने केलेल्या प्रितवाद म्हणजेच स्त्रीवाद होय."

**९.९.२ स्त्रीहक्कांचे स्वरूप व एतिहासिक पार्श्र्वभूमी :**

जगात स्त्रीयांचा दर्जा देशनिहाय वेगवेगळा आहे. तसेच त्या त्या देशातील समानता ही स्त्री यांच्या स्थानासंबंधी वेगळे मापदंड आहेत. काही देशात पारंपारिक समाज आहे की स्त्रिया आर्थिक, मानसिक, शारीरिकदृष्ट्या पुरूषांपेक्षा कुमकुवत आहेत.

भारतीय स्त्रीचे स्थान प्रचीन काळापासून दुय्यम मानले गेले आहे. वेदोत्तर काळात हिंदूधर्म शास्त्राचे मापदंड समजल्या जाणार्या स्मृती वाङमयात एखाद्या गुलमासारखे आढळते. स्त्रीचे वैवाहिक जीवन म्हणजे एक उपभोग्य वस्तु प्रजोत्पादनाचे साधन असेच त्या काळात समजले जात असे.

राष्ट्रयूगीन जगाच्या इतिहासात स्त्रीयांना समाजात वैवाहिक व वारसासंबंधी काही हक्क होते. ग्रीक संस्कृतीत स्त्रीयांचे स्थान एखाद्या नोकरासारखे होते. मध्ययुगीन युरोपमध्ये मुलींना धार्मिक शाळांमध्ये थोडेफार शिक्षण दिले जात असे. इंग्लडच्या "कॉमन लॉ" मध्ये रोमन व कॅनल (चर्च) कायद्याने स्त्रीयांवर असलेल्या कडक संघटनाच्या तरतुदी समाविष्ट करण्यात आल्या होत्या. विल्यम ब्लॉक स्टोन याने आपल्या गाजलेल्या. 'कॉमेट्रीझ ऑफ द लॉ ऑफ इंग्लड" या ग्रंथात स्त्रीयांच्या कायदेशीर दुय्यम स्थानावर बराच भर दिला आहे.

### ९.९.३ स्त्री हक्क चळवळ :

पुरूषी वर्चस्वाला विरोध करणार्या भूमीकेतून स्त्री हक्क चळवळ जन्माला आली या चळवळीचे बीज १५व्या शतकात सामाजिकदृष्ट्या व्यापक संधी मिळवण्यासंबंधी काही स्त्रीयांनी केलेल्या लेखनातून दिसून येते. त्यानंतर १८व्या शतकात औद्योगिक क्रांतीमुळे समाज व्यवस्थेची परंपरागत रचना बदलत जाऊन संरजामदारी जमिनदारी समाजाएवजी भांडवलप्रधान समाज व्यवस्था अस्तित्वात आली  औद्योगिक क्रांतीचा वेगळा परिणाम समाजातील मध्यम वर्गीय व उच्च वर्गीय स्त्रीवर झाला.

मध्यमवर्गीय स्त्रींयांच्या छोट्याशा विश्वात स्त्रीयांच्या हक्कांच्या चळवळीने थोडीशी जान आणली. पण या चळवळीत खरा जोश निर्माण झाला जेव्हा संतती नियमन सक्तीचे प्रथमिक शिक्षण व विवाह पूर्व मुलींना नोकरीची संधी याचा विचार होऊ लागला. १९व्या शतकाच्या शेवटच्या दशकात स्त्रीयांनी यासंबंधी आपली मते व विचार ठामपणे मांडावयास सुरूवात केली. मध्यमवर्गीय स्त्री यांनी आपल्या मिळालेल्या मोकळ्या वेळेच्या हक्कप्रप्तीसाठी प्रयत्न केला. औद्योगिक क्रांतीने त्यांच्यावर उपकार केले जाते असे म्हटले जाते.

### ९.९.४ जगातील स्त्री हक्क चळवळीः

#### १) ब्रिटन :

फ्रेंच राज्यक्रांतीच्या काळात ब्रिटनमध्ये ही स्त्री हक्क चळवळ सुरू झाली. या चळवळीचे नेतृत्व करणार्य "मेरी-ब्लुस्टोन कॉम्ट" या स्त्रीने १७९२ मध्ये स्त्रीहक्कांचे समर्थन करणारा "विडिकेशन ऑफ द राईटस ऑप वुमन" प्रिसद्ध केला. तिने या ग्रंथांत स्त्री जातीची अवस्था समाजापुढे मांडून धार्मिक व नैतिकदृष्ट्या स्त्रीची प्रितष्ठा राखली गेली पाहिजे ठासून प्रितपादन केले आणि यासाठी स्त्रियांना शिक्षण देणे आवश्यक आहे असे सांगितले.

"विल्यम थॉमसन" या आणखीन एकाच समाज सुधारकाने स्त्री हक्कांच्या चळवळीस महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्याने १८२५ साली लिहिलेल्या "चॅपियल ऑफ वन हाफ ऑफ ह्यूमन रेस वुमन" या ग्रंथात स्त्रियांचे आर्थिक स्वातंत्र्य सामाजिक सुरक्षितता, मुलांची जबाबदारी काम मिळण्याचा हक्क इ. विस्तृत चर्चा केली त्यांच्या लेखनामुळेच भांडवलशाहीच्या विरोधात स्त्री मुक्तीची चळवळ करणारा पहिला ब्रिटिश समाजातील विचारवंत गणला जातो.

१९व्या शतकाच्या उत्तरार्धात समाजातील स्त्रियांचे स्थान प्रभावी करण्यासाठी त्यांना मतदान हक्क देण्याची मागणी पुढे आली. या मुद्यावरून "मार्डिया बेकर" या विदुषिने १८६७ मध्ये पार्लमेंटनेच्या निवडणुकीसाठी आपले नाव नोंदवले. यापूर्वी १८५७ मध्ये पार्लमेंटने घटस्फोट कायदा मंजूर केला होता. या तशा किरकोळ वाटणार्या घटना असली स्त्रियांच्या मतधिकाराची चळवळ पुढे नेण्यास त्या साह्यभूत ठरल्या.

स्त्रीहक्क चळवळीस खरा वेग १८८० नंतर ब्रिटनमध्ये जी समाजवादी चळवळ सुरू झाली त्यावेळी त्याला समाजवादी चळवळीस स्त्रीहक्क हा एक महत्त्वाचा मुद्दा होता. जॉन स्डअर्डन या राजकीय विचारवंताने दसब्जेकश ऑफ वुमन हा ग्रंथ लिहून वैचारिक पाया.

**२) फ्रान्स :**

स्त्री हक्क चळवळीस १८व्या शतकातील अमेरीका राज्यक्रांती व फ्रेंच राज्यक्रांती या दोन ऐतिहासिक घटनेमुळे स्फुर्ती मिळाली. स्त्रियांनी जास्तीत जास्त मानवी हक्कांची मागणी केली. फ्रेंच राज्यक्रांतीच्या काळात काम करी व शेतमजुरी करणार्या स्त्रियांनी धान्याच्या भाववाढी विरोधी नॉमिडे प्रंतात उठाव केला आणि पावांचा पुरवठा करणार्या गोफर्सच्या विरोधी व्हर्साय येथे मोर्चा नेला. त्याही पुढे जाऊन ऑलिम्पिक - द - गॉगर्स या प्रिसद्ध नाट्यक्रमीने स्त्रियांना हक्काचा जाहीरनामा (डिक्लेरेशन ऑफ द राईट ऑफ वुमेन) प्रस्तुत केला. या जाहिरनाम्यात तिने पुरूषांनी बळाच्या जोरावर मिळवलेले सर्व हक्क रद्द करण्याची मागणी केली.

**३) अमेरिका :**

गुलामगिरी विरूद्ध दुभागलेली चळवळ आणि स्त्री हक्क चळवळ अमेरिकेत साधारणपणे एकाच वेळेस सुरू झाली. इ.स. १८४८ मध्ये शेकडो स्त्रिया आणि स्त्री हक्कास पाठिंबा दशर्विणारे काही पुरूष मंडळी, स्त्रियांच्या नेत्या एलिझाबेथ कॅडीन्स्टेम व ल्युट्रेशिया मॉड यांनी न्यूयॉर्क शहरात सेनेला कॉल्स येथे आयोजित केलेल्या मेळाव्यात जमल्या आणि त्यांनी त्या मेळाव्यात सेनेला कॉल्स जाहिरनामा प्रिसद्ध केला. सेनेला कॉल्स जाहिरनामा सेनेला कॉल्स जाहिरनामा स्त्री हक्क चळवळीतील एक अत्यंत महत्वाचा दस्तावेज मानला जातो. पुरूषांनी स्त्रियांना कशा प्रकारचे अन्याय, अत्याचार, नियंत्रणे व बंधने घातली आहेत. त्याचा तपशीलवार आढावा या जाहीरनाम्यात नोंदला होता.

या सेनेला कॉल्सच्या मेळाव्यात स्त्रियांनी काही प्रमुख मागण्या केल्या त्या स्त्रियांना मालमत्ता संपत्तीचा वाटा, मुलांचे पालन, घटस्फोटाचा हक्क, व्यवसाय, स्वातंत्र्य, समाधानकारक वेतन, कार्यस्थळी निरोगी वातावरण इ. चा समावेश होतो.

त्यापूर्वी ओहियो राज्यामध्ये ओबलिन का@लेजमध्ये स्त्रियांचा प्रवेश देण्यात आला.

हा स्त्रियांसाठी असलेली यांच्या याचवर्षी इ.स. १८९० मध्ये सर्व स्त्रीहक्क संघटनांनी एक येऊन त्यांनी 'नॅशनल अमेरिकन वुमन सिफ्रेन असोसिएशन' स्थापन केली. १९२०-६० या स्त्री हक्क चळवळीची चांगलीच पिछेहाट झाली. १९६०च्या दशकात पुन्हा अमेरिकेत स्त्री हक्क चळवळीचे पुर्नजीवन होण्याची चिन्हे दिसू लागली.

इ.स. १९६० व १९७० च्या शतकाच्या मध्यास चळवळ जोर धरू लागली. अमेरिकन सरकार आपल्यासाठी भरीव असे काहीच करीत नाही हे लक्षात आल्यानंतर १२ घटकराज्यांतील ३२ स्त्रीनेत्यांनी 'बेटी फ्रिवन मिस्टिक' या प्रिसद्ध ग्रंथाच्या लेखकांच्या अध्यक्षतेखाली 'नॅशनल ऑरगॉन नायझेशन फॉर वूमन' ही स्त्रियांची राष्ट्रीय संघटना २९ ऑक्टो. १९६६ रोजी स्थापन केला.

स्त्री हक्क चळवळीतील आणखीन एक महत्वाचा टप्पा म्हणून १९६८ मध्ये स्त्रियांसाठी मानवी हक्क (Human Rights for Women) या संघटनेचा उल्लेख करावा लागेल. १९६९ मध्ये अमेरिकेच्या क्लूलॅड राज्यातील वुमन्स इक्विटी ॲक्शन लीग या संघटनेने

शिक्षण, नोकरी, व्यवसाय यात स्त्रियांना जी भेदभावक वागणूक दिली जाते. सविस्तर करण्यात यावी अशी मागणी केली.

१९७१ मध्ये वॉशिंग्टन येथे नॅशनल फेमस पोलिटिकल कॉक्स ही स्त्रीयांची राजकीय संघटना स्थापन झाली आणि तिने १९७१ ते १९७४ मध्ये निवडणूकीमध्ये भाग घेतला.

**४) भरतातील स्त्री हक्क चळवळ :**

भारतात १९व्या शतकात आर्य समाज व ब्रह्मो समाज या संघटनांनी स्त्रीविषयक कायदे व स्त्रीशिक्षण या संदर्भातील स्त्रियांच्या सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी महिला मंडळे स्थापन केली. त्याचप्रमाणे राजा राम मोहन रॅाय व इश्वरचंद्र विद्यासागर, म. फुले, स्वामी दयानंद सरस्वती, केशवचंद्र सेन, लोकहीतवादी गोपाळराव हरी देशमुख इ. समाज सुधारकांनी स्त्री सुधारणांना हातभार लावला.

विधवा विवाह, बालविवाह प्रितबंधक, स्त्री गर्भाची भ्रूण हत्याबंदी इ. प्रश्नांना या समाजसुधारकांनी लक्ष घालून बरीच सुधारणा केली.

म. फुले यांनी पहिली मुलींची शाळा १८४८ साली मुळातच स्थापन केली. १९१० मध्ये सरलादेवी चौधरानी यांनी भारत स्त्री महामंडळ स्थापन केली. इ.स. १९१७ साली "वूमन्स इंडियन असोसिएशन" मद्रास येथे स्थापन करण्यात आली. या संघटनेत १९ हजाराहून जास्त स्त्री सदस्य होते. All India women conference ने बालकांसाठी नर्सरी शाळा गरोदर काळात व बाळंत पणानंतर बरेच कार्य केले.

म. गांधीजींनी स्त्री सुधारणेमध्ये बराच रस घेतला होता. त्यांच्या प्रेत्साहानामुळे निषेध सभा (Picketing) आणि मोर्चे निदशर्नामध्ये स्त्रियांनी स्वातंत्र्य चळवळीत केलेले कार्य संस्मरणीय आहे.

भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर राज्य घटनेत पुरूषांच्या बरोबरीने स्त्रियांनाही कोणताही लिंगभेद न करता समान हक्क दिले. विशेष विवाह कायदा (१९५४) हिंदू विवाह कायदा व घटस्फोट कायदा (१९९६) हिंदू दत्तक विधान कायदा (१९५६) आंतरराज्य वारसा कायदा (१९५६) हुंडाबंदी कायदा (१९६१) इ. स्त्रियांच्या हितरक्षणांसाठी कायदे करण्यात आले. समान वेतन कायदा (१९७६) बालविवाह प्रितबंध दुरूस्ती कायदा (१९७८) फौजदारी दुरूस्ती कायदा (१९७८) कुटुंब न्यायालय कायदा (१९८४) इ. कायद्यांचा समावेश होता.

२० शतकाच्या अखेरच्या दशकात १९९० मध्ये नॅशनल कमिशन फॉर वुमेन्स ॲक्ट मंजूर झाल्याने स्त्रियांचे अनेक प्रश्न मार्गी लागले.

## ९.१० सारांश

जगाने २१ व्या शतकात पदार्पण केले आहे. २० व्या शतकातील अनेक समस्यांना तोंड देण्याची तयारी २१ व्या शतकात करावी लागणार आहे. बहुतांश समस्या जागतिक स्वरूपाच्या आहेत. तसेच त्या जीवनाच्या वेगवेगळ्या क्षेत्राशी संबंधित आहेत. अशा प्रकारे



munotes.in

नव्या शतकामध्ये पदार्पण करताना अनेक समस्या जगाला भेडसावत आहेत. या समस्या सोडविण्याकरीता जागतिक तसेच देशपातळीवर मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले जात आहे.

## ९.११ प्रश्न

प्र. १ जागतिकीकरणाचा जगावर झालेला परिणाम यावर निबंध लिहा?

प्र. २ स्त्रीमुक्ती चळवळीवर निबंध लिहा?

प्र. ३ टिपा लिहा.

१) लोकसंख्येचा विस्फोट

२) गरीबीची समस्या

३) जंगलतोड (निर्वृक्षीकरण)

## ९.१२ संदर्भ


१. प्रा.राजदरेकर / प्रा. गर्गे - आधुनिक जगाचा इतिहास - विद्या प्रकाशन, नागपूर

२. ना. सी. दिक्षीत- पश्चिमात्य जग - पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर

३. गायकवाड, कदम, थोरात - आधुनिक जगाचा इतिहास - भाग १ - श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर.

४. प्रा. हरिदास जाधव व प्रा. कल्याण चव्हाण - आधुनिक जगाचा इतिहास - अक्षरलेण प्रकाशन, सोलापूर.

५. डॉ. सुमन वैद्य - आधुनिक जग - श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर .

६. डॉ. सौ . शरावती शिरगावकर - आधुनिक युरोप - श्रीविद्या प्रकाशन, पुणे.

७. श. गो. कोलारकर - युरोपचा इतिहास - आनंद प्रकाशन, नागपूर

८. प्रा. जितेंद्र भामरे- आशियाचा इतिहास - शेठ प्रकाशन, मुंबई .

९. डॉ. रमेश गुप्ते व शे. रा. कुलकर्णी - आग्रेय आशियाचा इतिहास - परिमल प्रकाशन, औरंगाबाद

१०. डॉ. अनिलकठारे - आधुनिक चीन - कल्पना प्रकाशन, नांदेड .

११. डॉ. मु. बा. देवपुजारी - रशियाचा इतिहास - श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर

१२. डॉ. मु. बा. देवपुजारी - आधुनिक आशियाचा इतिहास - श्री मंगेश प्रकाशन , नागपूर

१३. डॉ. नि. वक्कानी - आधुनिक भारताचा इतिहास - श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर


munotes.in

१४. डॉ. जालिंदर भोसले - आधुनिक आशियाचा इतिहास - मुरलीधर प्रकाशन, पुणे

१५. डॉ. सुमन वैद्य व डॉ. शांता कोठेकर - भारताचा इतिहास - श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर

१६. Adolf Hitler - Mein Kampf - KRJ Book International, Delhi

१७. D. R. Sardesai and B. K. Gokhale - World History - Kitab Mahal Publication, Alahabad.

१८. M. D. David - Rise and Growth of Modern China.

१९. तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी - मराठी विश्वकोश - भाग २ व ९

२०. डॉ. शांता कोठेकर, अमेरिकेच्या संघराज्याचा इतिहास - श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर

२१. डॉ. सुमन वैद्य - रशियाचा इतिहास - श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.

२२. विस्टन चर्चील - दुसरे महायुद्ध - महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, १९७८.

२३. डॉ. हुकुमचंद जैन, डॉ.कृष्णचंद्र माथुर - आधुनिक जगाचा इतिहास - के. सागर प्रकाशन पुणे.

❖❖❖❖

munotes.in

# १०

## शाश्वत विकास

**घटक रचना :**

१०.० उद्दिष्ट्ये

१०.१. प्रस्तावना

१०.२. पार्श्वभूमी

१०.३. शाश्वत विकास म्हणजे काय ?

१०.४. शाश्वत विकासाची आवश्यकता

१०.५. शाश्वत विकास उद्दिष्टे-२०१५

१०.५.१. १७ ध्येये

१०.६. शाश्वत विकास साधणे

१०.७. शाश्वत विकास आणि अपेक्षा

१०.७.१. निसर्ग

१०.७. २. समाज

१०.७.३. अर्थव्यवस्था

१०.८. नैसर्गिक साधनसंपदा : शाश्वत आर्थिक विकास व पर्यावरण

१०.९. शाश्वत विकासाची उदाहरणे

१०.१०. शाश्वत विकासात पर्यावरणाचे महत्व

१०.१०.१. विकासप्रकल्पांविरुद्ध लोकक्षोभ

१०.१०.२. विकासाची अपरिहार्यता

१०.१०.३. नियोजनबद्ध चिरंतन विकास

१०.११. पाणी आणि शाश्वत विकास

१०.११.१. पाणी आणि आरोग्य

१०.११.२. पाणी आणि शहरीकरण

munotes.in

१०.११.३. पाणी आणि औद्योगिकरण

१०.११.४. पाणी आणि शेती

१०.११. ५. पाणी आणि ऊर्जा

१०.११. ६. पाणी आणि समानता

१०.११. ७. पाणी आणि निसर्ग

१०.१२. भारतातील शाश्वत विकासाची सद्यस्थिती : प्रतिनिधीक उदाहरणे

१०.१३. शाश्वत आर्थिक विकाससाठी उपाययोजना

१०.१४. सारांश

१०.१५. प्रश्न

१०.१६. संदर्भ

## १०.० उद्दिष्ट्ये

- शाश्वत मूल्य म्हणजे काय याचा अभ्यास करणे.
- शाश्वत मूल्यांमध्ये कोणकोणत्या गोष्टी येतात याचा अभ्यास करणे.
- शाश्वत मूल्य विकास हा का आवश्यक आहे याचा अर्थ जाणून घेणे.

## १०.१ प्रस्तावना

जगाने आधुनिक काळात जेव्हा प्रवेश केला तेव्हापासून सर्व क्षेत्रात मग ते सामाजिक असो सांस्कृतिक असो वैज्ञानिक असो औद्योगीकरण असो यात मोठी प्रगती घडवून आणली एका बाजूला ही प्रगती मानवी समुदायाला वरदान ठरली परंतु दुसऱ्या बाजूला त्याचे अनेक दुष्परिणाम देखील घडून आले वैज्ञानिक क्षेत्रात तसेच शस्त्रास्त्र क्षेत्रात इतकी प्रगती झाली की संपूर्ण जगातले बलाढ्य देश आपल्या संरक्षणासाठी सर्वात मोठा खर्च शस्त्रास्त्र वाढीवर अण्वस्त्र वाढीवर करू लागले त्यामुळे जगात पहिले महायुद्ध व दुसरे महायुद्ध घडून आले जागतिकीकरण शहरीकरण वैज्ञानिकीकरण या सगळ्या घटकांमुळे प्रदूषण अनेक प्रकारचे आजार गरीबी बेकारी असे विविध वाईट परिणाम जगावर घडून आले त्याचबरोबर जागतिक पातळीवर दहशतवादी संघटना वाढल्या माणुसकीला जागा उरली नाही निसर्गाला फार मोठा धोका निर्माण झाला जमिनीतली पाणी पातळी कमी होत गेली लोकसंख्या प्रमाणाबाहेर वाढली हे सर्व घडल्यावर सर्व देशांना मानवी समुदाय नष्ट होण्याची चिंता भेडसाव लागली त्यातून बाहेर पडण्यासाठी प्रयत्न सुरू झाले या प्रयत्नातून शाश्वत प्रगतीचा उदय झाला या प्रकरणात याच विषयाचा अभ्यास आपणास करावयाचा आहे.

## १०.२. पार्श्वभूमी

२०१५ साली संयुक्त राष्ट्र संघाच्या पुढाकारातून सगळ्या जगाने 'शाश्वत विकास उद्दिष्टे' स्वीकारली. शाश्वत विकास ध्येये हा भविष्यकालीन आंतरराष्ट्रीय विकास संबंधित ध्येयांचा संच आहे. ही ध्येये युनायटेड नेशन्स ने बनविली असून त्यांची शाश्वत विकासासाठिची जागतिक ध्येये अशी बढती करण्यात आलेली आहे. या ध्येयांनी, सहस्र (मिलेनियम) विकास ध्येये ज्यांची मुदत वर्ष २०१५ च्या शेवटी संपली. वर्ष २०१५ पासुन २०३० पर्यंत ही ध्येये लागू पडतील. एकूण १७ ध्येये असून या ध्येयांसाठी १६९ विशिष्ट ध्येये आहेत भविष्यातील आपल्या वाटचालीला दिशा देण्यासाठी यांचा मोठा उपयोग होईल असा विश्वास हे स्वीकारताना सगळ्यांनी दर्शवला आहे. जागतिक पातळीवर मानवी विकाससंबंधीचा हा पहिलाच एकत्रित प्रयत्न होता. मानवी आयुष्याच्या सर्व अंगांचा विचार करून, तसेच पृथ्वीवरील विविध प्राणिमात्र आणि निसर्ग यांच्या संरक्षणासाठीचे महत्त्व लक्षात घेऊन या उद्दिष्टांची रचना करण्यात आली. आपण या लेखमालेत यासंबंधी माहिती घेणार आहोत. विकासाच्या नावाने झालेली पर्यावरणाची हानी कोणत्याही मार्गाने भरून काढता येणार नाही हे लक्षात आल्यामुळे शाश्वत विकासाची कास धरण्याची गरज मानवजातीला जाणवली आहे. म्हणून २०५०पर्यंत खूप वेगळ्या पद्धतीने मानव जगत असेल असे शास्त्रज्ञ म्हणतात. या शाश्वततेचा वापर कोणत्या प्रकारची ऊर्जा आपण वापरतो यावर अवलंबून आहे. पर्यावरण स्नेही आणि स्वच्छ तंत्रज्ञान वापरून निर्माण केलेली सौरऊर्जा किंवा पवनऊर्जा असे पर्याय आता जगभरात स्वीकारले जाऊ लागले आहेत. याचा परिपाक म्हणून येणाऱ्या वीस-तीस वर्षांत पृथ्वीवर असणारी दहा अब्ज मानवांची अजस्त्र लोकसंख्या शाश्वत स्वरूपाचीच ऊर्जा वापरेल असा अंदाज काही शास्त्रज्ञ बांधत आहेत. लिड्स विद्यापीठात शाश्वततेवर संशोधन करणाऱ्या जोवेल मिलवर्ड हॉपकिन्स या शास्त्रज्ञाने 'द कॉन्झर्वेशन' या शोधनिबंधात ही मते मांडली आहेत. त्यांच्या मते, आपण आत्ता जेवढी ऊर्जा वापरतो आहे त्याच्या ९०% यापेक्षाही कमी प्रमाणात ऊर्जा आपण २०५० साली वापरू. म्हणजे १९६० मध्ये जितकी ऊर्जा वापरली जात होती तितकीच ऊर्जा २०५० मध्ये वापरली जाईल.

२०५० मध्ये आयुष्य जास्त सुकर असेल असा एक सकारात्मक सूर हॉपकिन्स लावतात. त्यांच्या मते परिणामकारक ऊर्जा वापरणाऱ्या इमारती, वाहने, निरनिराळी उपकरणे, साधने तसेच प्रकाशमान करण्यासाठी आवश्यक असणारी यंत्रणा या सर्व गोष्टींचे उत्पादन आणि पुनर्चक्रीकरण हे योग्य पद्धतीने होत असेल. गेल्या काही दशकांमध्ये मानवजातीने इतक्या मोठ्या प्रमाणात नैसर्गिक साधनसंपदा वापरलेली आहे की त्यामुळे खूप मोठा हाहाकार झाला. परंतु आता दहा अब्जांपर्यंत वाढलेली मानवी लोकसंख्या असा अपव्यय करणार नाही. सेकंड होमसाठी जागा उपलब्ध नसतील, एकापेक्षा जास्त गाड्या ठेवणे अशक्य होईल आणि दर दोन वर्षांनी इलेक्ट्रॉनिक उपकरणे बदलणं किंवा बेसुमार खरेदी करणेही अशक्य होईल.

विकासाच्या नावाने झालेली पर्यावरणाची हानी कोणत्याही मार्गाने भरून काढता येणार नाही हे लक्षात आल्यामुळे शाश्वत विकासाची कास धरण्याची गरज मानवजातीला जाणवली आहे. म्हणून २०५०पर्यंत खूप वेगळ्या पद्धतीने मानव जगत असेल असे शास्त्रज्ञ म्हणतात. या शाश्वततेचा वापर कोणत्या प्रकारची ऊर्जा आपण वापरतो यावर अवलंबून आहे.

munotes.in

पर्यावरण स्नेही आणि स्वच्छ तंत्रज्ञान वापरून निर्माण केलेली सौरऊर्जा किंवा पवनऊर्जा असे पर्याय आता जगभरात स्वीकारले जाऊ लागले आहेत. याचा परिपाक म्हणून येणाऱ्या वीस-तीस वर्षांत पृथ्वीवर असणारी दहा अब्ज मानवांची अजस्त्र लोकसंख्या शाश्वत स्वरूपाचीच ऊर्जा वापरेल असा अंदाज काही शास्त्रज्ञ बांधत आहेत. लिड्स विद्यापीठात शाश्वततेवर संशोधन करणाऱ्या जोवेल मिलवर्ड हॉपकिन्स या शास्त्रज्ञाने 'द कॉन्झर्वेशन' या शोधनिबंधात ही मते मांडली आहेत. त्यांच्या मते, आपण आत्ता जेवढी ऊर्जा वापरतो आहे त्याच्या ९०% यापेक्षाही कमी प्रमाणात ऊर्जा आपण २०५० साली वापरू. म्हणजे १९६० मध्ये जितकी ऊर्जा वापरली जात होती तितकीच ऊर्जा २०५० मध्ये वापरली जाईल.

२०५० मध्ये आयुष्य जास्त सुकर असेल असा एक सकारात्मक सूर हॉपकिंन्स लावतात. त्यांच्या मते परिणामकारक ऊर्जा वापरणाऱ्या इमारती, वाहने, निरनिराळी उपकरणे, साधने तसेच प्रकाशमान करण्यासाठी आवश्यक असणारी यंत्रणा या सर्व गोष्टींचे उत्पादन आणि पुनर्चक्रीकरण हे योग्य पद्धतीने होत असेल. गेल्या काही दशकांमध्ये मानवजातीने इतक्या मोठ्या प्रमाणात नैसर्गिक साधनसंपदा वापरलेली आहे की त्यामुळे खूप मोठा हाहाकार झाला. परंतु आता दहा अब्जांपर्यंत वाढलेली मानवी लोकसंख्या असा अपव्यय करणार नाही. सेकंड होमसाठी जागा उपलब्ध नसतील, एकापेक्षा जास्त गाड्या ठेवणे अशक्य होईल आणि दर दोन वर्षांनी इलेक्ट्रॉनिक उपकरणे बदलणं किंवा बेसुमार खरेदी करणेही अशक्य होईल. आतापर्यंतच्या उपभोगवाद आणि चंगळवादाच्या अतिरेकामुळे मधल्या काळात सगळ्याच पर्यावरणाची विलक्षण कोंडी होत होती. परंतु येत्या काळात यात बदल झालेले असतील. घरांचा आकार लहान झालेला असेल. पुरेशी हॉस्पिटल्स, शाळा असतील आणि येथे जगातून कुठूनही इंटरनेटद्वारा जोडता येईल. लोक स्वतःच्या गाड्या ठेवणार नाहीत. सार्वजनिक वाहतुकीचा पर्याय स्वीकारतील. हवामान बदलाच्या संकटामुळे जी हानी झाली आहे त्याने माणूस शहाणा बनलेला असेल. २०५० मध्ये वेगळ्या पद्धतीने मानवजात विचार करू लागेल. मात्र या नव्या जगात सर्वात जास्त धोका असेल तो म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सर्व ऑटोमॅटिक गोष्टी वापरण्याकडे असलेला कल! यामुळे खूप मोठ्या प्रमाणावर बेकारी वाढू शकते आणि आर्थिक विषमताही. परंतु कमीत कमी ऊर्जेचा वापर करून चांगल्या पद्धतीने जगता येईल असे राहणीमान सर्वांनाच स्वीकारावे लागेल.

## १०.३. शाश्वत विकास म्हणजे काय?

शाश्वत विकासाला (Sustainable Development) मानवाने त्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण करून टिकवून ठेवल्या पाहिजेत, तसेच भावी पिढ्या त्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण करू शकतील याची खात्री करून घ्यावी या कल्पनेला संबोधले जाते. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, हा समाज संघटित करण्याचा एक मार्ग आहे ज्याद्वारे तो भविष्यातील पिढ्यांसाठी संसाधनांच्या उपलब्धतेशी तडजोड न करता दीर्घ कालावधीसाठी अस्तित्वात राहू शकतो. या या प्रकरणामध्ये आपण शाश्वत विकास म्हणजे काय विस्ताराने जाणून घेणार आहोत. शाश्वत विकास म्हणजे भविष्यातील पिढ्यांच्या स्वतःच्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेशी तडजोड न करता वर्तमान गरजा पूर्ण करणारा विकास. शाश्वत विकास हा लोकांसाठी संसाधने संपल्याशिवाय संसाधने वापरण्याचा मार्ग आहे. याचा अर्थ पर्यावरणाची हानी न करता किंवा प्रभावित न करता विकास करणे.

शाश्वत विकास याचा साधा अर्थ आहे टिकाऊ विकास. तात्पुरत्या लाभाचा केवळ भौतिक सुविधा वाढवून पैशाच्या लोभाच्या हव्यासापोटी केला जाणारा व नैसर्गिक संसाधनांना ओरबाडणारा आणि त्यांचे कायमचे नुकसान करणारा विकास हा शाश्वत विकास नसतो.

थोडक्यात सध्याच्या पिढ्यांच्या (आपल्या) गरजा भागविताना पुढच्या पिढ्यांना त्यांच्या गरजा भागविण्यासाठी संसाधने (जल, जंगल, जमीन, पर्यावरण) शिल्लक राहतील, अशा पद्धतीने विकास आराखडा तयार करणे म्हणजे शाश्वत विकास होय.

भविष्यातील पिढ्यांसाठी पर्यावरणाच्या गुणवत्तेशी तडजोड न करता देशाच्या आर्थिक विकासाचा दृष्टीकोन म्हणून शाश्वत विकासाची व्याख्या केली जाऊ शकते. आर्थिक विकासाच्या नावाखाली, पर्यावरणाच्या हानीची किंमत जमिनीचा ऱ्हास, मातीची धूप, वायू आणि जल प्रदूषण, जंगलतोड इ.च्या रूपात दिली जाते. हे नुकसान वस्तू आणि सेवांच्या अधिक दर्जेदार उत्पादनाच्या फायद्यांपेक्षा जास्त असू शकते.

## १०.४. शाश्वत विकासाची आवश्यकता

विकास हा मानवाचा नैसर्गिक हक्क आहे. या हक्काचा उपभोग घेतांना नैसर्गिक साधनधनाचा अमर्यादीत वापर केला जातो. त्यातून पर्यावरणाची अवनती होते. त्यांचा अनिष्ट परिणाम वर्तमान पिढी बरोबरच भविष्यातील पिढीवरही होत असतो. म्हणून विकासाच्या हक्काबरोबर नैसर्गिक कर्ता व जबाबदारीची जाणिव होणे गरजेचे आहे. ही जाणिव करून देण्यासाठीच शाश्वत विकासाची नितांत आवश्यकता आहे

## १०.५. शाश्वत विकास उद्दिष्टे-२०१५

सप्टेंबर २०१५ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने एकूण १७ उद्दिष्टे असणारा २०३० साठीचा शाश्वत विकास अजेंडा स्वीकारला. ही १७ उद्दिष्टे व त्याअंतर्गत असणारी १६९ छोटी ध्येये सदस्य राष्ट्रांनी २०१६ ते २०३० या कालावधीत साध्य करायची आहेत.

**१०.५.१.१७ ध्येये :-**

१. सर्व प्रकारच्या गरिबीचे निर्मूलन करणे.[१] २. भूक संपवणे, अन्न सुरक्षा व सुधारित पोषणआहार उपलब्ध करून देणे आणि शाश्वत शेतीला प्राधान्य देणे.

३. आरोग्यपूर्ण आयुष्य सुनिश्चित करणे व सर्व वयोगटातील नागरिकांचे कल्याण साधणे.

४. सर्वसमावेशक व गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करणे.

५. लिंगभावाधिष्ठित समानता व महिला आणि मुलींचे सक्षमीकरण साधणे.

६. पाण्याची व स्वच्छतेच्या संसाधनाची उपलब्धता सुनिश्चित करणे.

७. सर्वांना अल्पखर्चीक विश्वासार्ह, शाश्वत आणि आधुनिक ऊर्जा साधने उपलब्ध करून देणे.

८. शाश्वत, सर्वसमावेशक आर्थिक वाढ आणि उत्पादक रोजगार उपलब्ध करणे.

९. पायाभूत सोयीसुविधांची निर्मिती करणे, सर्वसमावेशक आणि शाश्वत औद्योगिकीकरण करणे आणि कल्पकतेला वाव देणे.

१०. विविध देशांमधील असमानता दूर करणे.

११. शहरे आणि मानवी वस्त्या, अधिक समावेशक, सुरक्षित, संवेदनशील आणि शाश्वत करणे.

१२. उत्पादन आणि उपभोगाच्या पद्धती शाश्वत रूपात आणणे.

१३. हवामान बदल आणि त्याच्या दुष्परिणामांना रोखण्यासाठी त्वरित उपाययोजना करणे.

१४. महासागर व समूहांचे संवर्धन करणे तसेच त्यांच्याशी संबंधित संसाधनांचा शाश्वतपणे वापर करणे.

१५. परिस्थितिकीय व्यवस्थांचा (Ecosystem) शाश्वत पद्धतीने वापर करणे. वनाचे शाश्वत व्यवस्थापन, वाळवंटीकरणाशी मुकाबला करणे, जमिनीचा कस कमी होण्याची प्रक्रिया आणि जैवविविधतेची हानी रोखणे.

१६. शांततापूर्ण आणि सर्वसमावेशक समाजव्यवस्थांना प्रोत्साहन देणे. त्यांची शाश्वत विकासाच्या दिशेने वाटचाल निश्चित करणे, सर्वांची न्यायापर्यंत पोहोच स्थापित करण्यासाठी विविध पातळ्यांवर परिणामकारक, उत्तरदायी आणि सर्वसमावेशक संस्था उभ्या करणे.

१७. चिरस्थायी विकासासाठी वैश्विक भागीदारी निर्माण व्हावी यासाठी अंमलबजावणीची साधने विकसित करणे.

## १०.६. शाश्वत विकास साधणे

**खालील मुद्द्यांचे पालन केल्यास शाश्वत विकास साधता येईल.**

१. मानवी क्रियाकलापांवर मर्यादा घालून हे साध्य केले जाऊ शकते.

२. तंत्रज्ञानाचा विकास इनपुट प्रभावी असावा आणि इनपुटचा वापर न करता.

३. उपभोगाचा दर मोक्षाच्या दरापेक्षा जास्त नसावा.

४. नूतनीकरणीय संसाधनांसाठी, वापराचा दर नूतनीकरणक्षम पर्यायांच्या उत्पादनाच्या दरापेक्षा जास्त नसावा.

५. सर्व प्रकारचे प्रदूषण कमी केले पाहिजे.

६. नैसर्गिक साधनसंपत्तीचा समंजस वापर करून हे साध्य करता येते.

## १०.७. शाश्वत विकास आणि अपेक्षा

शाश्वत विकास म्हणजे समाजाच्या आजच्या गरजा पूर्ण करीत असताना भविष्यातील पिढयांना त्याची किंमत मोजायला लागणार नाही, असा विकास आज जगातील सर्वच राज्यकर्ते हे त्या त्या देशातील आर्थिक विकास आणि सामाजिक व नैसर्गिक साधनसंपत्तीची मागणी यामध्ये सुवर्णमध्य कसा गाठायचा या विवंचनेत आहेत. शाश्वत विकासाची सामाजिक किंमत ही कमीत कमी नुकसानीत करायची असेल, तर माझ्या मते कोणत्याही अर्थव्यवस्थेने तीन स्तंभांची काळजी घेतली पाहिजे. म्हणजे त्यावर उभा असणारा हा शाश्वताचा डोलारा सांभाळता येईल. हे तीन स्तंभ म्हणजेच निसर्ग, समाज आणि अर्थव्यवस्था.

### १०.७.१. निसर्ग :-

निसर्गाबद्दल आज जगात खूपच जागरूकता आली आहे. हवामानातील बदल, विकासासाठी होणारी झाडांची कत्तल व त्यामुळे एके काळच्या जंगलांची झालेली वाळवंटे, प्रदूषण या सर्वच चिंतांच्या चर्चा सध्या जगभरात हिरिरीने सुरू असलेल्या ऐकू येतात. नैसर्गिक साधनसंपत्तीची मात्र सर्वानाच जास्त काळजी आहे. एका अंदाजाप्रमाणे एका वर्षांत मानव ५००० कोटी टन एवढी नैसर्गिक संपत्ती निसर्गाकडून ओरबाडून काढत असतो. विकासासाठी कोणत्याही अर्थव्यवस्थेला नैसर्गिक संपत्तीची गरज असली तरी ज्या गतीने ती माणूस ओरबाडत आहे ती पाहता शेवटी निसर्ग थकेल आणि हात वर करील. 'नासा'सारख्या अवकाश संघटनांना अशी आशा होती की, मंगळ, चंद्र अशा शेजाऱ्यांकडून ही नैसर्गिक संपत्ती आणता येईल, पण अशी आशा सध्या तरी अशक्य वाटत आहे. म्हणूनच विकास साधताना निसर्गाकडून हावरटपणे त्याची संपत्ती न ओरबाडता ती नियोजनबद्ध पद्धतीने काढावी. काढलेल्या संपत्तीचा जास्तीत जास्त पुनर्वापर करण्याच्या पद्धती अमलात आणाव्यात. कोळसा, खनिज तेल अशा इंधनांना पर्याय लवकरात लवकर शोधावेत, म्हणजे शाश्वत विकासाचा हा खांब टिकून राहील.

### १०.७.२. समाज :-

समाज हा शाश्वत विकासाचा दुसरा स्तंभ आहे. कोणताही आर्थिक विकास हा समाजातील सर्व स्तरांत पोचणे जरुरीचे आहे. आजवरच्या जागतिक विकासात देशोदेशी हे चित्र वेगवेगळे असले तरी बहुतेक देशांच्या विकासाच्या सुरुवातीच्या काळात समाजातील आर्थिक विकासाचा लाभ हा थोडया लोकांना झाला व प्रत्येक देशात श्रीमंत-गरीब गट निर्माण झाले, हा भांडवलशाहीचा परिपाक आहे, असे म्हणत ज्यांनी साम्यवादाचा अंगीकार केला त्यांचाही अनुभव काही वेगळा नाही. चीनसारख्या देशाचे उदाहरण घ्या. गेल्या दोन दशकांत चीनने अर्थव्यवस्थेत कमालीची प्रगती केली. म्हणजेच तीन स्तंभांपैकी एका स्तंभाची पूर्ण काळजी घेतली. या अर्थव्यवस्थेच्या वाढीमुळे चिनी घरातील पैशांचा खर्च चारपटीने वाढला. लाखो लोकांना आपली गरिबी गेल्यासारखे वाटले आणि ४५० लाख कोटी रुपयांची ही अर्थव्यवस्था अमेरिकेशी बरोबरी करणार, असा विश्वास जगातील अर्थतज्ज्ञांना वाटू लागला, पण हे सगळे अर्थव्यवस्थेत घडत असताना चीनने समाज या महत्त्वाच्या स्तंभाकडे कदाचित दुर्लक्ष केले. पूर्वीचे 'आनंदी' गरीब शेतकरी आता नैराश्याने

भरलेले या अर्थव्यवस्थेतील घटक वाटू लागले. चटकन वाढलेल्या या अर्थव्यवस्थेने समाजात आर्थिक तफावत आणली. चीनमध्ये आत्महत्या करणाऱ्यांचे प्रमाण अमेरिकेपेक्षा दुप्पट आहे. गेल्या वर्षी चीनमध्ये ३ कोटींच्या वर लोक नैराश्याच्या व्याधीने ग्रस्त होऊन रुग्णालयात दाखल झाले. जगभरात जेव्हा जेव्हा अर्थव्यवस्था वाढीस लागल्या तेव्हा समाजाचा एकंदर असाच कल दिसून आला. शाश्वत विकासाच्या दृष्टीने हे हानिकारक आहे.

### १०.७.३. अर्थव्यवस्था :-

भारत आर्थिक विकासाच्या ज्या टप्प्यावर आहे तेथे या शाश्वत विकासाची चर्चा म्हणूनच सयुक्तिक व महत्त्वाची वाटते. सकल उत्पादनाचा दर ८ ते ९% ठेवत असताना हा विकास शाश्वत कसा होईल, हे पाहणेही तितकेच गरजेचे आहे. या विकासाची जबर किंमत समाजाला चुकवायला लागू नये व येणाऱ्या पुढच्या पिढयांच्या विकासाला तो मारक ठरू नये हे पाहणे राज्यकर्त्यांचेच नव्हे तर संपूर्ण समाजाचे काम आहे. भारतातील विकासाचा फायदा जोपर्यंत सर्व समाजघटकांमध्ये पोहोचत नाही तोपर्यंत समाजाला शाश्वत विकास मिळणार नाही. स्वातंत्र्यपूर्व काळापासून आदिवासी, पारधी अशा समाजांकडे झालेले दुर्लक्ष, विकासाकरिता त्यांची घेतलेली जमीन यामुळे अर्थव्यवस्थेचा विकास झाला तरी समाजातील विषमता दाहकपणे वाढत गेली व त्यातूनच नक्षलवादाचे राक्षस उभे राहिले. अशा समाजात विकास शाश्वत ठरत नाही. समाजातील काही थोडय़ा लोकांची श्रीमंतीची हाव व त्यांचे ओंगळवाणे दर्शन व त्यामुळे येणारा माजोरीपणा या सर्वच गोष्टी शाश्वत विकासाला अत्यंत हानिकारक आहेत. भारतात खाण उद्योगात झालेली प्रचंड लूट, होणारी वीजचोरी, कोळसे घोटाळे, भ्रमणध्वनीचा अतोनात वापर या सर्वांमुळे विकास साधत असताना आपण निसर्गाच्या या स्तंभाकडे पूर्ण दुर्लक्ष करीत आहोत. मग हा शाश्वत विकास व्हावा कसा? अल्बर्ट आइन्स्टाइनने म्हटल्याप्रमाणे पूर्वी निर्माण केलेले प्रश्न सोडवण्यासाठी आता आपण पूर्वीसारखे विचार करून चालणार नाही, तर ते आज सोडवण्यासाठी उदयासारखा विचार करणेगरजेचे आहे.

## १०.८. नैसर्गिक साधनसंपदा : शाश्वत आर्थिक विकास व पर्यावरण

शाश्वत विकास म्हणजे शाश्वत जीवनशैली असा अर्थ काढणे चुकीचे ठरेल. शाश्वत विकासासाठी नैसर्गिक साधन संपत्तीची कमीत कमी हानी पर्यावरणाचा महत्तम संयोग व आर्थिक विकास हा विचार केंद्रस्थानी असला पाहिजे. भावी पिढीच्या गरजा भागविण्याच्या निसर्गातल्या क्षमतेला कोणताही धक्का न लावता लोकांच्या आजच्या गरजा पूर्ण करणे म्हणजे धारणाक्षम विकास होय. याचाच अर्थ निसर्ग नियमाच्या चौकटीत राहून निसर्गाला धक्का न पोहचवता मानवाने स्वत:चा विकास विविध नैसर्गिक घटकांचा वापर करणे होय. मानव व पर्यावरण यांचा परस्पर संबंध अतुट आहे. मानवाच्या सभोवताली असणाऱ्या परिस्थितीला पर्यावरण म्हणतात. मानवाने आपल्या अविवेकी वागण्याने पर्यावरणाचा हास केला आहे. स्वत:चा किंवा समाजाचा विकास करताना जर निसर्गाला धक्का पोहचत असेल तर असा विकास अशाश्वत किंवा अधारक्षम विकासच होय. काण यातून पर्यावरण असंतूलन होऊन मानव स्वत:साठी अस्थिरता निर्माण करून घेईल हा धारणक्षम विकास नव्हे नैसर्गिक पर्यावरणाचे संतुलन दीर्घकाळ टिकवून ठेवून मानवी जीवनमान उंचावणे म्हणजेच धारणक्षम किंवा शाश्वत विकास होय, मानवाने निसर्गाचा पुरेपुर उपयोग घेतला

त्यातून पर्यावरणाचे विविध प्रश्न निर्माण झाले २० व्या शतकाच्या उत्तरार्धात शेवटी माणसाला आपली चूक उमजली आणि वाढलेल्या गरजा सुखसोई न सोडता शाश्वत जीवनशैली शोधात मानव फिरू लागला. पोषणक्षम जीवनपध्दतीसाठी संपदाचा योग्य वापर करणे गरजेचे असून दुष्काळ महापूर कुपोषण, पर्जन्यमान, दहशतवाद, दारिद्र्य, युध्द, संघर्ष, प्रदुषण भूकंप, भूमीपात इत्यादी नैसर्गिक आपत्तीवर नियंत्रण ठेवणारे योग्य पर्याय सापडत नसल्याचे दिसते. या आव्हानांची समीक्षा मानव करत आहे. जगात नैसर्गिक साधन संपत्तीचे वितरण विषम स्वरूपात आहे. नैसर्गिक साधन संपत्तीचा वापरसुध्दा देशपरत्वे कमी जास्त आढळतो. मानव नैसर्गिक साधन संपत्तीचा अतिरेकी वापर करतोच पण त्याचबरोबर ती संपदा मोठ्या प्रमाणावर दृषितही बनवतो लोकसंख्या आकृतीबंध आणि नैसर्गिक साधन संपदेचा धारणक्षम उपयोग या दोन्ही गोष्टी एकमेकांशी निगडीत आहेत. पण या नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर योग्य पध्दतीने करून शाश्वत विकासासाठी गरिबी व दारिद्र्याचे उच्चाटन करणे आणि पर्यावरण संरक्षण करणे काळाची गरज आहे.

मानव आणि त्याच्या सभोवतालच्या पर्यावरणाचे एकात्मीकरण असते, म्हणजे एकाचे कल्याण दुसऱ्यावर अवलंबून असते. उत्पन्न आणि आर्थिक विकासाच्या गतीखेरीज पर्यावरणाचे संरक्षण होऊ शकणार नाही तर पर्यावरण संरक्षणाविना हळूहळू क्षीण होईल. मानवी वंशाला पर्यावरणीय अवनतीपासून होणारा धोका हा आण्विक मनुष्यहानी सारखाच मोठा असणार म्हणून औद्योगिकीकरण किंवा विकास कोणीही थांबवू शकणार नाही. त्यासाठी चिरस्थायी विकास हा मध्यम मार्ग असून त्यातूनच आर्थिक शाश्वता निर्माण होईल. पिण्याचे पाणी, आरोग्य स्वच्छता, ऊर्जा, अन्नसुरक्षा, जैवविविधता, लोकसंख्या, औद्योगिक तंत्रज्ञान या मुलभूत बाबींवर शाश्वत विकासासाठी जोर देणे महत्त्वाचे आहे. मानवाच्या आर्थिक उन्नतीसाठी भारतासारख्या कृषीप्रधान देशात आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून रासायनिक खते. औषधांचा अति उपयोग करून कृषी योग्य जमिनीची प्रत प्रतिवर्षी कमी होत आहे. पाण्याचा अतिवापर करून जमिनी खारपट होत आहेत. मोठ्या शहराजवळील कृषी योग्य जमिनीचा उपयोग सिमेंटच्या जंगलाकरता होत आहे. भारताच्या आर्थिक विकासात शेती महत्त्वाचा घटक आहे. काही भागात अनेक घटकामुळे प्रदुषण वाढत आहे म्हणून आर्थिक विकास व पर्यावरण यांचा समन्वय साधून शाश्वत विकास करणे गरजेचे आहे. कारण सर्वसमावेश विकास हवा असेल तर शेतीचे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करावे लागतील.

## १०.९. शाश्वत विकासाची उदाहरणे

१) पवन ऊर्जा

२) सौर उर्जा

३) पीक रोटेशन

४) शाश्वत बांधकाम

५) कार्यक्षम पाणी फिक्स्चर

६) हिरवीगार जागा

७) शाश्वत वनीकरण

## १०.१०. शाश्वत विकासात पर्यावरणाचे महत्व

पृथ्वीवरील साऱ्या सजीव सृष्टीचा आधार हे येथील पर्यावरण आहे. पृथ्वी सोडून इतर कोणत्याही ग्रहावर व विश्वात इतरत्र असे पर्यावरण नाही. त्यामुळे येथील पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करणे मानव जातीस नव्हे तर सर्व सजीव सृष्टीस अत्यावश्यक आहे. कोट्यावधी वर्षांच्या स्थित्यंतरानंतर येथील हवा, पाणी व जमीन यांचे असे पोषक वातावरण झाले असले तरी गेल्या काही दशकात मानवी उद्योगांमुळे त्यात बरेच हानीकारक बदल होऊ लागले आहेत. वाढती लोकसंख्या, शहरीकरण, उद्योगधंदे आणि जंगलाचा नाश करुन वाढलेली शेती यामुळे उपलब्ध नैसर्गिक साधनसंपत्तीत घट होत आहे. तसेच हवा, पाणी व जमीन यांच्या प्रदूषणाचा प्रश्न वाढत चालला आहे. उद्योगधंदे व शहराच्या सांडपाण्यामुळे जमिनीवरील नदी, तलाव यांचे पाणी दूषित होत आहेच. शिवाय जमिनीखाली असणाऱ्या पाण्याचेही प्रदूषण होत आहे. शेतीसाठी पाण्याबरोबर वापरली जाणारी रासायनिक खते पाणीप्रदूषणास कारणीभूत तर आहेतच. शिवाय शेतीसाठी अतिरिक्त पाणी वापरल्याने जमिनीत क्षार वाढून मीठ फुटण्याचे व सारी जमीन नापीक होण्याचे प्रमाण वाढले आहे. पायाभूत विकासासाठी होणारे प्रकल्पही पर्यावरणाच्या नव्या समस्या निर्माण करीत आहेत. मोठ्या धरणांमुळे शेकडो एकर जंगले पाण्याखाली जाणे, धरणग्रस्तांच्या जमिनी व घरे पाण्याखाली जाण्याने त्यांचे विस्थापन करण्याची समस्या त्या प्रकल्पाच्या उभारणीत महत्वाचा अडथळा ठरली आहे. जंगलातून जाणारे मोठे महामार्ग जंगलातील प्राण्यांच्या सुरक्षिततेला आव्हान ठरत आहे. माणसांच्या गरजा वाढल्यामुळे त्यांच्या विकासाचा वेगही त्यानुसार वाढविण्याची धडपड सर्वत्र चालली आहे. मात्र हा विकास करताना आपण पुढील विकासाच्या सर्वच संधी नाहिशा करून टाकीत नाही ना याविषयी माणूस फारसा विचार करताना दिसत नाही. आजची गरज भागली म्हणजे झाले. उद्याचे कोणी बघितले ? अशी वृत्ती झाली आहे व ती पर्यावरणास घातक आहे. शेतकऱ्यास जमीन चांगली ठेवण्यासाठी पिकांची फेरपालटी घ्यावी, पाण्याचा व रासायनिक खतांचा कमी वापर, ऊसासारख्या नगदी परंतु जास्त पाणी लागणाऱ्या पिकांऐवजी दुसरी पिके घ्यावी असे कितीही सांगितले तरी ते सहसा पाळले जात नाही. जमीन नापीक होत चालली आहे हे पाहूनही त्यात बदल होत नाही. त्वरित लाभ मिळविण्याच्या हव्यासापोटी दूरदर्शी योजनेकडे दुर्लक्ष होते. जे शेतकऱ्यांचे तेच उद्योगधंद्यांचे. उत्पादनखर्चात बचत करण्यासाठी सांड्पाण्यावर प्रक्रिया करण्याकडे चालढकल केली जाते. नगरपालिका / महानगरपालिका यांना शहरातील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी यंत्रणेचा खर्च व ती चालविण्यासाठी लागणाऱ्या विजेचा खर्च झेपत नाही. साहजिकच प्रदूषण वाढतच जाते. जुन्या गाड्यांमुळे प्रदूषण होते. त्यामुळे त्यांच्या वापरास बंदी, किंवा पेट्रोल, डिझेलऐवजी प्रदूषणरहित इंधनाचा वापर याची कायद्याने सक्ती केली तरी त्याची अंमलबजावणी मुष्किल होते. एकंदरीत काय ? नैसर्गिक साधनसंपत्तीचे भांडार असणारे पर्यावरण आपल्या साहाय्यास सज्ज असताना सोन्याची अंडी देणारी कोंबडीच कापणाऱ्या लोभी माणसाप्रमाणे आपण पर्यावरणाचे अतोनात व भरून न येण्यासारखे नुकसान करीत आहोत. यावर काही उपाय आहे का ?

### १०.१०.१. विकास प्रकल्पांविरुद्ध लोकक्षोभ :-

सतत वाढते प्रदूषण, निसर्गसंपदेची हानी आणि कारखानदार, प्रकल्प प्रायोजक यांची व्यावसायिक लाभासाठी प्रदूषण नियंत्रणासाठी प्रभावी उपाययोजना करण्यात टाळाटाळ

आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाची अकार्यक्षमता यांचा एकत्रित परिणाम लोकक्षोभात होऊन विविध सामाजिक, राजकीय आणि पर्यावरण संरक्षख संस्था यांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला व उद्योगधंदे, व्यापार व पायाभूत सुविधा यांच्या विकासाचा वेग मंदावला, देशाच्या विकासासाठी आवश्यक असणारी धरणे, विद्युत निर्मिती प्रकल्प, द्रुतगती मार्ग, विमानतळ किंवा तेलशुद्धी कारखाने यांची कामे लोकचळवळीतून बंद पाडण्यामागे निसर्ग संवर्धनाच्या आस्थेऐवजी ब-याचवेळा व्यावसायिक स्पर्धेपोटी परकीय शक्तींचा वा शत्रू राष्ट्रांचा हात असतो ही गोष्ट लक्षात घेतला पाहिजे. त्यामुळे सामाजिक शांततामय आंदोलनाचे रूपांतर हिंसक दंगलीत केले जाते व निर्णय शास्त्रीय व तात्विक निकषांपेक्षा राजकीय इर्षेवर घेतले जातात. या सर्व प्रकारात देशाच्या साधनसंप्पतीचे अतोनात नुकसान होतेच पण प्रकल्प थांबून आर्थिक प्रगतीचा मार्गही बंद होतो.

### १०.१०.२. विकासाची अपरिहार्यता :-

या जगाची वाटणी श्रीमंत देश आणि अविकसित गरीब देश अशा दोन गटात करण्यात येते. विकसित देश नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर दरडोई खूपच जास्त करतात परंतु तेथील लोकसंख्या मर्यादित आहे. याउलट अविकसित देशात गरिबी व मोठी लोकसंख्या यामुळे नैसर्गिक साधनसंपत्ती कमी वापरूनही पर्यावरणाचा ऱ्हास जास्त होत आहे. पर्यावरण रक्षण की गरिबी ऊन्मूलन या दुहेरी पेचात हे देश सापडले आहेत. संपन्न राष्ट्रांकडून या राष्ट्रांवर पर्यावरणासाठी कडक निर्बंध पाळण्याचे दडपण येत आहे. परंतु बेरोजगारीवर मात करण्यासाठी औद्योगिकीकरण, वाढत्या लोकसंख्येसाठी जंगलतोड व शेती आणि निसर्गसंपदाच पैसे मिळविण्याचे साधन झाल्याने या देशात पर्यावरण रक्षणाचे काम बिकट बनले आहे. उदाहरणार्थ आफ्रिकेमध्ये जंगलसंपत्तीचा वापर हा त्यांच्या अर्थव्यवस्थेचा प्रमुख भाग आहे. पायाभूत विकास व औद्योगिकीकरण या गोष्टी तर सर्वच देश अग्रहक्काने करण्याच्या प्रयत्नात आहेत. मात्र हे करत असताना पर्यावरणाच्या रक्षणाची काळजी न घेतल्याने दिवसेंदिवस पर्यावरणाचा दर्जा खालावत चालला आहे. कारखान्यातून बाहेर पडणारा धूर व स्वयंचलित वाहनातून पेट्रोल जाळण्याने निर्माण होणारा दूषित वायू, शिसे व काजळी यामुळे हवा प्रदूषित होत आहे.

### १०.१०.३. नियोजनबद्ध चिरंतन विकास :-

पर्यावरणाची हानी टाळण्यासाठी विकास थांबवावा म्हटले तर वाढत्या गरजा भागविणे अवघड होणार व विकास केला तर पर्यावरण दूषित होणार. नियोजनबद्ध चिरंतन विकास हे यावर उत्तर आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीचा कमीतकमी वापर करणे, अपारंपारिक ऊर्जास्रोतांचा वापर करणे, प्रदूषण नियंत्रणासह विकासयोजना आखणे व टाळता न येण्याजोग्या पर्यावरण हानीबद्दल भरपाई म्हणून पर्यावरण संवर्धनाची योजना प्रकल्प आराखड्यात समाविष्ट करणे या गोष्टी केल्या तर पर्यावरणाचा दर्जा आपण टिकवू शकू. गाव, जिल्हा, नदीचे खोरे वा कोणताही विधिष्ट भूभाग यातील विकासाचे नियोजन करताना त्या भूभागावरील पर्यावरणाचे व नैसर्गिक साधनसंपत्तीची क्षमता विचारात घेणे आवश्यक आहे. तसेच हवा, पाणी, जमीन या घटकांची प्रदूषके सामावून घेण्याची शक्ती ही मर्यादा धरली तर त्या धोकादायक मर्यादेपेक्षा खाली आपल्या आजच्या व भविष्याच्या विकासामुळे होणाऱ्या प्रदूषणाचे प्रमाण राहील अशी आपण काळजी घेतली पाहिजे. आपले जीवनदायी

पर्यावरण हा पूर्वजांकडून मिळालेला मालकीहक्काचा वारसा नसून आपल्या पुढील पिढ्यांकडून उसना घेतलेला ठेवा आहे हे आपण ध्यानात घेतले पाहिजे. कर्ज जसे व्याजासह परत फेडावे लागते तसे हे पर्यावरण अधिक सुखदायी व सुरक्षित कसे करता येईल हे आपण पाहिले पाहिजे.

## १०.११. पाणी आणि शाश्वत विकास

विकास हा मानवी समाजाचा स्थायी भाव आहे. आदीम काळापासून मानवी समाज सातत्याने विकास करत आला आहे. त्या त्याच्या प्रवासात पाण्याचे अनन्य साधारण महत्व आहे. आपल्याला उपलब्ध असलेल्या जमीन, पाणी आणि हवा या तीन नैसर्गिक संसाधनापैकी एक पाणी हे साधन नसेल तर विकास जवळजवळ अशक्यच आहे. शेती असो, नाही तर औद्योगिक विकास असो, पाण्याशिवाय ते शक्य नाही, हे आता जवळजवळ मान्यच झाले आहे. पाण्याशिवाय विकास ही संकल्पनाच आता अशक्य बनली आहे. पण, या पृथ्वीतलावर पाण्याचे वितरण आणि त्याची गुणवत्ता यात खूप असमानता आहे. विकास आणि शाश्वत विकास यात फार फरक आहे. विकास हा मानवी समाजाचा स्थायी भाव आहे. आदीम काळापासून मानवी समाज सातत्याने विकास करत आला आहे. त्या त्याच्या प्रवासात पाण्याचे अनन्य साधारण महत्व आहे. आपल्याला उपलब्ध असलेल्या जमीन, पाणी आणि हवा या तीन नैसर्गिक संसाधनापैकी एक पाणी हे साधन नसेल तर विकास जवळजवळ अशक्यच आहे. शेती असो, नाही तर औद्योगिक विकास असो, पाण्याशिवाय ते शक्य नाही, हे आता जवळजवळ मान्यच झाले आहे. पाण्याशिवाय विकास ही संकल्पनाच आता अशक्य बनली आहे. पण, या पृथ्वीतलावर पाण्याचे वितरण आणि त्याची गुणवत्ता यात खूप असमानता आहे. विकास आणि शाश्वत विकास यात फार फरक आहे. मानाच्या दृष्टीने अनेक प्रकारे शाश्वत विकास होणे आवश्यक आहे तो कसा याची आपण खालील मुद्यांच्या आधारे चर्चा करू –

१) पाणी आणि आरोग्य

२) पाणी आणि शहरीकरण

३) पाणी आणि औद्योगिकरण

४) पाणी आणि शेती

५) पाणी आणि ऊर्जा

६) पाणी आणि समानता

७) पाणी आणि निसर्ग

### १०.११.१. पाणी आणि आरोग्य :-

संपूर्ण मानव जात एका अनामिक भितीच्या छायेखाली असल्यासारखी वावरत आहे. मुक्त जीवन जवळजवळ संपुष्टातच आले आहे. अनेक प्रकारच्या कृत्रिम रासायनांची मदत त्याला

त्याचे अस्तित्व टिकविण्यासाठी घ्यावी लागत आहे. त्याने या रसायनांच्या सहाय्याने त्यांना तो सप्लिमेंटस किंवा औषधे म्हणतो - आपले सरासरी वय वाढवून तर घेतले आहेच, पण त्याचबरोबर आपले नैसर्गिक स्वातंत्र्य मात्र हरवून टाकले आहे. त्याने आपल्या पर्यावरण घटकांचे इतके प्रदूषण केले आहे की त्यांचे कृत्रिमरितीने शुध्दीकरण केल्याशिवाय त्यांना त्याला वापरताच येत नाही. साधे पिण्याचे पाणीसुध्दा त्याला प्युरीफायर मधून शुध्द करून घ्यावे लागते. मनुष्यास पाणी म्हणजे जीवन. मनुष्यासच नव्हे तर सर्वच परजीवांना पाणी हे अत्यंत आवश्यक असे संसाधन आहे. सजीवांच्या शरीराचा ५० टक्के पेक्षा अधिक भाग हा निव्वळ पाण्यानेच बनलेला असतो. वनस्पतीना जमिनीतून मिळणारे घटक पाण्यात विरघळलेल्या अवस्थेतच घ्यावे लागतात. त्यांना ते पाण्यातील द्रावणाशिवाय ग्रहण करता येत नाहीत. त्यामुळे पाणी नसेल तेथे वनस्पती वाढू शकत नाहीत. तहान भागवायला अनेक कृत्रिम पेये तयार केली जातात. पण, ती मुळातच पाण्यापासून बनवली जातात. अगदी चहासुध्दा! सजीव जे अन्नग्रहण करतात त्यातील मोठा हिस्सा पाण्याचाच असतो. त्यामुळे सजीवांना त्यांचे अस्तित्व टिकवण्यासाठी पाण्याची गरज असते. आपल्याला आपले अस्तित्व टिकवायचे असेल तर, आपले शरीर सशक्त ठेवावे लागते. शरीर सुदृढ ठेवणे पाण्याशिवाय शक्य नसते. एकवेळ अन्नाशिवाय मनुष्य अनेक दिवस काढू शकतो, पण पाण्याशिवाय जास्त काळ रहाणे त्याला शक्य होत नाही. असे हे पाणी की जे आपले अस्तित्व टिकवू शकते, त्याची योग्य काळजी न घेतल्यास आपले अस्तित्व धोक्यात आणू शकते. पाण्यामध्ये अनेक प्रकारचे सूक्ष्मजीव जगत असतात. त्यात काही विषाणूही असू शकतात. विशेष करून जे पाणी प्रदूषित झाले आहे. त्या पाण्यात अनेक रोगजंतू तयार होतात. हे पाणी प्यायल्याने सहाजिकच आपले आरोग्य धोक्यात येते. सध्यातरी या जलजन्य आजारांनी सर्वत्र थैमान घातले आहे. टायफॉईड, डायरिया, कॉलरा, कावीळ, मलेरिया, स्वाईन फ्लूसारख्या आजारांनी सर्वत्र हाहा:कार माजवला आहे. अशा स्थितीत निव्वळ हात स्वच्छ धुतले तरी आपण आपल्याला निरोगी ठेवू शकू. पण, हात धुण्यासाठी तरी पुरेसे स्वच्छ पाणी हवे ना?

आपले आजचे वर्तन खचितच आपल्याला शोभनीय नाही. आपण वैज्ञानिक प्रगतीच्या कितीही गप्पा मारल्या तरी आपण नाकारू शकत नाही की ज्याला आपण प्रगती किंवा विकास म्हणत आहोत, ती तर खरी अधोगती आहे. एक नैसर्गिक सजीव म्हणून जगण्याचा आपला हक्क आपणच हरवून बसलो आहोत. दिवसेंदिवस आपले जगणे अधिकाधिक कृत्रिम बनत आहे. काल ज्याला आपण विकास संबोधत होतो ती आपली कृती आज आपल्या अस्तित्वावरच घाला घालेल की काय असे आपणास वाटत आहे. जी प्रगती आपल्याला काल शाश्वत वाटत होती ती आज अनावश्यक वाटत आहे. आरोग्याच्या बाबतीत निव्वळ नवनवीन औषधे निर्माण करणे यावरच आपला भर आहे. पण वेळेवर एक टाका घातल्यास पुढील नऊ टाके वाचवता येतात. हे मात्र आपण सोयीस्करपणे विसरत आहोत. रोग बरा करण्यावर भर देण्यापेक्षा, तो होणारच नाही, हे पहाणे अधिक शहाणपणाचे नाही का? पाणी प्रदूषितच होवू दिले नाही तर, रोगराईवर आपोआपच नियंत्रण बसेल. पण आम्हाला सध्यातरी तात्पुरत्या विकासाशी मतलब आहे. दीर्घकालीन शाश्वत विकास हवाय कुणाला! आताची वेळ निघून गेली की बास, उद्याचे उद्या पाहू. या वृत्ती मुळेच आज पाण्याकडे आपले पूर्ण दुर्लक्ष झालेले आहे. वेळीच सावध होवू या आणि आपल्या आरोग्यातील पाण्याचे महत्व ओळखून त्याशी असणारा आपला आजचा व्यवहार अधिक

जबाबदारीचा कसा होईल ते पाहू या. दररोज प्रत्येक व्यक्तीला पिण्यासाठी, स्वयंपाकासाठी आणि व्यक्तिगत स्वच्छतेसाठी पाण्याची गरज असते. स्वच्छतेसाठी लागणारे पाणी गरीब - श्रीमंत, राव आणि रंक दोघांनाही आवश्यकच असते. ते श्रीमंतानाच लागते आणि गरीबांना लागत नाही असे नाही. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते कोणत्याही स्थितीतील व्यक्तीला ७.५ लिटर पाणी स्वच्छतेसाठी लागते. यापेक्षा जास्तीची गरज म्हणजे २० लिटर पाणी स्वच्छ आरोग्य आणि सकस आहारासाठी पुरेसे असेल. गेल्या दशकात खूप काही करून सुध्दा ७४८ द.ल. लोकांना सुधारित पिण्याच्या पाण्याच्या सुविधा मिळालेल्या नाहीत आणि २.५ बिलियन लोकांना विकसित स्वच्छतेच्या सोयी पुरवण्यात आलेल्या नाहीत. पाणी आणि स्वच्छतेच्या उपायावर केलेल्या खर्चातून चांगला नफा झाल्याचे आढळून आले आहे. स्वच्छतेच्या कायम स्वरूपी उपायावरील नफ्याचे प्रमाण आहे ५:५:१ आणि पिण्याच्या पाण्याच्या कायम स्वरूपी उपायावरील नफ्याचे प्रमाण आहे २:१ जगातील प्रत्येक माणसास स्वच्छ पिण्याचे पाणी आणि उत्तम स्वच्छता व्यवस्था पुरवण्यासाठी १०७ बिलियन अमेरिकन डॉलरच्या निधीची आवश्यकता आहे.

**१०.११.२. पाणी आणि शहरीकरण** :-

सध्या शहरीकरण इतक्या वेगाने होत आहे की तुम्ही या ओळी वाचेपर्यंत चार व्यक्ती शहरात रहावयास गेल्या असतील. आज दर दोन माणसातील एक जण शहरात रहात आहे. जगातील एकूण शहरी करणापैकी ९३ टक्के शहरीकरण विकसनशील देशात होत आहे. त्यातील ४० टक्के जनता झोपडपट्ट्या विस्तारत आहे. सन २०५० पर्यंत आणखीन २.५० बिलियन लोक शहराकडे स्थलांतरीत होतील. शहरांच्या आजूबाजूचा ग्रामीण भाग हळूहळू अदृश्य होवू लागला आहे. तेथील उपजावू शेत जमीन इमारती बांधकामासाठी वापरल्याने शहरांच्या जवळची शेती नाहीशी होत आहे. शहरीकरणाने छोट्या भूभागावर लोकसंख्येची घनता मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्यातून सर्वांना पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे, शहरातील सांडपाण्याची योग्य विल्हेवाट लावणे, घन कचरा वेळच्यावेळी गोळाकरून त्याची योग्य निर्गत करणे, वाहतुकीसाठी पुरेसे आणि रूंद रस्ते तयार करणे आणि त्यांची योग्य निगा राखणे, नागरीकांच्या संरक्षणाची काळजी घेणे वगैरे यंत्रणावर अनावश्यक भार पडतो. या यंत्रणा मग नीट काम करेनाशा होतात.

आज प्रत्येक शहरात हजारो कि.मी च्या पाईप लाईन्स घालण्यात आल्या आहे. पण त्या गळतीमुळे अधिकतर पाण्याचा अपव्ययच करतात. पाच लाख लोकसंख्या असलेल्या अनेक शहरातून सांडपाणी निर्गत यंत्रणाच नाही किंवा आहे ती धड काम करत नाही किंवा ती अपुरी आहे. मग, जल शुध्दीकरण यंत्रणा कुठून असायला. त्यामुळे पाणी प्रदूषणाचा प्रश्न फारच गंभीर होवून बसला आहे, आज एकही असा पाण्याचा स्त्रोत नाही की जो प्रदूषित झाला नाही. अनेक शहरे नद्यांच्या काठी आहेत, नद्यांतून पाणीही आहे, पण ते प्रदूषित आहे. त्यामुळे खर्चालाही वापरता येत नाही. शहरीकरणामुळे शहरांतून रहदारीच्या समस्या तर वाढल्याच आहेत, पण ग्रामीण भागातही त्या मोठ्या प्रमाणावर उद्भवू लागल्या आहेत. शहरांमुळे मोठमोठे महामार्ग बांधले जात आहेत. त्यांच्यासाठीही मोठ्या प्रमाणात उपजावू शेत जमीन वापरली जात आहे. मुळातच शहरे ही अपुऱ्या परिसंस्थेची उदाहरणे आहेत. त्यांना अन्नधान्य आणि भाजीपाल्यासाठी ग्रामीण भागावरच विलंबून रहावे लागते. पण त्यांच्या विस्तारामुळे जर उपजावू जमीनच नाहीशी होणार असेल तर पुढे काय?

munotes.in

युनोच्या वर्ल्ड अर्बनायझेशन रिपोर्टनुसार इथून पुढे भारत, चीन आणि नायजेरिया देशात मोठ्या प्रमाणात शहरीकरण होणार आहे. यु.एन.डी.ए.एस.ए. च्या लोकसंख्या विभागाचे संचालक, जॉन विल्मोथ म्हणतात, 'शाश्वत शहरे तेव्हाच उभी राहू शकतील जेव्हा त्यांना योग्य तितका शुध्द आणि स्वच्छ गोड्या पाण्याचा पुरवठा होईल.'

**१०.११.३. पाणी आणि औद्योगिकरण** :-

प्रत्येक उत्पादनासाठी पाण्याची गरज असते. काही उद्योगांना भरपूर पाणी लागते. तर काहींना कमी पाणी लागते. एक कागदाचा तक्ता करायला १० लिटर पाणी लागते, तर ५०० ग्रॅम प्लास्टिक तयार करण्यास ९१ लिटर पाणी खर्ची पडते. एक कार निर्माण करण्यासाठी एका मोठ्या पोहण्याच्या तलावात भरण्यास जेवढे पाणी लागते त्यापेक्षा अधिक पाणी आवश्यक असते. औद्योगिकरण ही लोकसंख्या वाढीमुळे आवश्यक बाब झाली आहे. लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी, उत्पादनांची संख्या आणि गुणवत्ता वाढीसाठी आणि आर्थिक उत्पन्न मिळवण्यासाठी औद्योगिकरणाशिवाय पर्याय नाही. शाश्वत विकासासाठी शेतीचेही औद्योगिकरण आता करण्यात येवू लागले आहे. त्यामुळे निव्वळ रोजगार निर्मिती, उत्पादन वाढ, गुणवत्ता वाढ आणि नफ्यात वाढ यावरच औद्योगिक जगताचे लक्ष असते. त्यासाठी वापरण्यात येणारी संसाधने कुठून येतात, त्यांचे संधारण होते का ? पाणी किती आणि कसे वापरले जाते ? त्यात काटकसर करता येईल का ? याकडे त्यांचे लक्ष नसते. त्यांच्या कृतीमुळे पर्यावरणाचे कसे आणि किती नुकसान होत आहे हे पहाण्यास त्यांना सवड नसते. औद्योगिकरण आवश्यकच आहे, कारण वाढत्या लोकसंख्येच्या हाताला काम देणे महत्वाचे आहे. पण त्याच बरोबर हेही पहाणे महत्वाचे आहे की उपलब्ध जलसाठे प्रदूषित होणार नाहीत किंवा संपणार नाहीत. कृत्रिम वस्तू तयार करण्यास सुरूवातीला नैसर्गिक संसाधने लागतातच. त्यात पाणी नसेल तर, कोणतीच औद्योगिक प्रक्रिया करता येणे अशक्य होवून बसेल. तेव्हा शाश्वत विकासासाठी औद्योगिकरणाबरोबरच जलसाठ्यांचे संरक्षण आणि संधारण करणे आवश्यक आहे.

सन २००० ते २०५० पर्यंत औद्योगिक वापरासाठी पाण्याची मागणी ४०० टक्के वाढण्याची शक्यता आहे. आणि हे सर्व विकसनशील देशात घडणार आहे. त्यामुळे तेथे वापरले जाणारे उत्पादन तंत्रज्ञान शक्यतो जलविरहीत असावे किंवा कमीतकमी पाण्याचा वापर करणारे असावे. उत्तम जल किंवा सांडपाणी शुध्दीकरण प्रकल्पातील गुंतवणूक परत मिळण्यास बरीच वर्षे जातात. त्यापेक्षा लवकर उत्पादनातून फायदा होतो. त्यामुळे जल किंवा सांडपाणी शुध्दीकरण प्रकल्पावर खर्च करण्यास उद्योगांना कायद्याने सक्ती करावी लागते. नवीन तंत्रज्ञानाने आता पाण्याचा वापर कमी करण्यात यश येवू लागले आहे. टेक्स्टाईल मिल्स, कोका कोलासारख्या मोठ्या सरबत आणि थंड पेयांच्या कंपन्या गेल्या १० वर्षांपासून त्यांच्या उत्पादन विभागातील पाण्याचा वापर कमी करण्यासाठी प्रयत्नशील असून त्यासाठी नवीन तंत्रज्ञानाच्या संशोधनात भांडवल गुंतवू लागल्या आहेत. आपल्याकडे जसे उद्योग वाढत आहेत तशी त्यांची पाण्याची गरजही वाढत आहे. त्यामुळे औद्योगिक वसाहतींना धरणातून पाण्याचा पुरवठा करण्याची वेळ येवू लागली आहे. यातून औद्योगिक घटक आणि शेतकरी यांच्यात तेढ निर्माण होत आहे. शेतकऱ्यांना वाटते की उद्योगांना पाणी दिल्यास त्यांना सिंचनास पाणी कमी पडेल. यातून मार्ग काढण्याची कसरत शासनास करावी लागत आहे. पण, शाश्वत औद्योगिक विकासासाठी शाश्वत पाण्याचा पुरवठा

उद्योगांना होणे आवश्यक आहे. शाश्वत औद्योगिक विकास झाला, तरच तरूणांना रोजगार उपलब्ध होईल, जागतिक बाजारपेठेत आपल्या मालाला मागणी असेल, देशाची आर्थिक स्थिती सुधारेल आणि जगात महासत्ता बनणे शक्य होईल.

### १०.११.४. पाणी आणि शेती :-

जी गोष्ट उद्योग क्षेत्राची तीच कृषि क्षेत्राची. एक कॅलरी अन्न निर्माण करण्यासाठी एक लिटर पाणी लागते. एक कॅलरी अन्न उत्पादन करण्यासाठी १०० लिटर पाणी सिंचनासाठी वापरणे म्हणजे पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय करणे होय. जगात एकूण उपसलेल्या पाण्यापैकी ७० टक्के पाणी सिंचनासाठी वापरले जात असावे. तर विकसनशील देशात हेच प्रमाण ९० टक्के आहे. सन २०५० पर्यंत जगात कृषी उत्पादन ६० टक्के पर्यंत वाढले पाहिजे, तर विकसनशील देशात हेच प्रमाण १०० टक्के असले पाहिजे. सध्या लोकांच्या खाण्यात शाकाहारी पदार्थांपेक्षा मांसाहाराचे प्रमाण जास्त होत चालले आहे. एक किलो भात उत्पादनासाठी ३,५०० लिटर पाण्याची आवश्यकता असते. तर, एक किलो गोमांस निर्माण करण्यासाठी १५००० लिटर पाण्याची गरज असते. हा आहारातील बदल गेल्या ३० वर्षात पाण्याचा वापर वाढतच आहे आणि हा ट्रेंड एकवीसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत असाच राहील. आजची कृषी क्षेत्राची पाण्याची मागणी अशाश्वत आहे. आजच्या अशास्त्रीय पाण्याच्या वापरांच्या पध्दतीमुळे वॉटर टेबल खाली गेले आहे, ॲक्विफर्स नाहीशी झाली आहेत, नदीचे प्रवाह आटले आहेत, वन्यप्राण्यांचे निवास लयास जात आहेत, आणि जागतिक पातळीवर २० टक्के सिंचनाखालील क्षेत्र क्षारफुटीमुळे अनउत्पादित पडीक जमिनीत रूपांतरीत झाले आहे. पाण्याचा उपयोग कमी करणे आणि कमीत कमी पाण्यात जास्तीत जास्त उत्पादन घेण्याचा कृषीक्षेत्राने प्रयत्न केला पाहिजे. तरच शाश्वत कृषी विकास साधता येईल.

आज अति कृषी कार्यक्रमांचा परिणाम म्हणजे पाणी प्रदूषणात अणखीनच वाढ. पण कृषी उत्पादन तर वाढवलेच पाहिजे. विकसित राष्ट्रांनी पाणी प्रदूषण रोखण्यास केलेले उपाय म्हणजे इन्सेंटीव्ह देणे, कडक कायदे व नियम आणि त्यांची कडक अंमलबजावणी, योग्य बाबीसाठी सबसीडी यांचा एकत्रित वापर होय. तेव्हा विकसनशील राष्ट्रांनीही त्यांच्या समोर उदाहरण म्हणून असलेली ही पध्दत वापरून त्यांच्या देशातील पाणी प्रदूषण रोखावयास हवे. तरच शाश्वत कृषी विकास साधणे त्यांना शक्य होईल.

### १०.११. ५. पाणी आणि ऊर्जा :-

पाणी आणि ऊर्जेचा अनन्यसाधारण संबंध आहे. ऊर्जा निर्माण करण्यास पाण्याचा उपयोग करतात, तर पाणी मिळवण्यासाठी ऊर्जेचा वापर केला जातो. पूर्वीपासून नद्यांच्यावर धरणे बांधून जलविद्युत निर्मिती केली जात आहे. आजही ऊर्जेची गरज भागवण्यासाठी सर्वात प्रथम जलविद्युत प्रकल्पांचाच विचार करण्यात येतो. पण, सर्वच ठिकाणी जलविद्युत प्रकल्प उभारण्यास अनुकूल स्थिती नसते. तेव्हा औष्णिक वीज प्रकल्पाचा किंवा अणुवीज प्रकल्पाचा विचार करण्यात येतो. पण, या दोन्ही प्रकल्पांना मोठ्या प्रमाणात पाण्याची उपलब्धता असावी लागते. कारण या दोन्ही प्रकल्पात कोळसा, गॅस, तेल किंवा अणुपासून केवळ उष्णता निर्माण केली जाते. त्यावर पाणी तापवून त्यापासून वाफ तयार करतात आणि त्या वाफेवर जनरेटर चालवून वीज निर्मिती केली जाते. त्यामुळे, सध्या तरी

पाण्याशिवाय वीज ही कल्पना करता येणार नाही. आज जगात जवळ जवळ ८० टक्के ऊर्जाही औष्णिक वीज निर्मिती केंद्रामार्फत निर्माण केली जाते. तर जगातील एकूण जलविद्युतचा वाटा केवळ १६ टक्के इतकाच आहे. पण येत्या दोन दशकांमध्ये जवळ जवळ ३७०० नवीन धरणे आणि जलविद्युत प्रकल्प जगभर उभारले जात असून, जगातील जलविद्युत निर्मिती दुप्पट होईल. पण, त्यासाठी मोठ्या प्रमाणात पाणी लागणार आहे. एकतर समुद्राचे पाणी किंवा प्रक्रिया करून शुध्द केलेले सांडपाणी मोठ्या प्रमाणात वापरले पाहिजे आणि ताज्या पाण्याच्या स्त्रोतावरचा ताण कमी केला पाहिजे. शक्य असल्यास तंत्रज्ञानच असे विकसित करावे की जेणेकरून पाण्याचा वापर करण्याची गरजच पडू नये. जलशीतकरण प्रक्रियेपेक्षा हवेनेच यंत्रणा थंड करणे किंवा वापरलेलेच पाणी पुन्हापुन्हा वापरण्याच्या दृष्टीने वर्तुळाकार फिरवणे म्हणजे जास्तीत जास्त पाणी स्त्रोतातून घेण्याची गरज भासणार नाही. अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतांचा वापर जगातील एकूण ऊर्जा वापराच्या दृष्टीने अगदीच तुटपुंजा आहे. त्याच्या वापरासाठी मोठ्या प्रमाणात समाजाची मानसिकता तयार करणे आणि कमीतकमी बीज भांडवलावर त्याच्या यंत्रांची उभारणी करता येणे शक्य व्हावयास हवे. यात सुध्दा नेहमी अर्धवट किंवा चुकीची माहिती दिली जात असल्याचे निदर्शनास येते. पवन ऊर्जा किंवा सौरऊर्जा स्थानिक संसाधनांच्या सहाय्याने कशी मिळवायची याचे प्रशिक्षण लोकांना देण्याची आवश्यकता आहे. आज वापरात असलेले सौरघट खूप महाग तर आहेतच पण त्या पेक्षा महत्वाचे म्हणजे त्यापासून मिळणाऱ्या विजेचे आर्थिक मूल्य पाहिल्यास तो संपूर्ण प्रकल्प तोट्यातच असल्याचे सांगण्यात येते. या अपारंपारिक ऊर्जांचा विषय निघाला की त्याबाबत नकारात्मक माहिती देवून समोरच्यांना प्रथम नामोहरम केले जाते. प्राथमिक खर्चाचा आकडाच असा सांगितला जातो की ही ऊर्जा वापरण्याची इच्छा असणाराही त्यापासून परावृत्त होतो. १०० मीटर उंचीचे खांब आणि १० - १० मीटरचे पंखे असलेल्या पवन चक्क्या सर्वांनाच उपयुक्त नसतात. त्यांना चारपाच कुटुंबाची गरज भागवतील अशा १५ ते २५ मीटर उंचीच्या आणि छोट्या पात्यांच्या पवन चक्क्या चालू शकतात. त्यादृष्टीने संशोधन होणे आणि ते अधिकाधिक समाजाभिमुख असणे गरजेचे आहे. तसेच छोट्या पोर्टेबल जलविद्युत प्रकल्पांचे जाळे संपूर्ण ग्रामीण भागात उभारता येणे शक्य आहे. अगदी पावसाळ्याचे तीन महिने जरी त्याचा उपयोग झाला तरी मोठ्या विद्युत प्रकल्पावरील तेवढाच भार कमी होईल. तेव्हा ऊर्जेच्या बाबतीत शाश्वत विकास साधायचा असेल तर मोठ्या प्रकल्पांच्या जोडीला लहान लहान प्रकल्प तयार करणे आवश्यक आहे.

### १०.११. ६. पाणी आणि समानता :-

विकसनशील देशामध्ये केवळ कुटुंबासाठी पाणी मिळवण्यात स्त्रियांना आणि लहान मुलामुलींना त्यांच्या दिवसापैकी २५ टक्के दिवस खर्ची घालावा लागतो. दर दिवशी जगातील स्त्रिया २०० द.ल. तास पाण्यासाठी खर्च करतात. पुरूषमंडळी क्वचितच पाणी आणतांना आढळतात. खर तर स्त्रियांचा हा वेळ त्यांच्या कुटुंबासाठी काही आर्थिक कमाई करण्यासाठी, शाळेत जाण्यासाठी किंवा घरातील इतरांची काळजी घेण्यासाठी वापरता येवू शकतो. स्त्रियांची आणि लहान मुलामुलींची ही स्थिती बदलणे आवश्यकच आहे. त्यासाठी वस्ती जवळच पाणी उपलब्ध करण्यासाठी आणि आरोग्य रक्षणासाठी केलेला खर्च फायदेशीरच ठरतो. पाणी आणि स्वच्छतेवर केलेल्या प्रत्येक डॉलरमागे ५ ते १० अमेरिकन डॉलरचा फायदा होवू शकतो.

जागतिक तापमान वाढीचा परिणाम हवामानावर झालेला दिसतो. त्यामुळे पाण्याचे पावसाच्या रूपाने पडणे खूपच अनिश्चित झाले आहे. त्यात अनेक प्रकारच्या उपयोगासाठी पाण्याची गरज भासू लागली आहे. त्यात पाणी वापर स्पर्धा सुरू आहे. मानव निर्मित अनेक कृती पाण्याविषयी विध्वंसक स्थिती तयार करत आहेत. यात खरा बळी पडतो आहे, गरीब सामान्य माणूस. विकसित राष्ट्रांना यामुळे फारसा फरक पडत नाही. पण, विकसनशील देशांच्याकडे पुरेसे आर्थिक पाठबळ नसल्याने ते यावर प्रतिबंधात्मक उपाय करू शकत नाहीत. सर्व मानव जातीचे कल्याण व्हायचे असेल, तर समन्यायी तत्वावर सर्वच संसाधनांचे वितरण व्हावयास हवे. अगदी पाणीसुध्दा त्याच तत्वावर वितरित होणे महत्वाचे आहे. आजची जगाची रीत आहे ८० टक्के संसाधने २० टक्के लोक उपभोगत आहेत. तर २० टक्के संसाधने ८० टक्के लोकांच्या वाट्याला येत आहेत. समानतेचा नुसता नारा देवून उपयोगी नाही, तर प्रत्यक्षात तशा कृती व्हायला हव्यात. तरच जगातील सर्व मानव जात सुखी होईल. आज आपल्याला दिसते आहे की लोक स्वत:ला निरनिराळी लेबले लावून वेगवेगळ्या गटात विभागून घेण्याच्या आणि इतरांपेक्षा आपण अधिक मातब्बर आहोत हे दाखवण्यात गुंतले आहेत. त्यातून युध्दजन्य स्थिती निर्माण होत आहे. सर्व जगात अशांत परिस्थिती जाणवत आहे. शाश्वत विकास तर केवळ स्वप्नच ठरणार नाही ना ? अशी भिती सर्वांनाच वाटत आहे.

### १०.११.७. पाणी आणि निसर्ग :-

पाणी आणि निसर्ग यांचे नाते अतूट आहे. विशेषकरून निसर्ग म्हणजेच जीवावरण असे समीकरण असेल, तेव्हा तर जीवावरणाच्या गाभ्यातच पाणी असलेले आढळेल. कारण मुळात संपूर्ण जीवावरणाची निर्मितीच पाण्यातून झाली असल्याने पाण्याशिवाय जीवावरण असूच शकत नाही. सर्व परिसंस्था - जंगल परिसंस्था, पाणस्थळ जमीन परिसंस्था, गवताळ प्रदेश परिसंस्था, या गोड्या - ताज्या पाण्याच्या जागतिक जलचक्राच्या केंद्रस्थानी आहेत. संपूर्ण ताज्या पाण्याचे जलचक्र हे परिसंस्थांच्या उत्तम कार्यक्षमतेवर अवलंबून आहे. परिसंस्थातील जल व्यवस्थापनासाठी जलचक्र सुयोग्यरित्या चालणे अनिवार्य आहे, हे आपण ओळखले पाहिजे. परंतु अनेक आर्थिक विकासाच्या मॉडेलमध्ये परिसंस्थांच्या या कार्याला फारसे महत्व देण्यात आल्याचे दिसत नाही. उलट त्याकडे दुर्लक्षच झाल्याचे आढळते. यामुळे पाण्याच्या अशाश्वत वापराचे प्रमाण वाढताना आणि परिसंस्थांचा ऱ्हास होतानाच पहायला मिळतो. आफ्रिकेतील ओकावांगो नदी परिसंस्था ही आजही तिच्या मुळ शुध्द स्वरूपात आढळते. पण आता दिवसेंदिवस शहरातील आणि औद्योगिक वसाहतीतील प्रक्रिया न केलेले सांडपाणी आणि शेतातील रसायने मिश्रीत पाणी नदीत मिसळू लागल्याने नदी परिसंस्था कमकुवत बनत आहे. तिची इतर कामासाठी पाणी पुरवण्याची क्षमता हळूहळू कमी होवू लागली आहे. आजच्या काळाची गरज म्हणून पर्यावरणपूरक शाश्वत विकासाकडे आपण वळले पाहिजे. त्यासाठी परिवैज्ञानिकी मूल्यांच्या आधाराने आपण विकास आराखडा तयार करण्याची गरज आहे. परिवैज्ञानिकी पध्दतीत परिसंस्थेतील प्रत्येक घटकाचे मूल्य लक्षात घेवून त्याचे कार्य ठरवलेले असते आणि त्या आधारेच त्यातील अंतर संबंध विकसित होत असतात. इथे पाणी हे जीवनावश्यक घटक तर आहेच, पण ते पोषक द्रव्ये (न्युट्रीयंट्स) आणि ऊर्जा यांचे एकाकडून दुसऱ्याकडे वहन करण्याचे प्रमुख माध्यम असते. मानवी समाजाच्या दृष्टीनेही पाणी समाजाला पोषक अन्नपुरवठा करण्यात आणि व्यवसाय रोजगार उपलब्ध करून देण्यात अग्रेसर असते. त्यामुळे आपल्या

munotes.in

समोरचे खरे आव्हान आहे ते म्हणजे नैसर्गिक संसाधने आणि कृत्रिम संसाधने यात समन्वय साधून शाश्वत विकास कसा साधावा याचे नियोजक आणि निर्णयक्षम व्यवस्थापनास आर्थिक विकासावर चर्चा करतांना परिसंस्था संधारण करण्यावर भर द्यावाच लागेल. कारण नैसर्गिकपणे परिसंस्थातील पाण्याचे संरक्षण जितक्या चांगल्या प्रकारे आणि कमी खर्चात होईल, तितक्या कमी खर्चात ते कृत्रिमपणे करता येणार नाही. तेव्हा पाण्याचे दीर्घकालीन नियोजन आणि विकास करावयाचा असेल तर परिसंस्था आधारित व्यवस्थापनाची कासच धरावी लागेल.

आज जागतिक जलदिन २०१५ च्या निमित्ताने आपण हे विचार मंथन सुरू करत आहोत, ते समाजाच्या सर्वच घटकांपर्यंत पोहोचले पाहिजे. त्यासाठी प्रत्येकाने आपापल्या कार्यक्षेत्रात थोडे सक्रिय झाल्यास मोठ्या जनसमुदायापर्यंत सहज पोचता येईल

## १०.१२. भारतातील शाश्वत विकासाची सद्यस्थिती : प्रतिनिधीक उदाहरणे

शाश्वत विकासाची तत्वे अंगीकारणे भारतासारख्या विकसनशील देशाला अत्यावश्यक आहे. भारताची पारंपारिक कृषिप्रधान अर्थव्यवस्था विकसीत देशांप्रमाणे जलद आर्थिक विकासाचा मार्ग स्वीकारू लागली आहे. त्यातून होणारा संसाधनाचा -हास हा देशातील नैसर्गिक परिसंस्था -हास होण्यास कारणीभूत ठरू शकतो. त्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण करून आर्थिक विकास साधण्यासाठी अशाश्वत विकासाकडून शाश्वत किंवा धारणक्षम विकास साध्य करणे गरजेचे आहे. शाश्वत विकास आणि पर्यावरणाचे संरक्षण या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. म्हणूनच आंतरराष्ट्रीय पातळीपासून स्थानिक पातळीपर्यंत दोन्ही संकल्पनाचा एकत्रीत विचार केला जातो. भारतामध्ये १९७२ साली पर्यावरण नियोजन व समन्वय राष्ट्रीय परिषद (National council of Environmental Planning and Co-ordination-NCEP) स्थापना केली. तसेच एकत्रित व प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी १९८५ मध्ये भारत सरकाने स्वतंत्र पर्यावरण व वने मंत्रालय सुरू केले. यांच अनुषंगाने प्रत्येक घटकराज्यानी पर्यावरण प्रदुषण नियंत्रण विभाग स्थापन केलेले आहेत. ज्यामध्ये सेंटर फॉर सायन्स अॅन्ड इनव्हारवमेंट (CSE) नवी दिल्ली, सेंटर फॉर इनव्हारवमेंट एज्युकेशन (CEE), बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी (BNHS) इत्यादी संस्थांमधून प्रयत्न केले जात आहे. शासकीय प्रयत्नाबरोबरच अशासकीय संघटनानी (NGO) प्रयत्न केलेले आहेत. ज्यामध्ये आगाखान ग्रामीण मदत कार्यक्रम, विक्रम साराभाई विकास व अन्योन्य क्रिया केंद्र आणि भारतीय उद्योग प्रतिष्ठान सारख्या अशासकिय संघटनानी शाश्वत विकासासाठी खालील काही महत्वाची उदाहरणे व प्रयत्न केलेले आहेत. चिपको आंदोलन ही भारतीय इतिहासातील महत्वपूर्ण घटना आहे. सुंदरलाल बहुगुणा यांच्या नेतृत्वाखाली

## १०.१३. शाश्वत आर्थिक विकाससाठी उपाययोजना

विशिष्ट मर्यादपर्यंत आर्थिक वृध्दीची स्वीकृती करणे, दिर्घकालीन उद्देशांचे अनुकुलन करणे, संसाधनाचा शाश्वत वापर, संसाधनाचे प्रभावी नियोजन, संसाधनाचे योग्य मुल्यांकन, जागतिक विकासासाठी विज्ञान, तंत्रज्ञान आणि पर्यावरणीय ज्ञानाचे उपयोजन, आंतरपीठ,

आंतरगट आणि आंतरजाती यांच्या समतेसाठी काळजी घेणे, सर्वांना किमान मानवी गरजांचे समाधान देणे. उपयुक्ततेचे संवर्धन, पर्यावरण काळजी आणि विकासाचे एकात्मिकरण करणे, परिस्थिती एकात्मतेसाठी देखभाल करणे, साधन संपत्तीचे उपयोजन करणे, साधन संपत्ती उपभोगात घट करणे, पुन्हा पुन्हा वापर आणि पुनर्चक्र दृष्टिकोनाचा स्विकार योग्य तंत्रज्ञानाचा वापर उपाययोजना केल्यास पर्यावरणाचे संवर्धन होऊन शाश्वत आर्थिक विकास मोठ्या प्रमाणात घडून येईल.

## १०.१४. सारांश

शाश्वत विकास हा विशिष्ट प्रदेश किंवा राष्ट्र यांच्याशी मर्यादित नसून ती संपूर्ण जगाची गरज आहे. भविष्यात मानवी समाजाच्या कल्याणासाठी परिसंस्थांचे रक्षण करणे व परिसंस्थांतील अखंडत्व राखणे हे शाश्वत विकास व पर्यावरण व्यवस्थापनाचे ध्येय आहे. जैवविविधतेचे संरक्षण व परिरक्षण करणे हे कायमस्वरूपी काम आहे आणि केवळ पर्यावरण दिवस साजरे करण्यापूर्ती विचार करून होणार नाही. शाश्वत विकासासाठी पर्यावरण प्रभाव मूल्यांकन तपासणी, पर्यावरण व्यवस्थापन पद्धती, पर्यावरण जोखीम मूल्यमापन इत्यादी साधनांचा स्वीकार करणे आवश्यक आहे. विकास ही सतत चालणारी प्रक्रिया आहे असा सतत चालणार विकास साधत असताना मानवाने नैसर्गिक संपत्तीचा वापर मोठ्या प्रमाणात केला आहे. मानव व पर्यावरण यांचा अतुट संबंध असल्यामुळे पर्यावरण घटकातून आर्थिक उकल होत गेली व पर्यावरण मार्गातून आर्थिक विकासावर भर दिला. पर्यावरण संरक्षण व मानवी जीवन एकमेकांना पूरक आहे याची जाणीव होऊन शाश्वत विकासाची संकल्पना पर्यावरण संरक्षण दृष्टिकोनातून स्पष्ट करण्यात आली. जो विकास मानवाच्या सध्याच्या व भविष्यकालीन गरजांची संतुलित पुर्ती करतो तो विकास शाश्वत विकास होय. शाश्वत विकासाची संकल्पना पर्यावरण महत्त्व देणारी आहे. यामध्ये मानवी गरजा, आर्थिक वाढीचे एकात्मीकरण पर्यावरणीय आरोग्य व निरंतर आर्थिक विकास केंद्रस्थानी असतो. पर्यावरण व विकास आयोगाव्दारे १९८७ पासून शाश्वत विकासाची संकल्पनेचा उगम होऊन पर्यावरण संरक्षणातून त्याचा विकास होत आहे. शाश्वत विकासासाठी नैसर्गिक साधनसंपत्तीचा हानी व भावी पिढीच्या गरजा भागविण्यासाठी निसर्गाला कोणताही धक्का न लावता लोकांच्या आजच्या गरजा पूर्ण केल्या जातात व आर्थिक विकास साधला जातो. पर्यावरणाचा होणारा हास व शाश्वत विकासाची तत्वे स्वीकारून नैसर्गिक साधन संपत्तीचे संवर्धन करून जलद आर्थिक विकासाचा मार्ग स्वीकारणे व मूलभूत बाबींवर भर देणे ही काळाची गरज आहे.

वाढत्या लोकसंख्येमुळे औद्योगिकरणातही वेगाने वाढ होत आहे. त्याचा प्रत्यक्ष प्रभाव पर्यावरणाच्या हासात होत आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीचा अनावश्यक वापर केल्याने पर्यावरणीय असमतोल निर्माण झालेला आहे. लोकसंख्या नियंत्रणाचे विविध उपाय अवलंबूनच पर्यावरणाचे संरक्षण केले जाऊ शकते. सद्यस्थितीत भारतात शाश्वत विकासाची गती वाढविणे गरजेचे आहे. वर्तमान पिढीच्या गरजा अमर्याद वाढल्या आहेत. वाढत्या गरजांमुळे भविष्यात नैसर्गिक साधनसंपत्ती टिकून राहणार काय हा प्रश्न निर्माण झाला आहे. म्हणून वर्तमान पिढीचा विचार करताना भावी पिढयांच्या कल्याणाचा विचार करणे अगत्याचे आहे त्यादृष्टीनेच शाश्वत विकास केला पाहिजे. सर्वसमावेशक वृध्दीच्या दिशेनेच आर्थिक विकास झाला पाहिजे देशातील गरीबी व दारिद्र्य निर्मूलनाचे ते एकमेव उपाय आहे. 'भवत्

सब्ब मंगलम्' ही नीती मानवी कल्याणाची, समतेची व विश्वबंधुत्वची नीती आहे. ती आचरणात येऊनच कल्याणकारी राज्याची निर्मिती होऊ शकते. संपूर्ण जीवसृष्टीच्या कल्याणासाठी जागतिक तापमान वृध्दीवर नियंत्रण ठेवता येईल असे धोरण आखणे आवश्यक आहे. त्यावर पृथ्वीचे संतुलन अवलंबून आहे. या व इतर अनेक बाबींचा विचार करुन देशाची धोरणे आखल्यास व राबविल्यास संपूर्ण मानवजातीचे कल्याण झाले नाही तरच नवल.

आधुनिक काळात तंत्रविज्ञानाच्या प्रगतीमुळे विकास कार्याला गती प्राप्त झाली असली तरी उत्पन्नाचा हिशोब करतांना पर्यावरणाच अवनतीचा खर्च वजा करण्याचा विचार त्यामध्ये अंतर्भूत नाही. उपयोगाचा दर नैसर्गिक पुनरुत्पत्तीच्या दरापेक्षा अधिक होत आहे. त्यामुळे नैसर्गिक साधनसंबत्तीच्या अवनतीला सुरूवात होत असते. त्यातून पर्यावरणाचे संरक्षण धोक्यात येते. याचा दुष्परिणाम वर्तमान पिढीवरच होत नसून भविष्यातील अनेक पिढ्यांवर होत असतो. म्हणून नैसर्गिक साधनधन टिकवायचे असेल तर आर्थिक व्यवहारा बरोबरच पर्यावरण संरक्षणाची काळजी घेणे गरजेचे आहे. त्यासाठीच शाश्वत विकासाची संकल्पना विकसीत होणे आवश्यक आहे.

## १०.१५. प्रश्न

१. शाश्वत विकास म्हणजे काय ते सांगून शाश्वत विकासाचे ध्येय स्पष्ट करा.

२. शाश्वत विकास आणि आपेक्षा स्पष्ट करा.

३. शाश्वत विकासात पर्यावरणाचे महत्व स्पष्ट करा.

४. पाणी आणि शाश्वत विकास स्पष्ट करा.

५. भारतातील शाश्वत विकासाची सद्यास्थिती, प्रतिनिधिक उदाहरणे स्पष्ट करा.

## १०.१६. संदर्भ


१. प्रा.राजदरेकर / प्रा. गर्गे - आधुनिक जगाचा इतिहास - विद्या प्रकाशन, नागपूर

२. ना. सी. दिक्षीत- पश्चिमात्य जग - पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर

३. गायकवाड, कदम, थोरात - आधुनिक जगाचा इतिहास - भाग १ - श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर.

४. प्रा. हरिदास जाधव व प्रा. कल्याण चव्हाण - आधुनिक जगाचा इतिहास - अक्षरलेण प्रकाशन, सोलापूर.

५. डॉ. सुमन वैद्य - आधुनिक जग - श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर .

६. डॉ. सौ . शरावती शिरगावकर - आधुनिक युरोप - श्रीविद्या प्रकाशन, पुणे.

७. श. गो. कोलारकर - युरोपचा इतिहास - आनंद प्रकाशन, नागपूर

८. प्रा. जितेंद्र भामरे- आशियाचा इतिहास - शेठ प्रकाशन, मुंबई .

९. डॉ. रमेश गुप्ते व शे. रा. कुलकर्णी - आग्नेय आशियाचा इतिहास - परिमल प्रकाशन, औरंगाबाद

१०.डॉ. अनिलकठारे - आधुनिक चीन - कल्पना प्रकाशन, नांदेड .

११.डॉ. मु. बा. देवपुजारी - रशियाचा इतिहास - श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर

१२.डॉ. मु. बा. देवपुजारी - आधुनिक आशियाचा इतिहास - श्री मंगेश प्रकाशन , नागपूर

१३.डॉ. नि. वक्कानी - आधुनिक भारताचा इतिहास - श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर

१४.डॉ. जालिंदर भोसले - आधुनिक आशियाचा इतिहास - मुरलीधर प्रकाशन, पुणे

१५.डॉ. सुमन वैद्य व डॉ. शांता कोठेकर - भारताचा इतिहास - श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर

१६.Adolf Hitler - Mein Kampf - KRJ Book International, Delhi

१७.D. R. Sardesai and B. K. Gokhale - World History - Kitab Mahal Publication, Alahabad.

१८.M. D. David - Rise and Growth of Modern China.

१९.तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी - मराठी विश्वकोश - भाग २ व ९

२०.डॉ. शांता कोठेकर, अमेरिकेच्या संघराज्याचा इतिहास - श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर

२१.डॉ. सुमन वैद्य - रशियाचा इतिहास - श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.

२२.विस्टन चर्चील - दुसरे महायुद्ध - महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, १९७८.

२३.डॉ. हुकुमचंद जैन, डॉ.कृष्णचंद्र माथुर - आधुनिक जगाचा इतिहास - के. सागर प्रकाशन पुणे.

२४.देशपांडे श्रीधर व विनायक, भारतीय अर्थव्यवस्था, हिमालय पब्लिशिंग हाऊस, मुंबई, २००४, पृ.४७५.

२५.सवदी अरूण, आपले पर्यावरण, निराली प्रकाशन, पूणे, २००७, पृ. १३१.

२६.झामरे जी.एन. (डॉ.), भारतीय अर्थशास्त्र, विकास व पर्यावरण, पिंपळापूरे पब्लिशर्स, नागपूर,२००४, पृ.४१०.

२७.कुरूक्षेत्र (हिंदी), पर्यावरण विशेषांक, दिसंबर - २००४.

२८.यशदा, यशमंथन, ऑक्टोबर - डिसेंब - २००९.

२९.चव्हाण, गणेश. (२००९). अध्ययन-अध्यापन : पारंपरिक ते आधुनिक. पुणे : नित्यनूतन प्रकाशन.

३०.कदम, व्ही. के. (२०१२). वर्तमान शिक्षण - शिक्षक शिक्षण. नागपूर : विद्या प्रकाशन.


❖❖❖❖